नगर वाचनालय, सातारा

# सरदार पृथ्वीसिंह

[ एका क्रांतिकारकाचें चरित्र ]

नगर वाचनालय, सातारा

लेखक

राहुल सांकृत्यायन

चरित्र
३१६

अनुवादक

स. ह. मोडक

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

लोक-साहित्य

८७ शिवाजी पार्क, मुंबई २८

किंमत तीन रुपये

| | | |
|---|---|---|
| पहिली मूळ हिन्दी आवृत्ति | : सप्टेंबर | १९४४ |
| दुसरी ,, ,, ,, | : जून | १९४६ |
| पहिली गुजराती आवृत्ति | : जानेवारी | १९४५ |
| दुसरी ,, ,, | : ऑक्टोबर | १९४५ |
| पहिली मराठी आवृत्ति | : डिसेंबर | १९४७ |

मुद्रक : एम्. बी. राव, न्यू एज प्रिंटिंग प्रेस १९० बी खेतवाडी मेनरोड, मुंबई ४
प्रकाशक : शकुन्तला मोडक, लोक-साहित्य, ८७ .शिवाजी .पार्क, मुंबई २८

नगर वाचनालय, सातारा

# विषय सूची


| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| १. बालपण ... ... ... | ५ |
| २. अमेरिकेच्या मार्गावर ... ... | ११ |
| ३. अमेरिकेंत ( १९१२-१९१४ ) ... ... | १६ |
| ४. असफल संग्राम ... ... ... | २६ |
| ५. मृत्यूची मार्गप्रतीक्षा ... ... ... | ३४ |
| ६. काळ्या पाण्यावर ... ... ... | ५३ |
| ७. हिंदुस्थानांतील तुरुंगांचा अनुभव ... ... | ७५ |
| ८. अज्ञातवास ... ... ... | ८९ |
| ९. काठेवाडांत व्यायाम-शिक्षक ... ... | ९५ |
| १०. पुन्हां बेपत्ता ... ... ... | ११६ |
| ११. सोविएत रशियांत ( १९३१-३५ ) ... ... | १२६ |
| १२. काबूल जेलमधील नरकयातना ... ... | १४५ |
| १३. सोविएत भूमींतून परत हिंदुस्थानांत ... ... | १५२ |
| १४. आत्मसमर्पण व तुरुंगवास ... ... | १६१ |
| १५. गांधीजींच्या सहवासांत ... ... ... | १७१ |
| १६. पार्टीचें कार्य व तुरुंगवास ... ... ... | १८३ |
| १७. विवाह आणि मुक्तता ... ... ... | १८६ |


SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA
1367

# राहुल–साहित्य

या यादींतील * या चिन्हानें निर्देशिलेल्या ग्रंथांचे मराठी अनुवाद ‘ लोक-साहित्या ’ तर्फे प्रसिद्ध झाले आहेत अगर होत आहेत. इतर ग्रंथांचे अनुवादहि वाचकांच्या मागणीनुसार यथावकाश प्रसिद्ध करण्यांत येतील.

**प्रवास-वर्णनें** ( १ ) मेरी लदाख यात्रा ( २ ) लंका ( ३ ) तिब्बतमें सवा वर्ष ( ४ ) मेरी तिब्बत यात्रा ( ५ ) मेरी योरोप यात्रा ( ६ ) जापान ( ७ ) ईरान ( ८ ) सोविएत भूमि.

**साम्यवाद व राजनीत** ( ९ ) बाईसवीं सदी * ( १० ) साम्यवाद ही क्यों ? ( ११ ) दिमागी गुलामी ( १२ ) क्या करें ? ( १३ ) तुम्हारी क्षय ( १४ ) सोविएत न्याय ( अनुवाद ) (१५) राहुलजीका अपराध ( १६ ) सोविएत संघ कम्यूनिस्ट पार्टीका इतिहास ( दो भाग ) ( १७ ) मानव समाज ( १८ ) मार्क्सवाद पाठावलि ( १९ ) भागो नहिं, दुनियाको बदलो.

**तत्वज्ञान** : ( २० ) वैज्ञानिक भौतिकवाद ( २१ ) दर्शन-दिग्दर्शन.

**विज्ञान** : ( २२ ) विश्व की रूपरेखा.

**साहित्य व इतिहास** : (२३) पुरातत्व निबन्धावलि (२४) तिब्बतमें बौद्धधर्म (२५) कुरानसार (२६) साहित्य निबन्धावलि (२७) हिन्दी काव्यधारा.

**कादंबऱ्या व गोष्टी** : ( २८ ) शैतानकी आँख ( २९ ) विस्मृतके गर्भमें ( ३० ) जादूका मुल्क ( ३१ ) सोनेकी ढाल ( ३२ ) जीनेके लिये * ( ३३ ) सतमीके बच्चे ( ३४ ) वोल्गा से गंगा * ( ३५ ) सिंह सेनापति * ( ३६ ) जय यौधेय *

**चरित्रें** : ( ३७ ) नये भारतके नये नेता ( ३८ ) सरदार पृथ्वीसिंह * ( ३९ ) मेरी जीवनयात्रा.

**बौद्धधर्म** : (४०) बुद्धचर्या (४१) मज्झिमनिकाय (४२) दीघनिकाय ( ४३ ) विनयपिटक ( ४४ ) धम्मपद ( ४५ ) बौद्ध-दर्शन.

**भोजपुरी भाषेंतील नाटकें** : ( ४६ ) जपानिया राछछ ( ४७ ) जरमन वाकै हार निहिचय ( ४८ ) देश रक्षक ( ४९ ) ई हमार लड़ाई ( ५० ) ढुनमुन नेता ( ५१ ) जौंक ( ५२ ) महेरारुनकी दुरदशा ( ५३ ) नइकी दुनिया.

**तिबेटी भाषा** : ( ५४ ) तिब्बती बाल शिक्षा ( ५५ ) तिब्बती व्याकरण.

**संस्कृत** : ( ५६ ) विज्ञप्तिमात्रा सिद्धिः ( ५७ ) अभिधर्मकोश वृत्तिः

**संस्कृत-सिंहल** : (५८-६१) पहिलें, दुसरें, तिसरें, चवथें पुस्तक.

# सरदार पृथ्वीसिंह

★

## ( १ )

### बालपण

सन १६५० अगर १७०० चा सुमार असेल. राजपुतान्यांतील जेसलमीर येथून दहा बारा भट्टी रजपूत जमातीचे घोडेस्वार दुष्काळामुळें गांव सोडून बाहेर निघाले. किती तरी दिवस फांके मारीत भटकत भटकत ते लालड्रू नामक गांवाच्या नजीक येत होते. गव्हाचें तयार पीक शेतांत लहरत असलेलें त्यांना दिसलें. त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें. त्यांनीं मनाशीं कांहीं तरी बेत ठरवून शेतकऱ्यांकडे विचारपूस केली. शेतकऱ्यांकडून उत्तर मिळालें—'हें आमचें शेत आहे.' हें उत्तर बहुधा नरमाईनें दिलें गेलें असावें म्हणून घोडेस्वारांची हिंमत वाढली. त्यानीं शेतकऱ्यांना दमदाटी देऊन बजावलें—"आम्हीं परत येईपर्यंत पिकाची कापणी करूं नका." कांही दिवस आसपास भटक्या मारून परत येऊन पाहातात तों पीक जसेंच्या तसें उभें ! तेव्हांपासून हे भट्टी घोडेस्वार पिकाचे व गांवचे मालक बनले. तेव्हांपासून लालड्रू हें भट्टी रजपुतांचें गांव झालें. कांहीं काळ एकाच्या अमलाखालीं, पुढें दुसऱ्याच्या अमलाखालीं असें करतां करतां पतियाळाच्या भट्टी राजवंशाच्या अमदानींत लालड्रू गांवच्या भट्टी मंडळींना जरा विशेष चांगले दिवस आले कीं काय यांचा कांहीं पत्ता लागत नाहीं. पण गांवावरची सगळी सत्ता त्यांच्याच हातीं राहिली. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस लालड्रूची चांगली ४००० वस्ती होती. दुकानें, कचेरी, पोलिसठाणें इत्यादि येथें असल्यामुळें एका लहानशा तालुक्याच्या ठिकाणाचें स्वरूप त्याला आलेलें दिसत होतें. पण रजपुतांचें चरितार्थाचें साधन केवळ शेती हेंच होतें. गांवांत रजपुतांचीं ८० घरें होतीं. गांवचा फाडिया [ पाटील ] हा यांच्यापैकींच असून तो रजपूत जमातींत सन्माननीय समजला जात असे. इथेंच शिक्षागृह

असे. गांवांत पकडलेल्या चोरांना काठ्यांचा अगर फटक्यांचा मार इथेंच दिला जाई. त्यावेळीं फाडिया कुटुंबांत तेरा चौदा माणसें होतीं. त्याच्या मालकीची ८० एकर जमीन होती. लालडू हें गांव अंबाल्याहून काल्काला जाणाऱ्या रेल्वेलाइनीवर तिसरें स्टेशन आहे.

## जन्म

चौधरी शादीराम व टावरच्या चव्हाणांची कन्या या दंपत्याला ता. १५ सप्टेंबर १८९२ रोजीं पहिला मुलगा झाला. त्याचें नांव ठेवण्यांत आलें पृथ्वीसिंह. भट्टी लोकांच्या रिवाजानुसार त्यालाहि तरवारीचें बाळकडू पाजण्यांत आलें. मात्र या चरणामृताची इज्जत इतक्या बहादुरीनें फार थोड्यांनीं राखली असेल.

फाडिया कुटुंब खाऊन पिऊन सुखी होतें. परंतु जोंपर्यंत पावसाची कृपा तोंपर्यंतच त्यांची स्थिति चांगली असे. त्यांच्या शेतांना कालव्याची अगर विहिरीच्या पाण्याची कसलीच सोय नव्हती. पाऊस पडला तर धान्य पिकावयाचें व परिवारांतील १५ माणसांना डाळ रोटी व कापडचोपड मिळण्याची सोय व्हावयाची. साल अखेरीस कांहीं शिल्लक टाकणें म्हणजे मुष्किलीचीच गोष्ट होती.

पृथ्वीसिंहांचें वय त्या वेळीं पांच वर्षांहून जरा जास्त होतें. त्यांचा धाकटा भाऊ डिपटी अजून दुधपितें बाळच होता. याच सुमारास संवत १९५६ चा [इ. स. १८९८] भयंकर दुष्काळ आला. धान्य पिकलें नाहीं. लोक एकेका दाण्यासाठीं तडफडूं लागले. पृथ्वीसिंहांना अजूनहि त्या प्रसंगाची आठवण आहे. त्यांचे चुलत आजोबा [ निहालसिंह ] इकडे तिकडे भटकून गाजरें गोळा करून घरीं आणीत असत व त्यांना थोडेंसे पीठ लावून तीं उकडून त्यांची लापशी तयार होई; आणि उपाशी झोंपलेल्या मुलांना जागें करून त्यांना कसेंबसें जगविण्यासाठीं ती लापशी देण्यांत येत असे.

चौधरी शादीरामांना फार दिवस घरीं राहवलें नाहीं. घरांतला एक भाऊ ब्रम्हदेशांत पोलिसाची नोकरी करीत होता. चौधरी शादीराम यांनाहि घराला रामराम ठोकून ब्रम्हदेशाची वाट धरणें भाग पडलें. चौधरींची तरुण अंगकाठी भरपूर सहा फूट उंच, आडव्या हाडांची, निरोगी व बलिष्ट होती. पण त्यांनीं पोलिसाच्या नोकरीचा विचार सोडून देऊन दूध विकण्याचा धंदा पसंत केला.

पृथ्वीसिंह व त्यांचा भाऊ या दोघांना त्यांचे मामा आपल्या गांवीं घेऊन गेले. तिथें खाण्यापिण्याची ददात नव्हती. गांवांत शाळा नव्हती म्हणून शिक्षणाची कांहीं सोय होऊं शकली नाहीं. गुरें राखणें, मुलांच्या बरोबर खेळणें-बागडणें यांतच

नगर वाचनालय, सातारा

त्यांचा सारा वेळ जाई. त्यांचे चारहि मामा चांगल्यापैकीं शिकारी होते. कित्येकदां रात्ररात्रभर बंदूक घेऊन रानडुकरांची शिकार करण्यासाठीं बाहेर भटकत असत. पृथ्वीसिंह नेहमीं त्यांच्या बरोबर असत आणि कितीतरी वेळां तर त्यांना भाला घेऊन मामाच्या जवळ उभें राहावें लागे. मामाच्या बरोबर या शिकारींच्या कार्यक्रमांत भाग घेतल्यामुळें पृथ्वीसिंहांच्या मनांतून भुतांचें व जंगली जनावरांचें भय पार नष्ट झालें.

पृथ्वीसिंह आपल्या बालसेनेचे निर्भय सेनापति होते. शेजारच्या गांवांतल्या गुराख्यांशीं जेव्हां कधीं तरी यांची जुंपे तेव्हां हे त्यांच्या गर्दींत घुसून त्यांच्या हातांतल्या काठया हिसकावून घेत असत. कधीं कधीं प्रतिस्पर्धी संख्येनें अधिक असत आणि मारहि खावा लागे. झाडावर चढण्याच्या खेळांत कितीदां तरी घसरून पडल्यामुळें त्यांच्या अंगावर जागोजाग जखमा होत असत. पृथ्वीसिंहांना बालपणापासूनच शाळेचें दर्शन घडलें नव्हतें. पण पाठशाळेपेक्षांहि मोठया अशा जीवनाच्या शाळेंत ते शिक्षण घेत होते; तिथेंच त्यांनीं निर्भयता, पुढारीपण व शौर्य या गुणांचे धडे घेतले. त्याचबरोबर त्यांची शरीरप्रकृतीहि दणकट झाली.

ब्रम्हदेशांत वडिलांचा दुधाचा धंदा चालू होताच. आणि थोड्याच दिवसांत त्यानीं सारें कर्ज फेडून टाकलें. वडिलांच्या पत्रानुसार पृथ्वीसिंहांना आतां आपल्या लालडू गांवच्या शाळेंत दाखल करण्यांत आलें. त्यांच्या वर्गातील मुलें फारच लहान होतीं. त्यामुळें पृथ्वीसिंहांना त्यांच्याबरोबर वर्गात बसण्याची लाज वाटे. पण फार दिवस तिथें राहाण्याचें कारणच पडलें नाहीं.

## ब्रम्हदेशांत ( १९०१-१९०७ )

ताया [ थोरले काका ] लग्न करण्यासाठीं घरीं आले होते ते दोन्ही पुतण्यांनाहि आपल्या बरोबर घेऊन ब्रम्हदेशांत परत गेले. चौधरी शादीराम रंगूनहून बऱ्याच दूरवर ' अपर बर्मा ' मध्यें मौन्येवा येथें राहत होते. त्यांना तिकडे जातांना इरावती नदींतून नावेमधून प्रवास करावा लागला.

कांहीं दिवसांनीं पृथ्वीसिंहांना स्थानिक मिशन स्कूलमध्यें दाखल करण्यांत आलें. इथेंहि त्यांना आपल्यापेक्षां वयानें फारच लहान सहाध्यायांबरोबर बसावें लागलें. शाळेंतले विद्यार्थी बहुतेक ब्रम्हीच असत आणि आसपासच्या वस्तींतले लोकहि ब्रम्हीच होते. म्हणून पृथ्वीसिंहांनीं ब्रम्ही भाषा फार लवकर शिकून घेतली.

पृथ्वीसिंह सहा वर्षें ब्रम्हदेशांत राहिले. वडिलांना स्वतःला लिहितां वाचतां येत नव्हतें. पण मुलांना शिक्षण देण्याची त्यांना फार इच्छा होती. घरीं

स्वयंपाकाला नोकर ठेवण्याइतकी त्यांच्या घरची श्रीमंती नव्हती. इतर कामें उरकल्यावर ते स्वतःच स्वयंपाक करीत असत आणि या कामांत पृथ्वीसिंह त्यांना मदत करीत. त्यांना घरचें काम इतकें असे कीं शाळेच्या वेळेबाहेर पुस्तकांना हात लावण्यास सुद्धां त्यांना फुरसत होत नसे. वडिलांची धर्मावर श्रद्धा होती. ते कितीदांतरी बौद्ध भिक्षूंच्या प्रवचनांना हजर राहात असत. पृथ्वीसिंहहि अनेकदां वडिलांच्या बरोबर जात आणि त्यांना बौद्ध भिक्षूंचें जीवन आकर्षक वाटूं लागे. एकदां तर ते स्वतःच जंगलांत तपश्चर्या करण्यासाठीं घरांतून पळून गेले. पण तिथें त्यांना कुणी तरी ओळखीचा लांकूडविक्या भेटला. त्यानें त्यांना सांगितलें—" या जंगलांत दरवडेखोर लपून राहिलेले आहेत आणि तुझे काका नारायणसिंह इतर शिपायांना बरोबर घेऊन त्यांचा पाठलाग करीत आहेत." पृथ्वीसिंहांना काकांच्या संतप्त चर्येची आठवण झाली. तपश्चर्येचा विचार पळाला आणि स्वारी परत घरीं आली. इकडे मुलगा बेपत्ता झालेला पाहून वडिल निराळ्याच काळजींत होते. कितीतरी मुलेंमुली टोळ्यांटोळ्यांनीं त्यांचा शोध करीत होतीं. चार मुलींनीं पृथ्वीसिंहांना डोंगरावरून पळत येतांना पाहिलें. त्यांनीं त्यांना गराडा दिला आणि ढकलत ढकलत वडिलांसमोर आणलें. वडील आतां आपल्यावर नक्कीच संतापणार म्हणून पृथ्वीसिंहांना भय वाटत होतें. पण चौधरी शादीराम एका शब्दानेंहि मुलाला बोलले नाहींत.

१९०६ सालीं पृथ्वीसिंहांना १५ वर्षें पूर्ण झालीं. त्या वेळीं देशांत राजकीय चळवळीला जोर चढलेला होता. पंजाब–केसरी लाला लजपतराय यांना हद्दपार करून मंडलेच्या किल्ल्यांत अटकेंत ठेवण्यांत आलें होतें. पण पृथ्वीसिंह जर वर्तमानपत्रें वाचीतच नव्हते तर त्यांना यांतलें कांहींहि ठाऊक कसें असणार ? याच सुमारास त्यांना सर वॉल्टर स्कॉटची एक कविता वाचावयास मिळाली—

"Breathes there a man with his soul so dead,
Who never to himself hath said,
'This is my own, my native land!' "

" असा कुणीतरी मृतात्मा जिवंत असेल का कीं ज्यानें 'ही माझी स्वतःची मातृभूमि आहे ' असे उद्गार स्वतःच्या मनाशीं कधींहि काढले नसतील ? "

चौथी इयत्ता पास झाल्यानंतर पृथ्वीसिंहांना स्वदेशापासून दूर राहणें फार जड जाऊं लागलें. पहिल्या पहिल्यांदा वडिलांनीं समजावून पाहिलें, पण मुलाचा हट्ट पाहून त्यांनींहि त्यांना घरीं परत जाण्याची परवानगी दिली.

# पुन्हां हिंदुस्थानांतील शाळेंत

पृथ्वीसिंह आतां अंबाला शहरांतील एका शाळेंत दाखल झाले. त्यांच्या ब्रम्ही भाषेच्या ज्ञानाला इथें कांहींच किंमत नव्हती. आणि त्यांना तर हिंदी अगर उर्दू मुळींच कळत नव्हतें. त्यांच्याजवळ पांचव्या इयत्तेचा दाखला असूनहि भाषेच्या अडचणीमुळें नाइलाजानें त्यांनीं चौथ्या इयत्तेपासूनच अभ्यास सुरू केला. त्यांचें इंग्रजी चांगलें होतें आणि इथें गाई म्हशीची सेवाचाकरी करण्याची अगर स्वयंपाकाची कटकटहि नव्हती. त्यांनीं खूप मन लावून अभ्यास केला आणि एका वर्षात ४ थी, ५ वी व ६ वी या तीन्हीं इयत्तांत ते पास झाले. ७ व्या इयत्तेंत दाखल झाल्यानंतर त्यांनीं आठव्या इयत्तेचाहि अभ्यास पूर्ण करण्याची उमेद धरली. पण अध्यापकांची इच्छा अशी होती कीं त्यांनीं एक वर्ष आणखी अभ्यास करून मिडल स्कूल परीक्षेंत उत्तम रीतीनें यशस्वी होऊन शाळेला नांव मिळवून द्यावें. यामुळें पृथ्वीसिंह नाराज झाले. त्याच वेळीं शिक्षकानें जपान व रशिया या विषयावर मुलांना एक निबंध लिहिण्यास सांगितला. पृथ्वीसिंहानीं आपल्या निबंधांत इतर मुद्यांबरोबर हाहि मुद्दा लिहिला—

> “ जपानसारखा छोटासा देश जर रशियाचा पराभव करूं शकतो तर हिंदुस्थानसारख्या मोठ्या देशानें इंग्लंडसारख्या लहान देशाचा पराभव करणें ही अगदींच क्षुल्लक गोष्ट आहे. ”

पृथ्वीसिंहांना नेहमीं निबंधलेखनांत चांगला नंबर मिळत असे पण त्या दिवशीं शिक्षकानें सांगितलें—“ तूं अगदीं वाईट निबंध लिहिला आहेस. तुला याबद्दल शिक्षा मिळेल.” त्यांनीं वही उचलून पाहिलें तर त्यांत स्पेलिंगची (शुद्धलेखनाची) अगर वाक्यरचनेची कसलीच चूक नव्हती. पृथ्वीसिंहांची काय चूक झालेली होती ती वरच्या वर्गातल्या मुलानें लाल पेन्सिलीची खूण असलेली ओळ पाहून त्यांना दाखवून दिली. तसे पृथ्वीसिंह राजकारणाच्या बाबतींत अगदीं कोरेकरकरीत होते. पण परकीय सत्तेविषयींची चीड त्यांच्या रजपूत रक्तांतच भिनलेली होती.

पृथ्वीसिंहांचे मन आतां तिथें लागेना. त्यांच्या गांवचे कांहीं मुलगे राजपूरच्या शाळेंत शिकत होते. त्या शाळेंत एकाच वर्षात दोन इयत्ता करतां येतात असें त्यांना कळलें. बरीच धांवपळ केल्यानंतर त्यांना शाळेचें लीव्हिंग सर्टिफिकेट मिळालें आणि तीनच महिन्यांच्या अवधींत सातव्या इयत्तेतून आठव्या इयत्तेंत प्रवेश करून ते मिडल स्कूलची परीक्षा पास झाले.

# पुन्हां ब्रम्हदेशांत

१९०९ साल उजाडलें. पृथ्वीसिंह आतां खूप उंच, रुबाबदार, दणगट, असे १७ वर्षांचे नवजवान झालेले होते. त्यांच्या मनांत मोठमोठ्या आकांक्षा होत्या. त्याच वेळीं राजपुरांत प्लेग आला. त्यांत पुन्हां वडिलांनीं तीन महिन्यांत पैसेच काय, पत्राचें उत्तरसुद्धां नव्हतें पाठविलें. त्यांना फार काळजी वाटूं लागली. भाऊबंदांपैकीं कांहीं लोक मदत करावयास तयार होते पण त्यांनीं वडिलांकडे परत जाण्याचाच बेत ठरविला. तिथें गेल्यावर पाहतात तों महामारीच्या साथींत साऱ्या गाई, मेंढ्या मरून गेलेल्या आणि वडिलहि अंथरुणाला खिळलेले.

मुलगा अभ्यास सोडून आपल्याकडे परत आला हें चौधरी शादीराम यांना आवडलें नाहीं. त्यांनीं सांगितलें—“ जमिनीवर कर्ज काढून अभ्यास कां नाहीं चालू ठेवलास ? ” पण आतां झाल्यागेल्याबद्दल विचार करून काम भागण्याजोगें नव्हतें. एखादा धंदा करावा म्हटलें तर पैसेच नव्हते. इष्टमित्रांनीं सल्ला दिला कीं पोलिस ट्रेनिंग स्कूलमध्यें प्रवेश मिळवावा. अर्जदेखील रवाना झाला. पण हें सारें वडिलांना न विचारतांच झालें. वडिलांना कळल्यावर त्यांनीं एकदम नकार दिला. दुसरें कोणतेंहि काम पतकरण्यास त्यांची हरकत नव्हती. पितापुत्रांच्या इच्छेंत मत-भेद असा कधींच निर्माण होत नसे. पृथ्वीसिंहांनीं आतां पोस्टांत नोकरी धरली. मात्र त्यांना ती तितकीशी पसंत नव्हती. याच सुमारास चौधरी साहेबांचे आप्तेष्ट मुलाचें लग्न करून टाका म्हणून त्यांना आग्रह करूं लागले होते. पण आतां-पासूनच मुलाला संसाराच्या पाशांत अडकवून ठेवणें त्यांना पसंत नव्हतें.

पृथ्वीसिंहांचीं मनोराज्यें मोठमोठीं होतीं. पण आपण पोस्टांत एक लहानशी नोकरीच करीत राहिलों आहोंत, मनांतली दिशा एक आणि चाललों आहोंत भलतीकडेच, या विचारानें त्यांच्या काळजाला सुया बोचल्यासारख्या वेदना होत होत्या. पृथ्वीसिंह आपल्या कामाला लागले तर त्यांना हातखर्चासाठीं दरमहा ३० रु. द्यावयाला त्यांचे वडील तयार होते. पण भावी काळाच्या दृष्टीनें त्यांना तिथें कसलीच अनुकूलता दिसत नव्हती. मुलगा स्वतंत्र वृत्तीचा आहे हें वडील चांगलेंच ओळखून होते. त्याचबरोबर ब्रम्हदेशासारख्या सामाजिक स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या देशांत राहूनहि तारुण्याच्या बहुतेक दोषांपासून मुलानें स्वतःला अलिप्त ठेवलें आहे हेंहि वडिलांना दिसत होतें.

पृथ्वीसिंहांची मानसिक विकलता इतकी वाढली कीं त्यांना एकेक दिवस कसा घालवावयाचा याची मुष्कील होऊं लागली. त्यांच्या वडिलांचे एक स्नेही मेम्यो या

रमणीय शहरीं राहात होते. त्यांना पृथ्वीसिंहांची हकीकत कुणाकडून तरी कळली. त्यांनीं पत्र लिहिलें. वडिलांना वाटलें, मेम्योला गेल्यावर स्वतः विचार करून, स्नेह्याचें सांगणें ऐकून मुलाच्या वृत्तींत कदाचित बदल होईल. पण आपल्या प्रश्नाचा उलगडा मेम्योच्या मुक्कामांत होणार नाहीं हें पृथ्वीसिंह जाणून होते.

★

(२)

## अमेरिकेच्या मार्गावर

घरचा पैसाअडका पृथ्वीसिंहांच्या हातींच असे. त्यांनीं १०० रु. खिशांत ठेवले व मेम्योला जाण्यासाठीं म्हणून वडिलांचा निरोप घेतला. आपण कुठें जाणार याचा त्यांचा त्यांनाच पत्ता नव्हता. मेम्योला जाण्याची मात्र त्यांची तयारी नव्हती. मौन्येवाहून त्यांनीं तिकिट मेम्योचेंच घेतलें. पण वाटेंतच त्यांनीं रंगूनची गाडी पकडली. त्यांना नाच-तमाशे, चैन-ऐषआराम इत्यादि कशाचीच आवड नव्हती. म्हणून रंगूनमध्यें देखील ते शहराकडे फिरकलेच नाहींत. कित्येक पंजाबी प्रवासी आपलें सामान डोक्यावर घेऊन कुणीकडे तरी चालले होते. सतरा वर्षे वयाचे पृथ्वीसिंहहि त्यांच्यांत सामील झाले. तिथें त्यांची दोघां पंजाबी तरुणांशीं ओळख झाली. ते नोकरीच्या शोधार्थ देश सोडून निघाले होते व तार मास्तरच्या परीक्षेला बसलेले होते. त्यांनीं पृथ्वीसिंहांनाहि समजावलें. स्टेशन-मास्तराची नोकरी मोठ्या पगाराची होती यांत शंकाच नाहीं. पण आमच्या तरुण कथानायकाला पैशाचें आकर्षण असेल तरची गोष्ट !

पंजाबी शेतकऱ्यांचे मुलगे नोकरीच्या शोधार्थ चीनपर्यंत भटकत भटकत जात असत. एकाएकीं पृथ्वीसिंहांच्या मनांत विचार आला—आपणहि चीनला कां जाऊं नये ? त्यांनीं मलायांतील पेनांग बंदराचें तिकीट काढलें. पेनांगमध्यें त्यांना इतर उतारूंसमवेत १५ दिवस क्वारंटाइनमध्यें अडकून राहावें लागलें. शिधा-पाणी आगबोटकंपनी देत होती व स्वयंपाक लोक आपला आपण करीत होते. क्वारं-टाइनची मुदत संपल्यावर ते शहरांत गेले ! तिथें लहान मोठ्या नोकऱ्या मिळण्या-जोग्या होत्या, पण त्या त्यांना पसंत नव्हत्या. आणि त्यांना आतां नोकरी करणें भाग होतें अशांतलाहि प्रकार नव्हता. सिंगापुरांत देखील त्यांना अडवून धरणारें कसलेंच आकर्षण आढळलें नाहीं.

सन १९०९ सालचा जून महिना होता तो. १५०० चिनी व १०० हिंदी प्रवासी घेऊन आगबोट हाँगकाँगकडे निघाली. शेळया मेंढ्याप्रमाणें उतारू बोटीवर कोंबून भरलेले होते. गर्दीमुळें इतकी दमछाट होत होती कीं कमजोर माणसाचा निभाव लागण्याची मुष्किलच होती. साधारणपणें सहा दिवसांत आगबोट हाँगकाँगला पोंचते. पण ही आगबोट वादळांतच सांपडली. मोठमोठ्या संकटांतून पार पडून १५ व्या दिवशीं आगबोट हाँगकाँग बंदराला लागली. ती इतके जोरांत हेलकावे खात होती कीं चांगल्या सराइत खलाशांखेरीज कुणालाहि उभेंच राहतां येत नव्हतें, डेकवरचे उतारू दोराला धरून उभे राहात होते. हातांतला दोरसु टला कीं थेट अथांग समुद्राशीं गांठ पडे. अशा रीतीनें कित्येक उतारू प्राणांसहि मुकले. कॅप्टनसुद्धां अगदीं निराश झालेला होता. आतां आपल्या हातीं कांहीं नाहीं असें त्यानें लोकांना सांगूनहि टाकलें. तरुण पृथ्वीसिंहांचा उत्साहहि थोडासा खचूं लागला. विशेषतः ५ दिवसांनंतर तो जास्तच खचूं लागला, लोकांवर उपासमारीची पाळी आली. भुकेमुळें लोक इतके दुर्बळ झाले होते कीं त्यांना दोरसुद्धां घट्ट धरण्याची ताकत नव्हती आणि तुफान त्यांना पाण्यांत ढकलून देत होतें. पृथ्वीसिंहांचाहि बिछाना वगैरे सर्व कांहीं 'समुद्रास्तृप्यंतु' झालें. फक्त एक लहानशी ट्रंक तेवढी वांचली. तिच्यांत थोडेसे कपडे होते ते राहिले. आठ दिवसांच्या उपासमारीमुळें अंगांत बिलकुल त्राण राहिलेलें नव्हतें., तरीपण आगबोट एकदांची हाँगकाँग बंदराला तर लागली.

## मुक्काम हाँगकाँग

हाँगकाँगमध्यें पृथ्वीसिंहांची कुणाशींहि ओळख नव्हती. त्यांच्याजवळ ६५ रु. शिल्लक असले तरी कमींतकमी खर्चात भागविण्याचा त्यांचा विचार होता. म्हणून इतर उतारूंच्याबरोबर तेहि शिखांच्या गुरुद्वारामध्यें मुक्कामासाठीं गेले. सारे लोक गुरुद्वाराच्या मोठ्या हॉलमध्यें आपापलें सामान ठेवून रात्रीं बाहेर खुल्या आवारांत झोंपत असत. पृथ्वीसिंहांना अजून चोरांचा अनुभव नव्हता. त्यांनीं पैसे ट्रंकेंत ठेवून ट्रंक हॉलमध्यें राहूं दिली. सकाळीं उठून पाहतात तों पैसे बेपत्ता. आतां एक पैसाहि त्यांच्याजवळ नव्हता. त्यांच्यावर रस्त्यावरचा भिकारी होण्याची पाळी आली. गुरुद्वाराच्या चालकांना ही हकीकत कुणाकडून तरी कळली. ते त्यांना जेवणासाठीं बोलावणें पाठवूं लागले. इथेंच त्यांना दोन पंजाबी तरुण भेटले. दोघेहि सुशिक्षित होते आणि त्याचबरोबर त्यांच्या अंगीं देशभक्ति पक्की मुरलेली होती. ते अमेरिकेला निघालेले होते. घरून पैसे येण्याची ते वाट पाहात राहिलेले होते.

या सज्जनांच्या संगतींत पृथ्वीसिंहांना एक नवेंच जग दिसूं लागलें, वैयक्तिक सुख व ऐषआराम यांच्यापेक्षांहि देशाचें स्वातंत्र्य ही एक श्रेष्ठ वस्तु आहे हें त्यांच्या लक्षांत येऊं लागलें. दोघांपैकीं प्यारेलालचे पैसे थोड्याच दिवसांत आले आणि तो अमेरिकाकडे रवाना झाला; पण बलवंतसिंहाला आणखी थांबावें लागलें. गुरुद्वाराचे ग्रन्थी (पुजारी) सरदार भगवानसिंह यांच्या हृदयांतहि मोठी तीव्र राष्ट्रीय भावना होती. त्यांच्या वाणींतहि दांडगें सामर्थ्य होतें आणि सारे शीख त्यांना मोठा मान देत असत. त्यांच्या भाषणांनींहि पृथ्वीसिंहांच्या राष्ट्रीय भावना जागृत करण्याची मोठी कामगिरी बजाविली. त्याच सुमारास कॅनडामधील शिखांचें एक शिष्टमंडळ आपलीं गाऱ्हाणीं व्हाइसरॉयच्या कानावर घालण्यासाठीं हिंदुस्थान-कडे चाललें होतें. या शिष्टमंडळाचे दोघे प्रतिनिधी सरदार भागसिंह व सरदार बलवंतसिंह यांचा मुक्काम गुरुद्वारांतच होता. त्यांच्याशीं गप्पागोष्टी केल्यामुळें आगींत तेल ओतल्यासारखा प्रकार झाला.

पृथ्वीसिंह १८ वर्षांचे नवजवान असले तरी मेम्योला निघालेले जुने पृथ्वी-सिंह ते आतां राहिलेले नव्हते. त्यांनीं आपला मित्र बलवंतसिंह याला सांगितलें—"मी हिंदुस्थानला परत जाऊन माझं सारं आयुष्य देशसेवेला वाहूं इच्छितों." बलवंतसिंहानें सल्ला दिला—"कसंहि करून अमेरिकेला जा अन् तिथल्या हिंदी क्रांतिकारकांना भेटा. ते तरुणांना क्रांतीचें शिक्षण देऊन तयार करीत आहेत." पृथ्वीसिंहांनींहि आतां अमेरिकेला जाण्याचा निर्धार केला. जवळ एक कवडीहि नव्हती अशा वेळीं त्यांनीं हा निर्धार केला.

इकडे तिकडे भटकल्यानंतर त्यांना एका सोडा वॉटर फॅक्टरींत १५ रु. पगारावर रखवालदाराची नोकरी मिळाली. मुख्य रखवालदाराच्या कृपेनें त्यांना रोज आठ आण्यांचे खाण्याचे जिन्नस दुकानांतून घेतां येत होते. बलवंतसिंहा-जवळदेखील एकहि पैसा नव्हता. तेवढ्याच जिनसांत दोघे एक वेळ संध्याकाळीं जेवत असत. ही नोकरीहि फार दिवस टिकली नाहीं. मुख्य रखवालदाराला धास्ती वाटूं लागली कीं या चलाख तरुणाला मालकानें आपलीच जागा दिली तर नेम काय सांगावा ? म्हणून १५ दिवस भरले नाहींत तोंच त्यानें पृथ्वीसिंहांना तिथून काढून लावविलें.

लष्करांतले कितीतरी हिंदु व शीख शिपाई गुरुद्वारांत येत असत. कांहीं रजपूत शिपायांना या रजपूत तरुणाचा पत्ता लागला. ते पृथ्वीसिंहांना आपल्या-बरोबर छावणींत घेऊन गेले. आणि कित्ती तरी रजपूत सैनिकांची त्यांनीं ओळख करून दिली. त्यांच्या आग्रहामुळें पृथ्वीसिंह रोज छावणींत जेवावयास जाऊं

लागले. नावेचें भाडेंहि ते शिपाईच देत असत. पृथ्वीसिंह स्वतः जेवून कांहीं रोट्या बलवंतसिंहासाठीं घेऊन येत असत.

## हाँगकाँगचा चव्हाटा

असें एक वर्ष गेलें. सन १९११ सालांतला कोणता तरी महिना होता. हाँगकाँगच्या चव्हाट्यावर जागोजाग लांबलांब शेंड्यांचें ढीग लागलेले पृथ्वीसिंहांना दिसले. त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. चिनी पुरुष आपली लांब शेंडी मांचु राजवंशीयांचे आपण गुलाम असल्याची खूण समजत होते. अर्थात् हे शेंड्यांचे ढीग म्हणजे चिनी क्रांतीची पूर्वसूचना होती. चिनी जनतेच्या या क्रांतीचा उद्देश काय होता तो पृथ्वीसिंहांना ठाऊक नव्हता. पण चिनी जनतेच्या वृत्तींत एकाएकीं फार मोठें परिवर्तन झालें हें त्यांना दिसलें. जिथें हाँगकाँगसारख्या शहरांत क्षुल्लक कारणावरून पोलिस शिपाई चारपांच चिनी हमालांच्या शेंड्या पकडून त्यांना फरफटत चौकीवर नेत असे तिथें आतां साराच जमाना बदलून गेला. हिंदी शिपायानें जरा कुठें 'अरे-तुरे' करण्याचा अवकाश, कीं चिनी हमाल त्याच्यावर तुटून पडत आणि शिपायालाच टोपी संभाळत पळ काढावा लागे.

कांहीं तासांच्या आंतच क्षुद्र चिनी लोकांच्या अंगीं देखील अशा प्रकारची जबरदस्त स्वाभिमानाची भावना जागृत व्हावी ही आश्चर्याचीच गोष्ट होती. पृथ्वीसिंहांच्या मनांत विचार आला—"हिंदी जनताहि अशाच रीतीनं एका दिवशीं आपल्या मानेवरचें शतकानुशतकांच्या गुलामगिरीचें जोखड फेंकून देईल काय?"

## फिलिपाइन्स बेटांत (१९११-१९१२)

त्या काळीं अमेरिकेचा दरवाजा हिंदी लोकांना बंद होता. विद्यार्थी व प्रवासी यांच्याखेरीज इतर कोणाहि हिंदी इसमाला अमेरिकेच्या भूमीवर पाऊल ठेवण्याची बंदी होती. पण अशाहि स्थितींत मानिलाहून अमेरिकेला जातां येतें अशी बातमी पृथ्वीसिंहांना कळली. पण त्यासाठीं ४०० रु. पाहिजे होते. भाई रतनसिंह चीनमधील कुठल्या तरी गांवाहून इथें येऊन गुरुद्वारांत उतरले होते. ते मानिलामार्गें अमेरिकेला जाणार होते. पृथ्वीसिंहांना एक हुशार देशभक्त तरुण या नात्यानें सारे गुरुद्वारवाले ओळखत असत आणि त्यांच्याविषयीं त्यांना आदर वाटत असे. भाई रतनसिंहांनाहि ही हकीकत कळली. त्यांनीं पृथ्वीसिंहांना सांगितलें—"मी तुम्हांला मानिलापर्यंत पोंचवून देतों. जर पैसे मिळाले तर माझे मला परत करा."

१९११ च्या अखेरीस भाई रतनसिंहांसमवेत पृथ्वीसिंह मानिला येथें पोंचले. मानिला शहरीं हिंदी लोकांची वस्ती जास्त नव्हती. शंभराच्या आसपास पाहरेवाले होते व रेशमाचा व्यापार करणारे कांहीं सिंधी लोक शहरांत राहात होते. याशिवाय फेरीचा धंदा करणारे कांहीं हिंदी लोक होते. हिंदी पाहरेवाल्यांची इथें चांगली कदर होत असे व त्यांना पगारहि चांगला, म्हणजे दरमहा ८० रु., मिळत असे.

भाई रतनसिंह व पृथ्वीसिंह यांना पाहरेवाल्याचें काम आवडलें नाहीं. त्यांनीं फेरी सुरू केली. इथलेच एक हिंदी गृहस्थ सरदार लालसिंह यांनीं माल खरेदी करण्यासाठीं पैशांची मदत केली. कांहीं थोड्याच महिन्यांत पृथ्वीसिंहांनीं इतके पैसे मिळविले कीं त्यांनीं भाई रतनसिंहांचे उसने घेतलेले पैसे परत केले व ते पहिल्याच बोटीनें अमेरिकेला रवाना झाले.

पृथ्वीसिंहांना आतां त्या देशाची ओळख झालेली होती. आतां त्यांचें सारें लक्ष पैसे मिळविण्यांत गुंतलें होतें. केव्हां एकदां पैसे जमा होतील व आपल्याला अमेरिकेला रवाना होतां येईल असें त्यांना झालें होतें.

पृथ्वीसिंह आणखी एकदोन हिंदी फेरीवाल्यांबरोबर आपलें फेरीचें काम करीत असत. देश तसा वेश असें वागावेंच लागतें. नाहींतर मोठी पंचाइत पडते. भलें मोठें मुंडासें व लांबलचक दाढी पाहून मुलांना खोड्या सुचत. एके दिवशीं मुलांनीं दगडफेंक व शिवीगाळ आरंभली. पोलिसांकडे तक्रार नेली तर तेहि मुलांनाच सामील झाले. थोड्याच मिनिटांच्या अवधींत आणखी दोनतीन शिपाई आले व तेहि याच मंडळींत सामील होऊन शिवीगाळ करूं लागले. पृथ्वीसिंहांच्या जोडीदारांनीं माघार घेतली. त्यांनीं इथली परिस्थिती पाहिलेली होती व स्वाभिमान राखण्याच्या फंदांत ते पडले नाहींत. पण पृथ्वीसिंहांना स्वतःच्या मनांवर ताबा ठेवणें अशक्य झालें. त्यांनींहि चार दोन गोष्टी पोलिसांना सुनावण्यास सुरवात केली. पोलिसांना हें कसचें सहन होणार ? त्यांनीं मारहाण सुरू केली. पण पृथ्वीसिंह होते २० वर्षें वयाचे पंजाबी पट्ठे. त्यांच्यापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. आणि मारामारींत दोन पोलिसांना दुखापत झाली. चौकीवर बातमी पोंचतांच पोलिसपार्टी आली आणि पृथ्वीसिंहांना पकडून लॉक-अपमध्यें ठेवण्यांत आलें. पोलिस अगोदर खूप जोरांत होते पण चूक आपलीच आहे हें मग त्यांच्या लक्षांत आलें. त्यांना मारहि फारसा लागलेला नव्हता. बॉर्डाच्या अध्यक्षाचा मुलगा मानिला येथील कोणत्या तरी कॉलेजचा विद्यार्थी होता. त्यानें मध्यस्थी करण्याची इच्छा प्रदर्शित केली व पृथ्वीसिंहांना माफी मागण्याचा

सल्ला दिला. पण ते या गोष्टीला तयार नव्हते.

या अटकेची बातमी मानिला येथील रजपूत रहिवासी भाई चौधरी बरकत अली यांना कळली. ते शहरांतील एका वकिलाला बरोबर घेऊन तिथें पोचले. पोलिसांची घाबरगुंडी उडाली. त्यांनीं माफी मागितली व पृथ्वीसिंहांना लॉक-अपमधून बिनशर्त सोडून दिलें.

★

## (३)

## अमेरिकेंत (१९१२–१९१४)

फेरीसाठीं लागणाऱ्या मालखरेदीच्या बाबतींत पृथ्वीसिंहांना सरदार लालसिंहांची मदत होत असे. प्रामाणिक धाडसी माणसाला सगळीकडे मित्र मिळत जातात. त्यांचा या तरुणावर फार विश्वास होता. अमेरिकेच्या प्रवासासाठीं पुरेसे पैसे जमा करण्यास पृथ्वीसिंहांना फार वेळ लागेल हें त्यांना दिसलेंच. त्यांनीं तिकिटासाठीं १५० डॉलर (५०० रु.) पृथ्वीसिंहांना दिले. दुसऱ्या एका मित्रानें चांगले कपडे दिले. एका तिसऱ्या मित्रानेंहि ५० डॉलर दिले. अमेरिकेंत पाऊल ठेवल्याबरोबर ही रक्कम सरकारी अधिकाऱ्यांना दाखवावी लागते.

एक ३५००० टनी मोठें जहाज अमेरिकेला चाललेलें होतें. त्यांतून पृथ्वीसिंह व त्यांचे हिंदी (बहुतांशीं पंजाबी) दोस्त अमेरिकेला निघाले. कपडे-लत्ते व एकंदर जाम्यानिम्यावरून पृथ्वीसिंह विशेष प्रतिष्ठित दिसत होते. या लोकांनीं त्यांनाच आपला पुढारी निवडलें. जहाज ४० दिवसांत पॅसिफिक (प्रशान्त) महासागर ओलांडून ऑरेगॉन संस्थानांतील सिएटल बंदरांत दाखल झालें. हिंवा-ळ्याचे दिवस होते. जहाजावरचा प्रवास चांगल्या रीतीनें पार पडला. सर्वांच्या तब्बेती सुधारल्या. बंदरांत दाखल झाल्यावर अधिकाऱ्यांनी पृथ्वीसिंहांना हिंदी उतारूंच्या सोईसाठीं दुभाष्याचें काम दिलें. त्यांचे सगळेच दोस्त साधेसुधे शेत-करी होते. अधिकाऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरें काय द्यावयाचीं हें देखील त्यांना कळत नव्हतें. अमेरिकन अधिकाऱ्यांच्या प्रश्नांचें भाषांतर जेव्हां पृथ्वीसिंह त्यांना सांगत तेव्हां ते पृथ्वीसिंहांनाच ते उलट विचारूं लागत—"मैनू क्या पता! तूं हि दस दे." (मला काय ठाऊक? तूंच सांग.) सर्वांना बंदरांत उतरण्यास एकदांची मोकळीक मिळाली.

मग पृथ्वीसिंहांची पाळी आली. अधिकाऱ्यानें विचारलें—" तुम्ही इकडे कशासाठीं आलां आहांत ? " पृथ्वीसिंहांनीं जराहि न अडखळतां स्पष्ट शब्दांत सांगितलें—

" आम्हांला आमचा देश स्वतंत्र कसा करतां येईल हें तुमच्याजवळ शिकायसाठीं आलोंय मी. "

अधिकारी पृथ्वीसिंहांच्या तोंडाकडे बघतच राहिला. पांच मिनिटें पूर्ण होईपर्यंत तो एक शब्दहि बोलला नाहीं अगर कागदावरहि त्यानें एक अक्षरसुद्धां लिहिलें नाहीं. पृथ्वीसिंहांना वाटलें कीं सारा कारभार आटोपला ! तेवढ्यांत अधिकारी खुर्चीवरून उठून उभा राहिला आणि गालांतल्या गालांत हंसत त्यांच्याशीं हस्तांदोलन करून त्यांच्या पाठीवर थाप मारून म्हणाला—" जा. "

## अमेरिकेंतला मजूर

अमेरिकेच्या स्वतंत्र भूमीवर प्रथमच पाऊल ठेवतांक्षणीं मनांत कोणकोणते भाव निर्माण होत होते ? आजचा दिवस उगवणार हें हाँगकाँगमध्यें अशक्यच वाटत होतें ! एका छदामाला सुद्धां मोताद झालेल्या तरुणाच्या मनांतला दृढ संकल्पच येवढा जबरदस्त होता कीं त्याच्याच जोरावर तो येथवर येऊन पोंचला. पृथ्वीसिंह व त्यांच्या दोस्तांनीं अगोदर हॉटेलांत जाऊन पोटभर भोजन केलें आणि मग भटकत भटकत नव्या जगांतलें नवें शहर डोळे भरून पाहिलें. हाँगकाँग व फिलिपाइन बेटांपर्यंत आशियावासीयांचे चेहरेच अधिक दिसत असत. आणि इथें जिकडे बघावें तिकडे गोरेच लोक ! ही नवी नवाई बघत बघत त्यांनीं सारी रात्र शहरभर भटकण्यांतच घालविली.

या लोकांचे कित्ये आप्तेष्ट अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर प्रथमपासूनच वास्तव्य करून राहिलेले होते. इतर मंडळींसमवेत पृथ्वीसिंहहि कॅलिफोर्नियांतील स्टॉक्टन गांवाकडे रवाना झाले. बरेचसे हिंदी मजूर तिथें शेतावर काम करीत होते. या सुमारास बटाट्यांचें पीक तयार होतें. आठ तासांच्या कामासाठीं रोजची दोन डॉलर (अंदाजें ७ रु.) मजुरी म्हणजे पुष्कळच होती. पृथ्वीसिंहांची अंगकाठी खूप दणगट आणि निकोप होती. पण इथें शेतांत एकसारखें फावडें चालविण्याचें व माल लादण्याचें काम होतें. कांहीं दिवसपर्यंत तर पंजाबमधील व ब्रम्हदेशांतील आठवणी येत राहिल्या. पण सरावामुळें माणूस सर्व कांहीं करूं शकतो. मेहनत न केल्यास सोन्यासारखें शरीरसुद्धां वस्तुतः मातीमोलच ठरतें. पंधरा दिवसांनंतर मेहनत पक्की अंगवळणीं पडली आणि इतर दोस्तांबरोबर पृथ्वीसिंहहि

आनंदानें काम करूं लागले. रोजची सात आणे मजुरी असती तर कदाचित् त्यांचें त्या कामाकडे कधींच मन लागलें नसतें; पण मजुरी होती सात रुपये. आठ तासांच्या अखेरीला आपल्या हातांत सात रुपये मिळणार व त्यांचा उपभोग घेण्यासाठीं बाकीचा वेळ आपल्या स्वतःच्या मालकीचा राहणार हें त्यांना ठाऊक होतें. बाकीचे हिंदी मजूर धडधाकट शीख होते. पृथ्वीसिंहांचा वेळ चांगल्या रीतीनें जाऊं लागला. थोड्याच अवधींत त्यांनीं कर्जफेडीची रक्कम फिलिपाइन्सला पाठवून दिली आणि ६०० रु. वडिलांकडेहि त्यांना पाठवितां आले.

हिंदी समाज व पाश्चिमात्य समाज यांच्यामध्यें कितीतरी बाबतींत फरक आहे. हिंदी समाज ज्या शेकडों रूढींनीं जखडलेला आहे, त्यांपैकीं बहुतेकांचा पाश्चिमात्य समाजांत अभाव आहे. जखडलेला प्राणी खुला होतांक्षणीं जसा मोकाट सुटण्याचा आनंद अनुभवतो, तशीच अवस्था महिन्याची कमाई एका दिवसांत मिळविणाऱ्या हिंदी मजुरांची झाली. त्यांत वर पाश्चिमात्य बाजारांमध्यें ठग, लुच्चे लफंगे, यांची कमतरता नसतेच. पृथ्वीसिंहांना आपल्या दोस्तांची काय गत होत आहे ती दिसत होती. ते स्वतःवर तशी अवस्था ओढवून घेऊं इच्छीत नव्हते. स्वाभिमानाबरोबरच त्यांच्या ठिकाणीं राष्ट्रीय भावनाहि निर्माण झालेली होती. त्यांनीं स्वतःसाठीं तीन नियम केले—

(१) शहरांत जातांना फॅशनेबल कपडे घालणार नाहीं व विकत घेणार नाहीं.
(२) विशेष प्रसंग खेरीज करून येरव्हीं सदैव मजुराच्या पोशाकांत राहीन.
(३) दारूचा गुत्ता, थिएटर, सिनेमा अगर नृत्यमंदिर या ठिकाणीं जाणार नाहीं.

पृथ्वीसिंह या नियमांचें पालन कडकपणें करूं लागले. पण त्यांचे सारे दोस्त तर त्यांचे असले नियम मानत नव्हते. सहा दिवस काम केल्यानंतर सुटीचा दिवस—रविवार—येई आणि त्याचबरोबर मजुरीचे चाळीस पन्नास रुपयेहि हातीं येत. रविवारचा रिकामा वेळ घालविणें सोपें काम नव्हतें. त्यांतल्या त्यांत शहरांत पुष्कळशीं प्रलोभनें असल्यामुळें तर हें काम विशेषच कठीण झालेलें होतें. हे लोक शहरांत जात असत आणि मग गुत्त्यांत जाण्याचा मोह त्यांना आवरत नसे. खिशांत डॉलर असतां एक दोन ग्लासांनीं संतोष कसचा होणार? ते यथास्थित मद्यपान करीत आणि धुंदींत येऊन झुकांड्या खात ते बाहेर येण्याचा अवकाश, कीं शहरांतले ठग व पोलिस त्यांच्यावर झडप घालीत असत. पृथ्वीसिंह व त्यांचे एकदोन ध्येयवादी स्नेही त्यांना उचलून घरीं नेण्याची खटपट करीत तेव्हां त्या दारुड्यांच्या थपडा व बुक्क्या त्यांना सहन कराव्या लागत. हे दोस्त शुद्धीवर आले म्हणजे पृथ्वीसिंहांविषयीं विशेष आदर दर्शवीत.

# गदर पार्टीचे सभासद

अमेरिकेला गेल्यावर त्यांना बाबा सोहनसिंह व बाबा ज्वालासिंह यांचा पत्ता लागलेला होता. पण पृथ्वीसिंहांची टोळी एका वेगळ्या ठिकाणीं काम करीत होती. हॉंगकॉंगचे दोस्त बलवन्तसिंहहि आतां अमेरिकेला पोंचलेले होते. ऑरेगॉन-मध्यें त्यांची भेट झाली. मग उभयतांनीं राजकीय चर्चा केली. "गदर" नांवाचें वर्तमानपत्र निघूं लागलें होतें. पृथ्वीसिंह हें वर्तमानपत्र नियमितपणें वाचीत असत इतकेंच नव्हे तर हिंदी मजुरांमध्यें स्वातंत्र्याच्या विचारांचा प्रसारहि त्यांनीं चालू केलेला होता.

इथल्या मुक्कामांतील एक शेवटचा प्रसंग सांगण्याजोगा आहे. पृथ्वीसिंह व त्यांची टोळी संत्र्यांच्या बगीच्यांत कामावर होती. ही जागा शहरापासून दूर होती. म्हणून इथल्या मजुरांना दर रविवारीं शहरांत जातां येत नसे. पण गेलें कीं पुन्हां पूर्वीच्याच प्रकारांची पुनरावृत्ति होई. एकदां मध्यरात्रीच्या सुमारास कांहीं गुंडांनीं एका हिंदी तरुणाला सतावण्यास सुरवात केली. पृथ्वीसिंह व बलवंतसिंह यांना हें सहन होणें शक्य नव्हतें. त्यांनीं गुंडांना समज दिली, पण तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अमेरिकेंत पिस्तुलें बाळगण्यास बंदी नसते. हे दोघे मित्र नेहमीं खिशांत पिस्तुलें बाळगत असत. यांनीं भरलेलीं पिस्तुलें गुंडांवर रोखलीं. तीं पाहतांक्षणीं गुंडांनीं नांगीच टाकली. आतां पृथ्वीसिंहांना इथल्या आयुष्याचा वीट आला. लॉस एन्जलस येथील लहान शेतकऱ्यांकडे मजुरी करणें इथल्यापेक्षां जास्त चांगलें असा विचार करून ते व हरनामसिंह तिकडे रवाना झाले.

हिंदी मजूर अमेरिकेला गेले होते ते केवळ मजुरीसाठींच गेले होते. पंजाबी मजूर कलकत्त्यापेक्षां रंगूनला जास्त मजुरी मिळते असें ऐकतांच रंगूनला निघून जात. तिथें त्यांना पत्ता लागे कीं पेनांग व सिंगापुरांत याहूनहि अधिक मजुरी मिळते; मग ते तिकडे रवाना होत. अशा प्रकारें चांगल्या मजुरीच्या शोधार्थ ते हॉंगकॉंग, शांघाय करीत करीत शेवटीं अमेरिकेंत दाखल झाले. अमेरिकेंत मजुरीहि चांगली मिळे, खाण्यापिण्यालाहि यथेच्छ असे, आणि घरींहि ते हजारों रुपयें पाठवीत. हें पाहून इतर मजूरहि आपली शेतीवाडी विकून कर्ज काढून साऱ्या अडथळ्यांना तोंड देऊन अमेरिकेंत दाखल होऊं लागले. अमेरिकेच्या स्वतंत्र वातावरणांत राहूं लागल्यानंतर थोड्याच अवधींत त्यांना आपण गुलाम आहोंत याची जाणीव होऊं लागे. आपल्याला पैसा मिळतो, पण कुणाकडूनहि आपल्याला मान नाहीं मिळत. या गोष्टींचा आतां त्यांच्यावर परिणाम होऊं लागला. बाबा सोहनसिंह या मंडळींत अधिक सुसंस्कृत व शिकलेले

होते. त्यांनीं आपल्या घरीं बरेचसे सुखांत दिवस काढलेले होते. बाबा ज्वालासिंह व विशाखासिंह यांनीं मजुरीचे पैसे वांचवून स्वतःची चांगली शेतीवाडी तयार केलेली होती. त्यांनाहि वर्णभेद सगळयांत अधिक बोचूं लागला. अशा प्रकारें देशाच्या पारतंत्र्याचा अनुभव ज्यांना पहिल्या प्रथम आला असे हे लोक होते. परंतु हिंदी मजूरहि या प्रवृत्तीपासून अलिप्त राहूं शकले नाहींत. कॅलिफोर्नियांत जरी ते अलग अलग राहत असत तरी शेतांत अगर कारखान्यांत काम करतांना अमेरिकन कामगारांचा त्यांच्याशीं संबंध येई. आपण गोऱ्या मजुरांपेक्षां कोणत्याहि बाबतींत कमी नाहीं, असें असतांहि आपल्याला हीन समजतात हें त्यांना दिसत होतें. असे कां ? याचें उत्तर समजण्यास त्यांना वेळ लागला नाहीं. हिंदुस्थानच्या गुलामगिरीचा हा परिणाम होता. या गुलामगिरीच्या छायेनें अमेरिकेपर्यंत त्यांचा पिच्छा नाहीं सोडला. मग त्यांच्या मनांत असा विचार येई—

> "मूठभर गोऱ्या लोकांनीं आमचा देश गुलाम करून ठेवावा अं ! आम्ही कोणत्या बाबतींत त्यांच्यापेक्षां कमी आहोंत ? आम्हांला ही अत्यंत लज्जास्पद गोष्ट आहे."

मग स्वतंत्र भारताचें स्वप्न त्यांच्या मनश्चक्षूसमोर दिसूं लागे व त्यांच्या मनांत विचार येई—

> "सात रुपये रोज मजुरीपेक्षां महत्वाची अशी आणखीहि एक वस्तु आहे. ती म्हणजे स्वदेशाचा मान. आम्ही आमचा देश स्वतंत्र करण्यांत यशस्वी झालों म्हणजे मगच आम्हांला ही वस्तु मिळेल."

बाबा ज्वालासिंहांनीं कॅलिफोर्नियाच्या मजुरांमध्यें राष्ट्रीय जागृतीचा फैलाव करण्याची मोठी कामगिरी बजाविली. हिंदी विद्यार्थ्यांमध्यें क्रांतिकारक भावना निर्माण करण्याची संधी मिळावी म्हणून त्यांनीं जातपात व धर्माचा विचार न करतां पुष्कळशा विद्यार्थ्यांना अमेरिकेस बोलावून घेतलें. ते आपली सारी कमाई हिंदी विद्यार्थ्यांमध्यें व मजुरांमध्यें जागृति निर्माण करण्यासाठीं खर्च करूं लागले. कॅनडांतील हिंदी मजूर आपल्याविषयींची गोऱ्या लोकांची वृत्ति पाहून असंतोष प्रदर्शित करूं लागले होते. अमेरिकेंत एका नव्या जागृतीचा फैलाव होऊं लागलेला होता. याच सुमारास लाला हरदयाळ अमेरिकेला पोंचले. तुर्कस्तान, इराण व चीनमध्यें एक नवी जागृति दिसूं लागलेली होती. हिंदुस्थाननेंहि मागें राहतां कामा नये ही गोष्ट लाला हरदयाळांसारख्या हिंदी क्रांतिकारकांना समजूं लागलेली होती. आतां प्राथमिक कार्य अशा अवस्थेला येऊन पोचले होतें कीं सगळयांची एक संघटना करणें जरूरीचें झालें होतें. प्रमुख हिंदी लोकांनीं या

कार्यासाठीं एक संमेलन भरविलें. त्याला बाबा ज्वालासिंह, बाबा सोहनसिंह, बाबा केसरसिंह, उधमसिंह, तरुणांचा आवडता युवक कर्तारसिंह, पंडित जगतराम, इत्यादि हजर होते. याच वेळीं हिंदुस्थानची क्रांतिकारी संघटना—गदर पार्टी—स्थापन झाली. हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेरच्या हिंदी लोकांमध्यें क्रांतिकारक विचारांचा प्रचार करण्यासाठीं "गदर" हें वृत्तपत्र काढण्याचेंहि ठरलें. संमेलनाची खबर मिळतांक्षणीं लोकांनीं सढळ हातानें पैशाची मदत देणें सुरू केलें, आणि स्वाभिमान व देशाभिमान आणखी जोरांत वाढीस लागला. याच्यापूर्वीं कॅनडांत अगर अमेरिकेंत जर कुणी गोरा इसम "ओहोहो! कलकत्ता, मुंबई, कराची, मद्रास, दिल्ली!" असे उद्गार काढूं लागला कीं हिंदी लोकांच्या आनंदाला पारावार राहत नसे आणि ते त्याच्याशीं हस्तांदोलन करून "ओहोहो! ये तो साडा साहेब हैं (हा तर आमचा साहेब आहे)" असें सांगत आणि त्याच्या स्वागतानिमित्त त्याला दारू पाजण्यासाठीं दारूच्या गुत्त्यांत घेऊन जात. पण "गदर" पत्राच्या प्रचारासरसा हिंदी लोकांच्या वृत्तींत बदल झाला. आतां जर कुणी गोरा इसम "कलकत्ता, मुंबई" म्हणूं लागला तर धडधाकट पंजाबी त्याला गुत्त्यांत घेऊन जात, त्याला थोडीशी दारू पाजून कांहींतरी भांडण उकरून काढीत आणि मग त्याला खूप चोप देत असत. चारदोनच आठवड्यांत शहराच्या रस्त्यांवर "कलकत्ता, मुंबई" अशी बडबड करणारे गोरे लोक मुळीं दिसेनासेच झाले.

"गदर" छापण्यासाठीं सॅन फ्रॅन्सिस्को शहरीं एक छापखाना घालण्यांत आला. एक डझन उत्साही व स्वार्थत्यागी तरुणांनीं त्यासाठीं स्वतःला आयुष्यभर वाहून घेतलें. लाला हरदयाळ या पत्राचे मुख्य संपादक होते. "गदर" चा लौकिक स्कॉटलंड यार्ड [इंग्रजांचें सी. आय. डी. खातें] व अमेरिकेंतील ब्रिटिश वकिलातीपर्यंत पोंचला. ते हें चालू देण्यांत तयार नव्हते. ब्रिटिश सरकारनें चिथावणी दिल्यावरून लाला हरदयाळ यांना अटक करण्यांत आली आणि मोठ्या मुष्किलीनें त्यांची जामिनावर सुटका होऊन त्यांना युरोपला रवाना करण्यांत आलें. "गदर" ला यामुळें मोठाच धक्का बसला. पण तरुणांनीं "गदर" चालविलें. गदर पार्टीचे अध्यक्ष बाबा साहेनसिंह एकदां पृथ्वीसिंहांच्या मुक्कामाच्या ठिकाणींहि प्रचारार्थ आले. पृथ्वीसिंहांनीं अशा प्रकारची मोठी सभा ही पहिलीच पाहिली.

लाला हरदयाळ यांच्या अटकेमुळें हेंहि सर्वांना कळून चुकलें कीं कदाचित सर्वांनाच अटक होण्याचा संभव आहे, म्हणून त्यांची जागा घेण्यासाठीं इतरांनीं तयार राहिलें पाहिजे. पृथ्वीसिंहांना बातमी कळतांक्षणीं ते तयार झाले आणि

दुसऱ्याच दिवशीं ते लॅास एन्जलसहून सॅन फ्रॅन्सिस्कोला जाण्यासाठीं निघाले. त्यांनीं प्रेस चालविण्याचें काम शिकून घेतलें. मानिला येथें त्यांना मदत करणारे त्यांचे दोस्त भाई रतनसिंह हेहि त्याच प्रेसमध्यें काम करीत आहेत हें पाहून त्यांना फार आनंद झाला. गदर पार्टीचा विचार अगदीं आरंभी हिंदी मजुरांच्या–विशेषतः शीख मजुरांच्या–मनांत आलेला होता. त्यांनींच आपल्या अंतःकरणाचें खतपाणी घालून या वृक्षाचें पोषण केलें. देशभक्ती व उत्साह त्यांच्या ठिकाणीं भरपूर होती पण त्यांना अजून अनुभव फार कमी होता. राजकारणाच्या शिक्षणाच्या अभावीं त्यांना आपल्या शत्रूंच्या डावपेचांचें आकलन चांगल्या रीतीनें होत नव्हतें. याच कारणांमुळें स्कॉटलंड यार्डला आपले हस्तक त्यांच्या संघटनेमध्यें घुसवितां आले. रामचन्द्र हा अशाच हस्तकांपैकीं एक होता. त्याच्या लंब्याचवड्या गप्पा ऐकून हा क्रांतीचा अवतार आहे असें मजुरांना वाटूं लागलें.

गदर पार्टीमध्यें जर चांगले अनुभवी क्रांतिकारक असते तर परिस्थिती निराळीच झाली असती. हिंदुस्थानच्या राजकीय रंगभूमीवर काय काय खेळ चाललेले आहेत याचाहि त्यांना पत्ता नव्हता. पृथ्वीसिंहांसारख्या कित्येकांनीं बॅ. सावरकरकृत सन १८५७ चें "भारतीय स्वातंत्र्य युद्ध" वाचलेलें होतें. त्या पुस्तकानें वाचणारांच्या मनांत खूप उत्साह जागृत केला. कांहीं जणांना लेख व कविताहि लिहितां येत असत. पण येवढ्या संघटित व शक्तिशाली राज्याविरुद्ध यशस्वी मुकाबला कशा रीतीनें करतां येईल हें राजकीय शिक्षणाच्या कमतरतेमुळें त्यांच्या लक्षांत येत नसे. पृथ्वीसिंहांनीं गदर पार्टीच्या वीरांच्या स्वार्थत्यागाची हकीकत वाचलेली होती. त्यांनी हॉंगकॉंग शहरांत रजपूत शिपायांशीं निकट परिचय करून घेतलेला होता. त्यांच्या मनांत असे विचार येत—"एकदां आपण हिंदुस्तान गांठलं पाहिजे. मग आपण रजपूत शिपायांना सांगूं कीं 'भाई हो! मातृभूमीच्या नांवानं एक रजपूत तुम्हांला विनवीत आहे. उठा! जागे व्हा! ब्रिटिश सत्तेचा चक्काचूर करा, आणि तिच्या जागीं आपली सत्ता स्थापन करा.' बस्स! इतकं सांगितलं कीं सारं गाडं उलटेल." त्यांचे इतर दोस्तहि अशाच प्रकारें विचार करीत असत.

"गदर" मध्यें खूप स्फूर्तिदायक लेख व कविता छापून येत असत. अमेरिकेंतील हिंदी मजुरांनीं या पत्रांतून पुष्कळच शिक्षण व ज्ञान घेतलें, पण या पत्रानें त्यांना राजकीय शिक्षण देण्याकडे अगर त्यांची संघटना करण्याकडे लक्ष दिलें नाहीं. आपल्या सामर्थ्यवान शत्रूचा मुकाबला आपल्याला सामर्थ्यवान हत्यारानींच करतां येईल हें तर त्यांना नक्कीच ठाऊक होतें. म्हणून त्यांनीं आधुनिक

युद्धतंत्रांतील शस्त्रास्त्रें चालविण्याच्या शिक्षणाकडे लक्ष दिलें. कर्तारसिंहांनीं विमान चालविण्याचें कौशल्य संपादन केलें. आणखी कित्येकांनीं लष्करी शिक्षण घेतलें. पृथ्वीसिंहांचें लक्ष अशा शिक्षणाकडे नव्हतें. असें शिक्षण घेतलेले सैनिक तर हिंदुस्थानांत पुष्कळच आहेत असें त्यांना वाटे.

गदर पार्टीला दोनच वर्षांचा नव्हे तर आणखी कित्येक वर्षांचा अनुभव असता तरी तिला आपल्या चुकांतूनच पुष्कळसें शिकतां आलें असतें. पण तेवढ्यांत "कोमागातामारू" ची घटना घडली आणि १९१४-१५ सालचें महायुद्ध सुरू झालें. दुधपित्या बाळासारखी अवस्था असलेल्या गदर पार्टीला सर्वस्व पणाला लावून मैदानांत उतरावें लागलें.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

## कोमागातामारू प्रकरण : सन १९१४

मजुरीच्या शोधार्थ संयुक्तप्रांत व बिहारमधील लाखों स्त्रीपुरुष आफ्रिका, फिजी बेटें, मॉरिशस, ट्रिनिडाड व गियानापर्यंत पोंचले होते. पण ते स्वतंत्र मजूर या नात्यानें नव्हते गेले. मुदत-बंदीचे मजूर अगर अर्धगुलाम होते ते. त्यांना अत्यंत वाईट परिस्थितींत आयुष्य कंठावें लागत होतें. उलटपक्षीं सन १९१० च्या अगोदरपासूनहि जे हजारों पंजाबी लोक कॅनडांत वस्ती करून राहिले होते ते अशा प्रकारचे मजूर म्हणून नव्हते गेले. ते होते शेतीवाडी, जंगलें, कारखाने व खाणींत काम करणारे स्वतंत्र मजूर. कॅनडावासीयांना हिंदी मजुरांच्या या लोंढ्याचें भय वाटूं लागलें. ते कमी मजुरीवर काम करण्यास तयार असत म्हणून इतर मजुरांनाहि त्यांचा द्वेष वाटूं लागला. म्हणून अगोदरपासून वस्ती करून राहिलेल्या हिंदी लोकांनाहि कॅनडांतून काढून लावण्याचा कायदा करण्याचा विचार कॅनडाच्या सरकारनें चालविला. या कायद्याविरुद्ध कॅनडा, अमेरिका व हिंदुस्थानमध्यें जबरदस्त चळवळ झाली म्हणून तो कायदा होऊं शकला नाहीं.

कॅनडांत वस्ती करून राहिलेले हिन्दी लोक आपल्या परिवारांतल्या माणसांना आपल्याकडे बोलावून घेऊं इच्छीत होते. त्यांनीं ब्रिटिश सरकार व हिंदुस्थान सरकारकडे शिष्टमंडळ पाठविलें. कॅनडाच्या सरकारनें त्यांची ही विनंती धुडकावून लावली. त्यांना सबब अशी सांगण्यांत आली कीं हिंदुस्थानहून कॅनडाकडे थेट जहाज येत नाहीं. तसें थेट जहाज जर आलें असतें तर आपण परिवारांतल्या लोकांनाच नव्हे तर नवीन मजुरांनाहि नेऊं दिलें असतें असें कॅनडाच्या सरकारनें शिष्टमंडळाला सांगितलें. कॅनेडियन सरकारला वाटलें कीं

" नऊ मण तेल कधीं जमायला नको अन राधेवर नाचायची पाळीच कधीं यायला नको."

पण बाबा गुरुदत्तसिंहांनीं ही अट पुरी करून दाखविण्याचा बेत केला. त्या वेळीं ते सिंगापुरांत एक चांगल्यापैकीं कंत्राटदार होते. त्यांनीं "कोमागातामारू" नांवाचें जपानी जहाज कंत्राटानें घेतलें. कलकत्त्याहून चारशें पंजाबी लोक व्हॅनकूवरला जाण्यासाठीं जहाजावर चढले. शेवटीं एके दिवशीं "कोमागातामारू' कॅनडाच्या किनाऱ्याला लागलें. कॅनेडियन सरकारनें तोंडानें कांहींहि सांगितलें असलें तरी असल्या दिवसाला तोंड द्यावें लागेल याची त्याला मुळींच कल्पना नव्हती. त्यानें साम-दाम-दंड-भेद इत्यादि साऱ्या हत्यारांचा प्रयोग केला. "कोमागातामारू" परत जावें म्हणून जंग जंग पछाडलें. पण बाबा गुरुदत्तसिंह व त्यांचे सहकारी कच्च्या मातीचे पुतळे नव्हते. हा आपल्या देशाच्या इज्जतीचा व स्वाभिमानाचा प्रश्न आहे अशी त्यांची भूमिका होती. कॅनेडियन सरकारनें जहाजाचा बाहेरच्या जगाशीं संबंध तोडून टाकविला. बाहेरच्या कुणाहि माणसाला त्याच्यावर जातां येईना, अगर जहाजावरच्या कोणाहि माणसाला बाहेर येतां येईना. हळू हळू जहाजावरची अन्नसामुग्री व गोड्या पाण्याचा सांठा संपून गेला. पोलिसांनीं पुढाऱ्यांना अटक करण्याचा प्रयत्न केला पण तिथें चारशे लोक जिवावर उदार होऊन त्यांच्या रक्षणार्थ सज्ज होते. कॅनेडियन सरकारनें लढाऊ जहाजाची मदत घेऊन "कोमागातामारू" ला जबरदस्तीनें हांकलून देण्याचा बेत केला. ही बातमी कॅनडांतील हिंदी मजुरांना कळली. हा प्रकार त्यांना सहन होण्याजोगा नव्हताच. कॅनेडियन मजुरांनींहि हिंदी लोकांच्या शौर्याची ही चुणूक पाहिली व तिचा प्रभाव त्यांच्यावरहि पडल्याखेरीज राहिला नाहीं. हजारों गोऱ्या मजुरांनीं हिंदी लोकांना साथ दिली. सर्वांनीं मिळून कॅनेडियन सरकारला इशारा दिला— जहाजाविरुद्ध जर हत्यार चालवाल तर आम्ही साऱ्या व्हॅनकूवर शहराला आग लावून देऊं. पांच हजार हिंदी मजुरांनीं देशाची इज्जत राखण्यासाठीं प्राण देण्याचा निर्धार केला.

सरकारनें हत्यार चालविलें नाहीं. तरी पण "कोमागातामारू" वरील लोकांना सरकारने कॅनडांत उतरूं दिलें नाहीं. अखेर "कोमागातामारू" ला हिंदुस्थानकडे परत जाणें भाग पडलें.

या घटनेचा प्रभाव फार दूरवर पोंचला अमेरिकेंतल्या हिंदी लोकांना ही बातमी कळली तेव्हां त्यांचे डोळे संतापानें लाल झाले. "गदर" च्या खास अंकांत जेव्हां

ही बातमी छापली जात होती तेव्हां ती वाचून पृथ्वीसिंहांना मशीनवर काम करण्याची मुष्किल झाली. संतापानें त्यांचें सर्वांग थरथर कापूं लागलें. कसेंबसें त्यांनीं काम हातावेगळें केलें. त्यांचे मित्र जगतराम व इतर लोक पृथ्वीसिंहांची ही अवस्था पाहून फार घाबरले आणि त्यांची समजूत घालूं लागले. पण पृथ्वीसिंहांनीं निक्षून सांगितलें कीं—"आतां मला अमेरिकेंत राहवणें शक्य नाहीं." त्यांनीं असेंहि सांगितलें—"मी माझ्या कांहीं विश्वासू दोस्तांबरोबर हिंदुस्थानला जाऊं इच्छितों. आणि तिथं माझ्या देशाची अब्रू वांचवायसाठीं जें कांहीं करतां येईल तें मी करीन." मित्रांनीं त्यांची समजूत घालण्याची परोपरीनें खटपट केली, पण व्यर्थ. पार्टीनें एक परिषद भरविण्याचा निश्चय केला आणि पृथ्वीसिंह हिंदी मजुरांमध्यें दौरा काढून देशाच्या अपमानाचा बदला घेण्यासाठीं लोकांना प्रोत्साहित करूं लागले. भरलेलें पिस्तुल खिशांत बाळगून त्यांनीं गदर पार्टीचा संदेश हिंदी लोकांपर्यंत पोंचविण्याच्या कामांत यश मिळविलें. कित्येक मजुरांनीं पैशाची मदत केली. किती तरी लोक रणांगणावर लढण्यासाठीं तयार झाले. आठनऊ रुपये रोज मजुरीवर पाणी सोडून आपण कुठें जात आहोंत याचा विचारच त्यांच्या मनांत नाहीं आला. अखेरीस सॅक्रामेंटो येथें पार्टीची परिषद झाली. बाबा केसरसिंह सव्वीस नवजवानांसमवेत क्रांतिदलांत सामील झाले. हे सारे सहा फूट उंचीचे होते आणि सारे जण आपलें बलिदान करण्यासाठीं उतावीळ झाले होते. त्यांनीं उघडउघड, इंग्लंडचा राजा व हिंदुस्थानच्या बादशहाविरुद्ध युद्ध पुकारलें. या परिषदेला हजारों अमेरिकन कामगारहि आलेले होते. त्यांत कित्येकांना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याविषयीं सहानुभूति होती. आणि कांहीं नुसतेच बघे म्हणून आले होते. इंग्रजांचे हेर प्रत्येक गोष्ट टिपून घेत होते. राजाविरुद्ध लढण्यासाठीं हिंदुस्थानला कोण कोण लोक जात आहेत तें त्यांना ठाऊक झालें. परिषदेच्या प्रतिनिधींचा उत्साह दांडगा होता. खूप जहाल व्याख्यानें झालीं आणि "बादशहाचा अंमल उलथून पाडा" अशी जाहीर विनंती हिंदी जनतेला उद्देशून करण्यांत आली. ज्या अमलाखालीं आम्हांला इतका अपमान सहन करावा लागतो, त्या अमलाखालीं हिंदी जनतेला राहूं देणें म्हणजे पाप आहे.

★

( ४ )

## असफल संग्राम

परिषदेंत एक हजार लोकांनीं स्वातंत्र्यसैनिक होण्यासाठीं आपली नांवें दिलीं. शंभर लोक हिंदुस्थानला जाण्यासाटीं तयार झाले. सर्वाजवळ उत्तमोत्तम पिस्तुलें, रिव्हॉल्व्हर्स व भरपूर दारूगोळा होता. या शंभर वीरांनीं महाबलाढ्य इंग्रज सरकारशीं लढण्याचा विडा उचलला. आतां ते रणांगणावर रवाना झाले. याला आत्महत्या हेंच नांव शोभलें असतें. असली मूर्खपणाची कामगिरी करण्याची खटपट इतिहासांत क्वचितच कुणी कधीं केली असेल. आपल्याबरोबर कित्येक सरकारी हेर आहेत याचीहि त्यांना दाद नव्हती. ता. ५ ऑगस्ट १९१४ रोजीं हे लोक जहाजावर चढले. तिथें त्यांनीं आपल्या युद्धमंडळाची निवड केली. मंडळानें जबाबदार लोकांना काम करण्याची रीत व निरनिराळ्या प्रदेशांवर नियंत्रण ठेवण्याचें शिक्षण देण्यास सुरवात केली. पृथ्वीसिंहांनाहि कित्येकदां व्याख्यानें द्यावीं लागत असत. त्यांनीं एकदां सांगितलें :

> “आम्ही स्वातंत्र्याची लढाई लढण्यासाठीं हिंदुस्थानला जात आहोंत. स्वातंत्र्य आम्हांला मिळेल का नाहीं हें मला सांगतां येत नाहीं. पण एक गोष्ट निश्चित आहे : आम्ही हिंदी जनतेला स्वातंत्र्याचे धडे देऊं आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठीं प्राण कसे द्यावे लागतात हें आम्ही दाखवून देऊं.”

## हिंदुस्थानच्या वाटेवर

सॅन फ्रॅन्सिस्कोहूनच साऱ्या जगभर बातमी पसरली कीं क्रांतिकारकांचा एक जथा ब्रिटिश सरकारशीं लढण्यासाठीं हिंदुस्थानकडे रवाना झाला आहे. जहाज जेव्हां होनोलूलूला ( हवाई बेटांत ) पोंचलें तेव्हां शेंकडों लोक आश्चर्यचकित नजरेनें या क्रांतिवीरांचें दर्शन घेण्यासाठीं आले होते. हा वेळपर्यंत महायुद्ध खूप जोरांत चालू झालें होतें. एक सुशिक्षित अमेरिकन या मंडळींपैकीं कुणाला तरी वर्तमानपत्र वाचतांना पाहून त्याच्यावर झडप घालून त्याच्या हातांतलें वर्तमानपत्र काढून घेऊन त्याला म्हणाला—“वर्तमानपत्रं वाचायची कांहींएक जरूर नाहीं. हिंदुस्थानला जा, क्रांति कर, इंग्रजांना हांकलून लाव, त्यांची खूण देखील मागें राहू

नगर वाचनालय, सातारा

देऊं नकोस. असली बातमी हिंदुस्थानकडून लवकरच ऐकायला मिळावी म्हणून आम्ही उत्सुक झालेलों आहोंत. अशी बातमी जगांतल्या वर्तमानपत्रांत छापून आली म्हणजे मग मी ती वाचीन अन् म्हणेन—शाबास ! वत्सांनों, खूप केलीत."

पृथ्वीसिंहांच्या मित्रांना वाटलें कीं हा कुणीतरी दारुडा अगर वेडा आहे. पण मागाहून असें कळलें कीं तो एक प्रसिद्ध माणूस असून बेटाच्या राज्याचा अध्यक्ष आहे.

आणखी दहा दिवसांनीं जहाज योकोहामा ( जपान ) येथें पोंचलें. तिथल्या हिंदी लोकांना भेटून त्यांना बंडाचा संदेश देण्यासाठीं हे स्वातंत्र्य-सैनिक फारच उत्सुक झालेले होते. या ठिकाणीं झांशीचे पंडित परमानंद भेटले. त्यांना जेव्हां सगळ्या गोष्टी कळल्या तेव्हां तेहि अमेरिकेला जाण्याचा नाद सोडून देऊन याच टोळींत सामील झाले. ते उत्तम वक्ते व गवई होते. आपल्या व्याख्यानांच्या व गाण्याच्या जोरावर ते लोकांमध्यें उत्साह जागृत करीत असत. कोबे व नागासाकी बंदरें घेऊन जहाज आतां हाँगकाँगच्या जवळपास चाललें होतें. समुद्राचा लांबचा प्रवास व थंड हवा यांच्या योगानें या मंडळींचीं भडकलेलीं माथीं थंड होण्यास मदत झाली. आतां त्यांना कळूं लागलें कीं आपण मूठभर लोक हाँगकाँग या इंग्रजांच्या लष्करी ठाण्यांत प्रवेश करीत आहोंत. अमेरिकन जहाज येथपर्यंत येण्यापुरतेंच भाड्यानें घेतलें होतें. इथून आतां दुसरें जहाज भाड्यानें घ्यावयाचें होतें. पृथ्वीसिंहांच्या मित्रांनीं आपसांत विचारविनियम केला. हत्यारें घेऊन आपण जहाजावरून उतरतांक्षणीं आपल्याला नक्कीच अटक होणार; मग हिंदुस्थानांत राहण्यास न मिळतां इथेंच राहावें लागणार; म्हणून हत्यारें समुद्रांत फेंकून द्यावीं असें सर्वानुमतें ठरलें. हत्यारें फेकून देतांना कित्येकांच्या डोळ्यांत अश्रू आले. सारे जण कडक शिक्षा पाळणारे होते, म्हणून हत्यारें फेंकून देण्यास उशीर लागला नाहीं.

पुढें त्यांनीं हाँगकाँगमधील हिंदी फौजेबरोबरहि बोलणें केलें. हे सैनिकहि पाठिंबा देण्यास तयार होते. त्या वेळीं साऱ्या फौजा गोळा करून फ्रान्सच्या रणभूमीवर पाठविण्याचा सपाटा चाललेला होता. तशा परिस्थितींत हिंदी फौजेला हाँगकाँग सर करून आपल्या ताब्यांत घेणें बऱ्याच अंशीं शक्य होतें. पण त्यांना इंग्रजांचीं मोठमोठीं लढाऊ जहाजें व इतर हत्यारेंपात्यारें माहीत होतीं आणि इथल्या चिनी जनतेला आपलें कांहींच सोयरसुतक नाहीं हेंहि त्यांना ठाऊक होतें. कांहीं का असेना, हाँगकाँगमध्यें लढाई करण्याचा विचार सोडून देण्यांत आला खरा.

त्याच सुमारास जर्मन लढाऊ जहाज एम्डेन इकुडच्या समुद्रांत खळबळ माजवून राहिलें होतें. फारच थोडीं जहाजें बंदरांत येत असत. जहाज पाहण्यासाठीं पुष्कळसे लोक किनाऱ्यावर जमा झाले होते. उतारूंना शहरांत जाण्याची परवानगी मिळाली. पण पृथ्वीसिंहांच्या सहकाऱ्यांना परवानगी नाहीं मिळाली. कोणी इंग्रज अधिकारी त्यांची चौकशी करण्यासाठींहि आला नाहीं. या उतारूंच्या बाबतींत त्यांना कांहींहि समजून घेण्याची इच्छा नव्हती असेंच त्यांच्या वर्तनावरून दिसत होतें. तसें म्हटलें तर समजून घेण्याच्या साऱ्या गोष्टी त्यांना अगोदरपासूनच ठाऊक होत्या. मंडळींच्या मनांत तऱ्हेतऱ्हेचे संदेह निर्माण होऊं लागले. कदाचित आपल्याला पकडून तुरुंगांत तर घालणार नाहींत? लष्करी कोर्टापुढें उभे करून आपल्यावर गोळ्या तर नाहीं झाडणार? पण कुणाच्याहि मनांत भीतीचा लवलेशहि नव्हता. सारे जण मृत्यूला आलिंगन देण्यास तयार होते. त्यांचा हा निर्धार ब्रिटिश अधिकाऱ्यांना बहुधा कळला असावा. म्हणूनच त्यांना मागाहून शहरांत जाण्याची परवानगी मिळाली. ते दहा-दहा पांचा-पांचांच्या टोळ्या करून शहरांत गेले. त्यांचें मुख्य काम पार्टीचा संदेश सर्व ठिकाणीं पोंचविणें हें होतें. हिंदी सैनिकांना व पोलिसांना त्यांच्याविषयीं सहानुभूति होती. पण ती प्रत्यक्ष कृतींत उतरविण्याची त्यांची तयारी नव्हती. कांहीं दिवस वाट पाहिल्यावर या मंडळींना "तोशा मारू" हें जपानी जहाज मिळालें. एम्डेनचा धोका कायमचा शिरावर लटकत होताच. हाँगकाँगहून निघाल्यानंतर तें कोणत्या वेळीं दत्त म्हणून समोर येऊन उभें राहील याचा कांहींच नेम नव्हता. जहाजावरील इतर उतारू परमेश्वराची करुणा भाकत होते. पण जहाज सुरक्षितपणें एकदांचें सिंगापूरला पोंचलें. इथेंहि आमच्या क्रांतिकारकांना सिंगापूरच्या लष्करी शिपायांच्या सहानुभूतीचें प्रलोभन होतेंच. पण हिंदुस्थानला पोंचण्याच्या अगोदर कांहींहि करावयाचें नाहीं असा त्यांनीं निश्चय केला. सिंगापूरच्या उत्साही सैनिकांना त्यांनीं "तयार रहा" हाच संदेश दिला. वाटेंत जहाजावरून अंदमान बेट दिसूं लागलें. कित्येक देशभक्त वीर बेड्यांनीं जखडून या बेटावर अटकेंत ठेवलेले आहेत हा विचार त्या वेळीं त्यांच्या मनांत आला व त्यांच्या हृदयांत अभिमानाची भावना उफाळून आली. त्यांनीं उभ्याउभ्या या देशभक्तांना अभिवादन करतांना अशी शपथ घेतली: "या वीरांच्या बेड्या तरी तोडूं, नाहींतर स्वतः तशाच बेड्या घालून घेऊन त्यांच्या सहवासांत राहूं." एक वर्षाच्या आंतच या मंडळीपैकीं कित्येकजण अंदमानांत पोंचलेहि होते.

जहाज रंगूनला पोंचलें. त्या काळीं ब्रम्हदेश हा हिंदुस्थानचा एक भाग होता. इथेंहि आमच्या क्रांतिकारकांनीं लष्करी बराकींना भेटी दिल्या. शिपायांना भेटल्यावर त्यांचा उत्साह इतका वाढला कीं ते भर रस्त्यांत बंडाच्या गोष्टी बोलूं लागले. "कोमागाता मारू" च्या उतारूंवर काय काय गहजब करण्यांत आले याची हकीकत त्यांना रंगूनमध्येंच पहिल्या प्रथम कळली. बजबज येथें जहाजांतून उतरल्यानंतर ते आपली दुःख-गाथा आपल्या देशबांधवांना सांगण्यासाठीं जथ्यां-जथ्यांनीं चालले होते. त्याच वेळीं कसलीहि आगाऊ सूचना न मिळतां त्यांच्यावर गोळीबाराचा वर्षाव होऊं लागला. वीस जणांहून अधिक लोक प्राणांस मुकले. बाकीच्या बहुतेकांना अटक करण्यांत आली. कित्येक जण पळाले व जंगलांत जाऊन लपून राहिले. पृथ्वीसिंहांनीं व त्यांच्या मित्रांनीं ही हकीकत ऐकली तेव्हां त्यांच्या हृदयावर जबर आघात झाला. त्यांनीं याचा बदला घेण्याची प्रतिज्ञा केली. पण आपल्या नशिबांतहि तसल्याच हालअपेष्टा वाढून ठेवलेल्या आहेत हें त्यांची बुद्धि त्यांना बजावीत होतीच.

जहाज कलकत्ता बंदरांत पोंचलें. डॉक्टरचें सोंग घेऊन तपासणी करण्याचा बहाणा करून पोलिस जहाजावर चढले. एकेक वस्तू अत्यंत बारकाईनें तपासण्यांत आली. हत्यार कसलेंच मिळालें नाहीं. जे चांगले स्वच्छ कपडे घातलेले व खूप मजबूत दिसले व ज्यांच्यापासून धोका आहे असें पोलिसांना कळलें त्या सर्वांना त्यांनीं स्पेशल गाडीवर नेऊन पोंचविलें. गाडींत पंजाबी सी. आय. डीं. ची गर्दी झालेली होती. गुरखे शिपाई पाहऱ्याला होते. सी. आय. डीं. नीं या मंडळींकडून माहिती काढून घेण्याची खूप खटपट चालविलेली होती. पण तिथें त्यांना कुणीहि कांहींएक सांगावयास तयार नव्हतें.

पंडित जगतराम जहाजावरून उतरतांक्षणींच पोलिसांच्या हातांवर तुरी देऊन पसार झाले होते. ते मोगलसराईला आले व त्यांनीं आपल्या दोस्तांची स्पेशल गाडी गांठली. केंसांचें मुंडन केलेलें व अंगावर फाटकीं लक्तरें या थाटांत त्यांचें मूळ स्वरूप अजिबात ओळखूं येत नव्हतें. सारे दोस्त त्यांना पाहून हंसूं लागले. आपल्यापैकीं एक जण तरी बाहेर राहून जनतेंत वावरत आहे हें पाहून त्यांना आनंद झाला. वस्तुतः गदर पार्टीच्या मजूर क्रांतिकारकांची दहशतवादावर श्रद्धा नव्हती; त्यांची मदार होती हिंदी फौजेच्या मदतीवर; ही आपल्या रक्तामांसाची आहे व म्हणून ती आपल्याला सामील होईल अशी त्यांना आशा वाटत होती.

## पोलिस पाहऱ्यांतून बेपत्ता

पंजाबी सी. आय. डीं. ना सॅनफ्रॅन्सिस्कोहूनच पुष्कळशा गोष्टींची आगाऊ सूचना मिळालेली होती. त्यांच्याजवळ संपूर्ण नांवें व पत्ते तयार होते पण कित्येक क्रांतिकारकांनीं आपलीं नांवें व पत्ते भलतेच लिहून दिले व ते त्या त्या स्टेशनांवर उतरून निघून गेले. पृथ्वीसिंहांनींहि आपलें नांव व पत्ता बदललेला होता परंतु त्यांचा बावीस वर्षे वयाचा धिप्पाड देह व त्यांच्या अंगावरचे स्वच्छ व ठाकठीक कपडे पाहून पोलिसांनीं त्यांना बाहेर जाऊं दिलें नाहीं. पण त्यांच्याविरुद्ध आरोप कसलाच नव्हता. गाडी रावळपिंडी स्टेशनावर पोंचली. कंपार्टमेंटमधील सारे लोक एकेक एकेक बाहेर निघून गेले. पण त्यांना बाहेर जाण्यास परवानगी नाहीं मिळाली. सी. आय. डी. चे अधिकारी छत्र्या उघडून पावसांत उभे होते. खिडकी उघडी होती. पृथ्वीसिंहांचें शरीर व मन या दोहोंमध्यें धडाडी होती. एका मिनिटांतच त्यांनीं आपल्या कर्तव्याविषयींचा निश्चय केला. ते झपाट्याने बाहेर पडून प्लॅटफॉर्मवरील गर्दींत मिसळले अणि इकडे तिकडे धांवपळ करणाऱ्या सी. आय. डीं. च्या तावडींतून निसटले. सी. आय. डीं. नीं बहुधा दुसऱ्याच कुणाला तरी पकडून आपला आंकडा पुरा केला असावा. दूर अंतरावर उभे राहून पृथ्वीसिंहांनीं गाडी स्टेशनांतून पुढें रवाना होत असलेली पाहिली. शहरांत जाऊन दुसरे कपडे खरेदी करून त्यांनी अगोदर आपला वेश बदलला. मग परत स्टेशनवर जाऊन ज्यांना गाडींतून उतरून जाण्यास मोकळीक मिळालेली होती त्या दोस्तांना ते भेटले.

पृथ्वीसिंह या मित्रांसमवेत लाहोरला आले. तिथें सर्वांनीं आपला भावी कार्यक्रम निश्चित केला. पृथ्वीसिंह रजपूत लोकांमध्यें बंडाचा संदेश पोंचविण्यासाठीं उतावीळ झालेले होते. ज्ञातींतील बडे बडे वयोवृद्ध लोक या कोंवळ्या तरुणाच्या बोलण्याची कसची कदर करतात! अशा वेळीं पृथ्वीसिंहांना असें वाटे कीं 'आज जर मला दाढीमिशा असत्या तर किती छान झालें असतें!' त्यांनीं कितीहि शहाणपणाच्या गोष्टी सांगितल्या तरी इतर लोक त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देत नव्हते. कारण अजून ते कच्चे तरुण होते.

सव्वा महिनापर्यंत त्यांनीं अशा रीतीनें लपून राहून आपलें काम चालू ठेवलें. ज्ञातींतील कांहीं लोकांना चळवळींत ओढून घेण्यांत त्यांना यश अर्थातच मिळालें. त्यांतल्या त्यांत आपल्या लहानपणींच्या शाळकरी मित्रांना चळवळीचें महत्व पटवून देतांना त्यांना कमी त्रासांत जास्त यश लाभलें. हे मित्र त्यांच्या

पावलावर पाऊल टाकून येण्यास तयार होते. पोलिस मोठ्या कसोशीनें त्यांचा पाठलाग करीत होते. पण विद्यार्थ्यांची जागरूकता व मदत असल्यामुळें ते पोलिसांच्या हातीं लागले नाहींत. अंबाला स्टेशन, लालडू स्टेशन व स्टेशनकडे जाणाऱ्या सडकेवर पोलिसांनीं डोळ्यांत तेल घालून कडक पाहरा ठेवलेला होता. पण पृथ्वीसिंहांना पोलिसांची नजर चुकवून निसटून जाण्यांत कधींच अडचण आली नाहीं.

एका रात्रीं सारे दोस्त अंबाला शहरानजीक एका शेतांत जमा झाले. सर्वांनीं आपल्या कामाचा रिपोर्ट दिला व त्यांच्यावर नव्या कामांच्या जबाबदाऱ्या सोंपविण्यांत आल्या. तीन घंटे बैठक चालल्यानंतर लोक आपापल्या जागीं परत गेले.

दुसरी बैठक एका लहानशा स्टेशनावर घेण्यांत आली. पंजाबी खेडुत कुठें तरी जाण्यासाठीं गाडीची वाट बघत आहेत असा बहाणा करण्यांत आलेला होता. सारे जण पैशाच्या टंचाईची तक्रार करीत होते. कांहीं लोकांनीं सावकारांचा अगर सरकारी खजिना लुटण्याचा ठराव आणला. सरकारी खजिना लुटण्यासाठीं त्यांच्याजवळ साधनेंहि नव्हतीं व तितकी त्यांची ताकतहि नव्हती. पण सावकारांचे खजिने लुटण्याच्या बाबतींत बऱ्याच जणांचें मतैक्य झालें. पण सगळे जबाबदार पुढारी, विशेषतः बाबा निधानसिंह, या ठरावाला कसून विरोध करीत होते. अशा प्रकारचा ठराव सुचविल्याबद्दल देखील बाबा निधानसिंहांनीं लोकांना खूप फटकारलें. शेवटीं हा ठराव सोडून देण्यांत आला. बाबा निधानसिंह साठ वर्षांच्या वयाला क्रांतिकारक सेनेंत सामील झालेले होते. ते अतिशय धाडशी व निर्मळ मनाचे गृहस्थ होते. सर्व जण त्यांना मोठा मान देत असत.

एके दिवशीं वर्तमानपत्रांत बातमी आली कीं पंडित जगतराम यांना पेशावर येथें अटक झाली. त्यांना सरहद्द प्रांतांत कामगिरीवर पाठविण्यांत आलें होतें. त्यांच्यासारख्या कर्तबगार कार्यकर्त्याला अटक होणें ही फार हानिकारक गोष्ट होती. त्यानंतर कांहीं दिवसांनीं कांहीं क्रांतिकारक टांग्यांत बसून एका सभेसाठीं खेड्यांत चालले होते. वाटेंत पोलिसांच्या एका टोळीनें त्यांना अडवून खालीं उतरविण्याचा प्रयत्न केला. यावरून झगडा माजला. सरकारी अधिकाऱ्यांवर गोळ्या झाडण्याची क्रांतिकारकांना सक्त मनाई असली तरी स्वसंरक्षणाच्या बाबतींत पार्टीनें पूर्ण मुभा देऊन ठेवलेली होती. सर्वांच्या जवळ हत्यारें होतींच. या लढाईंत एक पोलिस गोळी लागून जागच्या जागीं ठार झाला. इतर पोलिस आणखी मदत मिळविण्यासाठीं पळून गेले. पृथ्वीसिंहांच्या दोस्तांना दूर पळून

जाण्याजोगा रस्ता नव्हता. त्यांनीं झाडींत ठाण मांडून पोलिसांचा मुकाबला करण्याचें ठरविलें. पोलिस आल्याबरोबर हे क्रांतिकारक त्यांच्याशीं लढले व शेवटीं सारेच्या सारे पकडले गेले.

येवढ्या मोठ्या प्रमाणांत कार्यकर्त्यांची धरपकड झालेली, त्यांतल्या त्यांत पार्टीच्या तीन प्रमुख पुढाऱ्यांची उणीव—या परिस्थितीचा कार्यकर्त्यांच्या मनावर फार वाईट परिणाम होऊं लागला. त्यांचा उत्साह थंडावूं लागला आणि ते पृथ्वीसिंहांनाहि असा सल्ला देऊं लागले कीं आतां खटपट करण्यांत अर्थ नाहीं. पण पृथ्वीसिंह रणांगण सोडण्याचा विचार मनांतहि येऊं देण्यास तयार नव्हते. काय वाटेल तें होवो, आपण आपल्या मार्गापासून विचलित होणार नाहीं, असा त्यांचा निर्धार होता.

## अटक

पार्टीची तिसरी बैठक व्हावयाची होती. थोड्याशासुद्धां संशयावरून पोलिसांनीं लोकांची धरपकड चालविलेली होती. अंबाला शहर पृथ्वीसिंहांच्या कार्याचें केन्द्र होतें. सूचना मिळाल्यानंतर त्यांनीं वेशांतर केलें आणि बैठकीच्या जागीं जाण्यासाठीं ते तयार झाले. रजपूत लोकांमध्यें व रजपूत शिपायांमध्यें पृथ्वीसिंह पुष्कळ कार्य करीत असतात हें पोलिसांना ठाऊक होतें. त्यांनीं रजपुतांकडून माहिती काढण्याचा प्रयत्न केला पण एकहि रजपूत दगलबाजी करण्यास तयार नव्हता. शेवटीं अंबाल्याच्या पोलिस सुपरिंटेंडंटनें सरदार लहनासिंह (एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर) यांना हें पाप करण्यास उद्युक्त केलें. सरदार लहनासिंह पृथ्वीसिंहांना विद्यार्थीदशेपासून ओळखत होते! पृथ्वीसिंह आपल्या कार्यासाठीं ज्ञातींतील पुष्कळशा प्रमुख लोकांना भेटत असत, पण लहनासिंहावर त्यांचा कधींहि विश्वास बसला नाहीं. त्या दिवशीं पृथ्वीसिंह रजपूत बोर्डिंग हाऊसमध्यें होते. कुणातरी मुलानें बालसुलभ उत्साहाच्या भरांत ही बातमी लहानासिंहांना सांगितली. लहानासिंह पृथ्वीसिंहांच्या खोलींत आले. गोड गोड गोष्टी बोलूं लागले आणि कांहीं दिवसांनीं आपल्या गांवी येऊन जाण्याचा फारच आग्रह करूं लागले. पृथ्वीसिंहांनीं आपल्याला येतां येणार नाहीं असें सांगितलें. लहनासिंह निघून गेले.

लहनासिंह आपल्या ध्येयाबद्दल सहानुभूति दर्शवितील, अशी आशा पृथ्वीसिंहांनीं कधींच मनांत धरलेली नव्हती. आणि एक राजपूत माणूस आपल्या जातभाईला, त्यांतल्या त्यांत उच्च ध्येयासाठीं झगडणाऱ्या तरुणाला, दगा देईल

अशीहि त्यांची अपेक्षा नव्हती. लहनासिंह सरळ पोलिस सुपरिंटेंडंटकडे गेले. विद्यार्थी सगळे शाळेंत गेले होते. बोर्डिंगांत पृथ्वीसिंहांशिवाय कुणीच नव्हतें. ते बाहेर जाण्यासाठीं कोट घालण्याच्या बेतांत होते येवढ्यांत कुणीतरी दारावर थाप मारली. दरवाजा उघडला. सभ्य पोषाखांतला एक शीख गृहस्थ उभा असलेला त्यांना दिसला. पाहुण्यानें चांचरत्या स्वरांत विचारलें–"हें शीख बोर्डिंग हाऊस का ?"

"नाहीं. हें रजपूत बोर्डिंग आहे."

"ओह्, घोंटाळा झाला. आपण कृपा करून शीख बोर्डिंग हाऊस शोधायला मला मदत कराल ?"

"हो, हो. जरूर करीन मदत. या, बसा. मी हा इतक्यांत तयार होतोंयच."

पाहुणा अजूनहि घाबरलेलाच दिसत होता आणि त्याचें एकंदर तानमान पाहून कुणालाहि आश्चर्यच वाटलें असतें. पण एकाच क्षणांत पृथ्वीसिंहांना त्याचें आणखी एक स्वरूप दिसलें—त्यानें आपल्या खिशांतून रिव्हॉल्व्हर काढला व जरबेच्या स्वरांत सांगितलें—"माझ्या बरोबर चला, नाहीं तर गोळी झाडीन मी." तिथें विचार करायला एका मिनिटाचाहि अवसर नव्हता. पृथ्वीसिंहांनीं लगच्या लगेच रिव्हॉल्व्हरवर झडप घातली आणि त्याची नळी धरली. पाहुणा घोड्यावर बोट ठेवून तो दाबण्यासाठीं अनुकूल क्षणाचा विचार करीत होता आणि पृथ्वीसिंह त्याला पालथा पाडून दाबून धरून ठेवण्याच्या विचारांत होते. खोलीच्या अंधाऱ्या कोपऱ्यांत हा सारा प्रकार चाललेला होता. हा पोलिसचा माणूस आहे का कुणी गुंड आहे याचा पृथ्वीसिंहांना कांहींच निश्चित थांग लागेना. पोलिसचा माणूस म्हणावा तर एकटा कां व साध्या पोशाखांत कां ? गुंड म्हणावा तर पृथ्वीसिंहांजवळ पैसे आहेत अशी बातमी त्याला दिली कुणी ? पृथ्वीसिंह कुणाला मदतीसाठी हांक मारणें शक्य नव्हते आणि पाहुणाहि मुकाट्या मुकाट्यानेंच झटापट करीत होता. हा कुणीतरी बदमाषच असला पाहिजे अशी पृथ्वीसिंहांनीं समजूत करून घेतली. त्याला दडपून टाकून त्याच्या हातांतला रिव्हॉल्व्हर काढून घ्यावा आणि मग त्याला मात्र खोलींत बंद करून ठेवून आपण पसार व्हावें असें त्यांनीं मनाशीं ठरविलें.

हा जगण्यामरण्याचा प्रश्न होता. पाहुणाहि तगडा जवान होता. बऱ्याच झटापटीनंतर कांहीं मिनिटांत त्यांनीं पिस्तुल हिसकून घेण्यांत तर यश मिळविलें. त्यांनीं तें दूर फेकून दिलें. तेवढ्यांत पाहुण्यानें खिशांतून सुरा काढून पृथ्वीसिंहावर

कांहीं वार केले. त्या झटापटींत जखमांच्या वेदना त्यांना जाणवल्याच नाहींत. पृथ्वीसिंहांनीं ताडदिशीं उडी मारून सुऱ्याचें पातेंच पकडलें. पातें हाताच्या तळव्यांत बरेंच घुसलें पण त्यांनीं तें हातचें सोडलें नाहीं. जखमी सिंहाप्रमाणें पृथ्वीसिंह बेभान झाले होते पण त्यांनीं स्वतःवर ताबा कायम राखला आणि सुरा काढून घेऊन फेंकून दिला. मग त्यांनीं पाहुण्या इसमाला अनेकदां उभा करून भिंतीवर आपटलें. थोड्याच वेळांत त्याची शुद्ध गेली आणि त्यांनीं त्याला सोडून दिलें. त्या आपटाआपटीमुळें तो बेशुद्ध झाला आणि रक्तस्राव फार झाल्यामुळें पृथ्वीसिंहहि बेशुद्ध झाले.

★

## (५)

## मृत्यूची मार्गप्रतीक्षा

पृथ्वीसिंह शुध्दीवर येऊन डोळे उघडून पाहतात तों आपण खाटेवर पडलेलों असून चार पोलिस शिपाई नागव्या तरवारींनिशीं आपल्यावर पहारा करीत आहेत असें त्याना दिसलें. थोड्या अंतरावर दोन इसम बसलेले होते. त्यांतला एक होता पोलिस सुपरिंटेंडंट आणि दुसरा होत सिटी मॅजिस्ट्रेट. त्यांनीं डोळे उघडलेले पाहून दोघे त्यांच्या जवळ आले आणि त्यांनी त्यांना जबाब देण्यास सांगितलें. पृथ्वीसिंह आतां पूर्ण शुद्धींत आले होते पण जखमांच्या वेदना त्यांना अजून जाणवत नव्हत्या. त्यांनीं अगोदरच्या घटनेचा विचार आरंभला. थोड्याच वेळांत साऱ्या गोष्टी त्यांच्या नीट लक्षांत आल्या. आतां ते झाल्यागेल्याचा विचार न करितां भावी काळांचा विचार करूं लागले. मॅजिस्ट्रेटनें त्यांना त्यांचा गुन्हा व त्यांच्यावरील अरोप सांगितला. पृथ्वीसिंहांनीं विचारलें—"रिव्हॉल्व्हर घेऊन माझ्यावर हल्ला करणारा तो शीख कुठं आहे?" त्यांना उत्तर मिळालें—"मृत्युशय्ये-वर आहे तो." त्या इसमाला ठार करण्याचा आपला विचार नव्हता. आपण सुता अगर रिव्हॉल्व्हर उपयोगांत आणलाच नाहीं, या गोष्टींची पृथ्वीसिंहांना पक्की आठवण होती. म्हणून त्यांनीं दुसरा प्रश्न विचारला—"तो मृत्युशय्येवर कसा काय बुवा?" पण त्यांना या प्रश्नाचें उत्तर मिळालें नाहीं. पण मागाहून त्यांना कळलें कीं हा इसम अगदीं मजेंत एका आरामखुर्चीवर बसलेला होता. तो मृत्युशय्येवर

आहे असें सांगून पृथ्वीसिंहांना घाबरवावें म्हणजे मग तरी ते कांहीं गोष्टी सांगतील असा मॅजिस्ट्रेट व सुपरिंटेंडंटचा डाव होता. पुन्हां सवालजबाब सुरू झाले पृथ्वीसिंहांना जबर दुखापती झालेल्या होत्या तरी पण ते कुणाच्या धमकावणीला डरणारे नव्हते. अधिकाऱ्यांनीं कांहीं गोष्टी लिहून घेऊन त्यांना रजा दिली.

## नवे बहाणे

आतां अंगांतलें रक्त कमी झाल्यामुळें जखमेच्या वेदना जाणवूं लागल्या. त्या वेळीं तिथें त्यांची पूसतपास करणारा कुणीच नव्हता. पाहरेवाल्या शिपायांचे रुक्ष चेहरे पाहून त्यांच्याशीं त्यांना बोलावेंसेंसुद्धां वाटेना. त्याच वेळीं अकस्मात एक तरुण त्यांना भेटावयास आला. चेहऱ्यावरून तो त्यांना आपल्या शाळेंतल्या ओळखीच्या मुलासारखा वाटला. पोलिसांचा पाहरा चुकवून त्याला आंत कसें येतां आलें या गोष्टीचा विचारच त्यांच्या मनांत आला नाहीं. त्यानें खूपच सहानुभूति दर्शविली आणि कांहीं संत्रीं दिलीं. जातांना तो शिपायांना विनवून म्हणाला—"मी माझ्या दोस्ताला भेटलों ही बातमी सुपरिंटेंडंटला कळूं देऊं नका."

शहरांत अनेक प्रकारच्या अफवा उठत होत्या. कुणा बड्या क्रांतिकारकाला अटक झालेली असून आतां पोलिसांवर जबरदस्त हल्ला होणार आहे, अशी एक अफवा होती. पोलिसांनीं फाजील मौन पतकरल्यामुळें लोकांमधें घबराट पसरला आणि त्या दिवशीं नेहमींच्या वेळेच्या अगोदरच शहरांतील सारीं दुकानें बंद झालीं.

पृथ्वीसिंहांना सपाटून ताप आलेला होता आणि ते जीवनमरणाच्य दरम्यान हेलकावे खात होते.

त्यांना ता. ८ ऑक्टोबर रोजीं अटक झाली. पण पोलिसांची इतकी घाबरगुंडी उडाली कीं त्यांना चार दिवससुद्धां इस्पितळांत ठेवण्याची त्यांची छाती होईना. १२ तारखेला अपरात्रीं त्यांना अंबाला जेलमध्यें धाडण्यांत आलें.

शहरांतल्या अफवा ऐकून कैदी म्हणूं लागले होते कीं क्रांतिकारकांनीं आक्रमण केलें आहे; घनचक्कर लढाई चाललेली आहे; आणि कोणत्या वेळीं जेलवर हल्ला होईल याचा नेम नाहीं. पृथ्वीसिंह आपल्या कोठडींत एकटेच पडून होते. त्यांना भयंकर यातना होत होत्या पण त्यांची विचारपूस करावयाला तिथें कुणीच नव्हतें. क्रांतिकारक आतां तुरुंगाचे दरवाजे फोडणार आणि आपली सुटका होणार या

आशेंत सारे कैदी दंग होते. या साऱ्या अफवांना कारण झालेला क्रांतिकारक याच तुरुंगांत मरणाच्या दारीं पडून आहे याचा त्या विचाऱ्यांना पत्ताहि नव्हता.

सकाळीं कोठडीचें दार उघडलें तेव्हां सहा फूट उंचीचा व कोळशापेक्षांहि काळा आणि भयंकर चेहऱ्याचा एक भंगी आंत आला. तुरुंगाच्या बाबतींत आपण बालपणीं ऐकलेल्या गोष्टी खऱ्या आहेत असें पृथ्वीसिंहांना वाटूं लागलें. त्यांना खावयाला मिळणें तर दूरच राहिलें, नुसतें प्यावयास पाणीसुद्धां मिळालें नाहीं. ज्याच्यामुळें साऱ्या शहरांत खळबळ माजली त्या कैद्याला पाहण्यासाठीं तुरुंगाचे अधिकारी आले. या लोकांचें वर्तन चांगलें होतें. पृथ्वीसिंह इस्पितळांत असतांना सिव्हिल सर्जनच्या सांगण्यावरून जेल सुपरिंटेंडंटला क्रूरतेचा अवतार समजत होते; पण त्यानेंहि ही पहिली समजूत खोटी पाडली. वस्तुतः तो तितका क्रूर नव्हता. असिस्टंट सर्जन तर आणखी जास्तच सुस्वभावी होता. त्यानें जखमेचें वर्णन वाचून झाल्यावर सांगितलें–" वत्सा ! तूं मोठा भाग्यवान आहेस. तुझ्या मानेच्या दोहों बाजूंकडील नसांमध्यें जखमा इतक्या खोल आहेत कीं त्यांतून वांचणें ही आश्चर्याचीच गोष्ट आहे."

पृथ्वीसिंह आतां शुद्धींत आले होते. त्यांना स्वतःचें अगर आपल्या आप्तेष्टांमार्फत आलेलें अन्न खाण्याचा हक्क होता. पण तिथें हक्काबिक्काची पर्वा होती कुणाला ? कुणी आप्तेष्टहि त्यांच्यापर्यंत पोंचणें शक्य नव्हतें. अधिकाऱ्यांचा बेत बहुधा अशा रीतीनें वागून त्यांची हिंमत खचविण्याचा असावा. पण परिणाम नेमका उलटा झाला. कांहीं दिवसांनंतर पोलिसांनीं आत्माराम नामक एका इसमाला आणून शेजारच्या कोठडींत बंद करून ठेवलें. रोजच्या रोज पोलिस त्याला मारहाण करण्याचा बहाणा करीत होते आणि त्याच्या किंकाळ्या पृथ्वीसिंह ऐकत होते. हें मारहाणीचें नाटक सुरू करण्यापूर्वीं पोलिस सुपरिंटेंडंट जेलच्या दरवाज्यांत उभा राहून त्या इसमाला भलभलत्या शिव्या देई आणि दमदाटी देत सांगे–"साल्या ! जर सगळ्या गोष्टी खऱ्याखऱ्या सांगितल्या नाहींस तर गोळी घालून ठार करूं तुला. नीट विचार कर, मग मला बोलावून साऱ्या गोष्टी सांगून टाक. नाहींतर पृथ्वीसिंहाप्रमाणें तुझ्याहि नशिबाचा निकाल ऐकायला तयार रहा."

थंडीचे दिवस होते. कोठडींत तर जास्तच गारठा होता. जेलरनें मेहेरबानी करून पृथ्वीसिंहांना कांहीं मिनिटें उन्हांत बसण्याची परवानगी दिली. शिव्यागाळी व मारहाण ऐकून त्यांना नवीन आलेल्या कैद्याविषयीं सहानुभूति

वाटत होती. हा कैदी तो आत्मारामच आहे हें पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. त्याच्याजवळ गरम कपडे नव्हते, पांघरावयाला कांबळेंहि नव्हतें. थंडीमुळें तो कुडकुडत होता. देवाधर्माचें नांव घेऊन तो शिपायांचीं आर्जवें करीत होता. पण ते त्याला उन्हांत जाऊं देत नव्हते.

पोलिस सुपरिंटेंडंटनें तिथें यावयाचें, आत्मारामाला घाणेरड्या शिव्या द्यावयाच्या, आणि त्याला मारहाण करण्याचें नाटक करावयाचें, असा क्रम किती तरी दिवसपर्यंत चालू होता. हळूहळू शिपायांनीं दयार्द्र बुद्धीनें आत्मारामाला उन्हांत बसण्याची परवानगी दिली. मग दोघां समदुःखी कैद्यांच्या आपसांत गप्पा-सप्पा होऊं लागल्या. तिसऱ्या दिवशीं आत्मारामानें क्रांतिकारकांचा विषय काढला. त्याच्या गप्पा आणखी वाढतच गेल्या. तो सांगू लागला–" तुम्ही कसंहि करून रिव्हॉल्व्हर मिळवून द्यायची तजवीज कराल तर मी सुपरिंटेंडंटचा बदला जरूर घेईन." आत्मारामानें मोठमोठ्या क्रांतिकारकांशीं आपला संबंध असल्याच्या गप्पा सुरू केल्या. एके दिवशीं तो सांगू लागला–" पंडित जगतरामांनीं मला क्रांतीचा मार्ग दाखविला. तूं भारतीय क्रांतीचा पुढारी हो अशी त्यांनीं मला विनंति केली." पृथ्वीसिंहांनीं विचारलें–"तुम्ही पंडित जगतरामांना केव्हां पाहिलं ?"

" झाले असतील चारएक महिने."

आत्मारामाला चांगल्या रीतीनें पढवलेला नव्हता हें उघडच दिसत होतें. चार महिन्यांपूर्वीं जगतराम अमेरिकेंत होते हेंहि बिचाऱ्याला ठाऊक नव्हतें. त्यांना हिंदुस्थानांत येऊन पुरे दोन महिने झाले नसतील. पृथ्वीसिंहांनीं या कोल्ह्याला पुरता ओळखला. त्यांच्या मनांत विचार आलाः " द्याव्या याला चार-दोन थपडा." पण त्यांनीं मन आंवरलें. पांचव्या दिवशीं त्यानें बॉंब तयार करण्याची कृति शिकवा म्हणून पृथ्वीसिंहांच्या मागें लकडा लावला. पृथ्वीसिंहांनीं सांगितलें : " कागद पेन्सिल घेऊन या. मी कृति लिहून देतों." त्यानें कागद पेन्सिलहि आणली. मग पृथ्वीसिंह म्हणाले–" तुम्ही मॅट्रिक पास आहांत. गंधक वगैरे स्फोटक जिनसा तर तुम्हांला ठाऊक असतीलच ?"

" ठाऊक आहेत, पण त्या मिळणार कशा ?"

" या बाबतींत मला कांहींच सांगतां येणार नाहीं. तुम्हांला जर सुपरिंटेंडंटचा खून करायचाच असेल तर या वस्तु तुम्हांला जमा कराव्या लागतील."

" ठीक आहे. मी तपास करीन."

३

पृथ्वीसिंहांनीं सांगितलें–"या साऱ्या वस्तु एकत्र करून अगदीं एकान्तांत एका खोलींत जा. जिथं तुम्ही कुणाच्या दृष्टीस पडणार नाहीं अशी खोली घ्या. एक चांगल्यापैकीं स्टोव्ह व एक मोठी कढईहि बरोबर घ्या. दरवाजा घट्ट लावून घ्या आणि त्याला आंतून कुलुप लावून टाका. स्टोव्ह चांगला नीट पेटवा. मग त्याच्यावर कढई ठेवा. सगळ्या सामुग्रीचें नीट मिश्रण करा. कढई लाल झाली म्हणजे ही सामुग्री तींत टाका. एक उत्तम प्रकारचा बॉंब तयार होईल. तो घेऊन सुपरिंटेंडंटचा खून करा."

"तुम्ही तर थट्टा करतां आहांत. अशा रीतीनं तर मीहि मरून जाईन."

"दोस्त! मी थट्टा नाहीं करीत. थट्टा तुम्ही करतां आहांत. स्वतःला धोक्यांत घातल्याशिवाय तुम्ही दुसऱ्याला कसे मारूं शकाल बरं?"

मनांत राग तर खूप आलेला होता पण ते आणखी कांहींएक बोलले नाहींत. दुसऱ्या दिवशीं आत्माराम तिथून पसार झाला. त्याच दिवशीं काहनसिंह नामक एक रजपूत तरुण शेजारच्या कोठडींत आणून ठेवण्यांत आला.

पृथ्वीसिंह शाळेंत शिकत होते त्या वेळीं तोहि त्याच शाळेंत शिकत होता. दोघांची दोस्ती होती. त्यांना अटक झाली त्या दिवशीं काहनसिंहहि तिथें हजर होता. त्यालाहि पृथ्वीसिंहांचा सहकारी समजून अटक करण्यांत आली होती. पृथ्वीसिंहांची दोस्ती इतकी महाग पडेल याची काहनसिंहाला कुठून कल्पना असणार? एका अब्रूदार श्रीमंत कुटुंबांतला मुलगा होता तो; आणि आतां त्याच्या हातांपायांत बेड्या पडून त्याला कोठडींत बंद करून ठेवण्यांत आलें होतें. पृथ्वीसिंहांनीं त्याला एकेक गोष्ट समजून सांगण्यास सुरवात केली. आणि एकदोनच दिवसांत त्याची हिंमत खूप मजबूत झाली.

## न्यायाचा फार्स

दोन आठवडेपर्यंत पृथ्वीसिंहांना जागचे हलण्याचीहि मुष्किल होत होती. जखमा जरा बऱ्या झाल्याबरोबर खटला सुरू झाला. एक हिंदी फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेट तुरुंगांतच खटला चालविण्यासाठीं आला. त्या वेळीं पृथ्वीसिंहांना कळलें कीं तो शीख सबइन्स्पेक्टर त्यांच्यावर केवळ नजर ठेवण्यासाठीं पुढें पाठविण्यांत आला होता; पोलिसांची मोठी टोळी येण्याच्या अगोदरच आरोपी पळून जाऊं नये म्हणून ही तरतूद करण्यांत आलेली होती. पण सबइन्स्पेक्टर घाबरला. पृथ्वीसिंहांवर आरोप होता खुनाच्या प्रयत्नाचा आणि काहनसिंहावर दरवड्याचा. पोलिसांचें

म्हणणें असें होतें कीं आंत गुद्दागुद्दी चालू होती त्याच वेळीं काहनसिंह बाहेरून आला आणि सबइन्स्पेक्टरच्या खिशांतील पैशाचें पाकीट घेऊन पसार झाला. एका प्रतिष्टित श्रीमंत खानदानी घराण्यांतील मुलावर हा आरोप! आणि कोर्टानें तो मान्य केला. एक सुशिक्षित धडधाकट तरुण रजपूत जीवन-मरणाची लढाई लढत असलेल्या आपल्या दोस्ताला मदत करण्यासाठीं नाहीं आला, तर म्हणे कांहीं पसडे चोरण्यासाठीं आला! आणि साक्षीदार? तोच एकटा सबइन्स्पेक्टर. आणि जज्ज? एक इंग्रज! १९१४ सालीं हिंदुस्थानची राजकीय व कोर्ट-कचेऱ्यांबाबतची अवस्था काय होती, हें या घटनेवरून उत्तम प्रकारें दिसून येतें. सबइन्स्पेक्टरनें आपल्या जबानींत पृथ्वीसिंहांच्या बाबतींत असें सांगितलें— "यानं माझा रिव्हॉल्व्हर हिसकून घेतला आणि माझ्यावर गोळी झाडण्याचा याचा बेत होता पण घोड्याच्या खालीं मी टिनाचा लहानसा तुकडा खोंचून ठेवलेला होता म्हणून त्याला गोळी झाडतां आली नाहीं." सबइन्स्पेक्टरच्या कानाचा एक तुकडा पुरावा म्हणून हजर करण्यांत आला आणि असें सांगण्यांत आलें कीं आरोपीनें सुरी घेऊन हल्ला केला पण सबइन्स्पेक्टर थोडक्यांत बचावला. प्रत्येक गोष्ट पोलिसांनीं बनावट रचलेली स्पष्ट दिसत असल्यामुळें पृथ्वीसिंहांना न्याय मिळण्याची आशा अर्थातच नव्हती.

मुलाला अटक झाल्याची बातमी चौधरी शादीरामांना ब्रम्हदेशांत कळल्या-बरोबर ते तडकच अंबाल्याला आले मॅजिस्ट्रेटच्या परवानगीनें कोर्टातच बाप-लेकांची भेट झाली. भेटीच्या वेळीं सी. आय. डी. चे लोक कागद-पेन्सिल घेऊन हजर! तेव्हां पितापुत्रांनीं ब्रम्ही भाषेंत संभाषण चालू केलें. वडिलांच्या काळजाचे आंतल्या आंत तुकडे तुकडे होत आले तरी त्यांच्या चेहऱ्यावर लाचारी मुळींच नाहीं, आणि त्यांच्या डोळ्यांत अश्रूहि नाहींत, हें पाहून पृथ्वीसिंहांना समाधान वाटलें. मुलानें पायांना हात लावून वंदन केल्यावर वडील सांगू लागले— "तूं ब्रम्हदेशांत माझ्या जवळ राहिला असतास तर फार चांगलं झालं असतं. पण भगवानाची इच्छा निराळीच होती. ठीक आहे. जशी त्याची मर्जी."

आणखी माहिती मिळावी म्हणून पोलिसांनीं किती निरपराध लोकांना छळ छळ छळलें त्यांची गणतीच नाहीं. कित्येक रजपूत विद्यार्थ्यांना अटक करून तुरुंगांत त्यांचे अनन्वित हाल करण्यांत आले. पोलिसांवर या अत्याचारांबाबत कांहीं आरोप करतां येऊं नयेत म्हणून या विद्यार्थ्यांच्या खोट्या हजेऱ्या मांडण्याची सक्ती शाळा-चालकांवर करण्यांत आली. कित्येक प्रतिष्टित रजपूत पुढाऱ्यांनाहि

पकडण्यांत आलें आणि कित्येक दिवसपर्यंत त्यांच्यावर जुलुम जबरदस्ती करण्यांत आली. पण त्यांना जर कांहीं ठाऊकच नव्हतें तर ते सांगणार काय? चौधरी हंसराज यांजवर जुलुमाची परमावधी झाली. लागोपाठ कित्येक दिवसपर्यंत त्यांना झोंपूंच दिलें नाहीं. पण शूर रजपुताला शोभेशा रीतीनें त्यांनीं निक्षून सागितलें कीं—" माझे हालहाल करून वाटल्यास माझा जीव घ्या, पण मीं खोटा जबाब नाहीं देणार. "

कांहीं विद्यार्थ्यांनीं धाकदपटशाला घाबरून पोलिसांनीं पढविलेले कांहीं जबाब दिलेहि होते, पण त्यांनींहि कोर्टासमोर पोलिसांचे हे उपद्व्याप उघड करून सांगितले.

सेशन जज्जाच्या तिघां असेसरांमध्यें दोघे बनिये होते व एक होता मुसलमान रजपूत. असेसरांना निर्णय विचारण्यांत आला. त्यांनीं बाहेर जाऊन आपसांत निर्णय करून एक चिठी लिहून आणली—

" आरोपी निरपराध आहे, याला सोडून दिला पाहिजे. " युरोपियन जज्जाच्या अंगाची लाही लाही झाली. त्यानें सांगितलें—" तुम्हांला आपापल्या निर्णयाच्या समर्थनपर स्वतंत्रपणें कारणं लिहून द्यावीं लागतील. " पहिल्या असेसराला हें त्यानें सांगतांक्षणीं तो बिचारा तोंडांतून एक अक्षरहि न काढतां उभा राहून थरथर कापूं लागला. दुसराहि चुपचाप उभा राहिला. जज्जानें पोलिसांना कोर्टातून बाहेर जाण्यास सांगितलें. जज्जानें असेसरांना आपलें म्हणणें पुन्हां दुसऱ्यांदां सांगितलें. दोघे असेसर पुन्हां वाघासमोरच्या कोंकरांप्रमाणें चुपचाप उभे राहिले. जज्जानें तिसऱ्या असेसराला विचारलें; तेव्हां त्याचा चेहरा संतापानें लालेलाल झाला. त्याला आपल्या सहकाऱ्यांच्या वर्तनाची भयंकर चीड आलेली होती. त्यानें उभा राहून निक्षून सांगितलें—" आरोप सिद्ध झालेला नाहीं. माझ्या मतें आरोपी निरपराध आहे. कोर्टानं त्याला सोडून दिलं पाहिजे. "

जज्जानें या असेसराला आणखी प्रश्न नाहीं विचारले. इतर दोघां असेसरांनाहि मग जरा धीर आला. त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला—" साहेब! आम्ही दोन आगींच्या दरम्यान सांपडलों आहोंत. एका बाजूला आहे नरकाची आग अन् दुसऱ्या बाजूला आहे पोलिसांची आग. निरपराध आरोपींच्या विरुद्ध आम्ही बोललों तर मेल्यानंतर आम्हांला नरकयातना सहन कराव्या लागतील. अन पोलिसांच्या विरुद्ध मत द्यायचं आम्ही धाडस केलं तर आमच्या पाठीवर पोलिसांच्या लाठ्या बसतील. आम्ही पोलिसांच्या लाठ्या खाणंच पसंत करतों."

दुसऱ्या असेसरानेंहि याच म्हणण्याला पुष्टी दिली. जजानें त्या दिवशीं निकाल दिलाच नाहीं. सरकारी वकिलाला वाटलें कीं खटला कच्चा आहे. त्यानें जज्जाला मुद्दाम सांगितलें—" आरोप पुराव्यानिशीं सिद्ध झाला नसला तरी पृथ्वीसिंहांना सोडून देणें सुरक्षितपणाचें नाहीं."

जज्जानें तीन दिवसपर्यंत भवति न भवती केली. त्याच्यावर वरून दडपण आणण्यांत येत होतें. शेवटी मालकांच्या मर्जीपुढें त्याला मान वांकवावी लागली. जज्जानें पृथ्वीसिंहांना १० वर्षे व काहनसिंहाला १५ महिने कैदेची शिक्षा दिली. जनतेला या प्रकरणाची कांहींच बातमी कळूं देण्यांत आली नाहीं. ही हकीगत वर्तमानपत्रांत छापण्याची कुणाचीच काय बिशाद होती ? हें होतें १९१४ सालचें हिंदुस्थान.

## कैदी जीवनाचा पहिला अनुभव

कैद्यांना २०-२० शेर गहू कसे दळावे लागत होते, आणि दळतां नाहीं आलें तर त्यांना मार कसा मिळत होता, हें पृथ्वीसिंहांनीं अगोदरच पाहिलें होतें. त्यांचे हात मऊ होते. त्यांनीं दरवाजाच्या सळया धरधरून वीस दिवसांत आपले हात खूप खरखरीत करून घेतले. शिक्षा ऐकून दुपारीं ते परत आले तेव्हां वीस शेर धान्य कोठडीबाहेर त्यांची वाट पाहत असल्याचें त्यांना दिसलें. त्याच्याच जोडीला कैद्याचे कपडेहि होते. आज सकाळीं सुटलेल्या कैद्यानें आपल्या अंगांतून काढलेले जुने बिनधुतलेले कपडे होते ते. कपड्यांत उवा बुजबुजत होत्या. पृथ्वी-सिंहांनीं या बाबतींत कांहीं तरी सांगतांच त्यांना जबाब मिळाला—"वा ! नखरा पुरे झाला." उवा असलेले कपडे अंगांत घालण्यास ते कबूल नव्हते. त्यांनीं लंगोट उचलला, त्यांतल्या जितक्या उवा काढून टाकतां आल्या तितक्या काढल्या आणि तो धुवून त्यांनीं चढवला. बाकीचे कपडे तसेच पडून राहिले. मग ते चक्की चालवूं लागले आणि वेळेच्या आंतच त्यांनीं पीठ दळून ठेवून दिलें. पण त्यांना भयंकर थकवा आला होता. चक्की पिसण्याचें काम जितकें असेल तितकें पृथ्वीसिंह संपवीत राहिले. सुपरिंटेंडंटला हें आवडलें नाहीं. सरकारचा दुश्मन अशा प्रकारें आपल्या जाचांतून निसटला तर त्याला हें कसें आवडणार ? मग एके दिवशीं उभे राहून दळण्याच्या चक्कीऐवजीं बसून दळण्याची चक्की आलेली पृथ्वीसिंहांनीं पाहिली. त्यांनीं दुसऱ्या दिवशीं सुपरिंटेंडंटला ही हकीकत सांगितली तेव्हां त्यानें उत्तर दिलें—" जड जातं ? मला हेंच हवंय."

अमेरिकेंत पृथ्वीसिंहांच्या मनांत देशभक्तीचा व स्वातंत्र्याचा विचार

आला तेव्हां ते गदर पार्टींत सामील झाले. त्यांच्या मनांत परकीय सत्तेविरुद्ध चीड होती. पण सरकारी अधिकाऱ्यांचा द्वेष वाटत नव्हता. पण १९१४ ते १९२२ या आठ वर्षांच्या कैदीजीवनांत अधिकाऱ्यांनीं त्यांच्याशीं जें पशुसमान वर्तन केलें त्यामुळें साऱ्या नोकरशाही कारभाराचे ते घोर शत्रू झाले.

पृथ्वीसिंहांना फांशीची शिक्षा झालेल्या कैद्यांच्या वॉर्डांत ठेवण्यांत आलें होतें. तिथें इतर कुणाहि कैद्याला जाण्याची परवानगी नव्हती. त्याना फक्त वॉर्डर व झाडूवाल्यांचेच चेहरे पाहावयास मिळत होते. स्नान व प्रातर्विधीखेरीज इतर कोणत्याहि वेळीं त्यांना कोठडीच्या बाहेर जाण्याची मुभा नव्हती. अन्नपाणी त्यांना गजांच्या फटींमधून देण्यांत येत होतें.

## क्रांतीचा गर्भावस्थेंतच अपमृत्यु

इकडे पृथ्वीसिंह अंबाला जेलमध्यें चक्की पिसत राहिलेले असतांना बाहेर त्यांचे सहकारी स्वस्थ बसलेले नव्हते. पहिल्या टोळीमागोमाग आणखी पुष्कळसे हिंदी लोक निरनिराळ्या मार्गांनीं हिंदुस्थानांत परत आले होते आणि ते आपापलीं कामें करूं लागलेले होते. परदेशाहून परत आलेले सारे क्रांतिकारक खेडोंपाडींचे शेतकरी होते. त्यांच्यापैकीं प्रत्येकाचा गांववाला अगर जवळचा वा दूरचा कोणी ना कोणीतरी नातेवाईक लष्करांत नोकरीला होताच होता. अशा प्रकारें हिंदी फौजेशीं संधान बांधणें त्यांना फार सोपें होतें. सैनिकांशीं संबंध जोडल्यावर त्यांना कळून आले कीं क्रांतिकारकांना पाठिंबा द्यावयास सैनिक तयार आहेत. त्या वेळीं महायुद्धानें उग्र स्वरूप धारण केलेलें होतें. हिंदी शिपाई हिंदुस्थानची हद्द सोडून थेट दूर अज्ञात दिशेकडे रवाना केले जात होते. त्यांच्यामध्यें देशभक्तीची भावना जागृत करण्यांत आलेली नव्हती. विदेशी सरकारविषयीं त्यांचें चांगलें मत नव्हतें. मरावयाचेंच आहे तर क्रांतीच्या झेंड्याखालीं कां मरूं नये ? परदेशी झेंड्यासाठीं परदेशामध्यें मरण्यांत काय फायदा ? या युक्तिवादाचा त्यांच्यावर फार परिणाम झाला. पुष्कळशा शिपायांना क्रांतिकारकांचें म्हणणें पटूं लागलें. १९१४ सालीं हिंदुस्थानात इंग्रज शिपायांची संख्या १०००० पेक्षां अधिक नव्हती. आणि ही संख्या हिंदी लष्कर, मध्यमवर्ग व शेतकरीवर्गाशीं तुलना करतां फारशी नव्हती. त्या काळीं कारखान्यांतील कामगारांची संख्या कमी होती आणि त्यांच्यामध्यें राजकीय जागृतीहि झालेली नव्हती. क्रांतिकारकांना संघटित कामगारवर्गाचें महत्व ठाऊक नव्हतें. म्हणून त्यांनीं क्रांति यशस्वी करण्यासाठीं कामगारांच्या संघटनेकडे लक्षच दिलें नाहीं. हिंदी फौजेला

आपल्याकडे आकर्षित करून घेण्यांत यश मिळविणाऱ्या क्रांतिकारकांमध्यें कर्तारसिंह व पिंगळे यांचें चातुर्य व बहादुरी अद्वितीय होती. त्या काळींहि लष्कराच्या बराकींत बाहेरच्या लोकांनीं जाणें म्हणजे सोपें काम नव्हतें. पण शिपायांमध्यें मिळून मिसळून राहण्यांत कर्तारसिंह व पिंगळे यांचा अगदीं हातखंडा होता. त्यांनीं अनेक छावण्यांमध्यें शिरकाव करून घेऊन शिपायांना क्रांतीचें महत्व समजावून सांगितलें. शिपाई मोठ्या संख्येनें पाठिंबा द्यावयास तयार झाले. बंडाला सुरवात करण्याचा दिवसहि निश्चित करण्यांत आला. पण इंग्रज सरकारहि अगदींच झोंपलेलें नव्हतें. अशा प्रकारचें एखादें तुफान उसळलें तर त्याचा बंदोबस्त १०००० इंग्रज शिपायांनीं करणें म्हणजे सोपी गोष्ट नव्हे हें तेंहि जाणून होतें. यासाठीं सरकारनें आपल्या सी. आय. डी. खात्यांतील खास विश्वासांतल्या नोकरांवर भिस्त ठेवलेली होती. शेकडों लोक क्रांति करण्यासाठीं परदेशांतून आले आहेत याची बातमी सी. आय. डी. खात्याला होती. पण त्यांचा पत्ता काढणें सोपें काम नव्हतें. त्यांनीं भेद काढण्यासाठीं पुष्कळसे हेर कामाला लावले पण त्यांना यश नाहीं आलें. अखेरीस क्रांतिकारकांपैकींच एकाला विकत घेण्यांत त्यांना यश मिळालें. कृपालसिंह अमेरिकेंत राहिलेला होता. क्रांतिकारक चळवळींत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे दोष त्याला माहीत होते. गुप्त पोलीस खात्यानें त्याला आपल्याकडे ओढून घेतलें. पूर्वींच्या संबंधांमुळें तो क्रांतिकारक पुढाऱ्यांच्या विश्वासाला फार लवकर पात्र झाला. क्रांति सुरू करण्याची सारी योजना तयार झाली, निरनिराळ्या केन्द्रांकडे निरोप घेऊन जासूद निघणार होते, तेवढ्यांत कृपालसिंहाला याचा पत्ता लागला. तो ताबडतोब आपल्या धन्यांकडे धांवत गेला. सरकारला २४ तास आगाऊ खबर मिळाली. आणि सरकारला येवढा अवधी पुरेसा होता. सरकारचें सारें दमनयंत्र ताबडतोब चालू झालें. जितके कट्टे क्रांतिकारक होते त्या सर्वांना अटक करून तुरुंगांत डांबण्यांत आलें. क्रांतीची लाट उठण्याआधींच दाबली गेली. कितीतरी शिपाई तयारी करीत असतांनाच पकडले गेले व त्यांना गोळ्या खाव्या लागल्या. पण त्यांची कुणी आठवणहि केली नाहीं आणि त्यांच्यासाठीं कुणी डोळ्यांतून एक टिपूसहि काढला नाहीं.

पोलिस सुपरिंटेंडंटला खबर मिळतांक्षणीं तो तडकच पृथ्वीसिंहांच्या कोठडींत दाखल झाला. त्यानें सांगितलें—" पृथ्वीसिंह ! आतां तुम्हांला कांही आशा राहिलेली नाहीं. ज्या मित्रांवर तुम्ही आपली सारी भिस्त ठेवलेली होती त्या सर्वांना आम्ही खतम करून चुकलों. तुम्हांला जर आपला प्राण वांचवायचा असेल तर अजूनहि वेळ गेलेली नाहीं."

पण पृथ्वीसिंह असे कच्च्या गुरूचे चेले नव्हते. सुपरिंटेंडेंट किती तरी दिवस त्यांच्या पाठीस लागलेला होता. तो कधीं असें सांगे—"बघा, आम्ही तुमच्याच फायद्यासाठीं सांगतों आहोंत. एका नवजवानाच्या आयुष्याचं वाटोळं आम्हांला करायचं नाहीं. आज रात्रीं विचार करा अन् कांहींतरी निश्चित ठरवा अन् उद्यां सकाळीं आम्ही पुन्हां येऊं." दुसऱ्या दिवशीं तो पुन्हां येई आणि सांगूं लागे—" तुम्ही मोठे धाडशी तरुण आहांत. तुम्ही रजपूत आहांत. तुमच्या खानदानी घराण्यांत लष्करी बाणा चालत आला आहे. आम्ही तुम्हांला लष्करांत एक चांगला हुद्दा द्यायचं वचन देतों. तुम्ही हा हुद्दा घ्यायला कां नाहीं तयार होत ? "

पृथ्वीसिंह अत्यंत शांतपणें म्हणाले—" तयार आहें मी. रणांगणांत आपलं रजपुती बाण्याचं शौर्य दाखवायला मी फार उत्सुक आहे. मी निशाणबाजींत चांगलाच निष्णात आहें. अन् यांतलं कौशल्य मी प्रत्यक्ष दाखवूं शकतों. तयार आहें मी. पाठवा मला लढाईवर."

अधिकारी भलताच चिडला. जातां जातां त्यानें सांगितलें—" ठीक आहे, याचं फळ तुम्ही जन्मभर भोगत राहाल."

## लाहोर कटाच्या खटल्यांत

लाहोरांत पोलिसांना एका कटाचा सुगावा लागला. या कटांत सामील असलेल्या लोकांचीं ८५ नांवें पोलिसांना सांपडली पण त्यांना पकडतां आले यांतले फक्त ६५ लोकच. या ६५ पैकीं ९ जण सरकारचे माफीचे साक्षीदार झाले होते. आणि त्यांनीं अमेरिकेंत पृथ्वीसिंह कायकाय करीत असत हें सारें सांगितलें. बंगालचे सी. आय. डी. सुपरिंटेंडंट व हिंदुस्थान सरकारच्या गुप्त पोलिस खात्याचे सर्वांत वरिष्ठ अधिकारी या साऱ्या गोष्टी समजून घेण्यासाठीं पृथ्वीसिंहांकडे आले. जेलरनें दोघां अधिकाऱ्यांचा परिचय करून दिला! पकडलेल्या लोकांचा आंकडा येवढा मोठा आहे आणि इतक्या लोकांनीं पोलिसांना सारीं रहस्यें सांगून टाकलीं याचा पृथ्वीसिंहांना अजून पत्ता नव्हता. अधिकारी खूप गोडगोड बोलत होते. त्यांनीं हर प्रकारचीं आमिषें दिलीं. पृथ्वीसिंहांची कांहींच चलबिचल होत नाहीं हें पाहून अधिकारी म्हणाले—"ठीक. तुम्ही जर निरपराध आहांत तर तुमची सारी हकीकत सांगा. तुम्ही अमेरिकेला कां गेलांत अन् तिथं कसे गेलांत ? तुम्ही तिथं काय करीत होतां? अन् तिथं तुमचे कोण कोण सहकारी होते ?" इत्यादि इत्यादि अनेक प्रश्न त्यांनीं विचारले. सरकारी साक्षीदारांनीं आपल्या विरुद्ध सर्व कांहीं

सांगून टाकलें आहे हें पृथ्वीसिंहांना अजून ठाऊक नव्हतें. त्यांनीं आपली हकीकत लिहिण्यास सुरुवात केली. सी. आय. डी. अधिकारी दोन तास ती टिपून घेत होते. शेवटीं जातांना त्यांनीं सांगितलें—"तुम्ही एक छान काऊचिऊची गोष्ट ऐकवलीत आम्हांला. आम्हांला तुमच्या बाबतींतलं सारं कांहीं ठाऊक आहे. आतां स्वतःच्या बाबतींत तुम्ही स्वतःच खऱ्याखोट्याची शहानिशा करा." दुसरे दिवशीं अधिकारी पुन्हां आले. त्यांनीं प्रश्नांचा वर्षाव चालविला. दोघेहि हुशार अधिकारी होते. आणि हजारों क्रांतिकारकांचा त्यांना अनुभव होता. पृथ्वीसिंहांनीं विचार केला —"प्रश्नांचीं उत्तरं देतां देतां आपल्याकडून हे लोक कदाचित महत्वाच्या गोष्टी काढून घ्यायचे." म्हणून पृथ्वीसिंहांनीं नन्नाची ढाल पुढें केली. कोणत्याहि प्रश्नाला त्यांचें हें उत्तर ठरलेलें होतें—"महाशय, मला माहित नाहीं. महाशय, मला आठवत नाहीं. महाशय, मी कधीं पाहिलं नाहीं." अधिकारी मुकाट्यानें चालते झाले. पृथ्वीसिंहांनीं समाधानाचा सुस्कारा सोडला.

वीस शेर पीठ दळणें ही गोष्ट ती चक्की खराब असूनहि कठीण नव्हती. तुरुंगांतील इतर हालअपेष्टाहि सहन करण्याजोग्या होत्या. पण पृथ्वीसिंह त्या कावेबाज अधिकाऱ्यांचे प्रश्न ऐकून घेण्यास तयार नव्हते. ते लोक पुन्हां न येतील तर बरें होईल असा त्यांच्या मनांत विचार चालू होता. पण पाहतात तों दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्याच वेळेला पुन्हां ते दोघे हजर ! त्यांनीं पृथ्वीसिंहांना सांगितलें—"आम्ही तुम्हांला ही अखेरची संधि देण्यासाठीं आलों आहोंत. जें काय सांगायचं असेल तें सांगून टाका. तुम्ही जर आमचं ऐकाल तर आम्ही तुमची आतांच्या आतां सुटका करवितों. नाहींतर जन्मभर चक्की चालवीत राहावं लागेल. कदाचित फांसावरहि लटकावं लागेल."

पृथ्वीसिंहांनीं अगोदरच उत्तर तयार करून ठेवलें होतें. ते म्हणाले—"महाशय, फारच चांगली गोष्ट आहे. पण माझा नशिबावर विश्वास आहे. जें नशिबांत लिहिलेलं आहे त्याच्या आड कुणालाहि येतां येत नाहीं. जन्मभर चक्की चालवायचं नशिबीं आलं तरी हरकत नाहीं. चांगलीच गोष्ट आहे ती. अन् नशिबांत जर फांशी लिहिलेली असेल तर तिच्यासाठींहि माझ्याजवळ पुरेशी हिंमत आहे. तुमच्या मेहेरबानीबद्दल मी तुमचा अत्यंत आभारी आहें. आतां माझी येवढीच प्रार्थना आहे कीं तुम्ही मला माझ्या नशिबावर भरंवसा ठेवून सोडून द्यावं." अधिकाऱ्यांनीं आतां त्यांच्या मागचा ससेमिरा एकदांचा बंद केला.

# लाहोरच्या तुरुंगांत

ज्या वेळीं पृथ्वीसिंह अम्बाला जेलमध्यें पोलिसतपासाची अग्निपरीक्षा देत होते त्याच वेळीं लाहोर शहरीं एका भीषण नाटकाची तयारी चालू होती. निरनिराळ्या तुरुंगांत डांबून ठेवलेले क्रांतिकारक लाहोरला आणण्यांत आले. हा १९१५ सालचा मार्च महिना होता. पृथ्वीसिंहांना अम्बाल्याहून लाहोरला पोंचविण्यांत आलें. योगायोग असा कीं ज्या गाडीनें त्यांना नेण्यांत येत होतें त्याच गाडीनें त्यांचे वडील त्यांच्याच खटल्याच्या अपिलासाठीं लाहोरला चालले होते. साठ दिवसांपूर्वीं चौधरी शादीरामांच्या डोक्यावरचा एकहि केंस पांढरा नव्हता. त्यांचें वय पन्नासच्या वर होतें तरी त्यांचे सारे केंस काळे होते. पण पृथ्वीसिंहांना आतां त्यांचें स्वरूप निराळेंच दिसलें. त्यांचे सारे केस पांढरे झालेले होते आणि त्यांची कमरहि वांकलेली होती. आपल्या तेवीस वर्षें वयाच्या ज्येष्ठ पुत्राच्या पायांत त्यांनीं जड बेड्या पाहिल्या, पण त्यांनीं आपलें मन घट्ट केलें. त्यांनीं राष्ट्रीयतेच्या गोष्टी कधीं ऐकलेल्या नव्हत्या, शिक्षा खाण्याचाहि प्रसंग त्यांच्यावर आलेला नव्हता. पण त्यांना आपल्या रजपुती बाण्याचा अभिमान होता. पृथ्वीसिंहांना यामुळें फार समाधान वाटत होतें.

लाहोर सेंट्रल जेलच्या १४ नंबरच्या वॉर्डांत त्यांना ठेवण्यांत आलें. जेलच्या लोकांना त्यांच्या बाबतींत आणखी विशेषशी माहिती नव्हती. म्हणून इथें त्यांना अमेरिकेहून परत आलेल्या कितीतरी इतर दोस्तांना भेटण्याची संधि मिळाली. दुसऱ्या दिवशीं ते आपलें काम पुरें करून हिशेब देण्यासाठीं गेले तेव्हां बाबा सोहनसिंह ( भाकना ) आपला बिछाना घेऊन कोठड्यांकडे येत असलेले त्यांना दिसले. महायज्ञाच्या समिधा एकत्र करण्यांत येत आहेत हें पृथ्वीसिंहांना समजून चुकलें. बाबा सोहनसिंहांना तर जहाजावरच अटक झाली होती. पृथ्वीसिंहांवर त्याची फार माया होती. पृथ्वीसिंहांना दररोज वीस शेर पीठ दळावें लागतें हें ऐकून त्यांना फार दुःख झालें. कितीदां तरी ते चोरून पृथ्वीसिंहांना भेटत आणि त्यांना धीर देऊन त्यांचा उत्साह द्विगुणित करीत असत. दोन चार दिवसांतच साऱ्या कोठड्या भरून गेल्या. १४ नंबरच्या वॉर्डांत सर्वांत जास्त धोकेबाज कैद्यांनाच ठेवण्यांत येत असे. आतां नाटक कसें काय वठणार याचा सारे लोक विचार करीत होते. पण " आम्ही स्वातंत्र्यासाठीं प्राणार्पण करीत आहोंत. यापेक्षां आयुष्याला जास्त किंमत ती काय येणार ? " या विचारानें सारे अगदीं आनंदांत होते. पृथ्वीसिंहांप्रमाणेंच पंडित जगतराम यांनाहि शिक्षा

झालेली होती आणि त्यांनाहि लाहोरला आणण्यांत आलें. लवकरच या दोघांचे कैद्याचे कपडे काढून घेण्यांत आले; त्यांचें पीठ दळण्याचें काम बंद झालें. आतां ते पहिल्या लाहोर कटाच्या खटल्यांतील आरोपी होते.

पृथ्वीसिंहांचे वकील अंबाल्याचे लाला दुनीचंद यांनीं चौधरी शादीराम यांना कळविलें कीं पृथ्वीसिंहांना लाहोर कटाच्या खटल्यांत गोंवण्यांत आलें आहे. ते पुन्हां एकदां आपल्या मुलाला भेटण्यासाठी लाहोरच्या तुरुंगांत गेले. वडिलांचें धैर्य पाहून पृथ्वीसिंहांना समाधान वाटलें. त्यांनीं वडिलांना समजावलें : "माझ्यावर जे भयंकर आरोप करण्यात आले आहेत त्यांच्यावरून तुम्हीं आता असंच धरून चाला कीं तुमचा मुलगा मेला. मला तुमची कांहींच सेवा करतां आली नाहीं याबद्दल मला क्षमा करा. अन् आतां इथं राहण्यांत कांहीं फायदा नाहीं. तुम्ही ब्रह्मदेशाला परत जा."

## कोर्ट आणि आरोपी

इतके पुष्कळ लोक बंडाच्या आरोपांत गोंवण्यांत आल्याचा हा १८५७ नंतरचा पहिलाच खटला होता. तुरुंगांतल्या एका मोठ्या बराकीचें रूपांतर एका हॉलमध्यें करण्यांत आलें होतें. एका बाजूला एक उंच चवुतरा अगर प्लॅटफॉर्म तयार करण्यांत आला होता, त्यावर खास कोर्टाचे ( स्पेशल ट्रायब्यूनलचे ) तीन न्यायाधीश बसण्याची सोय केलेली होती. उजव्या बाजूला सरकारी अधिकाऱ्यांची बसण्याची जागा होती. आणि डाव्या बाजूला कैद्यांचा पिंजरा होता. तीन जज्जां-पैकीं दोन इंग्रज व एक हिंदी ( शिव नारायण शर्मा ) होते. जज्जांच्या मदतीला सी. आय. डी. चे बडे बडे हुशार अधिकारी, सरकारी वकील व फौजदारी खटले चालविणारे एक सुप्रसिद्ध बॅरिस्टर मि. पेटनम् हे लोक होते. पासष्ट हिंदी आरोपींचा खटला चालविण्यासाठीं सात वकील देण्यांत आले होते. त्यांपैकीं एक वगळून बाकीचे सगळे नुकतेच काळा झगा घालूं लागलेले होते. कांहीं जणांचा तर बहुधा कोर्टांत उभे राहण्याचा हाच पहिला प्रसंग होता. मार्च महिन्यांत एके दिवशीं सकाळीं साऱ्या आरोपींना त्यांच्या कोठड्यांतून बाहेर काढून त्यांच्या हातांत हातकड्या घालण्यांत आल्या आणि मग शिपाई त्यांना कोर्टाच्या बराकीकडे घेऊन चालले. सारे अगदीं आनंदांत होते. कारण अखेरच्या घटकेला सर्वांना एकदमच मृत्यूशीं सामना करण्यास मिळणार होता. त्यांनीं इंग्लंडच्या राजाविरुद्ध व हिंदुस्थानच्या बादशहाविरुद्ध युद्ध करण्यासाठीं कट केला असा त्यांच्यावर आरोप होता. आरोप चुकीचा होता. कारण त्यांनीं गुप्त कट कसलाच केलेला नव्हता. ज्या

अमदानींत आमच्या देशबांधवांना "कोमागाता मारू" च्या बाबतींतल्याप्रमाणें वागणूक मिळते ती अमदानी आम्ही कधींहि सहन करणार नाहीं अशी त्यांनीं जाहीर घोषणा केलेली होती.

पासष्ट आरोपींमध्यें इंग्रजी चांगलें जाणणारे फार तर बारा जण असतील. कोर्टांत काय बोलणीं चाललीं आहेत, आपल्या नशिबाचा या लोकांनीं काय काय खेळखंडोबा चालविला आहे, हें समजूं शकणारे बाबा सोहनसिंह, पं. जगतराम, कर्तारसिंह, पिंगळे, केदारनाथ सहगल, भाई परमानंद व आणखी कांहीं थोडे लोक होते. सगळ्यांना त्यांत कसलीच गोडी वाटत नव्हती. आरोपी इतके बेपर्वा होते कीं ट्रायब्यूनलच्या अध्यक्षाला घंटी वाजवून त्यांचें लक्ष वेधून घ्यावें लागत असे. कितीदांतरी घंटी वाजवूनहि ते लक्ष देत नसत. मग जज्ज संतापून उठे.

नऊ सरकारी अधिकारी त्यांच्याविरुद्ध साक्ष देण्यासाठीं उभे होते. त्यांतला नववा तर दोन महिनेपर्यंत त्यांच्या सहवासांत राहिल्यानंतर सरकारी साक्षीदार बनला होता. या पासष्ट लोकांमध्यें कांही जण असे होते कीं त्यांचा क्रांतिकारक कार्याशीं कांहींच संबंध राहिलेला नव्हता; पण उत्साहाच्या भरांत ते वाहवले होते. कित्येक नुसतेच सहानुभूतिदार होते पण सहानुभूति दर्शविण्यापलीकडे त्यांनीं कांहींच केलें नव्हतें. गदर पार्टीचे आजन्म सभासद असलेले व आपला सारा वेळ पार्टीसाठीं देणारे लोक आरोपींच्या सबंध पिंजऱ्यांत अवघे तीन होते. पंधरा सभासद पोलिसांच्या हातीं सांपडलेच नव्हते. ते फार मोठे जबाबदार कार्यकर्ते होते.

१९१४ सालीं अजून असहकारितेचे वारे वाहूं लागलेले नव्हते म्हणून कोर्टाच्या साऱ्या कामकाजावर पूर्णपणें बहिष्कार घालण्याचा प्रश्नहि नव्हता. इंग्रज सरकार आपला अपराध जेणेंकरून सिद्ध करूं शकणार नाहीं येवढ्याच दृष्टीनें हे आरोपी कोर्टाच्या कामांत जो काय भाग घेत असतील तेवढाच. मरणाची तर त्यांना पर्वाच नव्हती. त्यांना पर्वा असलीच तर ती येवढीच होती कीं कसेंहि करून हिंदुस्थानची इज्जत राहिली पाहिजे. मरावयाचें आहे खरें मग क्रांतीचें ध्येय व क्रांतीचा संदेश आपल्या डोक्यांत लपवून ठेवून कां म्हणून मरावें? असा विचार त्यांनीं केला. शेवटीं असें ठरलें कीं पार्टीच्या सहा सभासदांनीं उघडपणें सारी जबाबदारी स्वतःच्या शिरावर घ्यावी. पृथ्वीसिंह वयानें फारच लहान ( अवघे २३ वर्षांचे ) होते; तरी आपलेंहि नांव या सात नांवांमध्यें आहे म्हणून त्यांना अभिमान वाटला. या मंडळींनीं जबाब काय द्यावयाचा हेंहि ठरविण्यांत आलें. "कोमागातामारू" जहाजावरील हिंदी लोकांवर जो जुलुम करण्यांत आला त्यामुळें

हिंदी लोकांच्या अंगाची लाहीलाही कशी झाली, हिंदी मजुरांना क्रांतिकारक संघटना करणें कसें भाग पडलें, नंतर उघड बंडाचा झेंडा कसा उभारण्यांत आला, इत्यादि गोष्टी या जबाबांत त्यांना सांगावयाच्या होत्या. आपला जबाब तुरुंगाच्या बराकीबाहेर जाऊं दिला जाणार नाहीं हें त्यांना ठाऊक होतें, पण सर्वशक्तिमान ब्रिटिश सरकारला आपलें म्हणणें तरी ऐकवूं या असा त्यांचा बेत होता. सरकारी वकील जो रिपोर्ट पास करील तेवढाच वर्तमानपत्रांमध्यें जाऊं शकत होता. आरोपींच्या वकिलांना देखील तिथली गोष्ट बाहेर फोडण्याची परवानगी नव्हती. जनतेपैकीं कोणाहि माणसाला कोर्टांत येतां येत नव्हतें. आरोपींच्या सग्यासोयऱ्यांना देखील आंत येण्याची परवानगी नव्हती. आरोपींनीं आपला जबाब लिहून कोर्टाला सादर केला. त्यापैकीं एकहि शब्द वर्तमानपत्रापर्यंत पोंचूं शकला नाहीं. त्यांनीं किती शौर्यानें इंग्रजांच्या कोर्टाशीं सामना दिला याचें कौतुक करावयाला तिथें कुणीच नव्हता. सात हुतात्म्यांमध्यें आपली निवड कां करण्यांत आली याची चौकशी पृथ्वीसिंहांनीं आपल्या सहकाऱ्यांजवळ केली. तेव्हां आपण एक निर्भय तरुण आहोंत म्हणून आपली निवड झाली, दुसरें तिसरें कांहींच कारण नाहीं, असें जेव्हां त्यांना कळलें तेव्हां आपला हा फार मोठा बहुमान झाला असें त्यांना वाटलें.

साऱ्याच आरोपींना एक अजब प्रकारचा आनंद अनुभवावयास मिळत होता. त्यांच्या मनांत भीतीचा मागमूसहि नव्हता. पृथ्वीसिंह नुसतेच खुशींत होते इतकेंच नव्हे तर आपल्या विरोधकांना चिडविण्याची कोणतीहि संधि ते वांया दवडत नव्हते. कोर्टासमोर आपला जबाब देत असतांना त्यांनीं एका ठिकाणीं असा उल्लेख केलेला होता :

" लाहोरच्या रस्त्यावर पंडित जगतराम भेटले आणि आम्ही दोघे खूप हंसलों. " हें सांगत असतांना ते स्वतः हंसत होते आणि पंडित जगतरामदेखील त्यांना सामील झाले होते. असली धिटाई पाहून जज्जानें चिडून विचारलें—
" तुम्ही कां हंसतां ? "

" अमेरिकेंत आमचे दोस्त आम्हांला सांगत होते कीं हिंदुस्थानच्या सी. आय. डी. पासून तुम्हांला नेहमीं सावध राहावं लागेल; ते फार कावेबाज असतात अन् एकदां पाहिल्याबरोबरच तुमच्या साऱ्या गोष्टी त्यांना कळतात." मग पंडित जगतरामांकडे वळून ते म्हणाले, " पंडितजी ! बघा हे लोक किती हुशार आहेत ते. बिचाऱ्या साध्यासुध्या किसानांना पकडून तुरुंगांत डांबून ठेवलं आणि आम्ही आपले मजेंत काम करीत राहिलों."

पृथ्वीसिंहांच्या थट्टेखोर बोलण्याचा आनंद त्यांचे सारेच दोस्त उपभोगीत होते आणि अधून मधून मोठमोठ्यानें हंसून टाळ्या वाजवीत होते. जज्ज संतापून उठे आणि गडबड थांबविण्यासाठीं एकसारखी घंटी वाजवीत राही.

पृथ्वीसिंह आणि जगतराम यांजसारखे लोक गदर पार्टीच्या आश्रमांत झटून कार्य करीत होते आणि हिंदुस्थानला परत आल्यानंतर ते आणखी तत्परतेनें आपल्या कामाला लागलेले होते. खूप खर्च करून कामावर ठेवलेल्या सी. आय. डी. पोलिसांना त्यांचा मुळींच सुगावा लागला नाही. पृथ्वीसिंहांशीं अंबाला शहरीं व पंडित जगतराम यांच्याशीं पेशावर शहरीं ज्यांनीं दगलबाजी केली ते लोक निराळेच होते. पोलिसांची अशी फजीति झाल्यामुळें त्यांना आपल्या वरिष्ठांसमोर तोंड दाखविण्यास जागा नव्हती म्हणून त्यांनीं कितीतरी साध्यासुध्या लोकांना उगीचच पकडलें व त्यांनाच धोकेबाज क्रांतिकारक ठरविलें. स्वतः पृथ्वीसिंहहि पुढच्या काळांत सोळा वर्षें फरारी राहून कार्य करीत होते आणि सी. आय. डी. चे लोक नुसतीच शेखी मिरवीत होते.

एके दिवशीं सी. आय. डी. इन्स्पेक्टर जनरल पृथ्वीसिंहांकडे आला आणि म्हणाला "वा! एकाच रात्रींत तुम्ही क्रांतिकारक कसे काय झालांत हो? अम्बाल्यांत तर तुम्ही सगळ्या बाबतींत कानांवर हात ठेवून मोकळे झालां होतां ना?"

"त्या वेळीं अज्ञान दर्शविणं आवश्यकच होतं. कारण तुम्हांला त्या वेळीं माझ्याकडून माहिती काढून घ्यायला हवी होती. दमदाटी व आमिष देऊन तुम्हांला हें काम करायचं होतं. त्या वेळीं कांहींहि सांगणं म्हणजे भेकडपणा व दगलबाजी ठरली असती. इथं आम्ही घाबरून व आमिषाला बळी पडून कांहीं सांगतों आहोंत अशांतला मुळींच प्रकार नाहीं. इथं तर आम्ही उघड उघड घोषणा करतों आहोंत कीं आम्हांला आमच्या देशाचं स्वातंत्र्य प्रिय आहे अन् आम्ही आमचे प्राण देऊन आमचा देश स्वतंत्र करण्याचा प्रयत्न केला. आमच्या देशबांधवांना हें समजावं म्हणूनच ही घोषणा आम्ही जाहिरपणें करत आहोंत."

आरोपींमध्यें विशनसिंह पहिलवान यांच्यासारखे भले दांडगे लोक होते. त्यांचा रुबाब व ताकद पाहून विरोधकांचा थरकांप होत असे. त्यांच्यावर खून व दरवड्याचा आरोप होता. तरी पण ते लोक पृथ्वीसिंहांइतके धोकेबाज समजले जात नव्हते. इतके दिवस जेलमध्यें असतांना त्यांनीं कसलीहि चूक केली नव्हती; आपलें काम पुरेपूर करण्याच्या बाबतींत त्यांनीं अंगचोरपणा कधींच केला नाहीं. असें असूनहि तेच सगळ्यांत जास्त धोकेबाज कैदी समजले जात होते. त्यांच्यासाठीं अगोदरपासूनच एक वेगळी कोठडी निवडून ठेवण्यांत येई

क्र. ७५५ १३६७ पृ. ३६

आणि रोज रात्रीं ही कोठडी बदलण्यांत येत असे. रोजच्या रोज लोखंडी सळया ठोकठोकून तपासल्या जात असत. ओळख पटण्यासाठीं पांढऱ्या रंगानें भरलेली एक हंडी कोठडीसमोर ठेवली जात असे. येवढा बंदोबस्तहि पुरेसा वाटत नसे म्हणूनच कीं काय दर दोन दोन तासांनीं शिपाई येऊन त्यांना उभें राहण्यास लावत असे. आणि मग मोठ्यानें ओरडून तो खबर देई-" ऑल इज वेल " ( सर्व ठीक आहे ). पण ऐकणाराला हे उद्गार " ऑल इज हेल " ( सर्व नरक आहे ) असे ऐकूं येत.

अटक झाली त्या वेळीं पृथ्वीसिंहांचें वजन १६० पौंड होतें, पण नंतरची कसून मेहनत व हालअपेष्टा यांच्या योगानें तें १३० पौंडांवर आलें. लाहोरला मित्रमंडळींचा सहवास लाभल्यावर त्यांचें वजन जोरांत वाढूं लागलें आणि एक महिन्यांत तें १४५ पौंड झालें. फांशीची शिक्षा ऐकेपर्यंत तें १५० पौंडांपर्यंत चढलें.

कित्येक महिनेपर्यंत साक्षी-पुरावे जाबजबाब चालू राहिले. ६५-६५ लोकांचा खटला ऐकत राहणें म्हणजे जज्जांच्या दृष्टीनें पोरखेळ खास नव्हता. मग आपला निकाल लिहिण्यासाठीं त्यांनीं कुठलें तरी थंड हवेचें ठिकाण गांठलें. आणि आरोपी जीवनमरणाच्या दरम्यान हेलखावे खात वेगवेगळ्या कोठड्यांत बंद करून ठेवण्यांत आले. त्यांत तो जुलै-ऑगस्ट महिन्यांतला लाहोरचा उन्हाळा होता. कोठड्यांमध्यें वारा औषधालासुद्धां येत नसे. कोर्टाला हे सुट्टीचे दिवस असले तरी आरोपींना मात्र हे नरकयातनांचे दिवस होते. निकालांत फांशी अगर जन्मठेप मिळणार होती. ज्यांना फांशी मिळण्याची आशा होती ते सर्वांत जास्त आनंदांत होते. आपलें नांव फांशीच्या यादींतून वगळलें जाईल असें समजण्याचें पृथ्वीसिंहांना कांहींच कारण नव्हतें. त्यांना फांशी जाणाऱ्यांच्या नावेंतच बसावयाची इच्छा होती. विशेषतः पंडित जगतराम व कर्तारसिंह यांच्याहून वेगळें भवितव्य त्यांना नको होतें. कर्तारसिंहांचें वयहि त्यांच्याइतकेंच होतें व त्यांना ते एक आदर्श व्यक्ति समजत असत. कर्तारसिंह हे एक पूर्ण पुरुष आहेत असें पृथ्वीसिंहांना वाटत असे. त्यांच्या अंगीं हिंमत ठांसून भरलेली होती. या सातहि लोकांनीं शपथेवर आपला जबाब दिलेला होता. कर्तारसिंह मरणापुढें मुळींच डरणारे नव्हते. क्रांतिकारकांना एकदां पैशाची कमतरता पडली. दरवडे घालणें हें पार्टीच्या तत्वाविरुद्ध होतें. पण पैशासाठीं दरवडा घालणें भाग पडलें; त्यांत एक खून झाला. कर्तारसिंहांनीं आपल्या जबाबांत सांगितलें कीं "त्या दरवड्याचा पुढारी मी होतों व त्या खुनाची जबाबदारी

केवळ माझ्यावर आहे." शिवाय त्यांनीं असेंहि सांगितलें कीं "मी माझ्या एका निरपराध देशबांधवाची हत्या केली आहे आणि तीबद्दलची शिक्षा मी चुकवूं इच्छीत नाहीं." कर्तारसिंहांचा चेहरा, त्यांची हिंमत, त्यांचा सच्चेपणा, यांचा प्रभाव जज्जांवर पडल्याखेरीज राहिला नाहीं. जज्जांनीं सांगितलें—"कर्तारसिंह! तुम्ही असा जबाब देऊं नका." पण कर्तारसिंहांनीं तसा निश्चयच केलेला होता. त्यांनीं पुन्हां तोच जबाब दिला. जज्जांनीं खूप आढेवेढे घेऊन मगच त्यांचा जबाब लिहून घेतला.

१५ सप्टेंबर (१९१५) रोजीं या पासष्ट आरोपींना कोठड्यांतून बाहेर काढण्यांत आलें व कोर्टानें त्यांना आपला निकाल ऐकविला. पृथ्वीसिंह व त्यांचे चोवीस सहकारी यांना फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली. पंचवीस जणांना जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा मिळाली. बाकीच्यांना वेगवेगळ्या मुदतीच्या शिक्षा मिळाल्या. पांच जणांना सोडून देण्यांत आलें, पण ते तुरुंगाच्या दरवाज्यापर्यंत पोंचतात न पोंचतात तोंच इतर आरोपांवरून त्यांना पकडण्यांत आलें. फांशीची शिक्षा मिळालेले आरोपी सर्वांत जास्त खुशींत होते. पंडित जगतरामांनीं तर या आनंदाप्रीत्यर्थ एक कविता लिहिली.

१९१५ सालचा पंजाब हा ओडवायरशाहीच्या अंमलाखालीं भरडून निघत असलेला पंजाब होता. या शिक्षांविरुद्ध कांहीं लिहिण्याची अगर बोलण्याची कुणालाच हिंमत होत नव्हती. उलट मागाहून असें कळलें कीं सरदार सुंदरसिंह मजीथिया यांनीं शिखांची एक सभा बोलाविली आणि तींत शिखांना असें जोरदार अपील केलें—'या लोकांनीं शिखांच्या नांवाला बट्टा लावलेला आहे म्हणून या दुष्टांना फांसावर चढविण्यांत जरासुद्धां दिरंगाई होतां कामा नये अशी आपण सरकारला विनंति करूं या.' अशा प्रकारच्या अफवा एकसारख्या उठत होत्या, पण त्यांत खरें किती खोटें किती हें कुणाला सांगतां येणार? ज्या पंचवीस जणांना फांशीची शिक्षा झालेली होती त्यांपैकीं फक्त तिघेच असे होते कीं जे एका खुनाच्या प्रकरणांत सामील होते; पंधरा जणांना तर सरळ जहाजावरच पकडून सरकारनें त्यांना तुरुंगांत डांबून ठेवलें होतें. त्यांचा अपराध येवढाच होता कीं परकीय सत्तेचें जूं आम्ही आमच्या देशाच्या खांद्यावरून झुगारून दिलें पाहिजे असा त्यांनीं अमेरिकेच्या स्वतंत्र वातावरणांत निश्चय केलेला होता.

★

## ( ६ )

# काळ्या पाण्यावर

ट्रायब्यूनलच्या निकालावर अपील होऊं शकत नव्हतें. दुसऱ्याच दिवशीं सर्व जण फांसावर चढणार होते. उशीर लागण्याचें कोणतेंच कारण ठाऊक नव्हतें. एकेका वेळीं पांच पांच लोकांना फांसावर लटकावण्यांत येईल अशी बातमी तुरुंगांतले लोक सांगत होते. पृथ्वीसिंहांच्या जवळचे पांच दोस्त 'फांशीच्या घांटावर चढायचा मान मिळविणारे पांच भाग्यवान लोक कोण कोण असावेत बघूं या बरं ?' या विषयावर मोठ्या गंभीरपणानें चर्चा करीत होते. सारे जण आपापल्या मताच्या समर्थनार्थ कारणें सांगत होते. पण मृत्यूचा पुढारी कोण होणार हें ठरविणें त्यांच्या हातीं नव्हतें. पहांटे चार वाजतां प्रत्येक कोठडीच्या दाराशीं पाण्याची बादली ठेवण्यांत आली. 'तयार व्हा' असा याचा अर्थ होता. सर्वांनीं सळयांच्या आंतून हात घालून लहान भांड्यांतून पाणी घेऊन स्नानें केलीं. मग फरशी धुतली व शेवटची पूजा प्रार्थना सुरू केली. पूजा आटोपल्यावर ते शिपाई येण्याची वाट बघत राहिले. पण तिथें कुणाचाच पत्ता नव्हता. तासामागून तास गेले पण कांहींच बातमी कळेना. कोणी सांगत सरकारनें बहुधा इथें फांशी देण्याचा विचार सोडून दिला असावा; आतां या पंचवीस लोकांना लाहोर शहराच्या कोणत्या तरी चौकांत सरकार घेऊन जाईल आणि नागरिकांच्या समक्ष त्यांना फांसावर लटकावून ठेवील. अशा रीतीनें वाट पाहतां पाहतां संध्याकाळ झाली. कांहींच बातमी कळली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं जेलचा इंग्रज सुपरिंटेंडंट फांशीची शिक्षा झालेल्या कैद्यांकडे आला. या मंडळींना वाटलें कीं हा फांशीची वेळ सांगण्यासाठीं आलेला असावा. पण त्यानें जेव्हां 'तुम्हांला व्हाइसरॉयकडे क्षमायाचना करतां येईल' असें सांगितलें तेव्हां साऱ्यांना आश्चर्य वाटलें व चीडहि आली. दयेची याचना? प्राणांची भिक्षा ? क्रान्तिकारी जीवनाच्या संध्यासमयीं हुतात्म्यांनीं हें काम करावयाचें ? पृथ्वीसिंहांनीं आणि त्यांच्या दोस्तांनीं ही सूचना ठोकरून लावली. सुपरिंटेंडंट परोपरीनें त्यांची समजूत घालूं लागला, पण या गोष्टीला कुणीच तयार होईना. ज्याच्याशीं लढावयाचें, त्याचीच क्षमा कसली मागावयाची ! सर्व युक्तिवाद

निष्फळ ठरल्यानंतर सुपरिंटेंडंटनें आरोपींच्या वकिलांना दयेचा अर्ज करण्यास सांगितलें. त्यांनींहि परोपरीनें समजूत घालून पाहिली व जगण्याची संधि दुसऱ्यांदां मिळत आहे ती घ्या असें सांगून पाहिलें. त्यांत अशीहि एक अफवा ऐकूं आली कीं क्रांतिकारक लोक बाहेरून तुरुंगावर हल्ला करून या मंडळींची सुटका करण्याची जय्यत तयारी करीत आहेत. अखेरीस सर्व आरोपींनीं शेवटच्या विनंती अर्जावर एकदांच्या सह्या केल्या. त्यांत कर्तारसिंहांनीं सही केली कीं नाहीं हें कळलें नाहीं. आरोपींना एकमेकांचा सल्ला घेण्याची संधीच देण्यांत आली नाहीं. स्वतःचा विनंती अर्ज स्वतः लिहिण्याची सवलतहि त्यांना नाकारण्यांत आली. पृथ्वीसिंहांनीं मात्र आपण स्वतः हा विनंती अर्ज लिहिणार व त्यांतला एक शब्दहि कमीजास्त करतां कामा नये या अटीवरच तो पाठविण्याचें कबूल केलें. त्यांचा अर्ज साधारणपणें अशा प्रकारचा होता :

> "मी जें कांहीं केलें त्याच्या परिणामाचा नीट विचार करून जाणून बुजूनच केलें. मी जें कांहीं केलें व ज्याच्यासाठीं मला फांशी देण्यांत येत आहे तो सभ्य समाजाविरुद्ध गुन्हा असा मुळींच नव्हता असें माझें ठाम मत आहे. मी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यावर प्रेम केलें व परकीयांच्या गुलामगिरींतून देशाला मुक्त करण्याची माझी मनीषा होती. स्वदेशावर प्रेम करणें हा माणसाला फांशी देण्याइतका भयंकर गुन्हा असेल तर बिलकुल दिरंगाई न लावतां ताबडतोब मला फांशी देण्यांत यावें हीच माझी विनंती आहे."

दुसऱ्या कुणी तरी आपल्या वतीनं मन मानेल तसा विनंती अर्ज लिहावा आणि मग इंग्रज सरकारनें 'हिंदी क्रांतिकारक फांशीला भिऊन क्षमायाचनेचें रडगाणें गातात' असा जगभर डांगोरा पिटावा हें पृथ्वीसिंहांना नको होतें.

सुपरिंटेंडंटनें हा विनंती अर्ज पाहिल्यावर तो पृथ्वीसिंहांकडे आला. त्यानें विचारलें—"पृथ्वीसिंह! हा तुमचा विनंती अर्ज आहे? याला तुम्ही अर्ज म्हणतां?"

गालांतल्या गालांत हंसत पृथ्वीसिंह नम्रपणें उत्तरले—"होय साहेब. तुम्हांला जर पसंत नसेल तर नका पाठवूं. माझ्या सहीनं जर तुम्हांला अर्ज पाठवावयाचा असेल तर यांत एक शब्दहि कमीअधिक होतां कामा नये."

सुपरिंटेंडंट फार हळव्या मनाचा इसम होता. एक सुसंस्कृत नवयुवक इतक्या कोंवळ्या वयांत फांशी देण्यासाठीं रवाना होत असलेला पाहून त्याच्या

हृदयांत कालवाकालव झाली. त्यांचा हा विनंती अर्ज पुढें रवाना झाला कीं नाहीं हें कळलें नाहीं.

आज उद्यां करतां करतां एक आठवडा गेला तरी कांहींच बातमी कळली नाहीं. या मंडळींना एकेक दिवस म्हणजे एकेका शतकाइतका मोठा वाटूं लागला. मरणाचें भय तर मनांतून अगोदरच नाहींसें झालें होतें. आतां दिवस उगीचच काढावयाचे होते. भविष्य काळाचा विचार करण्याची या मंडळींना जरूरच नव्हती कारण त्यांच्या आयुष्याच्या जमाखर्चाचें खातेंच बंद होऊन चुकलें होतें. वाचावें म्हटलें तर तिथें कांहीं पुस्तकेंहि नव्हतीं. सारे जण पुनर्जन्म मानणारे होते. म्हणून त्यांची अशी समजूत होती कीं आपण पुन्हां जन्मभूमीचा उद्धार करण्या-साठीं या देशांत दुसरा जन्म घेऊन येऊं तेव्हांच आपल्याला पुढचा विचार करावा लागेल. त्यांना मरावयाचें तर होतें पण मृत्यू आतां कोठपर्यंत वाटचाल करीत आलेला आहे याचा त्यांना पत्ता नव्हता.

अखेरीस २१ मे (१९१५) रोजीं सुपरिंटेंडंट त्यांच्या कोठडीच्या दाराशीं येऊन उभा राहिला. त्याच्या हातांत एक कागदाचा चिटोरा होता. त्यानें एकेक नांव पुकारलें, त्यांना एकामागून एक कोठडींतून बाहेर काढण्यांत आलें, त्यांच्या बेड्या तोडण्यांत आल्या आणि तुरुंगाच्या वेगळ्या वॉर्डांत त्यांना नेण्यांत आलें. पृथ्वीसिंहांना व त्यांच्या सहकाऱ्यांना जिवंत राहण्याचा हक्क मिळाल्याबद्दल सुपरिंटेंडंटनें त्यांचें अभिनंदन केलें. मागें कोण कोण राहिले हें त्यांना कळलेंच नाहीं. आतां ते जिवंत राहणारे कैदी म्हणून त्यांना नव्या कोठड्यांमध्यें ठेवण्यांत आलें. आतां त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. मागें कोणकोण राहिले याची माहिती बेताबेतानें काढण्याची त्यांनीं खटपट केली. अठरा लोकच इकडे आणण्यांत आले असून सात लोक मागें राहिले आहेत हें कळतांच त्यांचा सारा आनंद मावळला. त्यांना एकेक नांव जेव्हां कळलें तेव्हां त्यांच्या काळजाचें पाणी पाणी झालें:— (१) कर्तारसिंह सराभा (वय २० वर्षें); (२) व्ही. जी. पिंगळे; (३) जगतसिंह सुरसिंग; (४) हरनामसिंह (सियालकोट); (५) सरैणसिंह (अमृत-सर); (६) बखसीससिंह आणि (७) पंडित काशीराम. कर्तारसिंह हे पृथ्वी-सिंहांचे समवयस्क होते. गदर पार्टीच्या आश्रमांत दोघे एकत्र राहिले होते; दोघांनीं बरोबरीनें कामें केलीं होतीं. कर्तारसिंहांना हुतात्मा होण्याचा मान मिळाला हें पाहून पृथ्वीसिंहांना त्यांचा हेवा वाटला व स्वतःविषयीं फार वाईट वाटलें पिंगळे हे एक दिलदार महाराष्ट्रीय तरुण होते. त्यांची बुद्धि फार तीक्ष्ण होती पण त्यांच्या ठिकाणीं खोटेपणाचा मागमूसहि नव्हता. कर्तारसिंह फांशी

जाणार हें ऐकून साऱ्या जेलवर दुःखाची छाया पसरली. त्यांचे दोस्तच नव्हेत तर तुरुंगांतील सामान्य कैदी देखील त्यांच्याकडे आकृष्ट झालेले होते. कर्तारसिंहांना सोडविण्यासाठीं जर कसलीहि गडबड झाली असती तर तुरुंगांतले सामान्य कैदी देखील तींत सामील झाले असते. पंडित जगतरामांनीं त्या प्रसंगावर एक कविता लिहिली तिच्यांतल्या कांहीं ओळी पुढीलप्रमाणें होत्या:

सन उन्नीससो बहत्तर माह मगहर दूसरी;
गदरकी पलटनका दस्ता मुक्तिको जाता हैं आज;
है जगाया हिन्दको कर्तार तेरी मौतने;
कसम हर हिन्दी तेरेही खून की खाता है आज;

सात हुतात्म्यांच्या खुनाबरोबर पहिलें नाटक समाप्त झालें.

## अंदमानच्या वाटेवर

कांहीं दिवसांनंतर पृथ्वीसिंह व त्यांच्या अनेक दोस्तांच्या पायांत पुन्हां जड बेड्या ठोकून त्यांना चौदा नंबरच्या वॉर्डांत रवाना करण्यांत आलें. दोघां दोघांच्या हातांत मिळून एकेक हातकडी घातलेली होती. सूर्यास्तानंतर त्यांना लष्करी लॉरींत बंद करण्यांत आलें. आणि इंग्रज सैनिकांच्या पाहऱ्यांत मोगलपुरा स्टेशनावर एका बाजूला उभ्या असलेल्या डब्यांत त्यांना बसविण्यांत आलें. डबा मेल गाडीला जोडण्यांत आला व ते एका अज्ञात दिशेकडे रवाना झाले. पुरे साठ तास त्यांना बसूनच काढावे लागले. संडासांत जातांना सुद्धां हातकड्या तशाच ठेवलेल्या असत. पण जीं हृदयें फांशीच्या व मृत्यूच्या धाकानें जरादेखील विचलित झालीं नाहींत तीं आतांहि तशींच निर्भय राहिलीं म्हणजे नवल नव्हे. स्टेशनवर गाडी उभी राहिली कीं अठरा जण कसलें तरी क्रांतिकारक गाणें म्हणूं लागत. तें ऐकण्यासाठीं लोक जमा होत. बन्दुका पाहून कुणाला जवळ येण्याची हिंमत होत नसे, पण लोक या बाबतींत आपसांत विचारपूस करूं लागत आणि अनेक प्रकारचे अंदाज करीत असत.

संध्याकाळीं गाडी हौरा स्टेशनवर पोंचली. पोलिसांच्या कडक पाहऱ्यांत घोडागाड्यांमध्यें बसवून त्यांना अलिपूर सेंट्रल जेलमध्यें पोंचविण्यांत आलें. इथल्या मुक्कामांतल्या बहुधा दुसऱ्या दिवशीं सुपरिंटेंडंट कैद्यांना भेटावयास येणार होता. कैद्यांचे जमादार व शिपाई त्यांच्याकडे आले व त्यांना सांगूं लागले—"सुपरिंटेंडंट येतील त्या वेळीं जमादार 'सरकार, सलाम!' असं म्हणेल; मग सगळ्या लोकांनीं दोन्ही तळहात दाखवीत खांद्यांवर ठेवले पाहिजेत व मग

हात ताठ करून ठेवले पाहिजेत आणि मग तोंडांतून जीभ बाहेर काढली पाहिजे.'' जेलच्या जमादारानेंहि साऱ्या गोष्टी शिकवून पढवून ठेवल्या. ''सरकार'' असा पुकारा ऐकूं आला. कैदी जमादारानें पृथ्वीसिंहांना उभें केलें. शिपाई येऊन पाहतो तों पृथ्वीसिंह साधे सरळ उभे आहेत. त्यानें रागारागांत सांगितलें—''असं नाहीं, असं!'' आणि कसें उभें राहावयाचें तें त्यानें स्वतः उभा राहून दाखविलें. पण पुन्हां तोच प्रकार. मोठ्या जमादारानें हें पाहिलें तेव्हां तो खूप चिडला आणि म्हणाला–''अँ? तुला कसं उभं राहायचं तें ठाऊक नाहीं असा उभा आहेस तूं!'' पृथ्वीसिंहांनीं हंसत सांगितलें–'' फार छान!'' आतां जेलरबरोबर सुपरिंटेंडंट तेथपर्यंत येऊन पोंचला. पृथ्वीसिंह सरळ उभे होते आणि त्यांची नजर सुपरिंटेंडंटच्या चेहऱ्यावर खिळलेली होती. त्यानें त्यांना पाहून घेतलें व कांहींएक न सांगतां त्यानें आपला रस्ता सुधारला. पृथ्वीसिंहांना मागाहून कळलें कीं त्यांच्या साऱ्या दोस्तांनीं असेंच केलें होतें. दुसऱ्या दिवशीं त्यांना छड्या मारण्याची धमकी देण्यांत आली. पण तशा अपमानास्पद रीतीनें उभा राहण्यास कुणीहि तयार नव्हता. ही पीडा कशीबशी एकदांची टळावी म्हणून जेलचे अधिकारी अगदीं उतावीळ झाले होते. पण अंदमानला जाणारें '' महाराजा '' जहाज यावयास अजून अवकाश होता.

अखेरीस जहाज आलें. अठरा लोक जहाजावर रवाना झाले. त्यांना कोठड्यांमध्यें बंद करण्यांत आलें. कोठड्यांच्या गोल गोल झरोक्यांतून ते कलकत्ता शहराकडे पाहात होते. मन उदास झालेलें होतें. कारण जिवंतपणीं पुन्हां आपल्या मातृभूमीचें दर्शन घेतां येईल याची त्यांना आशाच नव्हती. आतां ते भविष्य काळाविषयीं विचार करूं लागले. फांशीशीं तुलना करतां हें आयुष्य जरा कठीणच होतें. फांशी काय, कांहीं मिनिटांची गोष्ट होती. पण आतां अंदमानांत २० वर्षें काढावयाचीं होतीं. हीं येवढीं वर्षें काढणार कशीं? जहाजावर कांहीं साधे गुन्हेगार कैदीहि होते. त्यांच्यापैकीं काहींनीं अंदमानचा अनुभव घेतलेला होता. त्यांनीं तिथल्या भयंकर यातनांची कहाणी सांगितली. अंदमान हा पृथ्वीवरचा नरक होता एकूण. पण पृथ्वीसिंह प्रभृति अठरा जण सारेच एकजात निर्भय, शूर, एका मताचे, एकाच ध्येयानें प्रेरित झालेले होते. म्हणून त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. '' अंदमान हा जर नरक असेल तर आम्हीहि त्या यातना मुकाट्यानें सहन करणारे आहोंत थोडेच? '' चवथ्याच दिवशीं पोर्टब्लेअर बंदर व तिथली सुंदर हिरवळ दिसूं लागली. जहाज किनाऱ्याला लागलें. अठरा जण जेलच्या फाटकाशीं पोंचले. फाटकाच्या आंत शिरतांच जेलर बारीनें खदखदां

हंसून त्यांचें स्वागत केलें; मग तो जोरांत म्हणाला—" हे आले बघा राज्य घेणारे लोक ! राज्य पाहिजे म्हणे यांना राज्य. राज्य नाहीं मिळायचं. कोल्ह मिळेल कोल्ह. " पृथ्वीसिंहांना आणि त्यांच्या दोस्तांना या बडबडण्याचें आश्चर्य नाहीं वाटलें. कारण त्यांना अगोदरच पुष्कळशा गोष्टी ऐकावयाला मिळालेल्या होत्या. आतां हे अठराहि जण मोठमोठ्यानें हंसूं लागले. बारीचा चेहरा रागानें लालेलाल झाला. तो अंदमानचा सुलतान होता. सारें बेट त्याच्यापुढें चळचळां कांपत होतें. त्याच्या समोर या नवीन आलेल्या कैद्यांनीं इतका रुबाब दाखवावा ! तुरुंगांत सात ब्लॉक मिळून सातशें चाळीस कोठड्या होत्या. त्या अठरा लोकांना दोघां दोघां तिघांतिघांच्या टोळ्या करून आंत रवाना करण्यांत आलें. जुने कपडे घेऊन नवे कपडे देण्यांत आले. हीं त्रासाची गोष्ट होती. कारण त्यांना अनवाणी चाल-ण्याची संवय नव्हती आणि अंगणांत पायांना खडे बोंचत होते. पृथ्वीसिंहांना दुसऱ्या नंबरच्या ब्लॉकमध्यें ठेवण्यांत आलें. ते तिथें पोंचले तेव्हां संध्याकाळच्या जेवणाची वेळ झालेली होती. अजमासें शंभर कैदी दोन पंक्ती करून बसले होते. एका पंक्तींत होते हिंदु आणि दुसरींत होते मुसलमान. आणि ब्रम्ही वाढपी विजेच्या गतीनें पदार्थ वाढत चालले होते. भात, दोन चपात्या, भाजी व आमटी फेकतच चालले होते ते. माणसाचें जर लक्ष नसेल तर अन्न भांड्यांत पडण्याऐवजीं जमिनीवर सांडत होतें. मग हवें तर त्यानें जमिनीवरचेंच गोळा करून खावें, नाहीं तर उपाशीं राहावें.

पृथ्वीसिंहांनीं जेवण सुरू करून दोनचार मिनिटेंच झालीं असतील, येवढ्यांत उभे राहण्याचा हुकुम झाला. त्यांना घाईनें जेवण्याची संवय नव्हती. पंजाबांत जेवण आपल्या कोठडींत मिळत असे आणि तिथें ते स्वस्थपणें सावकाश जेवीत असत. त्यांना उपाशींच उठावें लागलें. दोन भांड्यांपैकीं एकांत पाणी भरून कोठडींत नेण्याचा हुकुम झाला आणि दुसरें दरवाजा-बाहेर ठेवून द्यावें लागलें. कडाडणाऱ्या आवाजांत हुकुम झाला— " जोडी-जोडीनें बसून रहा. " बोलण्याचालण्याची सक्त मनाई होती. राजबंद्यांना इतर कैद्यांच्या बरोबर बसण्याची संवय नव्हती. मग दुसरा हुकुम झाला—" कपडे काढा. " कैद्यांच्या अंगांत कपडे दोनच होते—एक लांड्या अस्तन्यांचा कुडता व चड्डी. वॉर्डरनें दोन्ही कपडे कसोशीनें वाचपून चाचपून पाहिले. पुन्हां हुकुम झाला—"कपडे उचला व बसून रहा."

पृथ्वीसिंहांची कोठडी वरच्या मजल्यावर होती. जास्त धोकेबाज कैद्यांना

अशा कोठड्यांमध्यें ठेवण्यांत येत असे. पृथ्वीसिंहांना याचा आनंदच झाला. गजांच्या आडून त्यांना हिरवेगार डोंगर दिसत होते. निळ्या आकाशाचा केवढा तरी मोठा भाग व चमचमणारे तारेहि त्यांच्यासमोर झगमगत होते. कोठडींत एक कांबळें होतें. वाटल्यास तें पांघरावें, वाटल्यास अंथरावें. लघवी-शौच्यासाठीं जवळच एक मडकें होतें. फारच लहान होतें तें मडकें.

सकाळीं कोठडींतून बाहेर निघतांक्षणीं पुन्हां जोडीजोडीनें बसण्याचा हुकुम मिळे व दोनच मिनिटांत कांजी येई. संडासाला जाण्याचा अगर तोंड धुण्याचा विचार करावा तर कांजीला मुकावें लागे. कांजी घेतांक्षणीं सरळ कामाच्या जागेकडे धांवत जावें लागे. कांजी घेतांक्षणीं पृथ्वीसिंहांना तळमजल्यावरच्या कोठडींत जावें लागलें तिथें नारळांच्या कांहीं शेंड्या, एक मोठें दांडकें आणि लांकडाचा तुकडा पडलेला होता. दांडक्यानें ठोक-ठोकून शेंडींतल्या रेषा अलग करण्याचें काम होतें. त्यांना वाटलें हें काम सोपें असेल. सुकलेली शेंडी कुटणें हें सोपें काम नव्हतें. आणि कितीदां तरी लांकूड उसळून कपाळावर आदळे. वीस शेर कणीक दळणें सोपें होतें पण इथें दुपारच्या जेवणाच्या वेळेपर्यंत ते शेंडीं कुटत राहिले तरी अजून बरेंचसें काम शिल्लक होतेंच. कोठडीला बाहेरून कुलुप होतें; यामुळें इतर कुणाला काम शिकविण्यासहि सांगतां येण्याजोगें नव्हतें. संध्याकाळीं चार वाजेतों नऊ छटाक स्वच्छ सुंभ चांगलें वळून द्यावयाचें होतें. ते सारी ताकत पणाला लावून हें काम करीत होते. बोटें व मनगट सुजून आलें. पण काम पूर्ण होण्याची कांहीं शक्यता नव्हती. दुपारच्या जेवणासाठीं जेव्हां दरवाजा उघडला तेव्हां बाहेर व्हरांड्यांत शेंडी कुटत असलेल्या कैद्यांना त्यांनीं आपल्या अडचणी सांगितल्या. शेंडी अगोदर पाण्यांत भिजवून मग कुटणें कसें सोपें जातें हें कैद्यांनीं त्यांना दाखवून दिलें. जेवण झाल्यावर ते पुन्हां आपल्या कामाला लागले. पण हातांची चांगलीच भगभग होऊं लागली होती. सुंभाचें प्रमाण कमी भरलें नाहीं खरें पण तें कोरडें, चांगलें झाडून साफ केलेलें व नीट लावलेलें असें त्यांना नाहीं देतां आलें.

त्या वेळीं अंदमानांत अंबाला जिल्ह्यांतला एक सुप्रसिद्ध कैदी रहमत अलीखान हाहि कैद भोगत होता. तो रजपूत होता. आपल्या जिल्ह्यांतला दुसरा एक रजपूत कैदी आला आहे असें त्याला कळलें. त्याला पृथ्वीसिंहांविषयीं सहानुभूति वाटूं लागली. रहमत अलीनें येऊन पृथ्वीसिंहांचें सुंभ पाहिलें. याचा परिणाम काय होणार हें त्याच्या लक्षांत आलें. मग अगदीं स्वच्छ व उत्तम प्रकारें वळलेलें नऊ छटाक सुंभ त्यांच्या हातीं आणून देण्यांत आलें. त्यांनीं तें डेप्युटी

जेलरकडे नेलें. तो त्याचें वजन करून कैद्याच्या तिकिटावर त्याची नोंद करीत होता. पृथ्वीसिंहांचें सुंभ चांगलें होतें व वजनांत बरोबर भरलें. डेप्युटी जेलर गालांतल्या गालांत हंसला. पण अठरा जणांपैकीं सारेच इतके भाग्यवान नव्हते. पांच जणांचें काम बरोबर झालें नाहीं असा शेरा मिळाला. त्यांना जेलर बारी-समोर नेण्यांत आलें. बारीला त्या वेळीं बहुधा फुरसत नव्हती म्हणूनच त्यांना नुसती समज देऊन सोडून देण्यांत आलें.

## लढ्याचा आरंभ

दुसऱ्या दिवशीं झांशीचे पंडित परमानंद यांना एकट्यांनाच जेलर समोर नेण्यांत आलें. बारी आरामांत आपल्या खुर्चीवर बसलेला होता. परमानन्द नेहमीं-प्रमाणें हंसतमुखानें त्याच्या समोर गेले. कैद्याच्या चेहऱ्यावर हास्य! बारीला हें सहन होणें कसें शक्य होतें! बारी रागानें लालबुंद होऊन घाणेरड्या शिव्या देऊं लागला. पण जिवावर उदार झालेले क्रांतिकारक कुणाला कधींच डरणार थोडेच! परमानंदांनींहि त्याला यथायोग्य जबाब दिला. जेलर कडाडून उभा राहिला. चर्बी व मांसानें भरलेल्या त्याच्या राक्षसी देहासमोर परमानन्द अगदीं लहान मुला-सारखे दिसत होते! पण बारी काय करूं इच्छीत आहे हें त्यांनीं नीट हेरलें. बारीचा हात परमानन्दांच्या जवळ येतो न येतो इतक्यांत त्यांनीं जरासें मागें हटून त्याच्या झांकलेल्या पोटाच्या पुढें आलेल्या भागावर असा जोराचा गुद्दा लगावला कीं बारी धाड्दिशी खालीं पडला. पहिला वार जो करावयाचा होता तो करून झाला. मग परमानन्दांना लाठ्या मारमारून जमीनदोस्त करण्यांत आलें हें सांगावयास नकोच.

ही बातमी हां हां म्हणतां साऱ्या जेलभर पसरली. "बारीला ठोकला! साल्याला ठोकला! शाबास बॉंबवाला!" असे उद्गार काढून लोक परमानन्दांच्या धाडसाची प्रशंसा करीत होते. परमानन्दांना मारहाण करून कोठडींत डांबून ठेवण्यांत आलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मेजर मरे रोजच्या प्रमाणें देखरेख करण्यासाठीं आला. तो परमानन्दांच्या कोठडींत गेला; पण त्यांना मार लागल्याची कांहींहि चौकशी न करतां एकदम म्हणाला—"कुत्र्यासारखा काय पडला आहेस?" परमानन्द ताडदिशीं उत्तरले—"कोण कुत्रा? तूं कुत्रा, तुझा बाप कुत्रा!" मरे कांहींएक न बोलतां तिथून सटकला. दुसऱ्या दिवशीं जेव्हां सारे दोस्त कुलुप लावलेल्या कोठड्यांमध्यें नारळाची शेंडी कुटण्यांत मग्न झालेले होते तेव्हां

परमानन्दांना मधल्या अंगणांत नेण्यांत आलें व त्यांचे हात पाय बांधून त्यांना तीस छड्या मारण्यांत आल्या. परमानन्दांना कांहींएक विचारण्यांत आलें नाहीं. डॉक्टराकडून त्यांची तपासणी तेवढी करण्यांत आली.

ही गोष्ट पृथ्वीसिंहांना व त्यांच्या दोस्तांना मुकाट्यानें सहन करतां येणें शक्य नव्हतें. ते अपमान सहन करण्यासाठीं नव्हते जिवंत राहिले. भाई परमानन्द व सावरकर यांच्यासारखे क्रांतिकारक असली गोष्ट खुशाल सहन करोत पण पृथ्वीसिंहांच्या दोस्तांना कांहीं ना कांहीं तरी केल्याखेरीज स्वस्थ राहवणें शक्य नव्हतें. लगेच पोर्टब्लेअरच्या चीफ कमिशनरला याची सूचना देण्यांत आली. तो ताबडतोब आला. लोकांना वाटलें चीफ कमिशनर हा जरा तरी सुशिक्षित व सुसंस्कृत असेल. पण तो कांहींच ऐकून घ्यावयास तयार नव्हता हें त्यांना दिसलें. लोक काम बंद करून स्वस्थ बसले होते आणि चीफ कमिशनर साऱ्या जणांना "काम करा नाहीं तर छड्या मिळतील" येवढेंच सांगत होता. तो पृथ्वीसिंहांच्या कोठडीपाशीं आला तेव्हां जेलरनें सांगितलें कीं "यांना थोडं इंग्रजी समजतं." तेव्हां चीफ कमिशनर म्हणाला :

"Learn to behave; otherwise you will be flogged."
(नीट रीतीनं वागायला शीक; नाहीं तर छड्या खाशील.)

पृथ्वीसिंहांनीं ताडकन उलट उत्तर दिलें : "Do your worst."
(तुला काय करायचं तें करून घे.)

दुसऱ्या दिवशीं सुपरिंटेंडंट पृथ्वीसिंहांच्या इतर दोस्तांकडे गेला. प्रत्येकाच्या तिकिटावर त्यानें अशी शिक्षा लिहिली: "सहा महिने एकान्तवास; सहा महिने दंडाबेडी, आजाऱ्याचें जेवण, तुरुंगाची शिस्त मोडल्याबद्दल शिक्षा झालेल्या कैद्याचें जेवण, आणि सात दिवस हातकड्या घालून उभे राहाण्याची शिक्षा." पण असल्या शिक्षा म्हणजे त्यांना निव्वळ पोरखेळ वाटत होता. सारे अंगानें धिप्पाड व धष्टपुष्ट होते. एक दोघे वगळल्यास बाकीचे सारेजण तीन तीन चार चार लोकांना पुरून उरणारे होते. कुणी वीट मारली तर तिला उत्तरादाखल धोंडा मारण्याची त्यांची तयारी होती. त्यांत आणखी पंचवीस क्रांतिकारक येणार अशी बातमी तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना लागली. अधिकाऱ्यांची आणखीच घाबरगुंडी उडाली.

आंतां पृथ्वीसिंह आणि त्यांचे दोस्त तुरुंगांतील शिस्तीचा भंग केल्याबद्दल शिक्षा म्हणून कोठड्यांत डांबून ठेवलेले होते. दिवसा त्यांना कांबळें अगर बिछाना मिळत नसे. लघवीसाठीं एखादें भांडेंहि नसे, आणि त्यांना लघवीशौच कोंडून

धरून राहावें लागे. कैद्यांच्या तिकिटावर लिहिलेल्या शिक्षांपेक्षांहि ही शिक्षा जास्त भयंकर होती.

पृथ्वीसिंहांच्या ब्लॉकमध्यें त्यांचे आणखी दोन दोस्त होते. पण त्यांना एकमेकांना भेटतां येत नव्हतें. आणि इतर कैद्यांनाहि त्यांच्या जवळ जातां येत नव्हतें. दिवसा कोठडीचें कुलुप फक्त तीन वेळां काढलें जात असे. सकाळीं शौच मुखमार्जनासाठीं २० मिनिटें, दुपारीं घाईघाईनें जेवण उरकून घेण्यासाठीं कांहीं मिनिटें व तितकाच वेळ संध्याकाळीं. त्यांना सकाळची कांजी मिळत नव्हती. बाकीच्या वेळांत त्यांना जगावयाला मिळत असलें तरी खाणें वर्ज्य होतें. या वेळांत तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना त्यांच्यावर आणखी अत्याचार करण्याची सुभा होती. दुपारीं मूठभर भात, आमटीच्या नांवाखालीं पिवळें पाणी आणि थोडेंसें उकडलेलें गवत—यालाच तुरुंगाचे अधिकारी 'भाजी' म्हणत असत. संध्याकाळीं दोन चपात्या, त्यांतल्या निम्म्या कच्या व निम्म्या जळलेल्या. आणि हा आहार कुणाला ? तर जे, दोघेतिघे अपवाद सोडून, एकजात पावणेसहा सहा फूट उंच होते व ज्यांचें वजनहि १५० पौंडांहून अधिक होतें, त्यांना. यांतले बहुतेक सगळेजण गिरण्यां कारखान्यांमध्यें व शेतांवर काम करणारे धट्टेकट्टे कामगार होते. या आहारामुळें त्यांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम झाला आणि कित्येक जण जन्माचे पंगु झाले, कित्येकांची तर पचनशक्तीच साफ बिघडून गेली.

जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झालेले आणखी २५ पंजाबी दोस्त अंदमानला पोंचले. ते आल्याबरोबर कामबंदीच्या संपांत सामील झाले. पण जेलचे अधिकारी तुरुंगांतील जीवन सुसह्य करण्यास तयार नव्हते; त्यांना असें करणें ही अपमानास्पद गोष्ट वाटत होती. अंदमानच्या तुरुंगांत वॉर्डर व जमादारांची संख्या तशी कमी नव्हती. पण आणखी नवे क्रांतिकारक आले तेव्हां ही संख्या पुरेशी नाहीं असें समजण्यांत येऊं लागलें. या टापूमधील बिनतारी स्टेशन वगैरेच्या संरक्षणासाठीं कांहीं इंग्रज शिपाई तिथें कामावर होते. त्यांच्यापैकीं भरपूर उंचीचे एक डझन जवान तुरुंगांत कामावर आणण्यांत आले. इंग्रज शिपाई हजर असल्याखेरीज कुणाचाहि दरवाजा उघडलाच जात नसे. लघ्वीशौच कोंडून धरण्याच्या यातना, आजारीपणांत औषधपाणी न मिळाल्यामुळें यातना, तहान लागलेल्यांना पाण्यावांचून ठेवणें, इत्यादि अनेक प्रकारें कैद्यांचा छळ करण्यांत येऊं लागला. कुणी मरणाच्या दारीं पडला तर त्याचा देखील पूसतपास होत नसे.

एके दिवशीं पृथ्वीसिंह खूप आजारी पडले. रात्रीची वेळ होती. त्यांच्या पोटांत असह्य वेदना होऊं लागल्या. पाहऱ्यावरल्या माणसाला त्यांनीं खबर

दिली. पण विचारतो कोण ! दोन तासांनीं त्यांना उलट्या-रेच सुरू झाले. त्यांना वेग आवरेनात. सकाळपर्यंत सारी कोठडी मैल्याच्या दुर्गंधीनें भरून गेली. कोणा पाहरेवाल्याला जवळपासहि येववेना. पुन्हां त्यांच्या आजारीपणाची बातमी देण्यांत आली. पण पुन्हां तसेंच दुर्लक्ष ! त्यांनीं बाहेर जाऊन स्नान केलें, कुणा कैद्यानें दाखवून दिलेली एक वनस्पति खाल्ली, तिच्यामुळें थोडासा गुणहि आला.

बारीकडे हा सारा रिपोर्ट गेला तेव्हां तो म्हणाला-" साला मेला नाहीं. " त्यानें कैदी जमादाराला चढवून ठेवलें होतें. राजबंद्यांचे हवे तितके हाल करण्याची त्याला पूर्ण मुभा देऊन ठेवलेली होती. स्नान केल्यानंतर त्यानें पृथ्वीसिंहांना पूर्वीच्याच घाण झालेल्या कोठडींत जाण्यास सांगितलें. जवळच्या चाळीस कोठड्या रिकाम्या होत्या पण त्याच घाणेरड्या कोठडींत जाण्याची तो त्यांच्यावर सक्ती करीत होता. पृथ्वीसिंहांनीं त्याला मिनतवारीनें समजावून सांगितलें, पण तो बधेना. उलट इतर पाहरेवाल्यांच्या मदतीनें त्यांना जबरदस्तीनें त्याच कोठडींत डांबण्याच्या गोष्टी तो बोलूं लागला. अर्थात् ही गोष्ट पृथ्वीसिंहांना सहन होणें शक्य नव्हतें. उलट्या-ढाळांमुळें त्यांची शक्ति क्षीण झाली होती तरीहि त्यांनीं आपली सगळी ताकत एकवटून त्याला बजावलें—"ज्यालसु मरायचं असेल त्यानं यावं पुढं. मला जो कोठडींत ढकलायला येईल तो जिवानिशीं हटायचा नाहीं." पाहरेवाल्यांची पुढें येण्याची हिंमत नाहीं झाली. इंग्रज शिपाई देखावा बघत होते व गालांतल्या गालांत हंसत होते.

कांहीं अशीं अशा तऱ्हेची गोष्ट सरदार बिशनसिंह ( पहिलवान ) यांच्या बाबतींत झाली. सरदार बिशनसिंहांना एका घाणेरड्या कोठडींत जाण्यास सांगण्यांत आलें. उतार वयांत देखील त्यांचें हत्तीसारखें शरीर व मोठमोठे पंजे पाहून कुणीहि असेंच अनुमान काढलें असतें कीं सरदारांना जर तुरुंगाबाहेर आयुष्य घालविण्याची संधि मिळाली असती तर त्यांची गणना पंजाबांतील लहान सहान नव्हे मोठमोठ्या पहिलवानांमध्यें झाली असती. त्यांनीं घाणेरड्या कोठडींत जाण्याचें साफ नाकारलें. सहा फूट उंच, २२० पौंड वजन, अशा या भीमकाय पुरुषाला जबरदस्तीनें कोठडींत ढकलण्यासाठीं दहा इसम आले. सरदारांच्या शांत चेहऱ्यावर क्रोध झळकूं लागला. सरदारांनीं गर्जना केली—" केडा मौत मँगदा ए ? ( कुणाकुणाला मरण हवंय ? ) जर कुणी पुढं पाऊल टाकील तर एकेकाचे चिरून दोनदोन तुकडे करीन." बिशनसिंह कोठडीच्या बाहेर उभे होते. बारीला तर त्यांच्या आसपास शंभर वार अंतरापर्यंतहि जाण्याची हिंमत

होत नव्हती. कुणीहि पुढें सरसावण्यास तयार नव्हता. लाठीचाहि उपयोग करतां येण्याजोगा नव्हता कारण एका लाठीचा त्यांच्यावर कांहींएक परिणाम होणार नाहीं हें या लोकांना माहीत होतें. आणि जर का त्यांनीं लाठी हिसकून घेतली तर मात्र सर्वांचेंच मरण ओढवणार हें सर्व जण ओळखून होते. म्हणून जो तो चोरपावलांनीं पसार झाला.

विशनसिंहांनीं आपल्या मनाजोगती कोठडी पसंत केली. अशा तऱ्हेच्या किती तरी घटना घडल्या. या क्रांतिकारकांची बहादुरी पाहून इतर सामान्य कैदी त्यांची प्रशंसा करूं लागले इतकेंच नव्हे तर ते क्रांतिकारकांची बाजू घेऊं लागले. बिचाऱ्या बारीची अवस्था फार चमत्कारिक झाली. त्याचा सारा रुबाब मातीमोल ठरला. साऱ्या कैद्यांच्या कोठड्यांना कुलपें लावलीं आहेत अशी खात्री झाल्यावर मग ही स्वारी पंधरा वीस लोक बरोबर घेऊन येई व कोठडीच्या बाहेर उभी राहून हिन्दीमध्यें अचकट विचकट शिव्या देई. त्या ऐकल्यावर बारी व त्याचा रुबाब अजूनहि कायम आहे हें इतर कैद्यांना समजावें असा यांत त्याचा उद्देश असे. पण आमचे पंजाबी बहादुर त्याच्या एकेका शिवीला दोन दोन शिव्यांनीं जबाब देत असत, आणि त्यासुद्धां दुप्पट मोठ्या आवाजांत! दोन तीन दिवसांनीं स्वारी मुकाट्यानें एकटीच येई आणि नरमाईच्या स्वरांत पंजाबी राजबंद्यांना सांगूं लागले—"हें पहा, मला कधीं कधीं स्वतःवर ताबा ठेवतां येत नाहीं. अन् मी तुम्हांला शिव्या देऊं लागतों. पण तुम्ही कैद्यांच्या देखत मला हिंदुस्थानींतून शिव्या देणं बरं नाहीं. अन् मला तुम्ही 'कुत्र्याची अवलाद' म्हणणं बरं नाहीं."

बारी आणि जेलचा सुपरिंटेंडेंट यांनीं पंजाबी क्रांतिकारक राजबंद्यांच्या बाबतींत हिंदुस्थान सरकारकडे जो रिपोर्ट पाठविला होता तोच हिंदुस्थानसरकारनें आधाराला घेतला आणि स्वाभिमानरक्षणासाठीं प्राणांवर उदार होणाऱ्या या क्रांतिकारकांना "लांडग्यांची झुंड" ही संज्ञा हिंदुस्थान सरकारनें दिली!

सहा महिन्यांची मुदत संपली. बेड्या काढण्यांत आल्या. राजबंद्यांनीं पुन्हां काम चालू केलें. परंतु अजूनहि त्यांना कोठडींत एकेकटें कोंडून ठेवण्यांत येत असे, वाचण्यासाठीं पुस्तकें देण्यांत येत नसत. जेलर बारी, सुपरिंटेंडंट मरे व चीफ कमिशनर यांच्या जुलुमांना अंदमानांत सीमा राहिलेली नव्हती, म्हणूनच बाबा विशाखासिंह यांजसारख्या शांत वृत्तीच्या सन्त पुरुषाला देखील पुढीलप्रमाणें कविता रचणें भाग पडलें:

" अंडमन् बिच सी डाकू तिन्न बड्डे ।
सी. सी. मरे ते बारी पछाण तिन्नों ।
रहे खून निचोड़ सी कैदियाँ दा,
एक दूसरे तो बेइमान तिन्नों ॥

जो चाँवदे जुलुमसी करी जाँदे,
बरेहम, बेतुखम शैतान तिन्नों ।
अक्खीं वेख्या, सच "बसाख" लिखदा,
जान कैदियाँ दी उत्थे खाण तिन्नों ।

[ अंदमान-द्वापूंत राहती डाकू तीन बडे
चीफ कमिशनर, मरे दूसरा, बारी तिसरा रे ॥
कैद्यांचें हे रक्त पिऊनी गलेलठ्ठ झाले
बेइमान तर एकाहुन एक वरचढ हे सगळे ॥
मानवतेचा अंश कुठोनी सैतानांमधिं या ?
तिघे मिळोनी सदैव सजले बन्दिजीव खाया ! ॥ ]

हा जुलुम लोकांना केवळ शारीरिक व मानसिक त्रास देण्यापुरताच मर्यादित राहिला नाहीं. याच्यापायीं आठ बहादुर राजबंद्यांना आपले प्राणहि द्यावे लागले. या बहादुरांचीं नांवें अशीं—(१) केहरसिंह मराण; (२) नन्दनसिंह (बुर्ज); (३) नत्थासिंह (लोरियाँ); (४) बुड्ढासिंह (गुजरात); (५) माडसिंह (सनैते); (६) हलियासिंह सरम; (७) रामरक्खा (झेलम); आणि (८) रोडासिंह (लंडे).

बारी व मरे या दोघांनीं साऱ्या कैद्यांना सळो कीं पळो करून सोडलें होतें. पण मरणाशीं खेळ खेळून याच बारी व मरेंना सळो कीं पळो करून सोडणारे राजबंदी अंदमानांत आले आहेत हें जेव्हां कैद्यांना दिसलें तेव्हां सर्वांची भक्ति या राजबंद्यांवर बसली. कुणाचा काथ्या पुरता कुटून झाला नसला तर इतर कैदी त्याला तो पुरा करण्यास मदत करूं लागले. तुरुंगाच्या नियमांप्रमाणें सुद्धां रविवारची सुटी असावयास पाहिजे; पण बारी-मरे यांनीं स्वतःचे वेगळेच कायदे केलेले होते. ते रविवारींसुद्धां वार्डाची साफसफाई करण्यास कैद्यांना सांगत असत. पहारेवाले कैद्यांना सांगत—" बाबू, त्या कोंपऱ्यांत जाऊन गवतावर बसा. कुणी जर आलं तर आम्ही सांगून देऊं कीं कैदी गवत निवडत बसले आहेत. " एक कैदी जमादार बारीच्या विशेष मर्जींतला होता. त्यानें पृथ्वीसिंहांच्या सात

दोस्तांना रविवारच्या सुटीदिवशीं देखील सबंध दिवसाचें काम करण्यास सांगितलें. त्यांनीं नकार दिला. त्यांना बारीसमोर हजर करण्यांत आलें. त्यानें त्यांना मेजर मरेसमोर हजर केलें आणि सांगितलें कीं " हे लोक काम करत नाहींत अन् उर्मटपणा करतात." मेजर मरेनें त्यांच्या तिकिटांवर लिहिलें—"सहा महिने एकान्तवास, आजाऱ्याचा आहार, हातकडी, वगैरे वगैरे."

पृथ्वीसिंहांना या गोष्टीची फार चीड आली. मरे त्या बाजूनें जात होता तेव्हां त्यांनीं त्याला सलाम करून सांगितलें—" साहेब! आमच्या दोस्तांवर अन्याय झाला आहे त्यांच्या प्रकरणांत तुम्ही पुन्हां लक्ष घाला." मरेला ऐकण्याइतकी फुरसत कुठून असावयाला? त्यानें दमदाटी देऊन उलट विचारलें—" अन्याय? यांत कसचा अन्याय?" आणि त्यानें आपल्या ऑर्डर्लीला हुकुम फर्मावला—"याचं तिकिट घेऊन ये." संध्याकाळीं पृथ्वीसिंहांनीं पाहिलें तों त्यांच्या तिकिटावर असें लिहिलेलें होतें—"जेलच्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध दुष्ट हेतूनें निराधार आरोप करूं इच्छितो." दुसऱ्या दिवशीं पृथ्वीसिंहांना मरेच्या समोर हजर करण्यांत आलें आणि त्यानें त्यांना दंडाबेडीची व एकांतवासाची शिक्षा दिली. एक वर्षाची शिक्षेची मुदत संपल्यानंतर इतर कैद्यांना कोठडीच्या बाहेर येण्यास मोकळीक मिळूं लागली पण पृथ्वीसिंहांना वीस महिनेपर्यंत बंद कोठडींत एकान्तवासांत ठेवण्यांत आलें. पण त्याच प्रमाणांत तुरुंगांतील सारे कैदी त्यांना मानहि देत असत. प्रत्येकजण त्यांना मदत करण्यास तयार असे. अधून मधून त्यांना पुस्तकेंहि वाचण्यास मिळत.

अनेक वर्षेपर्यंत पंजाब सरकार अंदमानला कैदी पाठवीत राहिलें. मात्र त्यांची संख्या दरसाल चारपांचांपेक्षां जास्त कधींच नसे. शीख कैद्यांच्या केंसांची साफसफाई, साबण, गोडें पाणी व तेल इत्यादि सोईंचा कधीं विचारच करण्यांत आला नाहीं. आतां तिथें चाळीस शीख कैदी होते. त्यांनीं या बाबतींत अधिकाऱ्यांना विनंति केली. पण तिथें त्यांचें ऐकण्यास तयार होता कोण! कुणी कुठून तरी एखादा तुकडा मिळवून साबण व गोड्या पाण्यानें डोकें धूत असलेला दिसला कीं त्याला शिक्षा होई. अनुभवानें कैद्यांना असें कळून आलें कीं नारळाच्या चवानें केंस चांगले धुतां येनात. त्यासाठीं गोड्या पाण्याची जरूर लागत नाहीं. समुद्राचें खारें पाणीहि चालतें. त्यांनीं त्याचा उपयोग सुरू केला तेव्हां त्यांना हातकडी, बेड्या, एकान्तवास, गोणपाटाचे कपडे घालणें, उपाशीं राहणें, इत्यादि अनेक प्रकारच्या शिक्षा भोगाव्या लागल्या. पृथ्वीसिंह स्वतः शीख नव्हते, त्यांनीं कधीं केंसहि वाढविलेले नव्हते, पण शिखांच्या लढ्या-

पासून त्यांना अलग रहाण्यास नको होतें. त्यांची दाढी व केंसहि थोडेफार वाढलेले होतेच. त्यांनीं जेलरला सांगितलें —"मीहि शीख आहें. मी टोपी नाहीं घालणार. मलाहि केंस झांकायला कापडाचा तुकडा मिळाला पाहिजे. त्यांनीं टोपी वापरण्याचें बंद केलें आणि कांहीं दिवसांनंतर कापडाच्या तुकड्याचीहि तरतूद झाली.

## आणखी निकराचा लढा

बारी कैद्यांना स्वस्थ राहूं देईल तर तो बारी कसचा! त्यानें एकसारखी कसली ना कसली तरी सतावणूक चालूच ठेवली. बंगालचे एक पदवीधर क्रांतिकारक आशुतोष लाहिरी यांची प्रकृति चांगली होती तेव्हां ते कोलू चालवून १५ शेर तेल काढून देत असत. पण आतां त्यांची प्रकृति तितकी चांगली राहिली नव्हती. म्हणून त्यांना काथ्या पुरेशा प्रमाणांत कुटून देतां येईनासा झाला. त्यांना लहान मोठ्या शिक्षा दिल्यानंतर मग छड्या मारण्याची शिक्षा देण्यांत आली. साऱ्या जेलमध्यें खळबळ उडाली. यानंतर बाबा ज्वालासिंह व अमरसिंह ( हे एकाच ब्लॉकमध्यें रहात होते ) यांना एका जागीं उभे असलेले पाहून बारीनें त्यांना मरेच्यासमोर हजर केलें. मरेनें त्यांना शिक्षा दिली. सावरकर, भाई परमानन्द, बारींद्र, यांच्यासारखे राजबंदी आपलें तुरुंगांतील आयुष्य शांततेनें घालवूं इच्छीत होते. ते छड्या व अपमान करून घोटाप्रमाणें पिऊन टाकण्यास तयार असत. पण पृथ्वीसिंह व त्यांचे दोस्त हीं निराळ्याच खाणींत पैदा झालेलीं माणसें होतीं. यांचा पिंड निराळ्याच मातीचा बनलेला होता. ते वीस वीस वर्षेपर्यंत बारी मरे यांनीं केलेले सारे अपमान सहन करण्यासाठीं तुरुंगांत नव्हते आलेले. लाहिरींना छड्या मारण्यांत आल्यानंतर राजबंदींनीं कांहींच कडक उपाययोजना केली नाहीं, हें पाहून बारीची हिंमत आणखी वाढली. त्यानें पुन्हां राजबंद्यांना सतावण्यास सुरवात केली. बारी आतां कैद्यांच्या ब्लॉक्समध्यें येऊं लागला. तो बोलणें सुरू करी आणि मग शिव्या देऊं लागे. एके दिवशीं तो पृथ्वीसिंहांच्या कोठडीसमोर आला आणि गप्पागोष्टी करूं लागला. पृथ्वीसिंहांनीं त्याला हंसत हंसत उत्तरें दिलीं. यावर बारी म्हणाला—"तूं पक्का माणूस आहेस. तुझ्या तोंडावर हंसूं असतं पण तुझं अंतःकरण आहे सापासारखं."

"शक्य आहे साहेब! माझ्या हृदयांत तुम्हांला सापाचं हृदय दिसतं कारण माझ्या अंगांत तें झांकून ठेवायला चर्बी नाहीं. पण तुमच्या हृदयांत काय आहे हें दिसायची मला फार मुष्किली होते. कारण त्याच्यावर चर्बीचा फार

मोठा थर जमलेला आहे अन् तोहि जिवंत चर्बीचा नव्हे. मेलेल्या चर्बीचा थर आहे तो." बारी मुकाट्यानें चालता झाला.

बाबा भानसिंह साठ वर्षांचे वयोवृद्ध क्रांतिकारक होते. एके दिवशीं बारी त्यांच्या कोठडीकडे गेला आणि स्वतःच्या स्वभावधर्मानुसार बोलला : " बचितलंत, साला राज्य घ्यायला आलाय." बाबा भानसिंह फारच शान्त स्वभावी होते. पण ते होते क्रांतिकारक. हा अपमान त्यांनीं मुकाट्यानें सहन करणें शक्य नव्हतें. त्यांनीं बारीला तिथल्या तिथें सडेतोड उत्तर दिलें. त्या भागांत त्यांच्या दोस्तांपैकीं कोणीच राहत नव्हतें. बारीनें हुकुम दिला, आठ कैदी पाहरेवाले बाबा भानसिंहांच्या कोठडींत घुसले आणि त्यांनीं त्यांना मार मार मारून बेशुद्ध पाडलें. दोन दिवसांनीं बाबा भानसिंह मरण पावले.

बारीची मजल इतक्या दूरच्या थराला जाईल असें लोकांना आतांपर्यंत वाटलें नव्हतें. संध्याकाळीं कोठडी बंद झाली त्या वेळीं एका पाहरेवाल्यानें सगळी हकीकत पृथ्वीसिंहांना सांगितली. बाबा भानसिंहांनीं निरोप पाठविला होता–" मार भलताच पडला आहे. आणि यांतून जास्त दिवस जगेन असें वाटत नाहीं." पृथ्वीसिंह रात्रभर विचार करीत राहिले. आणि बारीनें या दुसऱ्या हत्याराचा उपयोग सुरू केला आहे हें बाबा भानसिंहांच्या मृत्यूनंतर त्यांना स्पष्ट कळून आलें. त्याला जे कैदी जिवंत राहावयास नको असतील त्यांना एकेकांना तो असेंच ठार करील! बाबा भानसिंहांशीं पृथ्वीसिंहांचा विशेष निकट संबंध होता. अमेरिकेहून निघतेवेळीं ते बाबांचा निरोप घेतांना म्हणाले होते–" बाबा, देशाच्या कामासाठीं मी हिंदुस्थानला चाललोंय. तुम्हांला जी मदत करतां येईल ती करा." बाबा मुकाट्यानें ऐकत राहिले. मग त्यांनीं अंतःकरणांत खोल दडलेला आपला विचार प्रकट करून सांगितला–" तूं दुधपितं बाळ देशासाठीं प्राण दे अन् मी म्हातारा असून जिवाला घट्ट चिकटून राहतों! अत्यंत शरमेची गोष्ट आहे ही."

बाबा भानसिंह अमेरिकेंत शेतांवर काम करीत होते आणि दरमहा पंचाहत्तर डॉलर्स [ अडीचशें रुपये ] मिळवीत होते. त्यांनीं आपल्या सुखी जीवनाची व म्हातारपणाचीहि मुळींच पर्वा केली नाहीं. चार दोन मिनिटांत त्यांनीं आपली वळकटी बांधली आणि पृथ्वीसिंहांच्या बरोबरच बाबा निघाले. अर्थात् बाबा भानसिंहांच्या मृत्यूचा पृथ्वीसिंहांना विसर पडणें शक्य नव्हतें. त्यांना कांहीं तरी फार मोठा प्रकार करावयाचा होता. डोळ्यांतून वाहूं लागलेल्या अश्रूंना हृदयांतील आग विझवितां येईना. बारी व मरे हे तर अंदमानचे सर्वशक्तिमान परमेश्वर होते. परंतु

नगर वाचनालय, सातारा

पंजाबी क्रांतिकारकानीं आपल्या शौर्यबळावर साऱ्या कैद्यांच्या हृदयांत मानाचें स्थान पटकावलेलें होतें. बारीच्या हुकुमानुसार कित्येक डाकू व गुंड वाटेल तें करण्यास तयार असले तरी त्यांच्याहूनहि जास्त धोकेबाज व शूर कैदी व पहारेवाले पंजाबी क्रांतिकारकांना पाठिंबा देण्यास तयार असत. बारीचे हेर क्रांतिकारकांचीं एकेक बोलणीं जशीं त्याला सांगत असत, तशा क्रांतिकारकांनाहि बारीच्या साऱ्या गोष्टी कळत असत. त्याच्या टेबलाच्या खणांमध्यें काय काय लपवून ठेवलें आहे हें देखील त्यांना कळत असे. तुरुंगांतील सगळ्यांत बेडर व धोकेबाज कैद्यांच्या स्नेहाचा व आदराचा विषय होण्याचा मान पृथ्वीसिंहांना मिळालेला होता. तुरुंगांत रक्तपाती बंड उभारणें ही त्यांना सोपी गोष्ट होती; अर्थात् केवळ या गुन्हेगार कैद्यांच्या ताकतीवर हें बंड करावयाचें नव्हतें. शरीरानें देवासारखे बलिष्ठ व पोलादी हिमतीचे चाळीस पंजाबी क्रांतिकारक हेच या बंडाचे मुख्य आधारस्तंभ होते. त्यांच्यापैकीं कोणीहि एकजण एका थपडीसरशीं बारीला अगर मरेला खतम् करूं शकत होता. पण बारी व मरे हीं बुद्धिबळाच्या पटावरचीं केवळ मोहरीं आहेत याची त्यांना जाणीव होती. निकाल लावावयाचा आहे तो यांचा नव्हे. निकाल लावावयाचा आहे अंदमानच्या अमानुष कारभाराचा व तो चालविणाऱ्या परकीय सरकारचा. आतां लढा करणें आवश्यकच होतें. या वेळचा लढा हा साधासुधा लढा नव्हता. आतां एक तर अंदमानच्या कारभारांत बदल तरी करावा लागणार, नाहीं तर मरावें लागणार. त्यांना सार्वत्रिक संपांतल्या अडचणीहि स्पष्ट दिसत होत्या. त्यांना "टाइम्स" व "स्टेट्समन" हीं वर्तमानपत्रें वाचावयास मिळत असत. माहयुद्ध किती घनघोर स्वरूपांत चाललेलें आहे हें त्यांना या वृत्तपत्रांवरून कळलेलें होतें. कितीदां तरी देशी वृत्तपत्रेंहि चोरून तुरुंगांत आणलीं जात असत. आपण प्राण पणाला लावत आहोंत आणि याची कसली[illegible] शकणार नाहीं हें त्यांना ठाऊक होतें.

नगर वाचनालय, सातारा
संगणकीकृत

पृथ्वीसिंहांच्या ब्लॉकमध्यें रात्रीं बारा पाहरेवाले असत. त्या सर्वांना त्यांच्याविषयीं सहानुभूति होती. त्यांच्या मार्फत आपल्या इतर दोस्तांकडे तोंडी अगर लेखी निरोप त्यांना पाठवितां येत असे. ८५ राजबंद्यांपैकीं ४५ लोक कामबंदीचा संप करण्यास तयार आहेत हें त्यांना दुपारीं कळलें. त्यांच्यापैकीं कांहीं आजारी होते, म्हणून त्यांना संपांत भाग घेऊं नका असें सांगण्यांत आलें. बंगाली राजबंद्यांपैकीं तिघांनीं संपांत भाग घेतला. भाई परमानन्द जरी पृथ्वीसिं-

ह्यांच्या बरोबर राहात होते तरी ते संपांत भाग घेण्यास तयार नव्हते. या बाबतींत इतरांना विशेष तक्रार करतां येण्याजोगी नव्हती. कोणत्याहि राजकीय कार्यांत ते सामील नव्हते. आणि त्यांचे विचारहि त्यांच्याशीं जुळणारे नव्हते पोलिसांनीं उगीचच त्यांना पकडून हुतात्म्यांच्या टोळींत सामील केलें होतें. कांहीं मार्गच नव्हता म्हणून ते इथें तुरुंगात होते. सावरकर, भाई परमानन्द बारीन्द्र कुमार घोष व त्यांचे दोस्त हे जर संपांत सामील झाले असते तर संपाची ताकद वाढली असती यांत शंकाच नाहीं. पण भाई परमानन्दांखेरीज यांपैकीं इतर सर्वांना खास सवलती मिळत होत्या. त्यांना अंगात घालण्यास चांगले कपडे मिळत होते. जेवणहि ते स्वतःचें स्वतः तयार करीत होते. याशिवाय दरमहा बारा आणे त्यांना रोखहि मिळत होते. पण या लोकांचा पाठिंबा नसतांहि पृथ्वीसिंह व त्यांचे दोस्त आपला लढा आपल्या हिमतीवर लढण्यास तयार होते.

दुपारच्या जेवणानंतर सर्वांना कळलें कीं बाबा सोहनसिंहांनीं अन्नत्याग सुरू केला आहे. सोहनसिंह गदर पार्टीचे संस्थापक व अध्यक्ष होते. पृथ्वीसिंहांची आपल्या नेत्यावर अपार भक्ति होती. बातमी ऐकल्यावर त्यांना राहवणें शक्य नव्हतें. त्यांनीं अन्नत्याग करावयाचा म्हणजे मृत्यूला आमंत्रण करण्यासारखेंच होतें. मग उशीर लावण्याची काय जरूर? पृथ्वीसिंहांनीं पाणी पिणें देखील बंद केलें. अन्नत्यागाचा हा त्यांचा पहिलाच अनुभव होता. भुकेच्या आगीनें आंतड्यांची तगमग होऊं लागली व तहानेनें घशांत कांटे टोंचल्यासारख्या वेदना होऊं लागल्या. संध्याकाळीं लोहार आला आणि त्यानें त्यांच्या हातापायांत दंडा बेडी ठोकली. त्यांना वरच्या मजल्यावरून खालच्या कोठडींत बसविण्यांत आलें. आसपासच्या साऱ्या कोठड्या रिकाम्या करण्यांत आल्या. तिसऱ्या दिवशीं त्यांनीं कोठडीच्या बाहेर जाणें सोडून दिलें. चौथ्या दिवशीं भूक मेली. पण तहानेमुळें जीव जास्तच व्याकुळ झाला. रोज पाहरेवाला एका भांड्यांत खाण्याचे जिन्नस व दुसऱ्यांत पाणी अशी दोन भांडीं कोठडींत ठेवून जात असे. खाण्यापिण्यासाठीं त्यांचें मन लालचावावें म्हणून ही तरतूद होती. चौथ्या दिवशीं तहान त्रास देऊं लागली. ते उठून उभे राहिले आणि पाण्याचें भांडें ओठाला लावण्याचा विचार त्यांच्या मनांत आला. त्याच वेळीं त्यांचें मन त्यांना बजावूं लागलें: 'जीवनाला घट्ट चिकटून राहूं पाहतोयस तूं!' त्यांनीं पाण्याचें भांडें तसेंच खालीं ठेवलें. दोन-तीनदां त्यांचीं पावलें पाण्याच्या दिशेला वळलीं. त्यांनीं मनाला बजावलें, "मला जगायचं नाहीं. मी मरायला तयार आहे." आणि पुन्हां त्यांनीं पाण्याचें भांडें जमिनीवर टाकून दिलें.

थंडीचे दिवस होते म्हणून बरें. नाहीं तर येवढ्यांतच सारा कारभार आटोपला असता. सातव्या दिवशीं रात्रीचे दोन वाजून गेले. त्या वेळीं त्यांना वाटलें कीं आपले हातपाय गार पडले. पण मृत्यू कांहीं आसपास आपलें तोंड दाखवीत नव्हता. नवव्या दिवशीं मेजर मरे आला. त्यानें कोठडीचा दरवाजा खुला करविला आणि पृथ्वीसिंहांची नाडी पाहून घेतली. तो एक शब्दहि बोलला नाहीं. एक तासानंतर त्यांना एका कांबळयांत गुंडाळून लोक उचलून घेऊन गेले. आपल्याला कुठें घेऊन जात आहेत हें त्यांना ठाऊक नव्हतें. त्यांना कांबळयांत गुंडाळून नेलें जात असतां त्यांच्या दोस्तांनीं पाहिलें तेव्हां ते मेले अशीच त्यांची समजूत झाली. त्यांना इस्पितळांत नेऊन ठेवण्यांत आलें. डॉक्टरनें व कंपौंडरनें त्यांना खाऊं घालण्यासाठीं खूप समजावलें पण ते ऐकणार थोडेच! पुन्हां त्यांना उचलून कोठडींत परत पोंचविण्यांत आलें. मेजर मरे व त्याच्या साथीदारांनीं नवव्या दिवशीं त्यांना सक्तीनें अन्न खाऊं घातलें, म्हणून या बाबतींत पुढे आपल्याला खुलासा करणें सोपें जावें यासाठींच बहुधा त्यांना इस्पितळांत नेऊन परत आणण्यांत आलें असावें.

दहाव्या दिवशींहि त्यांना तशाच प्रकारें इस्पितळांत पोंचविण्यांत आलें. या वेळीं त्यांना नाकांतून जबरदस्तीनें नळीमधून खाऊं घालण्याची खटपट करण्यांत आली. पण पृथ्वीसिंहांनीं आपली सारी शक्ति एकवटून याचा प्रतिकार केला. नाकावाटे रबरी नळी घालतांना जखम झाली व नाकांतून रक्त येऊं लागलें. दहाव्या दिवसापासून हा रोजचा क्रम झाला. सकाळीं चार ब्रम्ही कैदी यावयाचे व पृथ्वीसिंहांना कांबळयांत गुंडाळून खांद्यावरून अगर डोक्यावरून इस्पितळांत घेऊन जावयाचे आणि तिथें त्यांना नाकांतून नळीनें दूध घालण्यांत यावयाचें. दोन तीन दिवसांनंतर तर ते दिवसांतून दोनदां दूध घालूं लागले. या कामासाठीं नवनवे कैदी आणण्यांत येत, हेतु हा कीं भाषेच्या अज्ञानामुळें ही गोष्ट इतरांना कळूं नये. पृथ्वीसिंहांना ब्रह्मी भाषा समजत होती. त्यांच्या शिव्या ऐकून त्यांची चांगली करमणूक होत असे. बाबा सोहनसिंह तिसऱ्या नंबरच्या ब्लॉकमध्यें राहत होते. त्यांनीं पाणी पिणें बंद नव्हतें केलें. पृथ्वीसिंहांनाहि त्याच ब्लॉकमध्यें पाठविण्यांत आलें. त्यांच्यावरहि बाबा सोहनसिंहांचा थोडाफार प्रभाव पडावा म्हणून ही व्यवस्था होती. त्यांचे दोस्त त्यांनीं सरळ उत्तर द्यावें म्हणून त्यांना सारखें सतावीत होते. पाहरेवाला रात्रींच्या वेळीं तासन्तास बडबडत असे, पण त्याला उत्तर देण्याइतकी ताकद पृथ्वीसिंहांना राहिलेली नव्हती. जीभ सुकून तिच्यावर कांटे आलेले होते. पृथ्वीसिंहांनीं आतां बोलणेंच सोडून

दिलें. पण आतां बारीनें त्यांना बोलावयास लावण्याचा निर्धार केला. तो आपल्या मर्जींतल्या कुणातरी पाहरेवाल्याला पाठवी आणि हा पाहरेवाला पृथ्वीसिंहांना अत्यंत घाणेरड्या शिव्या देई. पण पृथ्वीसिंहांची अवस्था "बुंद अघात सहहिं गिरि जैसे" अशी झालेली होती. कांहीं दिवसांनीं त्यांना इस्पितळांत नेण्यांत आलें. त्यांचें डोकें बिघडलेलें आहे कीं काय याची तपासणी करण्यांत आली. पृथ्वीसिंहांनीं डॉक्टर व कंपौंडरला सांगून टाकलें कीं "माझी जीभ सुकून जाते म्हणून मला बोलायला नको असतं." एके दिवशीं चीफ कमिशनरहि आला आणि म्हणाला—"अशा रीतीनं प्राण नका फेंकून देऊं!" पण 'तुम्ही अन्नत्याग कां केला?' असें त्यानें एकदांहि विचारलें नाहीं. दोन महिने असेच गेले. मृत्यूचा अजून पत्ता नव्हता आणि ज्यासाठीं त्यांनीं अन्नत्याग केलेला होता त्याहि बाबतींत कांहीं फलनिष्पत्ति दिसून आली नाहीं. तुरुंगाचे अधिकारी जरा नरम नक्कीच आले. मात्र सगळ्यांत मोठा परिणाम हा झाला कीं बारी आपली जीभ ताब्यांत ठेवूं लागला.

या अन्नत्यागाची बातमी हिंदुस्थानांत पोंचली आहे अशी खबर तुरुंगाबाहेरून आली. जनतेनें व वृत्तपत्रांनीं मोठी चळवळ चालवली आहे असेंहि कळलें. या बाबतींत खरेपणा कितपत आहे हें कांहींच सांगतां येण्याजोगें नव्हतें. मात्र तुरुंगाचे अधिकारी आतां जिकडे तिकडे हिंडून असें सांगू लागले होते कीं "आम्ही तुमच्याशीं चांगलं वागायची खटपट करूं, अन्नत्याग बंद करा." पण हें कांहीं पक्कें अभिवचन नव्हतें. बाबा भानसिंहांना मारणारांच्या बाबतींत कांहींच करण्यांत आलें नव्हतें. तरीपण ज्या कामासाठीं आपण अन्नत्याग केला तें काम तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनीं दिलेल्या वचनामुळें सफळ झालें आहे अशी समजूत करून घेऊन बाबा सोहनसिंहांनीं अन्नत्याग सोडून दिला. पण पृथ्वीसिंहांचें येवढ्यावर समाधान होत नव्हतें. मात्र बाबा सोहनसिंहांच्या धोरणानुसार न वागल्याबद्दल त्यांना मनांतल्या मनांत वाईट वाटत होतें. त्यांच्या मित्रांना आणखी काळजी वाटूं लागली. त्यांनीं हर प्रकारें त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण पृथ्वीसिंहांचा त्या वेळीं परमेश्वरावर फारच विश्वास होता. जशी परमेश्वरी मर्जी असेल तशा गोष्टी होतील असें त्यांना वाटे. एका रात्रीं विचार करतां करतां त्यांच्या मनानें त्यांना सांगितलें—"तूं जर जगायची आशा सोडून दिलेली आहेस तर थंडीपासून बचाव करायसाठीं कपड्याकांबळ्यांची जरूरच काय?" दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांनीं कांबळें तर घेतलें नाहींच, आणि अंगावरचे सगळे कपडे काढून फेंकून दिले व स्वारी दिगंबर बनून बसली. अर्थात् दंडाबेडी काढून फेंकून

देणें ही त्यांच्या आवांक्याबाहेरची गोष्ट होती. सिमिटाची फरशी फारच गार होती. तिच्यावर त्यांना पडून राहवेना. म्हणून चोवीस तास आसनमांडी घालून ते फरशीवर बसून राहूं लागले. आणि दंडा-बेडी त्यांना कुबडीसारखा आधार म्हणून उपयोगी पडूं लागली. त्यांचें वजन १६० पौंडांवरून घटत ९८ पौंडांवर आलें. सारें शरीर सुकून गेलें आणि जीवनशक्ति फारच क्षीण झाली. ते नंगे झाले असल्याच्या बातमीमुळें साऱ्या जेलमध्यें खळबळ उडाली. त्यांच्या दोस्तांना वाटूं लागलें कीं आतां त्यांचें मरण अगदीं जवळ आलें असावें. हळूहळू त्यांना बसल्या बसल्याच झोंप घेण्याचा सराव झाला. १५५ दिवस पृथ्वीसिंहांनीं अन्नत्याग चालू ठेवला. त्यांनीं अन्न, पाणी, कपडा व बोलणें देखील वर्ज्य केलें होतें आणि फक्त मरणाचा ध्यास घेतला होता. पण मृत्यू त्यांना विसरला असावासें दिसलें. बाबा सोहनसिंहांचाच निर्णय बरोबर होता हें आतां त्याच्या लक्षांत येऊं लागलें. कांहीं मर्यादेपर्यंत आपण अधिकाऱ्यांना नमविलें आहे, आतां पुढच्या लढाईसाठीं जिवंत राहणेंच चांगलें, मरून काय उपयोग? पण ही गोष्ट पटण्यासाठीं त्यांना बराच वेळ लागला. त्यांचे दोस्त काळजी करीत होते. पृथ्वीसिंहांनीं अन्नत्याग सोडून द्यावा म्हणजे इतरहि अन्नत्याग सोडतील, म्हणून त्यांची खटपट चाललेली होती. बाबा शेरसिंहांचा पृथ्वीसिंहांशीं विशेष स्नेह होता. या हट्टी तरुणाची समजूत आपण स्वतः जाऊन काढावी असा त्यांनीं बेत ठरविला. पण १२० पौंड वजनाचा निरोगी देह इस्पितळांत कोण जाऊं देणार? दुसरा कांहीं उपाय सुचेना, तेव्हां त्यांनीं कसलें तरी विषारी पेय घेतलें. त्यांना रक्ताचे रेच होऊं लागले. डॉक्टरनें त्यांची अशी अवस्था पाहून त्यांना एका रात्रीपुरतें इस्पितळांत पाठवून दिलें. बाबा शेरसिंहांनीं साऱ्या अन्नसत्याग्रहींच्या हालअपेष्टांची कहाणी पृथ्वीसिंहांच्या कानांवर घातली आणि मग सांगितलें—"तुम्ही अन्नत्याग सोडून द्या म्हणजे साऱ्या जणांचे हे हाल वांचतील." पृथ्वीसिंहांचा अजूनहि कांहीं निश्चय होईना. मग त्यांना पंडित जगतरामांची चिठ्ठी मिळाली. ती त्यांनीं आपल्या रक्तानें लिहिलेली होती व आतां अन्नत्याग चालू ठेवणें ठीक नव्हे हें पुराव्यानिशीं पटवून देण्याचा प्रयत्न तींत केलेला होता.

१५५ व्या दिवशीं डॉक्टर नाकावाटे दूध घालण्यासाठीं आले तेव्हां पृथ्वीसिंहांनीं तें हातांत घेऊन प्राशन केलें. लांबलेला अन्नत्याग समाप्त झाला.

## विजय

आतां मेजर मरेच्या वर्तनांत फार फरक पडलेला होता. तो दोन वर्षांच्या रजेवर गेला. पुन्हां अंदमानचें तोंड पाहावयास नको असें त्यानें ठरविलें होतें. पण बिचाऱ्याच्या नशिबांत रजेचा व पेन्शनचा उपभोग लिहिलेला नव्हता ! अंदमान-मधील त्याच्या साऱ्या पापांचें प्रायश्चित म्हणूनच कीं काय, तो मरूनच गेला. बारीच्या जागी त्याचा मेव्हणा जेलर होऊन आला. हा फारच चांगला माणूस होता. तो आल्यापासून लोकांना आपण कैदेंत आहोंत व तो जेलर आहे असें मुळीं वाटेनासेंच झालें. क्रांतिकारक देखील त्याला कोणत्याहि प्रकारें त्रास देण्यास तयार नव्हते. यानंतर कसल्यातरी अन्यायाबद्दल बाबा सोहनसिंहांना अन्न-सत्याग्रह करावा लागला. पृथ्वीसिंहांना हें कळतांच बाबा सोहनसिहांनीं पुन्हांपुन्हां मनाई केली असतांदेखील तेहि या अन्नत्यागांत सामील झाले व अकरा दिवस-पर्यंत त्यांनीं पाणी देखील न पितां अन्नत्याग केला.

अंदमानमधील कैद्यांमध्यें स्पृश्यास्पृश्य भावना फार होती. मुसलमानाच्या हातचीरोटी खाल्ली रे खाल्ली कीं लगेच आपण मुसलमान झालों असें हिंदु लोक समजत असत. पृथ्वीसिंहांना या स्पृश्यास्पृश्यतेचा फार राग येई. त्यांनीं मुसल-मानांच्या हातांतल्या रोट्या मुद्दाम हिसकून घे घेऊन खाण्याचा क्रम आरंभला आणि मग थोड्याच दिवसांत लोकांच्या या जुनाट समजुती नष्ट झाल्या.

## जातां जातां

मेजर मरेलाहि कांहीं दिवसांनीं हिंदुस्थानला पाठविण्यांत आलें. त्याच्या जागीं मेजर बार्कर सुपरिंटेंडंट होऊन आला. नव्या जेलरप्रमाणें हाहि चांगला माणूस होता. अपराध झाला असतां देखील कोणाहि कैद्याला तो भरमसाट शिक्षा करण्यास तयार नसे. जेलचा डॉक्टर एक लष्करी माणूस होता. कैद्यांच्या प्रकृ-तीचा प्रश्न असला कीं त्या बाबतींत जेलर व सुपरिंटेंडंटची तो पर्वाच करीत नसे. त्यांच्या प्रकृतीवर तो सर्व प्रकारें लक्ष ठेवी. आतां जुनें अंदमान स्वप्नसृष्टींत जमा होऊं लागलें होतें. आतां सारे कैदी हिंदुस्थानांत पाठविले जाणार व अंदमा-नचा जेल बंद करण्यांत येणार अशी बातमी पसरूं लागली होती.

★

(७)

# हिंदुस्थानांतील तुरुंगांचा अनुभव [१९२१–२२]

ग्रं. ७९५
१३६७
३७६

ऑक्टोबर १९१५ ते ऑगस्ट १९२१ पर्यंत सहा वर्षे अंदमानमध्यें राहिल्यानंतर पृथ्वीसिंहांच्या मनांत आपल्याला मातृभूमीच्या दर्शनाची संधि मिळणार अशी आशा पुन्हां अंकुरित होऊं लागली.

ते असहकारितेच्या चळवळीचे दिवस होते. साऱ्या हिंदुस्थानभर गांधीजींचा जयजयकार चालू होता. या बातम्या झिरपत झिरपत अंदमान बेटाच्या टापूंत व तेथील तुरुंगाच्या भिंतींतून आंत देखील पोंचूं लागल्या. म्हणून पृथ्वीसिंहांना व त्यांच्या दोस्तांना हिंदुस्थानांत परत जाण्याच्या बाबतींत आणखी जास्तच उत्सुकता वाटूं लागली. पण आतां आणखी एकदां लढा व्हावयाचा होता. मेजर बार्करनें तुरुंगाच्या खर्चांत काटकसर करण्यासाठीं प्रथम कैद्यांच्या तेलावर हात मारला व त्यांना पूर्वी बारा ड्रम मिळत होते त्यांऐवजीं आतां आठच ड्रम मंजूर केले. लोकांना या गोष्टीचा राग तर आलाच पण आता ते हिंदुस्थानला जाण्यासाठीं उतावीळ झाले होते. म्हणून पुन्हां एखाद्या झगड्याचें विकत श्राद्ध घेण्याची त्यांची इच्छा नव्हती. पण पृथ्वीसिंहांना ही तेल-कपात म्हणजे आपल्या इभ्रतीवर हल्ला आहे असें वाटत होतें. रणांगण समोर दिसत असतां मागें हटणें हें त्यांच्या स्वभावाला मानवणें शक्य नव्हतें. सारे लोक लढ्याला तयार झाले नाहींत. पण शांघायमधील गदर पार्टीचे आधारस्तंभ, ७० वर्षे वयाचे बाबा निधानसिंह, यांचा त्यांना पाठिंबा होता. गदर पार्टीचे महाकवि बाबा हरनामसिंह—यांनीं आपल्या उजव्या हाताचेंहि क्रांतिकार्याप्रीत्यर्थ बलिदान केलें होतें म्हणून यांना "थोटा लाट" असें टोपणनांव मिळालें होतें—हेहि या लढ्यांत भाग घेण्यास तयार झाले. तसेंच क्रांतीचे महान् योद्धे व अजूनहि पंजाबांतील निरनिराळ्या तुरुंगांत कित्येक वर्षांपासून खितपत राहिलेले बाबा गुरुमुखसिंह यांनींहि पृथ्वीसिंहांना साथ दिली. चौघांनीं अधिकाऱ्यांना बजावलें कीं तेलाचें प्रमाण पूर्वींइतकेंच कायम ठेवलें पाहिजे. पण याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. जेलरची आपल्याला सहानुभूति आहे हें

सर्वांना ठाऊक होतें. त्यानें या मंडळींची समजूत घालण्याची खटपट केली. परंतु हे चौघेजण गप्प राहण्यास तयार नव्हते. चौघांनीं काम बंद करून संप पुकारला.

मेजर बार्करच्या जागीं एक सहा फूट उंचीचा राक्षस सुपरिंटेंडंट होऊन आला. तुरुंगाची फेरी करीत असतां तो पृथ्वीसिंहांच्या कोठडीच्या दाराशीं आला. पृथ्वीसिंह तसेच बसून राहिले होते. सुपरिंटेंडंटनें दरवाजा खुला करविला व तो मुकाट्यानें पृथ्वीसिंहांच्या जवळ गेला. पृथ्वीसिंह एक शब्दहि बोलले नाहींत. त्यानें पृथ्वीसिंहांची दाढी धरली आणि जसें उभें राहिलें पाहिजे तसें त्यांना उभें करून तो चालूं लागला. कोठडींतून बाहेर पडतांना त्याच्या मुद्रेवर विजयाचें हास्य होतें. गांधीजींच्या असहकारितेच्या व अहिंसेच्या किती तरी गोष्टी पृथ्वीसिंहांनीं वाचलेल्या होत्या आणि त्यांचें पालन करावें असेंहि त्यांना वाटत होतें. वाटेल तसली शिक्षा व छडीमार खाण्यास ते खुशीनें तयार असत. पण सुपरिंटेंडंटचें हें वर्तन सहन करण्याची त्यांची तयारी नव्हती. त्यांनीं या बाबतींत आपल्या दोस्तांना व जेलरलाहि सूचना पाठवून दिली. जेलरला ही गोष्ट सुपरिंटेंडंटच्या कानावर घालतां येण्याच्या अगोदरच सुपरिंटेंडंट पुन्हां पृथ्वीसिंहांच्या कोठडीकडे आला. दरवाजा खुला करवून सुपरिंटेंडंट आंत शिरला व त्यानें पुन्हां त्यांची दाढी पकडून त्यांना उभें केलें. पृथ्वीसिंहांनीं त्याच्या डाव्या गालावर एक जोराची थप्पड लगावली. त्यांच्यावर लाठीहल्ला झाला व ते बेशुद्ध होऊन फरशीवर पडले. सुपरिंटेंडंटनें लगेच शिपायांना रोंखलें. आपण दाढी पकडून त्यांना उठविलें नाहीं, आपण नुसता त्यांच्या हनुवटीला स्पर्श केला असा खुलासा राजकारणी मंडळींपुढें करण्याचा सुपरिंटेंडंटचा बेत होता. पृथ्वीसिंहांना एका कोठडींत टाकून देण्यांत आलें. तेथें कांहींएक औषध न मिळतांच ते कांहीं दिवसांनीं खडखडीत बरे झाले. आतां त्यांनीं कुणाशींहि न बोलण्याचा निश्चय केला. तुरुंगाचे अधिकारी येऊन त्यांच्याशीं बोलूं लागत, पण ते डोळे मिटून आसनमांडी घालून गप्प बसून राहत. कांहीं दिवस असे गेल्यानंतर त्यांना इस्पितळांत पाठविण्यांत आलें आणि बाबा सोहनसिंहांना त्यांची वास्तपुस्त घेण्यासाठीं त्यांच्या बरोबर ठेवण्यांत आलें. मित्रमंडळींना वाटलें कीं आतां मात्र यांच्या डोक्यांत कांहीं तरी बिघाड नक्कीच झाला असणार. पण आपलें डोकें पूर्ण ठिकाणावर आहे अशी पृथ्वीसिंहांनीं बाबा सोहनसिंहांची खातरजमा करून दिली. तरी पण त्यांनीं डोळे मिटून मौन धारण करण्याची आपली तपस्या चालूच ठेवली. सुपरिंटेंडंट आला म्हणजे कधीं त्यांचे डोळे उघडून, कधीं त्यांचें तोंड उघडून, पाहणी करी, कधीं त्यांच्या साऱ्या

शरीराची तपासणी करी. दोन दिवसांनीं पृथ्वीसिंहांना कळून चुकलें कीं समाधि लागणें दूरच राहिलें, उलट ही तपासणीची आणखी एक नवी आफत मात्र ओढवली. म्हणून त्या दिवशीं सुपरिंटेंडंट कोठडीच्या आंत येऊं लागल्याबरोबर त्यांनीं त्याला बजावलें—"हें पहा, माझ्या अंगाला हात नका लावूं. शिक्षा जी द्यायची असेल ती द्या." हा इसम वेडा नाहीं याबद्दल अधिकाऱ्यांची आतां खात्री पटली.

तेलाचे बारा ड्रम पूर्ववत मिळूं लागले. संप संपला.

## अंदमानहून प्रस्थान ( ऑगस्ट १९२१ )

पृथ्वीसिंह आतां स्वतःला पक्के असहकारितावादी म्हणवून घेत असत. त्यांना आतां गांधीजींचा पक्का चेला होण्याचा ध्यास लागला. या सडलेल्या नोकरशाहीशीं कोणत्याहि प्रकारचें सहकार्य करणें हें त्यांना महापाप वाटूं लागलें. "महाराजा" नांवाचें जहाज त्यांना अंदमानमधून हिंदुस्थानला नेण्यासाठीं आलें. सारे लोक मोठ्या खुशीनें स्वदेशीं जाण्याच्या तयारींत होते. वैद्यकीय तपासणीचे वेळीं वजन करण्याची वेळ आली तेव्हां सर्वांनीं आपापलीं वजनें करून घेतलीं. पण पृथ्वीसिंह आपणहून वजन करून घेण्यासाठीं जाईनात. कारण वजन करणें म्हणजे सहकारिता झाली असती! सतरा माणसांच्या नंतर अठरावे पृथ्वीसिंह येत नाहींत हें पाहून पाहरेवाल्यांनीं या २९ वर्षे वयाच्या अहिंसक असहयोगी पृथ्वीसिंहांना उचलून तागडींत ठेवलें. सुपरिंटेंडंटनें त्यांच्या तिकिटावर लिहिलें—

"Poses as a martyr, is a humbug, absolutely incorrigible, needs careful handling."

( हुतात्मेगिरीची शेखी मिरवतो. भंपक आहे; सुधारणें शक्य नाहीं; याच्याशीं संभाळून वागलें पाहिजे. )

पंजाबी क्रांतिकारकांना आपल्या तुरुंगात ठेवून घेण्यास कोणतेंच प्रांतिक सरकार तयार नव्हतें. अखेरीस मद्रास सरकार कबूल झालें. बेड्या घालून या राजबंद्यांना जहाजावर नेण्यांत आलें. "तोशामारू" जहाजावर क्रांतिकारकांनीं जी प्रतिज्ञा केली होती, ती पूर्ण झाली. बेड्यांसह ते अंदमानला गेले, भयंकर लढे करून, मरणाशीं सामना देऊन, त्यांनीं अंदमानच्या तुरुंगांत राजबंदी ठेवण्याची प्रथा बंद करविली आणि सहा वर्षांनंतर १९२१ च्या जुलै अगर ऑगस्ट महिन्यांत त्यांनीं तिथून प्रस्थान केलें. त्यांना दोन गोष्टींचें मात्र फार वाईट वाटत होतें. ज्या आठ हुतात्म्यांनीं अंदमानचा नरक बंद करण्यासाठीं आपल्या

प्राणांची आहुति दिली त्यांचें दर्शन पुन्हां होणार नाहीं याचें त्यांना राहून राहून वाईट वाटत होतें. तसेंच ब्रम्ही कटाच्या खटल्यांतील राजबन्दीहि आणखी तेरा चौदा वर्षेपर्यंत तिथेंच सडत राहूं देण्यांत आलें याचें त्यांना फार वाईट वाटत होतें.

मद्रासच्या तुरुंगांत त्यांना एका बराकींत ठेवण्यांत आलें. आतां त्यांची पूसतपास करून प्रांतांतील निरनिराळ्या सेन्ट्रल जेलांमध्यें त्यांची वांटणी करावयाची होती. जेलर व सुपरिंटेंडंट कैद्यांना पाहण्यासाठीं आले. सारे लोक उभे होते. पण असहयोगी पृथ्वीसिंह आसनमांडी घालून बसले होते. सुपरिंटेंडंटनें दुरून पाहिलें. त्यानें ओरडून सांगितलें— "उभे रहा." पण त्याचें ऐकतो कोण ! तो दुसऱ्यांदांहि ओरडला. पण लोमस ऋषीवर याचा कांहींच प्रभाव पडला नाहीं. सुपरिंटेंडंटनें जवळ येऊन त्यांचें तिकिट पाहिलें. अंदमानमधील शेवटचा शेरा वाचून तो थंडगारच झाला. एकच दिवसाचा प्रश्न होता. त्यानें विचार केला— "उगाच बखेडा कशाला उकरून काढा ?"

## पळून जाण्याचा पहिला प्रयत्न [ जुलै १९२१ ]

दुसऱ्या दिवशीं तीन तीन चार चारांचे गट करून या मंडळींना निरनिराळ्या जेलांमध्यें जाण्यासाठीं रवाना करण्यांत आलें. पृथ्वीसिंह व आणखी दोन राजबंदी असे तिघे तीन शिपायांबरोबर राजमहेन्द्रीकडे रवाना झाले. संध्याकाळीं कलकत्ता मेलमध्यें ही मंडळी चढली. तिघे जवान पोलिस एका पंजाब्याला आंवरण्यास पुरेसे नाहींत हें पृथ्वीसिंहांनीं पाहून घेतलें. त्यांनीं आपल्या दोस्तांना सांगितलें— "हे लोक जर आम्हांला राजमहेन्द्री जेलमध्यें घेऊन जाऊं शकले तर ही अत्यंत शरमेची गोष्ट ठरेल." हें ऐकून त्यांचे दोस्त गप्पच बसले. त्यांना पृथ्वीसिंहांचें बोलणें पटलें नाहीं असा याचा अर्थ होता. पण यामुळें पृथ्वीसिंह निराश नाहीं झाले. त्यांनीं विचार करून आपला मार्ग ठरविला. आपलें जीवन तुरुंगांत सडत राहून घालविण्यास ते तयार नव्हते.

मेल भर वेगांत चालली होती. मध्यरात्र उलटून गेली होती. पृथ्वीसिंहांची नजर राहून राहून शिपायांच्या चेहऱ्याकडे जात होती. शिपाई अजूनहि जागेच होते. त्यांना झोंप येण्याचें कांहींच लक्षण दिसेना. रात्रींचा एक वाजला. गाडी अंगोल स्टेशनवर उभी होती. बाहेर मुसळधार पाऊस पडत होता आणि डब्याच्या बाहेरचें कांहींहि दिसत नव्हतें. त्यांनीं शिपायांकडे पाहिलें. शिपाई पेंगूं लागले. त्यांचे दोस्तहि गाढ झोंपेंत होते. पृथ्वीसिंहांनीं विचार

केला —"अशी संधि पुन्हां नाहीं येणार." मेल सुटली; वेग वाढूं लागला. थोड्या वेळांत ती स्टेशन हद्दीबाहेरचा सिग्नल ओलांडून पुढें गेली. खिडकींतून बाहेरचें कांहींएक दिसत नव्हतें. तिथें दगड असतील, काटे असतील, लांकूड-फांटा असेल, याचा कांहींएक विचार न करतां त्यांनीं डब्यांतून बाहेर छलांग मारली. खिडकीजवळ केहरसिंह झोंपलेले होते. पृथ्वीसिंहांच्या अंगाचा त्यांना स्पर्श झाला. त्यांनीं पाय धरला. पृथ्वीसिंहांनीं झटका मारला. पाय तर सुटला पण जमिनीवर ज्या प्रकारें त्यांना उडी मारावयास हवी होती त्या रीतीनें त्यांना उडी मारतां आली नाहीं. त्यांच्या एका गुडघ्याचें हाड पिंजलें. उठून उभे राहण्याचा त्यांनीं प्रयत्न केला पण वेदनांमुळें ते पुन्हां खालीं पडले. तोंपर्यंत धोक्याची सांखळी ओढली गेली होतीच थोडेंसें अंतर जाऊन गाडी उभी राहिलेली त्यांना दिसली. दोनतीनदां उठण्याचा प्रयत्न करतां करतां ते पडले. आतां त्यांना वेदनांची व मोडलेल्या गुडघ्याची पर्वा करण्याची सोय नव्हती. त्यांनीं सारी शक्ति एकवटून रेल्वे लाइनीपासून दूर जाण्याचा प्रयत्न केला. पुढें जाऊन पाहतात तों निवडुंगाचे कांटे. कांटे बोंचत राहिले पण ते थांबले नाहींत. चाळीस पावलें चालून गेल्यावर पुन्हां निवडुंगांची एक रांग लागली. पण तिथें परत फिरण्याचा मुळीं प्रश्नच नव्हता. शिपायांचा ओरडाआरडा अजूनहि ऐकूं येत होता. साऱ्या अंगाला निवडुंगाचे कितीशें कांटे बोंचले कोण जाणे. त्यांचे डोळे तेवढे शाबूत राहिले. पावसाचें पाणी शेतांतून जिकडेतिकडे उभें होतें. कुठें कुठें पाणी जास्त होतें आणि जखमी पाय घेऊन फरफटत चालत जाण्यापेक्षां पोहणेंच जास्त सोईचें होतें. किती तरी वेळानें ते एका भिंतीवर जाऊन आदळले. पाऊस अजूनहि थांबलेला नव्हता. त्यांना कांहींएक दिसत नव्हतें. मोठ्या कष्टानें व सावधगिरीनें ते भिंतीवर चढून पलीकडल्या अंगाला खालीं उतरले. गाडी अजूनहि उभीच होती. पण त्या तसल्या अंधेरांत पळून गेलेल्या कैद्याला शोधणें हें तसें सोपें काम मुळींच नव्हतें; आणि तिथें तर आणखी दोघां कैद्यांवर पाहराहि ठेवावयाचा होता. पृथ्वीसिंह आपलें शरीर तसेंच ढकलत ढकलत चालूं लागले! आतां दूर अंतरावर त्यांना एक उजेड दिसला. त्यांच्या सर्वांगांतून रक्त वाहत होतें आणि वेदना तर रोमरोमांतून होत होत्या. तसाच धीर धरून त्यांनीं त्या उजेडापर्यंत जाण्याची कसोशी केली.

तें एक लहानसें खेडें होतें. कांहीं मोठ्या घरांमध्यें दिवे जळत होते. ते एका मोठ्या घरांत जाण्याच्या बेतांत होते येवढ्यांत त्यांची नजर एका लहानशा झोंपडीकडे गेली; तींत एक लहानसा दिवा लुकलुकत होता. झोंपडीचा धनी

कुणीतरी गरीबगुरीब असावा हें पृथ्वीसिंहांना सहज कळण्याजोगें होतें. श्रीमंतांचे कटु अनुभव त्यांना अनेकदां आलेले होते, म्हणून त्यांनीं झोंपडीकडे मोर्चा वळविला. झोंपडींत एक राकेल तेलाची चिमणी जळत होती. एक गरीब जोडपें लांकडी फळ्यांवर अलग अलग झोपलें होतें, आणि कोंपऱ्यांत एक तान्हें वासरूं बांधलेलें होतें. झोंपडी इतकी लहान होती कीं तींत अधिक जागा शिल्लकच राहिलेली नव्हती. पृथ्वीसिंह कांहीं वेळपर्यंत एकटक बघतच राहिले. तोंडांतून शब्द काढण्याची हिंमतच होत नव्हती त्यांना. जखमी पायाला विश्रांति देण्यासाठीं त्यांचा दुसरा पाय जरासा हलला, त्याबरोबर बेडीचा खळ्ळ असा आवाज झाला. झोंपडींतल्या स्त्रीनें डोळे उघडले. येवढ्या रात्रीं भुतासारखा एक माणूस उभा असलेला पाहून ती घाबरून उठली व ओरडाआरडा करणार इतक्यांत पृथ्वीसिंहांनीं आपल्या ओंठांवर तर्जनी ठेवली. स्त्री गप्प राहिली व तिनें हात लांब करून नवऱ्याला जागें केलें. तो उठून उभा राहिला व त्यानें काळी दाढी व लांबलचक केंस वाढलेला पृथ्वीसिंहांचा चेहरा एकवार पाहिला मात्र, त्याची शुद्धबुद्धच हरपली. त्यांच्या अंगांतली बंडी व चड्डी या कपड्यांनीं त्याची राहिलासाहिली शंकाहि फेडून टाकली. त्यांतूनहि कांहीं शंका शिल्लक असलीच तर रक्तानें हातहातभर बरबटलेले कपडे पाहून तीहि फिटली. पृथ्वीसिंहांनीं त्यालाहि गप्प बसण्यास खुणेनें सांगितलें. अजूनपर्यंत त्याची नजर बेडीकडे वळलेली नव्हती. पृथ्वीसिंहांनीं बेडी खळखळविली. आतां त्याच्या डोक्यांत बहुधा थोडासा प्रकाश पडला असावा. तो कांहींतरी बोलला. पण पृथ्वीसिंहांना तेलुगूचें एक अक्षरहि कळत नव्हतें. तितक्यांत त्यांच्या डोक्यांत एक विचार अकस्मात आला. त्यांनीं हे शब्द उच्चारले : "काँग्रेस, स्वराज्य, महात्मा गांधी."

हे शब्द नसून जादूचे मंत्र आहेत असा अनुभव आला त्यांना तो त्यांना मदत करण्यास तयार आहे हे त्याच्या डोळ्यांवरून व तोंडावरील बदलत्या भावांवरून दिसून आलें. ते दोघे फळ्यांच्या मधल्या फरशीवर बसले आणि पृथ्वीसिंहांनीं या बेड्या तोडावयाच्या आहेत असें त्याला खुणेनें सांगितलें. जवळच एक लोखंडाचा तुकडा पडलेला होता. बहुधा तो नांगराचा लहानसा फाळ असावा. त्यांनी त्याच्याकडे बोट दाखविलें. त्या इसमानें त्या लोखंडाच्या तुकड्यानें बेडी तोडण्याची खटपट केली, पण बेडी होती फार मजबूत. पृथ्वीसिंहांनीं मग तो तुकडा स्वतःच्या हातीं घेतला आणि त्या वेळीं त्यांना कोण जाणे कुठून इतकी जबरदस्त ताकद आली, पण त्यांनीं बेडीचा सांधा खोलला खरा. बेडी पायांतून निघाली. बंडी व चड्डीहि त्यांनीं काढून टाकली आणि खुणेनें सांगितलें कीं "हें

सारें एक खड्डा खणून त्यांत पुरून टाक." आतां त्यांच्या अंगात फक्त एक लंगोट होता. त्यांनीं खुणा करून एक लुंगी मागितली, पण गरिबाजवळ कपडे कुठून असणार ? एक लहानशी चिंधी त्यांनीं आपल्या जखमी गुडघ्याला बांधली. चालण्याइतकी ताकद तर त्यांच्या अंगीं शिल्लक राहिलेलीच नव्हती. पण पहांट होऊं लागलेली होती आणि कुठली तरी सुरक्षित जागा शोधणें भाग होतें. आतां श्रीमंताच्या घरांत जाण्यास कांहीं हरकत नाहीं असें पृथ्वीसिंहांना वाटलें व त्या दिशेनें ते जाऊं लागले. तेवढ्यांत त्या गरीब इसमानें त्यांचा हात धरला व त्यांन कांहीं तरी सांगितलें. तिकडे जाण्यांत धोका आहे म्हणून तिकडे जाऊं नये असा पृथ्वीसिंहांनीं त्याच्या बोलण्याचा अर्थ घेतला. त्या माणसानें त्यांना गांवाबाहेर नेऊन सोडून दिलें. कुठें जावयाचें याचा कांहींच पत्ता नाहीं अशी त्यांची अवस्था झाली.

पाऊस अजूनहि बंद होण्याचें लक्षण दिसत नव्हतें, पण पृथ्वीसिंहांना पुढें जाणें भागच होतें. पोहत पोहत, लंगडत लंगडत, जसें जमलें तसें ते पुढें जात राहिले. पुष्कळसें रक्त गेल्यामुळें आधींच अशक्तता आलेली, त्यांत पुन्हां भूक लागलेली, आणि वर हे चालण्याचे श्रम. पण त्यांनीं दोन्ही हातांनीं स्वातंत्र्य हस्तगत केलें होतें आणि तें कितीहि मोल द्यावें लागलें तरी ते सोडून देण्यास तयार नव्हते.

चालतां चालतां त्यांना रेल्वे लाइन लागली. लाइनीच्या दुतर्फा पाणी उभें होतें आणि लाइन सोडून जाण्यास कुठें रस्ताच नव्हता. धडधाकट शरीर व लांब दाढी पाहून त्यांना लोक एक साधु समजले असते. पण अंगावरच्या जखमा व सर्वभर बोंचलेल्या कांट्यांचें काय करावयाचें? आतां पाऊस थांबला होता आणि सूर्यहि ढगांचा भेद करून तळपूं लागलेला होता. ते लाइनीजवळ बसले व शेतांतल्या पाण्यानें जखमा धुवूं लागले. कांटेहि जेवढे काढतां आले तेवढे त्यांनीं काढले. थकव्यामुळें ते तिथेंच चिखलांत पडून राहिले. सूर्याच्या कोमल किरणांनीं त्यांना थोपटलें व तशीच झोंप लागून साऱ्या सुखदुःखांचा त्यांना विसर पडला. लाइनीवरून जाणाऱ्या गाडीच्या इंजनानें शिटी दिली तेव्हां कुठें त्यांना जाग आली. सारें अंग आंखडले होतें. सारी शक्ति एकवटून त्यांनीं एका झाडाची एक मोठी फांदी तोडली व तिचा आधार घेऊन ते चालूं लागले. आसपासच्या शेतांमध्यें छातीइतकें पाणी होतें. म्हणून रेल्वे लाइन सोडून चालणें शक्य नव्हतें. ते तेनालीच्या दिशेनें चालले होते आणि आतां सुटण्याची आशा फारच थोडी राहिलेली होती.

ते एका स्टेशनांत पोंचले. त्याच वेळीं समोरून एक पोलिस शिपाई येत असलेला दिसला. अंगोल हें जिल्ह्याचें ठिकाण आहे. इथून पोलिस पार्ट्या पृथ्वीसिंहांच्या शोधार्थ पाठविण्यांत आल्या होत्या. कॉन्स्टेबलनें त्यांना ओळखलें पण त्यांच्या शरीराची ती अवस्था पाहून त्याचें अंतःकरण द्रवलें. त्यानें त्यांना आपल्या घरीं नेऊन थोडासा भात खाऊं घातला आणि मग तो आपल्या वरिष्ठाला खबर देण्यासाठीं गेला. थोड्याच मिनिटांनीं पृथ्वीसिंह पूर्णपणें पोलिसपार्टीच्या तावडींत सांपडले. त्यांचें मनोबल खचलें होतें आणि अंगांत त्राणच राहिलें नव्हतें. त्याच क्षणीं ते तिथें जे पडून राहिले ते आठ दिवस जागचे हललेसुद्धां नाहींत.

ज्या ठिकाणीं त्यांनीं गाडींतून उडी मारली तें ठिकाण त्यांना अटक झाली त्या ठिकाणापासून १६ मैल दूर होतें. जागोजाग जखमा, साऱ्या अंगभर कांटे रुपलेले, अशा अवस्थेंत ते इतके दूर कसे चालत जाऊं शकले ही मोठी आश्चर्याचीच गोष्ट होती. पोलिस त्यांना अंगोलला घेऊन गेले. १९२१ च्या असहकारितेच्या आगींत होरपळून निघालेली जनता आतां सात वर्षांपूर्वीची जनता राहिलेली नव्हती. बहादुर राजबन्दी पळून गेल्याच्या बातमीचा ज्या रीतीनें सर्वत्र प्रसार करण्यांत आला तीवरून पोलिसांची या बाबतींत विशेष कसोशी दिसून येत होती. चारी दिशांकडून लोक या वीर पुरुषाच्या दर्शनासाठीं येऊं लागले. स्थानिक कौन्सिलच्या एका ख्रिस्ती सभासदाला देखील या साहसी वीराला पाहण्याचा मोह आंवरेना. त्यानें पृथ्वीसिंहांची अवस्था पाहिली आणि त्यांना कपड्यांचा एक जोड देण्याची इच्छा दर्शविली. पृथ्वीसिंहांनीं या कपड्यांचा स्वीकार करण्यास संमति दिली. चार तासांनीं या गृहस्थानें दोन खमीस, एक धोतरजोडी व इतर कपडे त्यांच्यासाठीं पाठविले. पृथ्वीसिंहांनीं ते घेऊन एका कोंपऱ्यांत ठेवून दिले. परदेशी कपडे त्यांना अंगांत घालावेसे वाटणें शक्य नव्हतें. लोकांना हें कारण कळण्याचा अवकाश कीं त्यांनीं खादीचे खमीस व धोतरजोडी देण्याची इच्छा प्रदर्शित केली. पण ते कपडे घेण्याची त्यांना परवानगी नव्हती.

हिंडण्याफिरण्याइतकी प्रकृति चांगली झाल्याबरोबर पृथ्वीसिंहांना इस्पितळांत पाठविण्यांत आलें. त्यांनीं डॉक्टरला कांटे काढून टाकण्यास सांगितलें. पण दोनदोनशें कांटे काढण्याइतकी फुरसत तिथें होती कुणाला ? हे कांटे हळूहळू

काढत बसण्याचें काम त्यांच्या स्वतःवरच सोंपविण्यांत आलें. एक लहानसा कांटा उजव्या जांघेंत इतका खोल घुसलेला होता कीं तो आज ( १९४४ सालीं ) देखील बाहेर निघण्याचें नांव काढत नाहीं.

इस्पितळांतून त्यांना मॅजिस्ट्रेटच्या कचेरींत घेऊन जाऊं लागले. त्यांच्या अंगावर फक्त एक लंगोटी होती. पोलिस त्यांना अंगोलच्या रस्त्यांवरून घेऊन जाऊं लागले म्हणजे जागोजाग इतकी गर्दी जमे कीं पोलिसांना पुढें जाण्याची मुष्किल होई. लोक जागोजाग पृथ्वीसिंहांना कांहीं तरी बोलावयास भाग पाडत असत. किती तरी चांगले चांगले वकील त्यांचा खटला चालविण्यास तयार होते. पण पृथ्वीसिंह इंग्रजांचें कोर्ट व त्यांचा न्याय मानतील तरची गोष्ट ना ! आतां तर ते आपल्या पायांनीं चालत कोर्टांत जाण्यास देखील तयार नव्हते. जज्जानें दोन दिवस खटला चालवून त्यांना एक वर्षाची शिक्षा देतांना आपल्या निकालपत्रांत लिहिलें—" साऱ्या अंगावर इतक्या जखमा असूनहि आरोपी १६ मैल कसा चालत जाऊं शकला हें समजणें फारच मुष्किलीचें आहे. पण गाडींतून उडी मारली त्या जागेपासून १६ मैल अंतरावर त्याला अटक झाली ही गोष्ट निर्विवाद आहे."

## राजमहेन्द्री जेलमध्यें

निकालाच्या दिवशींच पृथ्वीसिंहांना राजमहेन्द्री जेलमध्यें पाठविण्यांत आलें. अंगोल सबजेलचा सुपरिंटेंडंट त्यांना निरोप देतांना म्हणाला, " पृथ्वीसिंह, हें तुमचं आयुष्य तुमच्या देशानं तुमच्या हातीं ठेव म्हणून दिलं आहे. ही ठेव फेंकून देण्याचा तुम्हांला कांहींएक हक्क नाहीं. तुम्ही धांवत्या गाडींतून उडी मारून आपल्या जिवाशीं जें वर्तन केलंत, तो शुद्ध पागलपणा होता. तुम्ही त्या वेळीं मृत्यूच्या तावडींतून वांचलांत हा निव्वळ योगायोग होता. निराश होऊं नका. तुरुंगांतून सुटल्यावर राष्ट्राची सेवा करण्यास संधि पुन्हां मिळेल." दोन शिपाई पृथ्वीसिंहांना घेऊन निघाले. त्यांनीं हात जोडून पृथ्वीसिंहांना सांगितलें— " आम्ही आपल्याला कांहींहि त्रास देऊं इच्छीत नाहीं. आपण कोण आहांत हें आम्हांला चांगलं ठाऊक आहे. आम्हांला चरितार्थाचं दुसरं कोणतंच साधन नाहीं. अन् आमच्या शिरावर कुटुंबाचा भार आहे. आमचा सत्यानाश होणार नाहीं असंच आपण वर्तन करावं." पृथ्वीसिंहांना त्यांची दया आली. त्यांनीं इतकेंच सांगितलें—" तुम्ही घाबरूं नका. माझ्या पाठोपाठ तुरुंगाच्या फाटकापर्यंत चालत या म्हणजे झालं."

रात्रीं त्याच गाडीनें ते राजमहेन्द्रीला निघाले. शेंकडो नवजवान त्यांना निरोप देण्यासाठीं स्टेशनवर त्यांची वाट बघत उभे होते. तिकडे राजमहेन्द्रीलाहि अगोदरच बातमी पोंचलेली होती व गाडी येण्याच्या अगोदरच लोक स्टेशनवर आले होते. पोलिस कांहीं बोलले नाहींत. लोकांनीं त्यांना गोदावरी नदीवर गेलें. नदीच्या पवित्र धारेंत त्यांनीं स्नान केलें. मग तिघांना उत्तम प्रकारचें जेवण देण्यांत आलें व घोडागाडींत बसवून सेन्ट्रल जेलच्या फाटकापर्यंत पोंचवून देण्यांत आलें.

जेलरला बातमी कळली व तो आपल्या बंगल्यांतून पृथ्वीसिंहांना पाहण्यासाठीं आला. पृथ्वीसिंह तसेच बसून राहिलेले होते. जेलर होता अँग्लो-इंडियन. त्याला ही गोष्ट आपल्या रुबाबाला कमीपणा आणणारी वाटली. तो दुरूनच ओरडाआरडा करूं लागला आणि जवळ येऊन पृथ्वीसिंहांना जबरदस्तीनें उठून उभे करण्याची धमकी देऊं लागला. पृथ्वीसिंहांनीं सांगितलें— "अगोदर माझ्या तिकिटावर काय लिहिलंय तें वाच." वाचल्यावर तो जरा थंड झाला.

पायाच्या जखमेंत पू झालेला होता. म्हणून कुणीहि कैदी त्या बराकींत पृथ्वीसिंहाबरोबर राहण्यास तयार होईना. सुपरिंटेंडंट आला. त्यानेंहि पृथ्वीसिंहांना बसलेले पाहून शिव्या देण्यास सुरवात केली. शिव्यांबद्दल त्याला शिव्यांचा उलट जबाब मिळाला. त्यानें फांशीची शिक्षा झालेले कैदी ज्या कोठडींत ठेवतात तींत पृथ्वीसिंहांना रवाना करविलें. सुपरिंटेंडंटहि अँग्लोइंडियनच होता आणि डॉक्टर होता एक इंग्रज. ते तिघे स्वतःसमोर सर्वांना तुच्छ समजत असत. पृथ्वीसिंह पहांटे ४ वाजतांच उठत असत व सकाळीं १० वाजेतों पूर्ण सहा तास डोळे मिटून आसनमांडी घालून बसून राहिलेले असत. ते बोलत सुद्धां अगदीं क्वचित केव्हां तरी. जेलचे शिपाई व पाहरेवाले हा कुणी तरी योगी महात्मा आहे असें समजू लागले. महात्म्याला खूष ठेवण्यासाठीं सारेच खटपट करीत असत आणि खाण्यापिण्याच्या ज्या वस्तू त्यांना चालत असत त्या त्यांच्यापर्यंत पोंचत्या होत असत. पण अँग्लो इंडियन जेलरचा असल्या बुवाबाजीवर विश्वास नव्हता. एके दिवशीं सकाळीं पृथ्वीसिंह उठून उभे राहिले नाहींत हें पाहून त्यानें त्यांना जबरदस्तीनें उठवून उभे करण्याचा हुकुम शिपायांना दिला. शिपायांनीं ही गोष्ट करण्यास साफ नकार देऊन सांगितलें—" साहेब ! हा कुणी तरी योगी सत्पुरुष आहे. याला आम्ही रात्रंदिवस ध्यानस्थ बसलेला बघत असतों. आम्ही याच्या अंगाला हात नाहीं लावणार." जेलर त्या दिवशीं तसाच निघून गेला.

... वाचनालय, ...

दुसऱ्या दिवशीं तो आपले हुकुम अक्षरशः पाळणाऱ्या पाहरेवाल्यांना घेऊन आला. कोठडीचा दरवाजा खुला करवून त्यानें ओरडून सांगितलें: "पकडा साल्याला." शिवी सहन करणें ही पृथ्वीसिंहांच्या आवाक्याबाहेरची गोष्ट होती. त्यांनीं उलट शिव्या देऊन आव्हान दिलें—"हिंमत असेल तर जवळ येऊन पहा." जेलरनें एक लाठी उचलून पृथ्वीसिंहांच्या डोक्यांत फेंकून मारली. त्यांनीं झेंप घेऊन जेलरची मानगूट धरली आणि त्याला एकदोन गुद्दे चढविले. चाळीस एक लोक पृथ्वीसिंहांवर तुटून पडले आणि जेलर जीव घेऊन तिथून पळाला. पृथ्वीसिंह चार तास बेशुद्ध पडले होते आणि मगहि त्यांना तिथेंच त्यांच्या नशिबावर हवाला ठेवून पडूं देण्यांत आलें. कांहीं दिवसांनीं ते चांगले बरे झाले. जेलरनें पुन्हां कधीं त्यांच्या कोठडींत पाऊल म्हणून घातलें नाहीं.

आतां हजारीबागहून आणखी कांहीं राजबंदी इथें आले होते. पंडित जगतराम यांनाहि राजमहेन्द्रीला पाठवून देण्यांत आलें. त्यांना स्वतःचें पंजाबी जेवण वेगळें तयार करण्याची मोकळीक होती. पृथ्वीसिंहांची आतां खाण्या-पिण्याच्या बाबतींत कांहींच अडचण राहिली नाहीं.

जेलच्या त्रिमूर्तींनीं सर्व प्रकारच्या शिक्षा दे देऊन शेवटीं अगदीं हात टेंकले बाकी राहिलें होतें फक्त फांशी देणें व छड्या मारणें. फांशी देणें त्यांच्या हातचें नव्हतें आणि छड्या मारल्या तर बाहेर हल्ला होण्याची धास्ती होती. शेवटीं त्यांनीं असें ठरविलें कीं या कैद्याला वेडा ठरवून वेड्याच्या इस्पितळांत पाठवून द्यावा! हें कळलें तेव्हां मित्रमंडळी घाबरली, आणि त्यांनीं पृथ्वीसिंहांना समजावण्याची खटपट केली. पण पृथ्वीसिंहांना वेड्यांचें इस्पितळ ही कांहीं भीतिप्रद जागा वाटतच नव्हती. याच सुमारास शीख कैद्यांना तुरुंगांत वाईट रीतीनें वागविण्यांत येत असल्याबद्दलच्या बातम्या पंजाबमध्यें पोंचल्या होत्या व या प्रकरणीं तिकडे फार मोठी चळवळ चालू झाली होती. निरनिराळ्या तुरुंगांतील शीख राजबंद्यांना भेटण्यासाठीं एक शिष्टमंडळ रवाना झालें. सरदार तेजासिंह चूडकाना हे आणखी दोघां गृहस्थांसमवेत राजमहेन्द्री जेल पाहण्यासाठीं आले. सरदार तेजासिंह मार्शल लॉचे कैदी या नात्यानें अंदमानमध्यें राहून आलेले होते आणि पृथ्वीसिंहांशीं त्यांची चांगलीच जानपछान होती. इतर राजबंद्यांना भेटविण्याचें काम आटोपल्यानंतर जेलर, सुपरिंटेंडंट व डॉक्टर ही त्रिमूर्ति या पाहुण्यांना पृथ्वीसिंहांकडे घेऊन आली. त्यांनीं सारी हकीकत ऐकून घेतली आणि देशाचें नांव घेऊन पृथ्वीसिंहांना हा हट्ट सोडण्याची विनंती केली. सुपरिंटेंडंटनें दोन तासांची मुदत दिली. पृथ्वीसिंहांनीं चूडकानांचें म्हणणें मान्य

केलें. दुसऱ्या दिवशीं डॉक्टरनें प्रकृति तपासली आणि सांगितलें कीं सहा दिवसांच्या आंत कसलें तरी काम पसंत करा. पृथ्वीसिंहांनीं स्वतःसाठीं दोन कामें पतकरलीं —(१) दोनशेंहून अधिक असहकारी राजबंद्यांना हिंदी शिकविणें आणि (२) आजाऱ्यांची शुश्रूषा करणें. अधिकाऱ्यांना ही गोळी भलतीच कडू लागली पण त्यांना या गोष्टीला मान्यता देणें भागच पडलें.

आज आन्ध्र देशांत हिंदीचा प्रचार भरपूर झालेला आहे. पण १९२२ सालीं या प्रचाराचा आरंभ करणारांमध्यें पृथ्वीसिंहांचें नांव पहिल्याप्रथम घ्यावें लागतें. एक महिन्याहून जास्त वेळ त्यांना हिंदी शिकवितां आलें नाहीं. त्यांच्यासारख्या क्रांतिकारकांचा आंध्र तरुणांशीं संपर्क व्हावा हें मद्रास सरकारला पसंत पडणें शक्य नव्हतें. मात्र इस्पितळांतलें त्यांचें काम चालू राहिलें. राजमहेन्द्री जेलमध्यें आन्ध्रदेशाचे डॉक्टर सुब्रम्हण्यम्, बुलुसु सांबमूर्ति इत्यादि मोठमोठ्या पुढाऱ्यांशीं त्यांचा स्नेह जमला. तरुणपणींच्या त्या काळांतील आठवणी साम्बमूर्ति अजूनहि मोठ्या कौतुकानें सांगत असतात.

राजमहेन्द्रीहूनच पहिल्या प्रथम पृथ्वीसिंहांनीं आपल्या वडिलांना एक पत्र धाडलें. आपला मुलगा अजूनहि जिवंत आहे हें वडिलांना या पत्रावरूनच प्रथम कळलें.

सारे पंजाबी राजबंदी आपल्याला उत्तर हिंदुस्थानांतील कोठल्या तरी तुरुंगांत पाठवून द्यावें असे अर्ज कर करून कंटाळून गेले, पण त्यांच्याकडे कुणीच लक्ष दिलें नाहीं. याच सुमारास परिस्थितीच अशी निर्माण झाली कीं तिच्यापायीं या राजबंद्यांना दुसऱ्या जेलमध्यें पाठविणें खुद्द सरकारलाच भाग पडलें. त्या वेळीं आंध्र देशाच्या कित्येक जिल्ह्यांमध्यें रम्या-पितूरीचा ( रम्याच्या बंडवाल्यांचा ) जोर फार वाढलेला होता.

सीताराम राजू नामक एका बहादुर तरुणानें इंग्रजांच्या सत्तेविरुद्ध युद्धाचा पुकारा केला होता. राजूचें दल हळूहळू पुष्कळच मजबूत होत गेलें आणि सरकारच्या नाकीं नव येऊं लागले. तीन वर्षेपर्यंत त्यांनीं सरकारला झोंप म्हणून मिळूं दिली नाहीं. आंध्र देशाच्या रानावनांत व डोंगरदऱ्यांत तो अनेक ठिकाणीं लपून राहत असे आणि तिथून कधीं कुठल्या तरी पोलिस ठाण्यावर व कधीं कुठल्या तरी कचेरीवर तुटून पडत असे. तो अगोदर सरकारला नोटिस देऊन मग हल्ला करीत असे; पण राजूच्या संघटनायन्त्रापुढें सरकारचें संघटनायन्त्र फारच दुबळें ठरे व तो हातीं लागत नसे. पृथ्वीसिंहांच्या बहादुरीच्या गोष्टी कुणी

तरी राजूच्याहि कानावर घातल्या. राजूनें पृथ्वीसिंहांना राजमहेन्द्री जेलमधून सोडविण्याचा संकल्प केला. राजू जेलवर हल्ला करणार अशा अफवा राजमहेन्द्रींत पसरूं लागल्या होत्या. जेलमध्येंहि खूप दंगल माजली होती आणि त्याच्या रक्षणासाठीं जादा पोलिस मागविण्यांत आले. राजमहेन्द्रीनजीकच्या एका स्टेशनावर राजूनें यशस्वी छापाहि घातला.

आतां पृथ्वीसिंहांसारख्या क्रांतिकारकांना राजमहेन्द्रींत ठेवणें ही गोष्ट सरकारला फार धोक्याची वाटली. त्या वेळीं पंडित जगतराम, सरदार धीरसिंह, सरदार कर्तारसिंह व सरदार पृथ्वीसिंह हे इंग्रजी भाषा जाणणारे चार उत्तर हिंदुस्थानी राजबंदी राजमहेन्द्रींत होते. त्यांपैकीं पंडित जगतरामांना जबलपूरला पाठविण्यांत यावें व बाकीच्या तिघांना नागपूरच्या सेंट्रल जेलमध्यें पाठवावें असा बेत ठरला.

## दुसरी छलांग [ २९ नोव्हेंबर १९२२ ]

मित्रांच्या भेटीगांठी घेऊन चौघेजण शिपायांसमवेत गाडींत बसले. स्टेशनवर कितीतरी लोक भेटावयास आले होते. ही गर्दी पाहून इंग्रज सार्जंटची घाबरगुंडी उडाली. त्याच्याबरोबर सात कॉन्स्टेबल होते तरीहि त्याला धीर येईना. पृथ्वीसिंह व त्यांच्या दोस्तांच्या ना हातांत हातकडी ना पायांत बेडी. त्यांच्या अंगावर कपडेहि कैद्यांचे नसून साधेच होते. शेंकडों लोकांच्या गर्दींतून निसटून जाणें त्यांना फारच सोपें होतें. पण त्यांच्या मनांत निसटून जाण्याचा विचार मुळींसुद्धां डोकावला नाहीं. गाडी बेझवाड्याला पोंचली. इथून त्यांना दुसऱ्या गाडींत बसावयाचें होतें. पण पुढेंहि त्यांना हैदराबादेस व भुसावळेस गाडी बदलावयाची होतीच. या ठिकाणींहि पृथ्वीसिंह दोन शिपायांबरोबर खाण्याच्या जिनसा घेण्यासाठीं गेले होते. दोन शिपाई म्हणजे त्यांना खिसगणतींतहि घेण्याचें कारण नव्हतें. आणि साध्या कपड्यांनिशीं ते सहज पळून जाऊं शकले असते. पण त्यांच्या मनांत पळून जाण्याचा विचारच मुळीं आला नाहीं. भुसावळेस ते नागपूरच्या गाडींत बसले. गाडी वेगांत चालू लागली. धांवत्या नजरेसमोर निवडुंगांचा फड दिसूं लागला. पंडित जगतरामानीं विचारलें—"गाडींतून उडी मारून तुम्ही हे कांटे ओलांडून जाऊं शकाल ? " पृथ्वीसिंह गालांतल्या गालांत हंसले. त्यांच्या मनांत अशा प्रकारचा विचारच आलेला नव्हता. जगतराम त्याच वेळीं उठून समोरच्या बांकावर बसले. पृथ्वीसिंह खिडकीजवळ बसले होते. सार्जंटला जरा काळजी तर वाटलीच पण उघड बोलण्याची हिंमत झाली नाहीं. त्यानें जगतरामांना सांगितलें—

"यांना जरा खिडकीपासून दूर बसायला सांगा." पृथ्वीसिंहांच्या मनांत आतांपर्यंत कमलाच विचार आलेला नव्हता. ते निराळ्या गोष्टींच्या चिंतनांत गर्क झालेले होते. जगतरामांनीं सार्जंटचें म्हणणें सांगितलें. त्याचा पृथ्वीसिंहांना राग आला. आणि त्यांनीं खिडकीपासून हटण्याचें नाकारलें. सार्जंटनें दोन कॉन्स्टेबलांना त्यांच्या शेजारीं बसण्यास फर्मावलें. पृथ्वीसिंहांना हा आपला फार मोठा अपमान वाटला आणि त्यांचें विचारचक्र जोरांत चालू झालें. "हा बहुधा आपल्या हुशारीच्या जोरावर मला दुसऱ्या जेलमध्यें पोंचवायची ऐट मारूं पाहतोय. शिकवूं का याला चांगला धडा?" पण त्यांनीं आपल्या मनाची कशीबशी समजूत घातली व खिडकी सोडून मधल्या बांकावर कांबळें अंथरून ते आडवे झाले. सार्जंटहि जवळच होता. एक दोन तास गाडी चालल्यानंतर त्यांना गाढ झोंप लागली. त्यांना स्वप्नांत कुणी तरी विचारूं लागला: "झोंपून कां राहिलास? ऊठ. हीच वेळ आहे." त्यांची झोंप उडाली. बाकी सगळे जण झोंपलेले असून तिघे शिपाई तेवढे पत्ते खेळत असलेले त्यांना दिसले. शिटी होऊन गाडी स्टेशन सोडून पुढें जाणार होती. अजूनहि त्यांच्या डोक्यांत पळून जाण्याचा विचार मुळींच आलेला नव्हता. ते पायखान्याचें दार उघडून लघवीला गेले. गाडीचा वेग थोडासा वाढूं लागलेला होता. लघवी करतां करतां त्यांच्या मनांत विचार आला—"छेः छेः! खरोखरी हीच वेळ आहे." बाहेर जाऊन खिडकींतून सटकावें असा विचार त्यांच्या मनांत चालू होता. पण संडासाच्या खिडकीची कांच खालीं पाडतां येते हें त्यांना दिसून आलें. खिडकी फार लहान होती. तरीहि तींतून त्यांनीं आपलें शरीर कसेंबसें बाहेर काढलें. मग कोलांटी उडी मारून त्यांनीं पाय जमिनीवर टेंकले. गाडी सिग्नलच्या हद्दीबाहेर गेली होती व तिचा वेगहि बराच वाढलेला होता. शिपाई आणखी किती उशीरपर्यंत पत्ते खेळत राहतील? पृथ्वीसिंह आतां कैदी राहिले नव्हते. ते एक स्वतंत्र व्यक्ति झाले होते आणि खूप लांब मुदतीपर्यंत ते स्वतंत्र राहणार होते. ही १९२२ सालच्या २९ नोव्हेंबरची रात्र होती. सर्वत्र दुधासारखें टिपूर चांदणें पडलेलें होतें.

★

## ( ८ )

# अज्ञातवास

थंडीचे दिवस होते. चांदणी रात्र होती. पण त्या उंचसखल पहाडी प्रदेशांतून ते झपाट्यानें चालत निघाले तेव्हां तहानेचा जोर वाढणें साहजिक होतें. पहिल्यांदां पळून जाण्याचें साहस त्यांनीं केलें त्या वेळीं पाण्याच्या अतिरेकानें पृथ्वीसिंहांवर संकट आगलें होतें; आणि आतां एकदोन मैल दौड केल्यावर त्यांना भयंकर तहान लागलेली होती. तिथें पाण्याचा तर कोठें पत्ताच नव्हता. चांदण्या रात्रीं त्यांना आसपास खूप दूरपर्यंत नजर फेंकतां येत होती. पण हा प्रदेश अगदीं नीरव दिसत होता. रेल्वे लाइनीपासून त्यांनीं अगोदरच खूप दूर पर्यंत मजल मारली होती, आणि आतां रस्त्याचा पत्ता लावण्याची मुष्किल झालेली होती. त्यांनीं अंदाजानें एक दिशा धरून चाल सुरू केली. दोनदां सडकांचा चौरस्ता आला. पुढें एक विहीर लागली. ती फार खोल होती. पाणी काढण्याचें कांहीं साधन नव्हतें. विहिरीजवळ एक खड्डा होता. चांदण्यांत तो नुसत्या चिखलानेंच भरल्यासारखा वाटत होता. पण हातानें स्पर्श केल्यावर त्यात अंगळ अर्धे अंगळ पाणी आहे असें आढळून आलें. त्यांनीं हातांपायांवर शरीर तोलून धरून जिभेनें जितकें चाटतां येईल तितकें पाणी चाटून तहान भागविण्याचा प्रयत्न केला आणि मग ते पुढें चालूं लगले.

या वेळीं वेष धोक्याचा नव्हता. त्यांच्या अंगांत पायजमा व कुडता आणि डोक्यावर फेटा होता. त्याचया जोडीला काळीभोर लांब दाढी असल्यामुळें सारा थाट सभ्य गृहस्थाला साजेसा दिसत होता. आणि शंका येण्याजोगें कसलेंहि लक्षण त्यांत दिसत नव्हतें. पहांटे चार वाजेपर्यंत ते चालत राहिले, तेव्हां त्यांना एक पक्की सडक मिळाली. अर्धा तास आणखी चालल्यानंतर त्यांना मैलाचा दगड मिळाला. त्यावर “ अमरावती दोन मैल ” असें लिहिलेलें होतें. अजूनहि त्यांना शंका होती. पण पुढें “ अमरावती एक मैल ” असें लिहिलेला दगड मिळाला. आतां अमरावतीहि जवळ आली आणि सूर्योदयहि जवळ आला. सगळ्यांत मोठी काळजी होती “ जावें कुणाकडे ? ” अशाच रीतीनें चालत

ते शहराच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत गेले. एका मोठ्या हॉलच्या दरवाजावर एक पाटी लावलेली होती. एका खोलींत दिव्याचा उजेड दिसत होता. तींत एक विद्यार्थी होता. पृथ्वीसिंह सरळ त्याच्याकडे गेले आणि म्हणाले— " मला तुमची मदत पाहिजे. " त्यानें एकहि प्रश्न न विचारतां " जरा थांबा " येवढेंच सांगितलें. जराशी वाट पाहिल्यानंतर हा तरुण कपडे करून बाहेर आला आणि म्हणाला—" मी आपल्याला काय मदत करूं शकतों ? " पृथ्वीसिंह म्हणाले—" मेहेरबानी करून मला शहरांतील सगळ्यांत सच्च्या देशभक्ताकडे घेऊन चला. मी फार जरूरीच्या कामासाठीं आलोंय. "

त्यानें मग कसलाहि प्रश्न विचारला नाहीं व पृथ्वीसिंहांना बरोबर घेऊन तो चालूं लागला. दोघे एका मोठ्या घराकडे गेले. पण घराचा मालक बाहेर गेलेला आहे असें कळलें. पृथ्वीसिंहांनीं सांगितलें—" ठीक आहे. मग आतां दुसऱ्या सच्च्या देशभक्ताकडे घेऊन चला मला." तिथेंहि तोच प्रकार झाला. तिसऱ्या ठिकाणींहि घराचा मालक घरीं नाहीं हें पाहून पृथ्वीसिंह जरासे निराशल्यासारखे झाले. त्यांनीं मग त्या तरुणाला विचारलें : " ठीक आहे. या तिघांखेरीज आणखीहि कुणी आहे ? " त्यानें जरा वेळ विचार करून सांगितलें— " होय. डॉक्टर वऱ्हाडपांडे घरीं होतेच." दरवाजावर थाप मारतांक्षणीं ते बाहेर आले. पृथ्वीसिंहांनीं विचारलें—" डॉक्टर वऱ्हाडपांडे आपलंच नांव का ? " उत्तर मिळालें—" होय. " पृथ्वीसिंहांनीं तरुणाचे आभार मानून त्याला रजा दिली. हा तरुण दोन तासपर्यंत पृथ्वीसिंहांबरोबर भटकत होता. हा दाढीवाला अनोळखी माणूस हें सारें कशासाठीं करतोय हेंहि त्याला ठाऊक नव्हतें. तरीहि त्यानें पृथ्वीसिंहांना कसलाच प्रश्न विचारला नाहीं. इतक्या पहांटे एक अनोळखी माणूस पाहून डॉक्टरांना तरी जरूर कुतूहल वाटावयास पाहिजे होतें. त्यांनीं त्यांना " बसा " म्हणून सांगितलें आणि ते पृथ्वीसिंहांच्या चेहऱ्याकडे निरखून पाहूं लागले. तरीहि त्यांनीं कसलाच प्रश्न विचारला नाहीं. त्यांनीं न विचारतांच पृथ्वीसिंहांनीं आपली सारी कथा त्यांना ऐकविली. त्यांनीं ती सारी मुकाट्यानें ऐकून घेतली आणि शेवटीं त्यांनीं विचारलें—" ठीक, मला आपल्यासाठीं काय करतां येईल ? " पृथ्वीसिंहांनीं सांगितलें —" एक कात्री व चांगलासा वस्तरा आणा." या दोन्ही वस्तू डॉक्टर घेऊन आले. मग पृथ्वीसिंह म्हणाले —" आतां हजाम व्हा. " दाढी , मिशा सफाचट करण्यांत आल्या. डॉक्टरांनीं मग विचारलें —" आतां काय करायचं ? " " कपड्यांचा एक संच आणा." तोहि आला. पृथ्वीसिंहांनीं खादीचें धोतर नेसून कुडता अंगांत घातला

व या पोषाखांत ते असहयोगी दिसूं लागले. डॉक्टरांनीं मग विचारलें, "आतां पुढं काय ?" "हे सारे कपडे जाळून टाका, अन् असल्यास एक चप्पलजोड द्या." चप्पलजोडहि आला. अवघ्या एका तासाच्या आंत पृथ्वीसिंह अजीबात निराळे दिसूं लागले. हें वेषांतर चालू होतें त्या वेळीं डॉक्टरांनीं आणखी कसलेंहि बोलणें काढलें नाहीं. आतां त्यांनीं विचारलें--"तुम्हांला जायचंय कुठं ? अन् जायची व्यवस्था काय करणार ?" अवघडच होता हा प्रश्न. घरांतल्या सामान-सुमानावरून डॉक्टरांची गरीबी आहे हें पृथ्वीसिंहांना दिसत होतें. संकोच वाटत असूनहि त्यांना सांगावें लागलें कीं "मला मुंबईचं एक तिकीट पाहिजे." डॉक्टरांच्या जवळ एकदेखील रुपया नव्हता. डॉक्टरनीं सांगितलें--"माझ्या-जवळ पैसे नाहींत. पण माझ्या मित्राकडून मागून घेऊन येतों मी."

इतक्या तांतडीनें पैशाची जरूर कां लागली असा प्रश्न कदाचित दोस्तानें विचारला असेल, किंवा डॉक्टरनां आपला दोस्त पुरेसा विश्वासपात्र वाटला असेल. डॉक्टरनीं या साहसी तरुणाची सारी हकीकत दोस्ताला सांगितली. दोस्त डॉक्टरांच्या बोलण्यावर विश्वास ठेवायला तयार नव्हता. त्यानें सांगितलें-"हें अगदीं अशक्य आहे. सी. आय. डीं. नीं हें जाळं टाकलेलं दिसतंय. हा माणूस तुम्हांला नक्कीच कसल्या तरी राजकीय खटल्यांत गुंतवून फसवूं पाहतोय." डॉक्ट-रानीं कांहींएक तर्ककुतर्क न करतां त्याला सांगितलें-"माझा या पाहुण्यावर पूर्ण विश्वास बसला. तो खरं बोलतोय हें त्याच्या डोळयांवरूनच दिसतंय. तूं त्याला एकदां समक्ष पाहून तर घे." डॉक्टरांनीं पृथ्वीसिंहांना त्याच्याकडे नेलें. हा दोस्त कांहींएक बोलला नाहीं. त्यानें नुसतें दुरून त्यांना पाहिलें. मुंबईला जाण्यासाठीं रुपये मिळाले. डॉक्टर त्यांना बसवून देण्यासाठीं गाडीवर आले. कुणा फरारी कैद्याचा तपास पोलिसांनीं चालविला आहे असें त्यांनीं गाडींत लोकांच्या तोंडून ऐकलें. पृथ्वीसिंहांचा चेहरा आतां पूर्णपणें बदललेला होता.

## मुंबईंत

मुंबईला जातांना वाटेंत भुसावळ लागलें. पोलिसवाले प्रत्येक कंपार्टमेंटमध्यें डोकडोकावून बघत होते राजमहेन्द्रीचा एक हवालदारहि तपास करणाऱ्यांमध्यें पृथ्वीसिंहांना दिसला. पण तो राजमहेन्द्रीचा पृथ्वीसिंह इथें होताच कुठें !

मुंबईंत त्यांच्या ओळखीचें कुणीच नव्हतें. आणि डॉक्टर वऱ्हाडपांडे यांज-कडून त्यांनीं कुणाला तरी उद्देशून ओळखपत्रहि घेतलें नाहीं. अंदमानांत त्यांनीं एका मुंबईकर सद्‌गृहस्थाचें नांव ऐकलें होतें, त्याच्याचकडे जाण्याचा त्यांनीं निश्चय

केला. पण मुंबईमारख्या शहरांत पत्ता माहीत नसतां नुसत्या नांवावरून कुणाला शोधून काढावयाचें म्हणजे मोठ्या मुष्किलीचीच गोष्ट होती. पण योगायोग असा आला कीं ज्या माणसाला त्यांनीं उपरोक्त सद्गृहस्थाचा पत्ता विचारला तो त्यांना सरळ त्याच्या ऑफिसकडेच घेऊन गेला. ऑफिसमधून घरीं जाण्यास कांहींच अडचण आली नाहीं. फारच छानपैकीं सुंदर घर होतें हें. इथें लक्ष्मीचा अधिवास आहे हें पाहिल्याबरोबर लक्षांत येई. पृथ्वीसिंहांना दिवाणखान्यांत बसवून ठेवण्यांत आलें. चार दोन मिनिटांनीं उपरोक्त सद्गृहस्थ दुसऱ्या खोलींतून त्यांच्याकडे आले.

पृथ्वीसिंहांचे कपडे अगदीं साधे होते. त्या घराच्या सजावटीशीं ते अगदींच विसंवादी दिसत होते. उपरोक्त सद्गृहस्थांची — यांनाहि आपण डॉक्टरच म्हणूं या — झोंपण्याची वेळ होती. रात्र बरीच झालेली होती. डॉक्टर दिवाणखान्यांत आले आणि कोचावर बसले. बोलणें कसें सुरू करावें हें पृथ्वी-सिंहांना एक दोन मिनिटें कांहीं केल्या सुचेचना. डॉक्टरनींच प्रथम बोलण्यास सुरवात केली आणि विचारलें—"इतक्या अपरात्रीं कोणत्या कामासाठीं मजकडे आलांत?" पृथ्वीसिंहांना आतां थोडासा धीर आला आणि ते म्हणाले —"मी आपल्याजवळ येऊन बसूं शकतों का?" एक क्षणभरहि न अडखळतां डॉक्टरांनीं गालांतल्या गालांत हंसत सांगितलें—"हो हो, जरूर या. इथं बसा माझ्याजवळ."

पृथ्वीसिंहांनीं सुरवात केली: "माझं नांव पृथ्वीसिंह. मी अंदमानांत होतों. २९ नोव्हेंबरला धांवत्या गाडींतून उडी मारून मी फरारी झालोंय. कसंतरी वेषांतर करून मी येथपर्यंत आलोंय. आतां आपली मदत हवीय मला. आपण दोघे एकमेकांना अपरिचित आहोंत. मी आपलं नांव ऐकलं होतं आणि कसाबसा शोध काढत काढत इथवर आलोंय." डॉक्टर अगदीं लक्षपूर्वक पृथ्वीसिंहांची कथा ऐकत राहिले होते. कथा समाप्त झाल्याबरोबर त्यांनीं अगदीं अकृत्रिम भावपूर्वक सांगितलें: "मी आपलं स्वागत करतों."

पृथ्वीसिंह फरारी झाल्याची बातमी वर्तमानपत्रांमध्यें अगोदरच प्रसिद्ध झालेली होती.

जेवणाची वेळ टळून गेलेली होती. डॉक्टरनीं नोकराला पाठवून थोडीशी मिठाई मागविली आणि "आपण स्वस्थपणानं खाऊन घ्या" येवढें सांगून डॉक्टर दिवाणखान्यांतून बाहेर गेले.

डॉक्टर बाहेर गेलेले पाहून पृथ्वीसिंहांच्या मनाला थोडीशी रुखरुख

नकीच लागून राहिली. पण याबद्दल त्यांनीं लगेच आपल्या मनाची निर्भर्त्सना केली.

तासाभरानें डॉक्टर परत आले. त्यांच्याबरोबर एक देखणा तरुण होता. त्यांनीं तरुणाची ओळख करून दिली. एका क्रान्तिकारकाला मदत करावयास मिळते ही आपल्या मोठ्या भाग्याची गोष्ट आहे असें या तरुणाला वाटत होतें. डॉक्टरांचें घर तितकेसें सुरक्षित नव्हतें, म्हणून या तरुणानें त्यांना एका सुरक्षित ठिकाणीं नेलें. अशा पक्क्या व अनुभवी क्रांतिकारकाची गांठ पडल्यावर तरुणाला आपल्या हृदयांतील भावना आवरून ठेवतां आल्या नाहींत. त्यानें देशासाठीं कुरबानी करण्याच्या आपल्या मनांतील साऱ्या ऊर्मि पृथ्वीसिंहांसमोर उघड करून सांगितल्या. ही नवी जागा गिरगांवांतील एका पोलिस स्टेशनच्या जवळ होती. सकाळसंध्याकाळ पोलिस कॉन्स्टेबल आपल्या कामावर जात असलेले पृथ्वीसिंहांना दिसत असत. त्यांनीं आणखी दोनदां जागा बदलली ज्या तिसऱ्या तरुणाच्या बिऱ्हाडीं ते राहण्यास गेले, त्याचा चुलता सी. आय. डी. मध्यें कामावर होता. हीहि जागा धोक्याचीच होती.

डॉक्टरांच्या मतें मुंबईत राहणें सुरक्षितपणाचें नव्हतें. आतां पृथ्वीसिंहांना बेळगांवला रवाना करण्याचें ठरलें. ते पुण्यावरून बेळगांवला पोंचले. पत्ता त्यांना ठाऊक होताच. ते थेट त्या घरीं दाखल झाले. भोंवतालीं ऐसपैस आवार असलेला हा एक मोठा बंगला होता. हें कुणा उच्च अभिरुचि असलेल्या धनिकाचें घर आहे ही गोष्ट पाहतांक्षणीं लक्षांत येण्याजोगी होती. पृथ्वीसिंहांजवळ ओळखपत्र कसलेंच नव्हतें. पण ते येणार असल्याची बातमी घरधन्याला अगोदरच कळलेली होती व त्यानें स्टेशनावर एक माणूसहि पाठवून दिला होता. त्या माणसाला असें वाटलें असावें कीं अनोळखी बावरलेली नजर पाहून आपण नवीन येणाऱ्या पाहुण्याला ओळखूं. पण बावरलेली नजरच पोलिसांना ओळखूं येते. म्हणून आपण जणूं काय बेळगांवचे जुने रहिवासी आहोंत अशाच थाटांत पृथ्वीसिंह आले होते.

बराच उशीर झालेला पाहून घरधन्याला जरा काळजी वाटूं लागली. तेवढ्यांत पृथ्वीसिंह कपड्यांचें गांठोडें घेऊन बंगल्यावर येऊन हजर झाले. घरधन्याला फारच आनंद झाला आणि घरधन्याचें सर्व कांहीं ठीक आहे हें कळल्यावर पृथ्वीसिंहांना तर त्याहूनहि जास्त आनंद झाला. त्याच रात्रीं दोघांनीं भावी कार्यक्रमाविषयीं चर्चा केली. घरधन्याबद्दल पोलिसांना कसलाहि संशय नसला तरी देखील ही जागा होती धोक्याचीच. आणि शेवटीं असेच ठरलें कीं इथें राहणें ठीक नव्हतें.

# भावनगरांत [ १९२३--३० ]

पृथ्वीसिंहांना पुन्हां मुंबईला यावें लागलें. अगोदर ओळख झालेल्या क्रांतिकारक तरुणाबरोबर व इतर मंडळीबरोबर बरीच सल्लामसलत झाली. शेवटीं असेंच ठरलें कीं पृथ्वीसिंहांनीं भावनगरला राहणेंच ठीक होईल. अर्थात त्यांना तिथें आपली ओळख एक क्रांतिकारक या नात्यानें न देतां एक सामान्य माणूस या नात्यानेंच द्यावी लागेल.

अखेर एका संध्याकाळीं पृथ्वीसिंह भावनगरला पोंचले. त्यांना काम मिळालें होतें मुलांना कुस्ती व व्यायाम शिकविण्याचें. पृथ्वीसिंह आतां तीस वर्षांचे होते. त्यांचें शरीर खूपच निरोगी व धष्टपुष्ट होतें. तिथें राहिल्यावर त्यांना असें दिसून आलें कीं एका बगीच्यांत लाल शेंदूर फांसलेल्या मारुतीच्या मूर्तीसमोर बसून मुलें सायंकाळीं प्रार्थना म्हणतात. असला प्रकार पृथ्वीसिंहांनीं आपल्या बाळपणीं व पुढें ब्रम्हदेशांतहि पाहिलेला नव्हता. त्यांना मुलांची ही हनुमानभक्ति फार आवडली आणि थोड्याच दिवसांनीं पृथ्वीसिंहांनीं या मुलांच्या मारुतीसाठीं एक लहानसें मंदिरच उभारून दिलें.

पृथ्वीसिंहांचा स्वभाव फारच गोड आहे. कधीं कधीं रागाच्या भरांत ते बेभान झालेले दिसत असत. पण असा प्रसंग त्यांच्या स्वाभिमानाला अगर देशाभिमानाला धक्का पोंचणार आसें दिसलें तरच यावयाचा. भावनगरला हजारों स्त्रीपुरुषांचा व लहानथोरांचा त्यांच्याशीं संपर्क आला आणि त्यांनीं आपल्या गोड स्वभावानें सर्वांना आपलेंसें करून ठेवलें. त्यांचें काम होतें मुलांना शिकविणें. मुलांचा भोळा भाबडा स्वभाव किती चांगला असतो हें अगदीं जवळून निरीक्षण करण्यास मिळाल्यानंतर त्यांना कळून आलें. भावनगरांतहि त्यांना एक जिवाभावाचा स्नेही लाभला. थोड्याच दिवसांच्या परिचयानंतर या मित्रानें असा विचार केला कीं अशा माणसाला भावनगराहून जाऊं देतां कामा नये. पृथ्वीसिंहांची राहणी फारच साधी होती. त्यांच्या गरजा फारच कमी होत्या. या मित्रानें आपल्या दोस्तांजवळ त्यांच्यासाठीं कांहींतरी काम शोधून देण्याची गोष्ट काढली तेव्हां एका दोस्तानें विचारलें—"तुमच्या दोस्तासाठीं कसलं काम पाहिजे?" या मित्रानें उत्तर दिलें—" चपराशापासून वैद्यापर्यंत कसलंहि चालेल."

## (९)

# काठेवाडांत व्यायामशिक्षक

पृथ्वीसिंहांचे दोस्त वैशंपायन हे भावनगरांत एक समाजसेवक या नात्यानें खूपच प्रसिद्ध होते. नगरांतील प्रमुख व्यक्ति त्यांना मान देत असत. श्री. गोपालजीभाई ठक्कर यांनीं एके दिवशीं त्यांना सांगितलें —"आमच्या सनातन धर्म हायस्कूलसाठीं एक व्यायामशिक्षक शोधून द्या." त्यांनीं पृथ्वीसिंहांना हें सांगितलें. दुसऱ्या दिवशीं त्यांना हेडमास्तरला भेटावयाचें होतें. श्री. ठक्कर यांनीं पृथ्वीसिंहांच्या या दोस्ताजवळ पगाराविषयीं जेव्हां चौकशी केली तेव्हां त्यानें उत्तर दिलें —" आपण त्यांच्या योग्यतेइतका पगार देऊं शकणार नाहीं. आपण आपल्या योग्यतेनुसार जो काय द्यायचा तो द्या. "

गुजरात व महाराष्ट्रांतले लोक संयुक्तप्रांतीयांना "भय्या" म्हणतात. भय्या लोक मोलमजुरीचीं कामें करतात म्हणून त्यांच्या दृष्टीनें "भय्या"चा अर्थ क्षुल्लक माणूस असा होतो. अर्थात नोकरांच्या बाजारांत भय्याची किंमत फारच कमी असते. म्हणून संयुक्त प्रांताच्या या भय्याला दरमहा १५ रु. पगार भरपूर झाला असें शाळेच्या चालकांना वाटलें. खादीचें धोतर व कुडता या पोशाखानिशीं पृथ्वीसिंहांनीं शाळेचे हेडमास्तर छगनलाल दवे यांना भेटून अत्यंत नम्रतेनें सलाम केला. इतक्यांत घंटा वाजली व त्यांना असें सांगण्यांत आलें कीं "एक शिक्षक येत आहेत, त्यांच्या बरोबर तुम्ही जा." हेडमास्तरांच्या खोलींत पुष्कळशा खुर्च्या मांडलेल्या होत्या. पण भय्याला खुर्चीची काय जरूर ? शिक्षक येईपर्यंत भय्याला तसेंच ताटकळत उभें राहावें लागलें.

शिक्षक त्यांना व्यायामशाळेंत घेऊन गेला. भय्यानें कांहीं कसरतीचे प्रयोग करून दाखविले. शिक्षक संतोषराम भट्ट मुंबई विद्यापीठाचे बी. एस्सी. होते व त्यांना स्काउटिंगची फार आवड होती. त्यांनीं आपल्या मोडक्या-तोडक्या भय्या-बोलींत—हिंदींत—व्यायामासंबधांतील आपले विचार त्यांना सविस्तर समजावून सांगण्यास सुरवात केली. हिंदी बोलतांना ते अडखळूं लागले. पृथ्वीसिंहांना गुजराती समजत नव्हतें. म्हणून त्यांनीं या शिक्षकमहाशयांशीं इंग्रजींत बोलणें सुरू केलें. त्यांच्या तोंडून पहिलें वाक्य पूर्ण होतांक्षणीं श्री. भट्ट

आश्चर्यचकितपणें त्यांच्याकडे पाहात त्यांना म्हणाले—"चला चला ! हेडमास्तरांच्या ऑफिसांत चला." बोलणें पुरें करण्याच्या अगोदरच तिकडे चला असें हे कां सांगत आहेत याचा पृथ्वीसिंहांना उलगडा होईना. पृथ्वीसिंहांच्या हाताला धरून ते हेडमास्तरांच्या खोलींत घेऊन गेले आणि म्हणाले "हा कुणीतरी पदवीधर असावासें वाटतें." हेडमास्तर लगेच खुर्चीवरून उठून उभे राहिले आणि त्यांच्याशीं हस्तांदोलन करून त्यांनीं त्यांना बसावयास सांगितलें. अगदीं मनापासून दिलगिरी प्रदर्शित करून हेडमास्तर श्री. दवे म्हणाले–" आपण कुणी साधासुधा भय्या असाल असं आम्हांला वाटलं म्हणून आम्ही आपणांस १५ रु. दरमहा द्यायचं ठरविलं होतं. कृपा करून उद्यां जरूर या."

पृथ्वीसिंह वाटेनें येतांना एकसारखा विचार करीत होते. आपण इंग्रजी बोललों हें चांगलें केलें नाहीं असें त्यांना वाटूं लागलें. याच्यापायीं आपल्याला कदाचित हें कामहि मिळणार नाहीं अशी त्यांना धास्ती वाटूं लागली.

दुसऱ्या दिवशीं पृथ्वीसिंह हेडमास्तरांना भेटावयास गेले त्या वेळीं त्यांना नोकरीच्या बाबतींत फारच थोडी आशा राहिलेली होती. पण हेडमास्तरनें अत्यंत नरमाईनें त्यांना सांगितलें—" आमची संस्था श्रीमंत नाहीं, म्हणून आपल्या योग्यतेला साजेसा पगार आम्हांला देतां येत नाहीं. म्हणून आपण आमच्याकडून दरमहा ३० रु. स्वीकारावेत व तिसरे प्रहरीं मुलांना एक तास व्यायामाचं शिक्षण द्यावं अशी आमची आपणांस विनंति आहे."

पृथ्वीसिंहांना खूप आनंद झाला. दुसऱ्या दिवसापासून त्यांनीं आपलें काम सुरू केलें.

पृथ्वीसिंहांची अंगलट पाहतांक्षणीं ते पहिलवान आहेत हें कळून येत असे. पण जोर बैठकांशिवाय दुसरा कसलाहि व्यायाम त्यांना माहित नव्हता. आणि इथें तर ते झाले होते व्यायाम-शिक्षक. आपल्या अंगच्या या उणीवेविषयीं त्यांचें मन त्यांना फार खात होतें. निरोगी शरीर, देखणा चेहरा आणि सौम्य स्वभाव या गुणांची देणगी त्यांना निसर्गाकडूनच मिळालेली होती; पण येवढ्याच तीन गुणांवर व्यायामशिक्षकाचें भागत नाहीं. म्हणून आतां त्यांनीं पुस्तकांना आपले गुरु केले आणि शारीरिक व्यायाम, शारीरिक आरोग्य व शरीरशास्त्र या विषयांचें ज्ञान मिळविण्यास प्रारंभ केला. कधींकधीं ते परेड मैदानावर जाऊन शिपायांच्या कवाइतीचें निरीक्षण करीत असत. अन्नत्यागाची मुदत सोडल्यास अंदमानमधील बाकीच्या काळांत ते रोज जोर बैठका काढत असत, यामुळें

त्यांची छाती खूप रुंद झालेली होती. त्यांचे स्नायूहि खूप उठावदार दिसत होते. चड्डी घातलेलें त्यांचें उघडें शरीर पाहिल्यावर ते चांगले व्यायामशिक्षक नाहींत असें म्हणण्याची कुणाची छाती होती ? त्यांना व्यायामाचे इतर प्रकार माहीत झालेले नव्हते तोंपर्यंत आपली छाती, खांदे, मांड्या, पिंढऱ्या व स्नायू दाखवून आपल्याला ठाऊक असलेल्या व्यायामाचें प्रदर्शन ते करीत असत आणि पुढें त्यांचें ज्ञान आणखी वाढल्यावर नवनव्या गोष्टींचा अंतर्भाव ते व्यायाम-शिक्षणांत करू लागले.

काठेवाडांत व्यायामाची प्रथा फार कमी आहे. पृथ्वीसिंहांनीं तरुणांच्या मनांत व्यायामाविषयीं गोडी फार लवकर निर्माण केली. आरोग्य हें तरुणांचें सर्वांत मौल्यवान धन आहे आणि व्यायामाच्या अभावीं काठेवाड हें धन फार मोठ्या प्रमाणांत घालवून बसला आहे असा प्रचार त्यांनीं सुरू केला. त्यांच्या जुन्या मित्रानें भावनगरांतील वजनदार लोकांना व्यायाम-शिक्षणकार्याला मदत करण्याची प्रेरणा दिली. शाळेच्या वेळेखेरीज बाकीचा वेळ ते इतर तरुणांना व्यायामाचें शिक्षण देण्यांत खर्च करीत असत. चारदोन महिन्यांच्या आंतच व्यायामविषयक चळवळीला फार अनुकूल वातावरण निर्माण झालें.

व्यायामाच्या अनेक प्रकारांची माहिती तरुणांना हवी होती, पण पृथ्वीसिंहांची पुंजी फार थोडी होती.

या बाबतींत एक गोष्ट सांगावयाची राहून गेली. महिन्याचा पगार घेतल्यावर पृथ्वीसिंहांना पगारपत्रकावर सही करण्यास शिपायानें सांगितलें तेव्हां नांव काय लिहावें हा प्रश्न त्यांच्यापुढें उभा राहिला. त्यांनीं टांक उचलला व "स्वामीराव" अशी सही करून टाकली. संयुक्त प्रांतांतल्या भय्ये लोकांमध्यें "स्वामी" हें नांव क्वचितच कुठें आढळत असेल पण "राव" हें नांव मात्र छप्पन जन्म धुंडाळले तरी मिळणार नाहीं, हें त्यांच्या कांहीं लक्षांत आलें नाहीं. असो ! गुजरात-काठेवाडापुरते तरी पृथ्वीसिंह आतां "स्वामीराव" होऊन चुकले. त्यांची साधु-ब्रह्मचारी वृत्ति पाहून लोकांनीं या नांवाचें "स्वामी" असें रूपांतर केलें. स्वामीरावांच्या मित्राचा नाशिकचे प्रख्यात व्यायामाचार्य के. बी. महाबळ यांच्याशीं फार दाट परिचय होता. त्यांच्याबरोबर बोलणें करून अशी व्यवस्था करण्यांत आली कीं त्यांनीं व्यायाम शिकणाऱ्या प्रौढ विद्यार्थ्यांना व्यायामाचे कांहीं प्रकार शिकवावेत. त्याप्रमाणें महाबळगुरुजी आपले चिरंजीव व दोन शिष्य घेऊन भावनगरला आले. स्वामीराव लाजसंकोच गुंडाळून

ठेवून स्वतःच विद्यार्थी म्हणून या वर्गात सामील झाले. ही कला जास्तींत जास्त शिकून घ्यावी म्हणून त्यांनीं ही खटपट केली. परंतु तुरुंगांतील संघर्षपूर्ण जीवनामुळें त्यांच्या शरीरांत तितका लवचिकपणा राहिलेला नव्हता. म्हणून त्यांच्या इतर तरुण शिष्यांइतकें त्यांना व्यायामशिक्षणांत यशस्वी होतां आलें नाहीं. महाबळगुरुजींची व्यायामपद्धति व त्यांचा व्यायामशिक्षणाचा वर्ग यांच्या योगानें भावनगरच्या सुशिक्षित तरुणांमध्यें व्यायामाच्या बाबतींत भरपूर आवड निर्माण झाली. व्यायामाला हीन समजणारे पोशाखी तरुण देखील व्यायामशाळेकडे आकर्षित होऊं लागले, या यशामुळें स्वामीरावांचा उत्साह इतका वाढला कीं त्यांनीं काठेवाडांतील प्रसिद्ध-प्रसिद्ध स्थळीं महाबळगुरुजींचा दौराच काढला.

* * *

उन्हाळयाच्या दिवसांत मुंबई प्रांतांतील शाळा-कॉलेजांना ४० दिवसांची सुट्टी असते. पुस्तकें वाचून व महाबळगुरुजींसारख्या तज्ज्ञांच्या संगतींत राहून स्वामीरावांना व्यायामविद्येंतल्या बऱ्याचशा गोष्टी शिकण्याची संधि मिळाली. स्वामीरावांनीं सुट्टीचे दिवस याच कामांत खर्च करण्याचा बेत केला. महाबळगुरुजींनीं त्यांना बडोद्याचे व्यायामकलाचार्य माणिकराव यांच्याकडे जाण्यास सांगितलें व स्वतः त्यांनीं तिकडे पत्रहि पाठविलें. स्वामीराव बडोद्याला गेले आणि जुम्मादादा व्यायामशाळेच्या विद्यार्थिवसतिगृहांत एक महिन्यासाठीं राहिले. माणिकरावांनीं आपल्या एका हुशार बलिष्ठ शिष्यावर त्यांना सोंपवून दिलें. हा शिष्य कुस्तीच्या कलेंत फारच निपुण होता. त्याच्या अंगांत ताकतहि खूप होती आणि त्याचबरोबर डावपेंचांचें ज्ञानहि त्याला चांगलें होतें. स्वामीरावांच्या अंगीं ताकत तर होती पण कुस्तीची कला त्यांना अवगत नव्हती. शिष्यानें स्वामीरावांना एखाद्या लहान मुलाप्रमाणें हवें तसें घोळपाटलें, पण स्वामीराव हताश नाहीं झाले. ही कला शिकून घेतली पाहिजे असा त्यांनीं निश्चय केला. पहिल्या दौऱ्यांत त्यांना फारसें शिकतां नाहीं आलें, पण त्यांना या कलेचें महत्व माहित झालें, त्याचप्रमाणें माणिकरावांचा परिचय करून मिळाला व त्यांचा शिष्य होण्याचा मान लाभला. आतां काठेवाडांत स्वामीराव हे नुसते स्वामीरावच राहिले नाहींत; ते माणिकरावांचे शिष्यहि झाले होते.

## स्वयंसेवक संघटनाकार्याचा पहिला अनुभव

भावनगरला थिऑसॉफिकल सोसायटीचें एक संमेलन व्हावयाचें होतें. त्याच्याबरोबर एक प्रदर्शनहि भरणार होतें. सनातनधर्म स्कूलच्या हेडमास्तरांनीं

विद्यार्थ्यांना स्वयंसेवक होण्यास सांगितलें पण तें जमलें नाहीं. संमेलनाचे चालक या कामासाठीं पोलिसांची मदत घेण्याच्या विचारांत होते. स्वामीरावांना हें आवडलें नाहीं. त्यांनीं हेडमास्तरांना सांगितलें—"मला जरा प्रत्येक वर्गांत जाऊन स्वयंसेवकांची भरती करायची परवानगी द्या." हेडमास्तरांना आशा वाटत नव्हती पण त्यांनीं स्वामीरावांना तशी परवानगी देऊन टाकली. ते प्रथम सहाव्या इयत्तेच्या मुलांकडे गेले. तिथें त्यांना जें यश मिळालें, त्यामुळें उत्साहित होऊन ते सातवीच्या वर्गांत गेले. तिथें एक सद्‌गृहस्थ मुलांना तत्वज्ञान व ब्रह्मविद्या घोळघोळून पाजण्यांत दंग झालेला होता स्वामीरावांनीं एका शब्दांत विद्यार्थ्यांना स्वयंसेवक होण्याची विनंती केली पण कुणीहि विद्यार्थी तयार झाला नाहीं. त्यांनीं व्याख्यात्याजवळ दोन मिनिटें भाषण करण्याची परवानगी मागितली, आणि मग सांगितलें-" ज्या संस्थेंत राहून तुम्ही विद्यामृताचा आस्वाद घेतां त्या संस्थेची सामाजिक सेवा जर तुम्हांला करावीशी वाटत नाहीं तर खादी वापरण्याचा व गांधीटोपी घालण्याचा फायदा काय ? " व्याख्याता रागारागानें मध्येंच उद्गारला-" या टोपीला गांधीटोपी नका म्हणूं. ही पांढरी टोपी आहे." स्वामीराव शांतपणानें म्हणाले-" गांधीटोपी आहे का पांढरी टोपी, हें ठरवायचं काम विद्यार्थ्यांवर सोंपवून द्या." विचारल्याबरोबर मुलांनीं एका आवाजांत "गांधीटोपी" असा पुकारा केला. मग स्वयंसेवक होण्याबद्दल सांगितल्यानंतर कांहीं मुलानीं आपलीं नांवें दिलीं.

स्वामीरावांनीं स्वयंसेवकांना एका ठराविक वेळेला ठराविक पोशाख करून लाठ्या घेऊन बोलावलें. दुसऱ्या दिवशीं गणवेषधारी तरुण लाठ्या घेऊन तिथें पोंचले. भावनगरच्या जनतेनें प्रतिष्ठित घराण्यातील तरुण मुलांना अशा प्रकारें गणवेष घालून लाठ्या घेऊन परेड करतांना कधींच पाहिलें नव्हतें. कांहीं प्रमुख नागरिक यावर अशी टीका करीत असत—" आ माणस शा माटे नाना छोकराओंना हाथमां वांसडा आपे छे ? " ( हा माणूस लहान मुलांच्या हातांत बांबू कशासाठीं देतो ? ) मुलांनाहि पहिल्या पहिल्यांदां थोडीशी लाज वाटत असावीसें दिसत होतें. त्यांतल्या त्यांत लाठीची जरूर काय हें हेडमास्तरांनाहि कळत नव्हतें आणि गोपालजीभाईंना तर त्याहूनहि कळत नव्हतें. संमेलनानंतर संध्याकाळीं प्रदर्शनांत जाण्यासाठीं लोकांची फार गर्दी झाली. गडबड माजविणारे कांहीं लोक फाटकाशीं जमा झाले आणि तिथें दंगल करण्याची त्यांनीं तयारी चालविली. कांहीं लष्करी शिपाईहि त्यांना सामील झाले व तिकिटाशिवायच प्रदर्शनांत घुसण्याचा त्यांनीं बेत केला. तिकिट अवघे चार आणे होतें.

स्वामीराव मुलांना फाटकाशीं पाहऱ्याला उभे करून जेवावयास गेले होते. तेवढ्यांत त्यांना बातमी कळली. ते धांवतच आले. चालकांजवळ विचारतां त्यांनीं सांगितलें—"कसंहि करून प्रदर्शनाचं संरक्षण केलं पाहिजे." स्वामीरावांनीं आपल्या व्यायामशाळेंतील तरुणांना लाठ्या घेऊन येण्यास सांगितलें. सारेच्या सारे तरुण तिथें हजर झाले. आखाडेवाले तरुण लाठ्या घेऊन उभे असलेले पाहतांच दंगेखोरांनीं तिथून सूंबाल्या केला.

स्वामीराव भावनगरच्या तरुणांमध्यें आणि त्यांच्या मार्फत वृद्ध मंडळीमध्यें फारच लोकप्रिय होऊ लागले होते. कारण व्यायामाची गोडी लावून त्यांनीं तरुणांच्या आरोग्यांत खरोखरीच फार मोठें परिवर्तन घडवून आणलें होतें. त्याचबरोबर त्यांच्या चालचलणुकीनें आणि साध्या राहाणीनें अनेकांच्या मनांत त्यांच्याविषयीं श्रद्धा निर्माण केली होती. ते व्यायामाबरोबरच खादीचेहि परमभक्त होते. शाळेच्या शिक्षकांमध्यें व विद्यार्थ्यांमध्यें खादी वापरणारे फार कमी आहेत हें त्यांनीं पाहिलें. हेडमास्तराला विचारून त्यांनीं सर्वांच्या सभेंत भाषण करण्याची परवानगी मिळविली. ते सभेंत उभे राहिले केवळ खादीचें गुणगान करावयाला, परंतु त्यांतच त्यांनीं भारतमातेची गरीबी, परतंत्रता, इत्यादि किती तरी गोष्टी अत्यंत करुणरसपूर्ण रीतीनें सांगून टाकल्या. भाषण करून झाल्यावर स्वामीरावांना आपली चूक कळून आली. श्रोत्यांपैकीं पुष्कळसे लोक त्यांच्याकडे आणखीच श्रद्धायुक्त दृष्टीनें पाहूं लागले. कुणी म्हणूं लागले—"पाहिलांत हा माणूस. यानं देशासाठीं आपल्या सुखावर व स्वास्थ्यावर लाथ मारली." कुणीकुणी असेंहि म्हणूं लागले—"काय प्रकार आहे पहा. येवढा सुशिक्षित व सुसंस्कृत माणूस ३० रुपड्यांवर रखडतोय? यात कांहींतरी रहस्य असलंच पाहिजे." आणि कांहीं राजकीय कार्यकर्ते तर हा कुणी तरी सरकारचा हेरच असला पाहिजे असा समज करून घेऊं लागले.

५१९४
१३६७
५३१६

## एक शपथ

स्वामीरावांनीं भावनगरांत मुलांचें क्रीडामंडळ काढून आपल्या कार्यास सुरवात केली होती. क्रीडामंडळांत कुस्ती व तालीम शिकवीत असत. त्यांना या आखाड्यासाठीं मिळलेली जागा एका बागेच्या आवारांत होती. शंभर फूट लांब व शंभर फूट रुंद अशी ही खुली जागा होती. आखाड्याच्या एका अंगाला एक विहीर होती व एका कोंपऱ्यावर शेंदूर फांसलेली हनुमानाची मूर्ति होती. इथेंच बारा फूट लांब व बारा फूट रुंद अशी जागा खोदून कुस्तीसाठीं हौदा तयार करण्यांत आला. आखा-

ज्यांत कांहीं लाठ्या व कांहीं करेले होते. हें साहित्य संभाळण्याची जबाबदारी बागेच्या माळयावर सोंपविण्यांत आली होती.

एके दिवशीं संध्याकाळीं स्वामीराव आखाड्याकडे गेले. त्यांनीं दुरून पाहिलें, तों कांहीं मुलगे झाडू घेऊन आखाडा साफ करीत आहेत व इतर मुलगे नुसतेच बघत उभे राहिले आहेत. अंगमेहनतीचें काम सर्वांनींच केलें पाहिजे हा विचार स्वामीरावांच्या मनांत अशा प्रसंगीं येणें साहजिकच शक्य होतें. पण या वेळीं त्यांच्या मनांत असाहि विचार आला कीं या जागेला कांहीं तरी फार चांगलें रूप दिलें पाहिजे; म्हणजे ज्या कामासाठीं मुलें इथें येतात त्या कामाकडे त्यांना अधिक वेळ देतां येईल. म्हणून क्रीडामंडळाला म्हणा अगर आखाड्याला म्हणा, फारच चांगलें रूप दिलें पाहिजे असा त्यांनीं संकल्प सोडला.

दूध आणि साखर हे स्वामीरावांचे अत्यंत आवडते पदार्थ होते. त्यांनीं असा निश्चय केला कीं जोंपर्यंत क्रीडामंडळाला सुंदर स्वरूप देतां येत नाहीं तोंपर्यंत दूध-साखर वर्ज्य. ही प्रतिज्ञा स्वामीरावांनीं मुलांच्या देखत केलेली होती. तिची बातमी मुलांच्या आईबापांच्याहि कानांवर गेली होती पण मदत कुणालाच करतां आली नाहीं. सहा महिने लोटले. स्वामीरावांचें वजन अठरा पौंड घटलें, पण कांहींच मार्ग निघाला नाहीं. याच सुमारास नवे महाराज कृष्णकुमारसिंह गादीवर यावयाचे होते. हा उत्सव मोठ्या थाटामटानें होणार होता. त्या वेळीं शिक्षण विभागाच्या अध्यक्षांनीं स्वामीरावांनाहि व्यायामाचा कार्यक्रम दाखविण्यास सांगितलें. कार्यक्रमाचे वेळीं महाराज व त्यांचे दिवाण सर प्रभाशंकर पट्टणी हेहि हजर होते. स्वामीरावांच्या क्रीडामंडळाचा कार्यक्रम पाहून ते इतके खूष झाले कीं सर प्रभाशंकर पट्टणींनीं आखाड्यासाठीं स्वामीरावांना एक सुंदर जागा दिली पाहिजे असा हुकुम तिथल्या-तिथेंच पास केला. क्रीडामंडळाला मोतीबागेंत एक जागा देण्यांत आली. माळयाला हुकुम मिळाला कीं मोठ्या वृक्षांच्या बुंध्यांलगत फुलझाडें लावावींत म्हणजे आखाडेवाल्या तरुणांना सुगंधी हवेंत श्वास घेतां येईल. आखाड्यावर छप्परहि उभारण्यांत आलें. व्यायामाचें सामानहि भरपूर खरेदी करण्यांत आलें. माणिकरावजींना विनंति करण्यांत आली आणि त्यांनीं आपले तरुण शिष्य बहाउद्दीन उस्मानशेख यांना स्वामीरावांना मदत करण्यासाठीं पाठविलें. क्रीडामंडळ ही आतां भावनगरांतली एक उपयोगी संस्थाच नव्हे तर खरोखरीच एक सुंदर व प्रख्यात संस्था झाली. क्रीडामंडळाचे संस्थापक होते स्वामीरावांचे मित्र गणेश रघुनाथ वैशंपायन. आतां स्वामीरावांनीं त्याचें नांव ठेवलें "गणेश क्रीडामंडळ."

* * *

स्वामीराव मुलांमध्यें जितके लोकप्रिय होते तितकेच शिक्षकांमध्यें अप्रिय होते. कारण त्यांनीं आपल्यासारखेंच मजबूत व्हवें म्हणून ते त्यांचेहि दोष काढीत असत. एके दिवशीं असिस्टंट हेडमास्तरशीं व्यायामाच्या प्रश्नावर त्यांचा वाद झाला. शिक्षक सांगत होते कीं सर प्रभाशंकर पट्टणींच्या मतें माणसाला जगण्यासाठीं व्यायामाची कांहींएक जरूर लागत नाहीं. स्वामीराव उत्तरले--"सर प्रभाशंकर यांच्यासारखा माणूस असं कधींच सांगणार नाहीं. अन् जर ते असं सांगत असतील तर मला त्या सांगण्याची मुळींच किंमत वाटत नाहीं. ते एक हुशार राज्यकर्ते आहेत, पण ते व्यायामाचे खास तज्ज्ञ अगर डॉक्टर नाहींत."

शिक्षक रागावला आणि म्हणाला--"म्हणजे तुम्ही स्वतःला सर प्रभाशंकरांपेक्षां जास्त हुशार समजतां?"

"व्यायामापुरता मी स्वतःला जरूर जास्त हुशार समजतों."

शिक्षकानें यावर तोंडांतून शिवी काढली. स्वामीराव उठून उभे राहिले. त्यांचा लाल चेहरा पाहून शिक्षक पळून गेला. त्यांनीं थोड्या अंतरापर्यंत त्याचा पाठलाग केला, पण मग त्यांनीं स्वतःला सांवरून घेतलें. हेडमास्तराला त्यांनीं यांतलें कांहींच कळविलें नाहीं आणि ते शाळा सोडून चालते झाले. गोपालजीभाईंनीं त्यांची समजूत घालण्याची खूप खटपट केली पण स्वामीराव परत शाळेंत कांहीं गेले नाहींत.

स्वामीराव भावनगरला पोंचले तेव्हांपासून दक्षिणामूर्ति विद्याभवनाचीं कार्यें ऐकून या संस्थेकडे त्यांचें मन आकर्षिलें गेलें. शाळेला रामराम ठोकल्यानंतर विद्याभवनाशीं निकट संबंध जोडण्याची त्यांना संधि मिळाली आणि ते तेथें व्यायामशिक्षकाचें काम करूं लागले. मागाहून ते इतिहास व भूगोलहि शिकवूं लागले. विद्यार्थ्यांना हिंदी समजत नव्हतें म्हणून स्वामीराव गुजरातींत बोलण्याचा प्रयत्न करीत; त्यांत पुष्कळच चुका होत असत आणि विद्यार्थ्यांची चांगलीच करमणूक होई. दक्षिणामूर्ति विद्याभवनांत किती तरी उच्च ध्येयवादी शिक्षक कार्य करीत होते, स्वामीरावांची त्यांच्याशीं आणखी दाट मैत्री झाली. मागाहून हातांना जखमा झाल्यामुळें त्यांना इस्पितळांत जाणें भाग पडलें आणि अशा प्रकारें भवनाशीं त्यांचा संबंध सुटला.

* * *

स्वामीरावांनीं स्वतःचें खरें स्वरूप लपवून ठेवण्याची पूर्ण कसोशी केली होती. पण कांहीं झालें तरी ते एक जिवंत माणूसच होते, म्हणून चोवीस तास बतावणी करीत राहणें मोठें कठीण होतें. कोणत्या ना कोणत्या तरी प्रसंगीं त्यांच्या प्रतिभेची चमक झळकून जाई आणि येवढा लायक माणूस अशा प्रकारें इतक्या सामान्य रीतीनें आपलें आयुष्य कां घालवीत आहे असा प्रश्न त्यांच्या वर्तनावरून लोकांच्या पुढें उभा राही. त्या वेळीं ते आपल्या एका सहकारी शिक्षकासमवेत एका बिऱ्हाडीं राहत होते. रात्रीं ते अगदीं गाढ झोंपलेले होते. शिक्षक आला, त्यानें त्यांना जागें केलें आणि कठोर शब्दांत सांगितलें —"तूं सरकारचा हेर आहेस. माझ्यासारख्या देशभक्ताच्या घरीं तुला राहतां येणार नाहीं." स्वामीराव स्वतःतर्फे खातरजमा कशी करणार? पण असलीं बोलणीं ऐकण्यासाठीं त्यांनीं आपल्या मनाची तयार केलेली होती. त्यांनीं आपला बिछाना गुंडाळला आणि गालांतल्या गालांत हंसत त्याच रात्रीं त्या घराला रामराम ठोकला.

एके दिवशीं विद्यार्थ्यांबरोबर स्वामीराव फिरावयास गेले होते. वाटेंत समोरून पांच साधू येत होते. ते चांगले धष्टपुष्ट उत्तर हिंदुस्थानी लोक होते. खादीधारी गांधीटोपीवाल्या गुजराथ्यांना पाहून त्यांनीं महात्मा गांधींना शिव्या देण्यास सुरुवात केली. या शिव्यासुद्धां कुणा साधूनें कवितावद्ध केलेल्या होत्या. हा दोहरा काठेवाडी विद्यार्थ्यांना तर कळलाच नाहीं पण स्वामीरावांना त्याचा अर्थ समजत होताच. स्वामीरावांनीं त्यांना विचारलें: "बाबा! तुम्ही कसलं गाणं म्हणत आहांत?"

"जें आमच्या मर्जीला येईल तें."

"मलाहि आपलं गाणं ऐकायचंय." साधूंनीं महातमाजींवर घाणेरड्या शिव्यांनीं भरलेला एक दोहरा म्हणून दाखविला. स्वामीरावांना हें सहन झालें नाहीं. त्यांनीं जरबेनें सांगितलें—"आपण गांधीजींना शिव्या दिल्यांत. आतां मी तुम्हांला सांगतों कीं तुम्ही तीन वेळां 'महातमा गांधी की जय' असं म्हणा." साधू थोडेच त्यांचें ऐकणार? त्यांनीं त्यांची चेष्टाच केली. स्वामीरावांची लाठी त्यांचा एक विद्यार्थी बालजी पटेल याच्याजवळ असे. त्यांनीं बालजीला काठी आणावयास सांगितलें. या बलिष्ठ साधूंनीं खदखदा हंसत विचारलें—"तुम्ही लाठी दाखविली म्हणजे आम्ही डरूं होय?" स्वामीराव म्हणाले—"ठीक आहे. मी लाठी नाहीं दाखवीत. आतां तुम्ही सावध रहा हं." त्यांनीं त्यांच्यापैकीं सगळ्यांत बलिष्ठ साधूची मानगूट धरली

आणि सांगितलें–"आतां मी तुला जमिनीवर लोळवल्याशिवाय सोडणार नाहीं. तुला काय हवं तें कर तूं." हाताची पकड बसतांक्षणीं स्वामीरावांच्या अंगांत केवढी ताकत आहे याची प्रचीति साधूला आली. तो जरा देखील उशीर न लावतां 'महात्मा गाधी की जय' असें ओरडतच सुटला—त्याच्या साथीदारांनींहि त्याचें अनुकरण केलें स्वामीरावांच्या बरोबर शंभर विद्यार्थी चालले होते, त्यांची या प्रकारामुळें चांगलीच करमणूक झाली.

स्वामीरावांना राहण्यासाठीं एक जागा तर शोधावयाची होती, पण त्यांना भाडें देण्याची ऐपत नव्हती. कुणा मित्रानें सांगितलें कीं शहराबाहेर पण दक्षिणामूर्ति भवनाच्या जवळच एक चांगला बंगला रिकामा पडलेला आहे. हा बंगला कुणा एका भक्तानें एका जैन साधूसाठीं तयार करविलेला होता. साधू तिथें फार दिवस राहिला नाहीं. आणि त्याच बंगल्यांत त्याला मृत्यु आला. शहरांत बातमी पसरली कीं त्या बंगल्यांत भूत आहे. कुणीच त्या बंगल्यांत राहावयाला तयार होईना. स्वामीरावांचा भुतांखेतांवर तर कधींच विश्वास नव्हता. बंगला पाहतांक्षणीं त्यांना पसंत पडला. त्यांनीं मालकाकडे राहण्याची परवानगी मागितली आणि मालकानेंहि मोठ्या आनंदानें परवानगी दिली. मित्रांना जेव्हां हें कळलें तेव्हां त्यांनीं स्वामीरावांची परोपरीनें समजूत घातली आणि त्यांना आपल्या घरीं राहून घेण्याचा बेत केला, पण स्वामीरावांनीं भुतांची ही भानगड काय आहे ती पाहण्याचा निश्चयच केला होता.

स्वामीराव एक बिछाना, खाटलें, व एक कंदील घेऊन भुताटकीच्या बंगल्यांत गेले. उन्हाळ्याचे दिवस होते, त्यांनीं आपलें खाटलें बाहेर अंगणांत टाकलें. खूप गाढ झोंप लागली होती त्यांना. एकाएकीं त्यांच्या कानीं आवाज आला –"कोन छे?" (कोण आहे?) स्वामीरावांनीं डोळे उघडून इकडे तिकडे पाहिलें पण कुणीच दिसलें नाहीं. चार दोन मिनिटांनीं पुन्हां तसाच आवाज आला. ज्या दिशेनें आवाज आला तिकडे नजर फेंकतां तिथें कुणीतरी माणूस उभा असलेला दिसला. स्वामीरावांनींहि "कोन छे?" असा पुकारा केला. त्यावर त्या माणसानें तेच शब्द पुन्हां उच्चारले स्वामीरावांनीं त्याचा पाठलाग करण्यासाठीं धांव घेतली. भूत तिथून पळून गेलें आणि पुन्हां तिथें कधींहि दृष्टीस पडलें नाहीं. वस्तुतः त्या बंगल्यांत भुताटकी नव्हती. तिथें बदमाषांचा अड्डा होता. स्वामीराव राहून गेल्यानंतर बंगल्यांत बिऱ्हाडकरू येऊं लागले.

## ब्रह्मदेशाचा दौरा

१९२४ साल आलें. भावनगरांत राहून दोन वर्षें होऊन गेलीं होतीं.

सरकारच्या मेहेरबानीवरच ते अवलंबून राहिले असते तर त्यांची १९५१ सालीं सुटका व्हावयाची होती. पण आतां ते आपल्या हिंमतीवर स्वतंत्र झालेले होते. वडिलांना भेटीसाठीं काठेवाडांत बोलावून घेणें तर त्यांना शक्यच नव्हतें आणि त्याचबरोबर वृद्ध वडिलांचें देहावसान होण्यापूर्वी त्यांना एकदां भेटून येण्यासाठीं त्यांचें मन अगदीं बेचैन झालें होतें. कुणा मित्रानें त्यांना २०० रु. दिले आणि थोड्याच दिवसांत ते ब्रह्मदेशांत पोंचले. निराश झालेल्या वडिलांना अशा प्रकारें एकाएकीं पृथ्वीसिंह आलेले पाहून प्रथम आश्चर्य आणि नंतर अपार आनंद झाला. पृथ्वीसिंहानीं त्यांना सारी हकीकत सांगून त्यांचा आशीर्वाद मागितला—"मी माझं सारं आयुष्य देशसेवेसाठीं समर्पण केलं आहे. आपण या कामीं मला खुशीनं आज्ञा व आशीर्वाद द्या." वडिलांचा आशीर्वाद घेऊन निघतेवेळीं पृथ्वीसिंहांनीं सांगितलें—"देशाच्या शत्रूंशीं लढतां लढतां जर मी मारला गेलों तर ती बातमी मोठमोठ्या मथळ्यांनिशीं सर्वत्र छापली जाईल अन् आपल्याला कळेल. मी आजारी पडून मला जर बिछान्यावरच मरण आलं तर माझे मित्र कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनं आपल्याला खबर देतील. मी देशसेवा करीत जिवंत राहिलों तर मात्र आपल्याला कुणीच बातमी देऊं शकणार नाहीं."

दोन वर्षे हिंदुस्थानांत अज्ञातवासांत काढल्यानंतर पृथ्वीसिंहांना अशी इच्छा झाली कीं इंग्रजांच्या तावडींतून निसटून दुसऱ्या कोणत्या तरी देशांत निघून जावें. ब्रह्मदेशाच्या हद्दीला लागून सयाम देश आहे. वाटेंतल्या धोक्या-संबंधांत त्यांना अगोदरच सारें कांहीं कळलेलें होतें तरीहि त्यांनीं सयाममध्यें घुसण्याचा निश्चय केला. रंगून शहरीं त्यांनीं मोठा आवाज करणारें एका खेळांतलें पिस्तुल खरेदी केले. जंगली जनावरांना घाबरवण्यासाठीं उपयोगी पडावेत म्हणून त्यांनीं थोडेसे फटाकेहि बरोबर घेतले. कांहीं औषधें व एक चांगल्यापैकीं सुरा त्यांनीं आपल्यापाशीं ठेवून दिला.

मोलमीन सोडल्यानंतर त्यांना नावेंत बसून एक नदी ओलांडावी लागली. आतां दाट जंगल लागलें. त्यांत भयंकर हिंस्र श्वापदें होती. तीन दिवसपर्यंत त्या जंगलांतून ते वाटचाल करीत राहिले. जनावरांनीं त्यांना कांहीं एक त्रास दिला नाहीं पण मच्छरांनीं त्यांना हैराण करून सोडलें. एके दिवशी संध्याकाळीं आपल्याला १०४ डिग्री ताप आला आहे असें त्यांना आढळून आलें. पुढें जाणें शक्यच नव्हतें. इकडे तिकडे शोध केला, तेव्हां एका तारवाल्याचें घर मिळालें. हा इसम एक हिंदु तरुण होता. पृथ्वीसिंहांच्या या सांगण्यावर त्याचा विश्वास बसला—"मी

रंगूनच्या एका व्यापाऱ्यासाठीं पुष्कळशा गाई खरेदी करायला आलों होतों. जंगलांत आल्यावर आजारी पडलों. रात्रीपुरती मला जागा द्या."

पृथ्वीसिंहांनीं मुसलमानी धर्तीचे कपडे घातलेले होते म्हणून त्यांनीं आपलें नाव मुसलमानाला शोभेसेंच सांगितलें. हिंदु तरुणानें आपल्या ऐपतीप्रमाणें त्यांच्या राहण्याची जास्तींत जास्त चांगली सोय केली. ते अंथरुणावर पडून होते आणि तापाच्या भरांत कांहींतरी बडबडूं लागले. त्यांनीं तरुणाला कागदपेन्सिल आणण्यास सांगितलें. आणल्यावर ते म्हणाले-" मी जें कांहीं बोलतोंय तें लिहून ठेवीत जा."

दुसऱ्या दिवशीं ताप उतरला. तरुणानें पृथ्वीसिंहांना सांगितलें-"तुम्ही तर सागत होतां कीं आपल्या मालकासाठीं गाई खरेदी करायला आपण आलों आहों म्हणून. पण रात्रीं तुम्ही काय काय बोललांत तेंहि जरा बघून घ्या ना." पृथ्वीसिंहांनीं या बडबडण्यांत आपल्या आयुष्याचें कोणतेंहि रहस्य उघड करुन सांगितलें नसलें तरी त्यांनीं देशाचें स्वातंत्र्य व 'मारा किंवा मरा' या विषयावर खूप जहाल व्याख्यानच झोडलें होतें. खरा प्रकार कदाचित तरुणाच्या लक्षांत आला असेलहि, पण त्यानें आणखी माहिती मिळविण्यासाठीं कसलाहि प्रश्न विचारला नाहीं. तीन दिवस ते त्या तरुणाच्या घरीं राहिले. मुसलमान असूनहि तरुणानें त्यांची आपल्या भावाप्रमाणें बडदास्त ठेवली. पृथ्वीसिंहांना जरा बरें वाटल्यावर त्यांनीं पुढें जाण्याची गोष्ट काढली, तेव्हां तरुणानें त्यांना सारे धोके समजावून सांगून पुढें न जाण्याचा सल्ला दिला. ते पुन्हां मोलमीनला परत आले. पुन्हां दुसऱ्यांदा त्यांना ताप आला. त्या दिवशीं ते एका मुसलमानी सराईंत (धर्मशाळेंत) गेले. त्यांना राहण्यासाठीं खोली मिळाली. आंत गेल्यावर त्यांनीं आंतून कडी लावून घेतली. पुन्हां आपण बडबडलों तर कुणी ऐकूं नये म्हणून त्यांनीं हा बंदोबस्त केला.

रंगूनला आल्यावर त्यांनीं कलकत्त्याला जाण्यासाठीं बोट पकडण्याचा बेत केला. धक्क्यावर पोंचतां पोंचतां पुन्हां ताप आला. कलकत्त्याची बोट केव्हां सुटते या बाबतींत त्यांनीं एका माणसाजवळ दोनतीनदां विचारपूस केली. तो माणूस होता सी. आय. डी. त्याला कांहीं तरी संशय आला. त्यानें उलट सुलट प्रश्न विचारावयास सुरवात केली. उत्तरें समाधानकारक नव्हतीं, म्हणून त्याचा संशय आणखीच बळावला. त्यानें पृथ्वीसिंहांना पोलिस चौकीवर चलण्यास सांगितलें. दोघांचीं प्रश्नोत्तरें चाललीं होतीं. इतक्यांत एक सी. आय. डी. अधिकारी तिकडून जात होता. त्याला एका मोठ्या कामगिरीवर जायचें होतें म्हणून त्यानें त्याच

माणसाला त्यांना घेऊन जाण्यास सांगितलें. पृथ्वीसिंहांनीं त्या माणसाला एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या घरावरून जाण्यास सांगितलें. माणसानें कबूल केलें.

पृथ्वीसिंह त्याला एका निर्जन रस्त्यावर घेऊन गेले. त्यांनीं त्या माणसाच्या हातावर ५० रु. ठेवले आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला सांगितलें— "तुला जर आपलं भलं व्हावं असें वाटत असेल तर तूं मला उलटसुलट प्रश्न विचारूं नकोस." माणूस एक शब्दहि न बोलतां तिथून चालता झाला.

## जंगली जनावरांच्या वाटेंत

माणूस निघून गेल्याबरोबर तिकडून एक टॅक्सी आली. पृथ्वीसिंह तींत बसले आणि त्यांनीं ड्रायव्हरला टॅक्सी खूप जोरांत हांकारण्यास सांगितलें. अर्ध्या तासानंतर एका लहानशा रेल्वे स्टेशनावर ते पोंचले आणि तिथें टॅक्सींतून उतरून ते मंडालेकडे जाणाऱ्या रेल्वे स्टेशनाकडे गेले. इथें जवळच्या नदींतून आगबोटी चाललेल्या होत्या. पृथ्वीसिंह किन्दत्‌ला जाणाऱ्या आगबोटींत बसले. चिन्दविन नदींतील हें शेवटचें बंदर आहे. उत्तर ब्रह्मदेशाची वाट धरतांना आतां आपल्याला मणिपूरच्या डोंगरांतूनच हिंदुस्थानकडे जावें लागणार हा विचार पृथ्वीसिंहांनीं मनांत योजून ठेवलेलाच होता. आगबोटींतून उतरून ते धर्मशाळेंत गेले. धर्मशाळेंत तीन मणिपुरीहि उतरलेले होते आणि ते दुसऱ्याच दिवशीं आपल्या घरीं जाण्यास निघणार होते. पृथ्वीसिंहांनीं त्यांच्या बरोबर जाण्याची गोष्ट काढली तेव्हां त्यांनीं सांगितलें-"ठीक आहे. तुम्ही चालूं शकतां आमच्या-बरोबर. पण सरहद्दीवरच्या अधिकाऱ्याकडून परवाना घ्यावा लागेल." परवाना घेण्यासाठीं पृथ्वीसिंहांनीं कुणा अधिकाऱ्याकडे जाणें म्हणजे स्वतःला धोक्यांत घालणें असाच त्याचा अर्थ होता. तिघे मणिपुरी बिचारे साधेसुधे इसम होते. त्यांना त्यांनीं सांगितलें—"भाई हो! मी आहे कॉंग्रेसवाला. इंग्रज अधिकाऱ्यासमोर मी जाणं बरं नव्हे. परवान्याची जिकडे कांहीं जरूरच पडणार नाहीं अशा एखाद्या डोंगरी रस्त्यानं तुम्हांला जातां नाहीं का येणार?"

ते तिघे म्हणाले—"तसा रस्ता आहे, पण तिकडून गेलं तर तीन दिवस जास्त लागतील."

"मणिपुरापर्यंत तीन माणसांचा जो काय खर्च होईल तो मी देईन. जिकडून परवान्याची जरूरच लागणार नाहीं अशाच रस्त्यानं जाऊं या आपण." त्यांनीं हें काम पतकरलें. मणिपूरला गेल्यावर आपल्याजवळचा मोठा सुराहि भेट म्हणून देऊं असें आणखी एक आमिष पृथ्वीसिंहांनीं त्यांना दाखविलें.

दुसऱ्या दिवशीं त्यांनीं पाऊलवाट धरली. जंगलांतल्या पहाडी वाटा त्यांना ठाऊक होत्या पण पृथ्वीसिंह मलेरियामुळें जास्तीच गळाठलेले होते. वरून पाणी पडलेलें होतें म्हणून रस्ता फारच निसरडा झालेला होता. पण पृथ्वीसिंहांना आपली सारी शक्ति पणाला लावून या संकटांतून पार पडणें भाग होतें. वाटेंत किती तरी ठिकाणीं त्यांनीं बसकण मारली आणि ते पुन्हां उठून चालूं लागले. बरेंच दूर गेल्यानंतर त्यांच्या सोबत्यांनीं वास घेऊन सांगितलें कीं इथें आसपास कुठें तरी वाघ आहे. हें सांगतांना त्यांच्या चेहऱ्यांवर मरणाची अवकळा आलेली होती. थोड्याच अवधींत पृथ्वीसिंहांनाहि तो वास कळला. ते मृत्यूशीं लढण्यास तयार होते पण मृत्यु बहुधा या चौघांचा नुसता वासच घेऊन दूर गेला असावा. बऱ्याच वेळानंतर या सोबत्यांच्या जिवांत जीव आला आणि त्यांच्या चेहऱ्यांवरील फिकट-पणा ओसरून ते पूर्ववत दिसूं लागले.

संध्याकाळीं ते एका लहानशा धर्मशाळेंत उतरले. आपलें सामान मधोमध ठेवून चौघे झोंपी गेले. मध्यरात्रीनंतर डाकू आले. त्यांनीं दगडफेंक सुरू केली. पृथ्वीसिंह व त्यांचे सोबती लाठ्या सरसावून जोरजोरांत आरडाओरडा करूं लागले. थोड्या वेळानें ही धामधूम ऐकून गांवांतले कांहीं लोकहि मदतीला आले. आणि डाकूंनीं पोबारा केला. डोंगरावरील झाडीचें दृश्य फारच सुंदर होतें पण पृथ्वीसिंह निसर्गसौन्दर्याचा आनंद लुटण्यासाठीं येथें नव्हते आलेले. त्यांना कसेंहि करून हिंदुस्थानला पोंचावयाचें होतें. रस्ता भयंकर होता याबद्दल शंकाच नव्हती. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं ही मंडळी एका नदीकांठीं पोंचली. नदीच्या धारेला ओढ फार होती आणि खडकांशीं धडका घेणाऱ्या पाण्याच्या खळ-खळाटापुढें बोलणें ऐकूं येण्याची मुष्किल होती. पाणी फार खोल नव्हतें. जास्तींत जास्त चार फूट असेल. पण त्या तसल्या वेगवान धारेंतून १०० वार अंतर ओलांडावयाचें होतें. नदीच्या कांठावर उभे राहून चौघेजण कांहीं वेळ धारेकडे बघत उभे राहिले. रात्र पडूं लागलेली होती. हत्ती वगैरे हिंस्र पशूंची धास्ती होती. म्हणून उशीर करणें धोक्याचें होतें. त्याचबरोबर धार तोडून पलीकडे जाणेंहि कमी धोक्याचें काम नव्हतें. त्यांच्यासमोर नऊ पहाडी इसमांनीं धार तोडून पलीकडे जाण्याची खटपट केली, पण त्यांचे पाय सुटले आणि मग त्यांचा पत्ताच लागला नाहीं. सूर्य अस्ताला चाललेला होता आणि त्याच्याच बरोबर त्यांची आशाहि सुटूं लागलेली होती. पण नुसतें उभें राहणें त्यांना अगदीं असह्य झालें होतें. त्यांनीं जिथें दगड कमी घसरत होते अशी एक जागा पाहिली. त्यांनीं पृथ्वीसिंहांचे कपडेलत्ते घेतले आणि

धारेंत शिरून पैलतीर गांठण्यांत यश मिळविलें. पृथ्वीसिंहांनाहि मागें राहावत नव्हतेंच. त्यांनींहि पाण्यांत पाऊल घातलें. त्यांना प्रवाहाशीं तितकें जोरांत झगडतां आलें नाहीं. तरी पण कसेंबसें मागेंपुढें करीत ते सोबत्यांच्या उताराच्या जागेपासून अर्धा मैल खालीं लागले व धारेंतून बाहेर पडले. आपला जीव वांचलेला पाहून त्यांना आनंद झाला. नदी ओलांडण्याचा अवकाश, कीं लगेच जोरांत पाऊस पडूं लागला. सारे कपडे भिजून गेले. तिथें विस्तव पेटवावा म्हटलें तर सुकीं लांकडेंहि नव्हती अगर भिजलेली काडीहि पेटत नव्हती. तापांतून उठल्याबरोबर हा कठीण प्रवास आणि वर पावसांत भिजणें. मध्यरात्रीनंतर त्यांना सपाटून ताप भरला आणि सारें शरीर थडथडूं लागलें. झोंपावयाला ओलीच जमीन आणि कपडेहि ओलेचिंब. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ताप उतरला. अंगांत शक्ति नव्हती तरीहि त्या निर्जन अरण्यांत मागें राहाण्याची त्यांची तयारी नव्हती. वाटेंत कांहीं ठिकाणीं त्यांना उलट्या झाल्या. चालण्याची मुष्किल होती. पण मन घट्ट करून ते धावूं लागले. अर्धा मैल धावल्यानंतर अंगांतून घामाच्या धारा लागल्या. मग सोबत्यांची वाट बघत ते बसून राहिले. तो सारा दिवस असाच धांवण्यांत व बसण्यांत निघून गेला आणि रात्रीं ते आपल्या मुक्कामाच्या जागेवर पोंचले. दुसऱ्या दिवशीं बरीच खटपट करून दहा रुपये रोजावर एक भाड्याचा घोडा केला. घोडेवाल्याला अडचण माहीत होती. सुदैव येवढेंच कीं त्यानें जास्त पैसे मागितले नाहींत. त्या दिवशीं संध्याकाळीं ज्या गांवीं ते पोंचले तिथें या पहाडी लोकांच्या ओळखीचीं कुणी माणसें होतीं. पृथ्वीसिंहांना पुढें जाण्याची हिंमत होईना. त्यांनीं सोबत्यांना इथेंच थांबण्यास सांगितलें. तेहि सज्जन लोक होते, आणि त्यांनीं राहण्याचें कबूल केलें. इथून मणिपूर चाळीस मैल दूर होतें. त्यांनीं पांच रुपये भाड्याचा एक घोडा घेतला. आणि दुसऱ्या दिवशीं ते मणिपूरला पोंचले. त्यांच्या सोबत्यांनीं आपल्या घरीं त्यांची उत्तम बडदास्त ठेवली चहूं बाजूंनीं हिरव्यागार डोंगरांनीं वेढलेली ही सुंदर नगरी व तिच्या आसपासचीं लहानलहान गांवें व शेतें मोठीं मनमोहक होतीं. आठ दिवसपर्यंत त्यांनीं इम्फालमध्यें विश्रांति घेतली. चौकशी केली तेव्हां असें कळलें कीं इंग्रज रेसिडेंटच्या परवान्याशिवाय कोणाहि इसमाला सरहद्द ओलांडून आसाम प्रांतांत प्रवेश करतां येत नाहीं. पृथ्वीसिंहांना परवाना घेण्याची हिंमत असणें शक्य नव्हतें. मणिपूरच्या रस्त्यांवरून भटकतां भटकतां एका सर्कसवाल्याशीं त्यांची ओळख झाली. सर्कस आसामांत जाणार होती. पृथ्वीसिंहांनीं कांहींतरी युक्ति करून त्याचा विश्वास संपादन केला. आपल्याला बरोबर घेऊन जाण्याची

त्यांनीं त्याला विनंति केली तेव्हां त्यानें उत्तर दिलें—"कांहीं काळजी करूं नका. मी तुम्हांला सर्कशींतला एक खेळाडू बनवून घेऊन जाईन." मणिपुराहून मणिपूर रोड स्टेशन ३० मैल दूर आहे. मोटारीसाठीं त्यांना १० रु. भाडें द्यावें लागलें. वाटेंत पुष्कळसे सी. आय. डी. चे लोक उतारूंवर लक्ष ठेवण्यासाठीं हजर होते. पण पृथ्वीसिंह होते सर्कशीचे खेळाडू. आतां ते रेल्वे स्टेशनवर तर आले. मग गाड्या बदलत बदलत त्यांनीं परत भावनगर गांठलें

## राजाची नोकरी

स्वामीराव आतां पुन्हां भावनगरांत आले. शिक्षण खात्याचे डायरेक्टर विठ्ठलराय मेहता यांच्या अध्यक्षतेखालीं सुशिक्षित प्रतिष्ठित मंडळींची एक सभा झाली. तींत स्वामीरावांनीं व्यायामाच्या आवश्यकतेवर भाषण केलें. गुजराती तरुणांचें शरीरबळ व आरोग्य कसें नष्ट होत चाललें आहे व त्याची उपेक्षा करणें म्हणजे आत्महत्या करण्यासारखें कसें आहे हें त्यांनीं या भाषणांत दाखवून दिलें. या व्याख्यानावर मेहता अगदीं खूष झाले. त्यांनीं आतां स्वामीरावांना सरकारी शिक्षणखात्यांत कामावर घेतलें. संस्थानांतील शाळांमध्यें व्यायामाचा प्रचार करण्याची जबाबदारी त्यांजकडे होती.

भावनगरला गेल्यापासून स्वामीराव रजपूत विद्यार्थ्यांशीं संबंध प्रस्थापित करण्याची खटपट करीत होते पण त्यांत त्यांना अजून यश आलें नव्हतें. आतां त्यांनीं रजपूत मुलांना व्यायाम शिकविण्याचें काम विनावेतन करण्याची इच्छा दर्शविली. रजपूत जमातीचे पुढारी त्यांना बनिया समजून त्यांच्याकडे फार क्षुद्र दृष्टीनें पाहत असत. पण थोड्याच दिवसांत ते विद्यार्थ्यांमध्यें पूर्णपणें मिळूं मिसळूं लागले. रजपूत बोर्डिंग हाउसचे सुपरिंटेंडंट मकनजी मास्टर फारच वृद्ध होते आणि बोर्डिंगची व्यवस्था करणें त्यांना बरेंच जड जात होतें. स्वामीरावांना व्यवस्थेच्या बाबतींतील थोडेंसें काम करावें लागत असेच. कारण रजपूत समाजाच्या पुढाऱ्यांवरहि आतां त्यांचा प्रभाव पडूं लागला होता. म्हातारपण आणि तारुण्य यांची झटापट सुरू झाली. अधिकाऱ्यांनीं मास्टर साहेबांच्या सेवेबद्दल त्यांना धन्यवाद देऊन त्यांना कांहीं रकमेची थैली दिली. वृद्ध सुपरिंटेंडंटनें बोर्डिंगचा निरोप घेतला आणि आतां स्वामीराव नवे सुपरिंटेंडंट म्हणून कामावर आले. रजपूत तरुणांना संभाळणें हें सोपें काम नव्हतें. पण स्वामीराव तरुणांवर आपला प्रभाव नेहमीं सहज पाडूं शकत असत कारण ते स्वतःला या विद्यार्थ्यांपैकींच एक समजत असत आणि वरून हुकुम सोडणें त्यांना आवडत नसे.

रजपूत बोर्डिंग हाउसमधील मुलगे हे शहरांतील सर्वांत जास्त पुंडाईखोर समजले जात असत. पण स्वामीरावांनीं पुंडाईंत खर्च होणाऱ्या शक्तीचा ओघ व्यायाम, करमणूक व इतर धाडसाच्या कामांकडे वळविला. आतां ते मुलगे शिस्तीनें वागणारे पक्के सैनिक बनले. स्वामीरावांनीं त्यांचें एक स्वयंसेवक दल तयार केलें. सभा व कार्यक्रमांच्या वेळीं हें दल मोठ्या तत्परतेनें काम करीत असे. जत्रा असो अगर सभा असो, सर्व ठिकाणीं रजपूत तरुण लाठ्या व कट्यारी घेऊन स्वामीरावांच्या बरोबर हजर असत. एका बनियाचा प्रभाव इतका वाढत चाललेला पाहून कांहीं रजपूत पुढाऱ्यांना त्यांचा हेवा वाटूं लागला आणि कांहीं काळानंतर त्यांनीं बोर्डिंग सोडून दिलें. अर्थात बोर्डिंग सोडतांना त्यांना फार वाईट वाटलें.

मागें सांगितलेल्या मोतीबागेंतल्या सभेंत स्वामीरावांनीं व्यायामाचे फायदे सांगितले तेव्हां सभेचे अध्यक्ष सर प्रभाशंकर पट्टणी यांनीं त्यांना विचारलें होतें —“माझ्यासारख्या म्हाताऱ्यालाहि व्यायामापासून कांहीं फायदा होऊं शकतो का?” त्या वेळीं स्वामीरावांनीं त्यांना शक्य तितकी मदत करण्याचें कबूल केलें होतें. दररोज दिवाणसाहेबांची मोटार स्वामीरावांना घेऊन जाण्यासाठीं येई आणि स्वामीराव त्यांजकडे जाऊन मालिशच्या द्वारें त्यांच्याकडून व्यायाम करवून घेत असत. सर प्रभाशंकर यांना या तरुणाला जवळून पाहण्याची संधि मिळाली आणि मालिश करतांना कोणत्या ना कोणत्या विषयावर दोघांच्या गप्पा होऊं लागल्या. राजकारण, धर्म, इतिहास, अर्थशास्त्र अगर राज्यकारभाराची कला यांपैकीं ज्या कोणत्या विषयावर सर प्रभाशंकर बोलत, तो समजण्याची शक्ति या तरुणाच्या ठिकाणीं आहे हें त्यांना दिसत असे. म्हणून ते स्वामीरावांविषयीं जास्तच आदर दर्शवूं लागले. विशेषतः स्वामीराव त्यांच्याकडून कोणत्याहि वैयक्तिक लाभाची अपेक्षा अगर इच्छा धरीत नव्हते म्हणून तर त्यांच्याविषयीं त्यांचा आदर आणखीच द्विगुणित झाला. त्याच सुमारास व्हाइसरॉय काठेवाडांतील संस्थानांच्या दौऱ्यावर आले होते. सर प्रभाशंकर आपल्या खास सलूनमधून त्यांना भेटण्यासाठीं राजकोटला व जामनगरला गेले. त्या प्रसंगीं स्वामीरावहि त्यांच्या बरोबर होते आणि संस्थानांच्या तैनातींतील सैनिक सर प्रभाशंकरनां सलामी देत असत त्या वेळीं स्वामीरावहि ही सलामी घेण्यांत भागीदार होत असत.

मालिशमुळें सर प्रभाशंकर यांचा फायदा होत असल्याचें दिसून आलें. त्यांनीं स्वामीरावांना आधुनिक मालिश-कला शिकण्यास सांगितलें, आणि यासाठीं त्यांना गायकवाडांचे मालिश-तज्ज्ञ मिस्टर वोलोश यांजकडे व मग

प्राचीन भारतीय मालिश-कला शिकण्यासाठीं मलबारपर्यंत पाठविलें. आतां स्वामीराव आधुनिक व प्राचीन मालिश-कलेचे पंडित झाले आणि त्याचबरोबर संस्थानच्या दिवाणाची त्यांच्यावर विशेषच मर्जी बसली.

## काठेवाड युवक परिषद

१९२८ च्या सुमारास राजकोट येथें काठेवाड युवक परिषद भरली. पंडित जवाहरलाल अध्यक्ष होते. काठेवाडांतील तरुणांचा फार मोठा मेळावा तिथें जमणार होता. आपले काँग्रेसवादी मित्र गोपाळराव कुलकर्णी, बलवंतराय मेहता इत्यादिकांना पोंचविण्यासाठीं स्वामीरावहि स्टेशनापर्यंत गेले. स्वामीरावांना असें वाटत होतें कीं आपण संमेलनाला हजर राहणें ठीक नव्हे. स्टेशनावर त्यांच्या दोस्तांनीं विचारलें "काय, तुम्ही आमच्या बरोबर संमेलनाला नाहीं येणार? तुम्ही नव युवकांची येवढी प्रशंसा करतां, त्यांचे आवडते मार्गदर्शक आहांत, अन् तुम्हीच त्यांच्या संमेलनाला जात नाहीं, म्हणजे हें बरं दिसतं का?" पृथ्वीसिंहांनीं तिथल्या तिथेंच निश्चय केला कीं संमेलनाला अवश्य जाऊंच, पण रेल्वेनें जाऊन सी. आय. डी. वाल्या लांडग्यांच्या तावडींत नाहीं सांपडणार. भावनगरहून राजकोटपर्यंत मोटारीची उत्तमपैकीं सडक आहे हें स्वामीरावांना ठाऊक होतें. त्यांनीं एका मित्राकडून एक चांगल्यापैकीं सायकल घेतली. आणि सकाळीं गाडी पोंचावयाच्या वेळेपर्यंत आपणहि तेवढी मजल मारण्याचा त्यांनीं निश्चय केला. लांब्या बाह्यांचा शर्ट व लांडी विजार घालून हातांत लाठी घेऊन ते सायकलीवरून निघाले. किती तरी वेळानंतर ते सोनागडला पोंचले. तिथें गुरुकुलांतील ओळखीच्या मित्रांनीं त्यांना भोजन दिलें आणि रात्रीं पुढें जाऊं नका असें सांगितलें. रात्रहि काळोखी होती आणि त्यांच्याजवळ दिवाहि नव्हता, टॉर्च नव्हती. त्यांना रस्त्याच्या बाबतींत कांहींएक माहिती नव्हती. पाणी अगर धर्मशाळेच्या बाबतींत त्यांनीं कुणाला विचारलेंहि नाहीं.

रात्रीं १० वाजतां ते सायकलवरून दौडत असतां सडकेच्या उजव्या बाजूकडून एक रानडुक्कर आला. धांवती वस्तू पाहून तो घाबरला आणि इकडेतिकडे पळून जाण्याऐवजी सायकलीबरोबरच धांवूं लागला. रानडुक्कर किती धोकेबाज असतो हें स्वामीरावांना लहानपणापासूनच माहीत होतें. त्यांनीं ओरडाआरडा करून त्याला पळवून लावण्याची खटपट केली पण त्याचेंहि अगोदरच भान नाहींसें झालें होतें. रानडुक्कर आपला जीव वांचविण्यासाठीं धांवत होता आणि पृथ्वीसिंह दौडत राहले आपला जीव वांचवण्यासाठीं. त्यांनीं सारी शक्ति एकवटून सायकल

भरधांव सोडली व बराच वेळ खटपट केल्यानंतर रानडुकराला मागें टाकून पुढें जाण्यांत त्यांनीं यश मिळविलें.

आतां रानडुक्कर बराच मागें राहिलेला होता. पण पृथ्वीसिंह इतके थकून गेलेले होते कीं त्यांना आतां एक मिनिटभर देखील सायकल चालविणें अशक्य झालें. सायकलीवरुन उतरुन सडकेच्या कडेला ते आडवे पडून राहिले. आतां धांप कमी झाली होती. धास्तीहि नाहींशीं झाली होती. पण तहानेमुळें घशांत सुया बोंचल्यासारख्या वेदना होत होत्या. पाणी कुठें मिळेल याचा कांहीं पत्ताच नव्हता. अंधेऱ्या रात्रीं डोळे फाडफाडून पाहिलें पण वस्तीचें चिन्ह कुठेंच नव्हतें. अर्धा तास आणखी पुढें गेल्यानंतर ते एका खेड्यात येऊन पोंचले. एका मोठ्या घरापाशीं जाऊन त्यांनीं दार ठोठावलें. आंतून घरमालकानें दार ठोठावण्याचें कारण विचारलें. स्वामीरावांनीं अगदीं नरमाईच्या स्वरांत आपण तहानेलेले प्रवासी आहोंत असें सांगून पाणी मागितलें. घरमालक कडाडून म्हणाला–" आमच्याशीं असल्या गमज्या नको करूं. एवढ्या रात्रीं पाणी नाहीं मिळायचं. आम्ही अनोळखी माणसांसाठीं या वेळीं दार नाहीं उघडणार." स्वामीरावांनीं पुन्हां पुन्हां विनंती केली. घरमालकानें उत्तर दिलें–" तुला जर तहान लागलेली असेल तर इथंच बसून राहा, सकाळीं आम्ही तुला पाणी देऊं."

निराश होऊन स्वामीराव खेड्यांतून पुढें निघाले. परंतु सुदैवानें एकच मैल अंतरावर एका साधूची पर्णकुटी मिळाली. साधू बाहेर झोंपलेला होता. स्वामीरावांनीं त्याला जागा केला आणि साधूनें पाणी व बिछाना दोन्हीं दिलीं. पाणी पिऊन एक तास झोंप काढली व पुन्हां ते सायकलवरुन पुढें रवाना झाले. वाटेंत कांहीं ठिकाणीं उंचसखल भाग असल्यामुळें ते सायकलवरुन पडलेहि, पण जास्त इजा नाहीं झाली. सायकल कुठें बिघडली नाहीं म्हणून बरें झालें, नाहींतर ठरलेल्या वेळेला त्यांना राजकोटला पोंचतां नसतें आलें.

भल्या पहांटेसच पुष्कळशा लॉऱ्या राजकोटकडे जात असलेल्या दिसल्या. स्वामीरावांना मोह तर झाला, पण ते लॉरींत बसले नाहींत. शेवटचा दहा मैलांचा प्रवास त्यांना सगळ्यांत जड गेला. स्वामीराव ज्या वेळीं स्टेशनवर पोंचले त्याच वेळीं त्यांचे दोस्त प्लॅटफॉर्मवरुन बाहेर येत होते. तेहि मिरवणुकींत सामील झाले. परिषदेंत त्यांना व्यायामाची उपयुक्तता व त्याचा प्रचार व संघटना या विषयावर भाषण करण्यास सांगण्यांत आलें. स्वामीराव जवाहरलालांच्या समोर आपलें व्याख्यान देत होते, पण व्यायामावर भाषण करणारा हा वक्ता तुरुंगांतून फरारी झालेला क्रांतिकारक आहे हें जवाहरलालांना काय ठाऊक ?

सोनागडच्या गुरुकुलांतील मित्रांनीं टोमणा मारला होता— "रातोरात कसे राजकोटला पोंचतां तें बघूंच आम्ही." दुपारनंतर त्यांनीं सायकलवर स्वार होऊन राजकोट सोडलें. ३० मैल मजल मारल्यानंतर सायकल पंक्चर झाली. सायकल हातांत धरून ४ मैल तसेच पयीं चालले. मग एक पोलिस चौकी लागली. ते चौकींत गेले. शिपायांनीं पंक्चर दुरुस्त करण्यास मदत केली, जेऊं घातलें आणि झोंपावयास खाटलें दिलें. सूर्योदयाच्या अगोदरच ते पुन्हां पुढें निघाले आणि वाटेंत दोस्तांना भेटून तिसरे प्रहरीं भावनगरला पोंचले.

## शिवाजी महोत्सव

शिवाजीचा महोत्सव साजरा होणार होता. स्वामीरावांनींहि त्यांत भाग घेण्याचा बेत केला. त्यांनीं गणेश क्रीडामंडळ व राजपूत बोर्डिंग हाउसच्या २०० मुलांपैकीं खूप सशक्त व निरोगी अशा ५० तरुणांची निवड केली. कँपसाठीं त्यांनीं व्हिक्टोरिया बागेजवळची एक टेंकडी पसंत केली. मागाहून या टेंकडीचें शिवाजी हिल् असें नांव पडलें. स्वामीरावांनीं आपल्या विद्यार्थ्यांना सांगितलें ताबडतोब या टेंकडीवरून निघा आणि जास्तींत जास्त खेड्यांमध्यें हिंडून सूर्यास्तानंतर परत या. खाण्यासाठीं त्यांना दोन दोन छटाक गूळ व १४ छटाक भाजलेले चणे मिळालेले होते. विद्यार्थी चारांचारांच्या टोळ्या करून निघाले आणि ३० ते ४५ मैलांची पायपीट करून संध्याकाळीं परत आले. ते परत आल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ टेंकडीवर जाळ करण्यांत आला व टेंकडीचें नांव 'शिवाजी हिल' असें ठेवण्यांत आलें. तरुणांना आपल्या या विजयाबद्दल मोठा अभिमान व आनंद वाटला. स्वामीरावांनीं त्यांना उत्तेजन देण्यासाठीं एक लहानसें व्याख्यान दिलें. पुढच्या वर्षीं शिवाजी महोत्सवांत स्वामीरावांनीं मुलांच्या कडून शिवाजी मोंगल सेनेची फळी फोडून कसा निसटला या प्रसंगाचा प्रयोग करवून घेतला. शिवाजी झालेल्या मुलानें "मोंगल सेनेचे" सारे प्रयत्न हाणूनपाडून निसटून जाण्यांत यश मिळविलें.

पोरबंदरला संस्थानी प्रजा परिषद व्हावयाची होती. महात्माजींना तिचे अध्यक्ष निवडण्यांत आलें होतें. परिषदेच्या चालकांनीं स्वामीरावांकडे त्यांच्या सुशिक्षित स्वयंसेवकांची मागणी केली. स्वामीराव तिथें पोंचले. त्यांनीं जिथें जिथें आपल्या स्वयंसेवकांच्या द्वारां परिषदेच्या व्यवस्थेंत भाग घेतला तिथें तिथें त्याच वेळीं व्यायामासंबंधीं व्याख्यानें देऊन काठेवाडच्या कित्येक पुढाऱ्यांची ओळख करून घेतली.

## सत्याग्रहाच्या चळवळींत

१९२८ सालीं काका कालेलकर यांच्या अध्यक्षतेखालीं काठेवाडांतील विद्यार्थ्यांचीं एक परिषद झाली होती. स्वामीरावांनीं याहि परिषदेंत व्यायाम व आरोग्य सुधारण्यावर व्याख्यान दिलें. चोरवाडचे दानशूर श्रीमंत हरखचंद शहा यांना त्यांचे विचार फारच आवडले आणि उन्हाळ्याच्या दिवसांत व्यायामाचा एक वर्ग चालू करण्यासाठीं त्यांनीं सर्व प्रकारची मदत करण्याचें आश्वासन दिलें.

१९३० च्या मे महिन्यांत चोरवाडला स्वामीरावांनीं व्यायामाचा वर्ग चालू केला. चोरवाड हें काठेवाडांतील एक फारच हवेशीर स्थळ आहे, आणि उन्हाळ्यांत इथल्या हवेंत उकाडा होत नाहीं. शंभराहूनहि जास्त विद्यार्थी या वर्गांत सामील झाले. भाई हरखचन्द शहांनीं साऱ्या गरजा मोठ्या प्रेमानें भागविल्या. कँप फारच यशस्वी झाला.

याच वेळीं स्वामीरावांनीं मिठाच्या सत्याग्रहांत गांधीजींना अटक झाल्याची बातमी ऐकली. कँपांत या अटकेच्या निषेधार्थ सभा झाली. तींत स्वामीरावांनीं भारताची गुलामगिरी व स्वातंत्र्याचे प्रयत्न या विषयावर खूप जोरदार भाषण केलें. स्वामीरावांच्या आयुष्याचा हा एक नवा पैलू तरुणांना दिसला. स्वामीरावांना रामपूरहून तार आली कीं तुम्ही सत्याग्रहाच्या चळवळींत स्वयंसेवकांची भरती करण्याच्या कामीं सहकार्य करा. स्वामीराव सरळ चोरवाडहून रामपूरला रवाना झाले आणि अमृतराय सेठ व त्यांचे सहकारी यांजबरोबर काम करूं लागले. ते उत्साहाच्या भरांत इतके वाहवत गेले कीं त्यांना विचार करण्याचें भानच राहिलें नाहीं. रामपूरला गेल्यावर त्यांच्या उत्साहानें त्यांना आणखी एक पाऊल पुढें खेंचून नेलें. आणि बुद्धिवादाचा व सारासारविवेकाचा मार्ग सोडून केवळ भावनेच्या आहारीं जाऊन त्यांनीं सत्याग्रहांत भाग घेण्याचा निश्चय केला. त्यांनीं शिकवून तयार केलेले विद्यार्थी दक्षिणामूर्तिभवनाचे व क्रीडामंडळाचे तरुण सत्याग्रहामध्यें खूप जोरांत भाग घेत होते. मग त्यांचे गुरु स्वामीराव स्वस्थ बसून राहतील हें कसें शक्य होतें? सत्याग्रही तरुणांवर पोलिसांकडून जे जुलूम होत होते ते पाहिल्यावर स्वस्थ राहण्यानें तरुणांच्या मनांत संशय उत्पन्न झाला असता हें निःसंशय. आपण ज्या दिशेनें पाऊल टाकत आहोंत तिकडे फार मोठा धोका आहे याची त्यांना चांगल्या प्रकारें जाणीव होती. स्वामीराव राजकीय चळवळींत भाग घेण्यासाठीं जाणार आहेत हें त्यांच्या दोस्तांना जेव्हां कळलें तेव्हां त्यांनीं भावनगरांत एक सभा घेतली. स्वामीरावांनीं आपल्या भाषणांत सांगितलें—"सत्य अहिंसेवर माझा विश्वास

आहे असें मला म्हणतां येत नाहीं. माझं ध्येय आहे स्वराज्य आणि स्वराज्यासाठीं मी काहींहि करायचं शिल्लक ठेवणार नाहीं." स्वामीरावांच्या व्यक्तित्वांत एक वेगळाच माणूस लपून राहिलेला होता हें भावनगरच्या जनतेला व सरकारी अधिकाऱ्यांना प्रथमच दिसून आलें. निरोप देण्यासाठीं नागरिकांनीं व तरुणांनीं केलेली सभा पाहून त्यांना हें पक्के कळून चुकलें कीं आतां आपला आठ वर्षांचा अज्ञातवास संपला, आणि पुन्हां आपल्याला या मंडळींत काम करण्याची संधि मिळणार नाहीं. स्वामीराव एक वेळ जर का कायद्याच्या कचाट्यांत अडकले तर पुन्हां जिवंत बाहेर येऊं शकत नव्हते. आखाड्यांतील एक डझन तरुण स्वामीरावांच्या बरोबर निघाले. रामपुरांत मित्रमंडळींनीं मोठ्या उत्साहानें स्वागत केलें. कॅंप कमांडरनें सत्य-अहिंसेच्या प्रतिज्ञापत्रकावर सही करण्यास सांगितलें. स्वामीराव नकार देऊन म्हणाले— "प्रतिज्ञेशिवायच मला राहूं देत असाल व तरुणांनाहि मदत करायची संधी द्याल तर मी आभारपूर्वक राहायला तयार आहे. नाहीं तर मी निघून जाईन."

त्यानें राहण्याची परवानगी दिली. आणि तरुणांमध्यें खरोखरच जास्त उत्साह दिसूं लागला. स्वामीरावांचा प्रभाव तरुणांवर केवढा आहे हें कॅंप कमांडरला ठाऊक होतें. तिथें हजर असलेले पोलिसवालेहि तरुणांवर जादूची मोहिनी घालणारा हा स्वामीराव कोण आहे याची माहिती काढण्यासाठीं खूप खटपट करूं लागले. आणि ही माहिती मिळविण्यांत त्यांना ज्या प्रमाणांत अपेश मिळत होतें त्याच प्रमाणांत त्यांची कसोशी वाढत होती.

## (१०)

# पुन्हां बेपत्ता

दहा दिवस राहिल्यानंतर धंधुक्याचा सब इन्स्पेक्टर स्वामीरावांना अटक करावयास आला. स्वामीरावांनीं कॅम्पचे प्रमुख भाई जगजीवनदास मेहता यांजकडून अटकेनिमित्त रजा घेतली. तरुणांना आश्चर्य वाटलें. कारण अटक होण्याजोगें कसलेंच काम स्वामीरावांनीं केलेलें त्यांनीं पाहिलें नव्हतें. तरुणांना चारदोन साधेसुधे उपदेशपर शब्द सांगून स्वामीरावांनीं निरोप घेतला.

सारा जन्मभर तुरुंगांत राहण्याची त्यांची तयारी होती का? सब इन्स्पेक्टरबरोबर जातां जातां त्यांच्या डोक्यांत हा विचार आला. सब इन्स्पेक्टर-

जवळ पिस्तुल होतें. तो चाळीस वर्षांचा मजबूत तगडा माणूस होता. पण स्वामीरावांपुढें तो कःपदार्थ होता. सब इन्स्पेक्टरला विचार करून खिशांतून पिस्तुल काढून नेम घ्यावयास सहा सेकंदांचा तरी वेळ लागेल, आणि तेवढा अवधि आपल्याला पुरेसा आहे हा हिशेब स्वामीरावांनीं मनांतल्या मनांत करून ठेवलेला होता. जातां जातां ते एका वळणावर येत होते. तिथें पोंचतां-क्षणीं ते म्हणाले—"सलाम साहेब! मी चाललों." सब इन्स्पेक्टर स्तंभित होऊन उभाच राहिला. स्वामीराव दोनच छलांग मारून दृष्टीच्या टप्प्याबाहेर निघून गेले. त्यांनीं पोबारा केल्यानंतर दहाच मिनिटांनीं एक फार मोठी वावटळ आली आणि धुळीमुळें कांहींच दिसेनासे झालें. मग पावसानें मदत केली. पोलिसांचें काम सोपें राहिलें नाहीं.

पोलीस रस्तोरस्तीं मोटारींतून धांवाधांव करीत होते. त्यांना चिखल व पाणी भरलेल्या शेतांतून थोडेंच जातां येणार? स्वामीरावांनीं अंगावरचे सारे कपडे फेंकून दिले आणि स्वारी लंगोट चढवून शेतें तुडवत चालली. अंधाऱ्या रात्रीं ते एका खेड्यांतून चालले होते. एका इसमानें त्यांना ओळखलें आणि विचारलें—"स्वामीजी, हें काय आहे? कुणाला बनवायचा तर विचार नाहीं तुमचा!" स्वामीराव म्हणाले—"नाहीं रे भाई, वेडेपणा नको करूंस. मला एखाद्या सुरक्षित जागीं घेऊन चल." त्यानें त्यांना एका गोठ्यांत नेलें. तिथें त्याच्याशिवाय कुणालाहि जातां येत नव्हतें. पुष्कळ दूरवर दौड केल्यामुळें त्यांना थकवा आलेला होता. मित्रानें त्यांना गरम-गरम दूध प्यावयास दिलें. दूध पिऊन त्यांनीं तीन तास पूर्ण विश्रांति घेतली. पृथ्वीसिंहांनीं आपली सारी हकीकत या मित्राला सांगितली आणि मग तिथून पुढें जाण्याची परवानगी मागितली. पण त्यांचा रजपूत मित्र येवढ्यावर आपलें कर्तव्य संपलें असें मानावयास तयार नव्हता. गांवाबाहेर दोन चांगले घोडे तयार होते. त्यांच्यावर स्वार होऊन ते दोघे शेतां-शेतांतून एका अज्ञात दिशेच्या रोखानें निघाले. स्वातंत्र्याचे भोक्ते स्वामीराव धोक्याशीं जेवढा सामना करूं शकत होते तेवढा पैशासाठीं स्वतःला विकून घेतलेले कसचा करतात! सूर्योदयाच्या सुमारास त्यांनीं घोडे सोडून दिले आणि एक बैलगाडी भाड्यानें घेतली. कांहीं अंतरापर्यंत बैलगाडींतून गेल्यानंतर पुन्हां भावनगरच्या खाडींतून छातीइतक्या पाण्यामधून दोघे चालत निघाले. अशा प्रकारें पोलिसांच्या हातांवर तुरी दिल्यानंतर २४ तासांनीं स्वामीराव पुन्हां भावनगरला आले. त्यांनीं आपल्या मित्राला शहरांत दोस्तांकडे

सूचना देण्यासाठीं पुढें पाठवलें आणि ते स्वत: एक डोळा व अर्धे तोंड झांकून घेऊन एका गाडीत बसून संध्याकाळीं शहरांत आले.

पृथ्वीसिंहांना रामपुराहून इतरत्र सहज पळून जातां आलें असतें. पण भावनगरांत आपल्या मित्रांना खरी हकीकत सांगणें त्यांना आवश्यक वाटलें. स्वामीराव शेवटीं भेकड ठरला असें त्यांनीं समजू नये हा यांत हेतु होता. स्वामीरावांच्या तोंडून त्यांची आत्मकथा ऐकल्यावर त्यांच्या मित्रांचा त्यांच्याविषयींचा आदरभाव आणखीच वाढला. मध्यरात्रीं एका दूरच्या गांवीं जाण्यासाठीं टॅक्सी करण्यांत आली. तिथून त्यांना वेष पालटून गाडींत बसावयाचें होतें. त्यांचा दोस्त अगोदर सामान व तिकिट घेऊन स्टेशनावर वाट बघत राहिलेला होता. स्वामीराव युरोपियन पोशाखांत गाडींत जाऊन बसले.

स्वामीरावांनीं पोलिसांच्या हातांवर तुरी कशा दिल्या या बाबतींत अनेक प्रकारच्या दंतकथा काठेवाडांत पसरल्या. सब इन्स्पेक्टरनें आपल्या जबाबांत सांगितलें--"त्यानें मला जोराचा धक्का मारून जमिनीवर पाडलें आणि पोबारा केला." यांत सत्याचा अंश काडीइतकाहि नव्हता. दुसरी दंतकथा प्रचलित झाली ती अशी होती : कुणी सी. आय. डी. इसम त्यांच्या मागावर होता. हा माणूस नागर घराण्यांतला होता आणि त्यानें स्वामीरावांच्या अनेक नागर शिष्यांना आमिषें देऊन फोडण्याचा प्रयत्न केला. एका प्रसंगीं या माणसानें स्वामीरावांना पकडण्यांत यश मिळविलेंहि. पण त्याच वेळीं स्वामीरावांनीं त्याच्या डोक्यावर असा ठोसा लगावला कीं त्याला कायमचें वेडच लागलें. असा एक माणूस सी. आय. डी. तर्फे नेमण्यांत आला होता व तो वेड लागून मेला ही गोष्ट खरी आहे. पण स्वामीरावांनीं त्याला ठोसा कधींच लगावला नव्हता. अगदीं शेवटीं तुरुंगांतून सुटल्यानंतर ते एक वेळ भावनगरला गेले तेव्हां तिथल्या नागर तरुणांनीं त्यांचा सत्कार केला. त्या वेळीं त्या माणसाच्या मृत्यूला पृथ्वीसिंहच कारण झाले अशी कांहीं तरुणांची खरोखरीच समजूत आहे हें ऐकून त्यांना आश्चर्य वाटलें.

कॅंपचा कमांडर व त्याचा मदतनीस या दोघांनीं स्वामीराव फरारी झाल्याबद्दल त्यांना दोष देणारें एक पत्रक काढलें होतें. सत्याग्रहीनें पळून जाणें ही खरोखरीच शरमेची गोष्ट समजली जात होती. पण स्वामीराव फरारी झाले नसते तर त्याचा परिणाम काय झाला असता हें या बिचाऱ्यांना काय ठाऊक ?

पोलिसांनीं स्वामीरावांच्या पूर्वचरित्राचा छडा लावण्यासाठीं कसून तपास सुरू केला. राजकोटचा सर्वांत वरिष्ठ पोलिस अधिकारी भावनगरला तपास करण्या-

साठीं आला. शाळांच्या रजिस्टरवरून कळलें कीं या फरारी माणसाचें नांव आहे स्वामीराव दयाराम; आणि घरचा पत्ता आहे--कमालपूर; मोहल्ला : जमालपूर; जिल्हा : हलालपूर; मध्यप्रदेश. सी. आय. डी. च्या पदरांत कांहींच फळ पडलें नाहीं.

पृथ्वीसिंह सेवासमिती स्काउट असोसिएशनमध्यें काम करण्यासाठीं प्रयागला दाखल झाले होते. पण तिथें पोलिसांच्या तावडींतून सुटणें फार मुष्किलीचें आहे हें त्यांनीं पाहिलें. पं. श्रीराम वाजपेयी यांनीं त्यांना व्यायामशिक्षक म्हणून राजपुतान्यांतील आपल्या एका मित्राला उद्देशून ओळखपत्र दिलें. तो गृहस्थ त्यांना मोकळ्या मनानें भेटला. प्रेमराज —आतां हेंच त्यांचें नांव होतें— यांनीं शिक्षक व विद्यार्थ्यांसमोर व्यायामावर व्याख्यान दिलें. तो गृहस्थ त्याचा संशय घेऊं लागला. त्याला वाटलें कीं हा कुणी सी. आय. डी. वाला माणूस आपली बातमी काढण्यासाठीं आला असावा. आणि त्यांनीं आपल्याकडून त्याची खातरजमा करून देण्याचा प्रयत्न केला. पहिल्याच दिवशीं चार तासांच्या कामासाठीं दरमहा ४० रु. पगार व राहण्यासाठीं मोफत जागा अशी सोय करून देण्यांत आली. तिथली परिस्थिति पाहून प्रेमराजांनीं तिसऱ्याच दिवशीं तिथून निघून जाण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्या सद्गृहस्थानें जेव्हां त्यांना राहून घेण्यासाठीं जोराचा आग्रह सुरू केला तेव्हां त्यांनीं त्याला आलेल्या संशयाचा निर्देश केला आणि सांगितलें— "आतां मला इथं राहतां येत नाहीं." आपल्या आग्रहाचा परिणाम होत नाहीं असें पाहून या गृहस्थानें शाळेच्या हेडमास्तरला बोलावून आणलें आणि दोघांनीं मिळून त्यांना राहाण्यासाठीं फार गळ घातली. पण प्रेमराज आपल्या निश्चयापासून विचलित होईनातच; तेव्हां डोळ्यांत पाणी आणून त्यांना त्यांनीं निरोप दिला.

## चंद्रशेखर आझाद यांची भेट

१९२२ सालीं पृथ्वीसिंह फरारी झाले तेव्हांपासूनच पोलिसांप्रमाणेंच क्रान्तिकारकहि पृथ्वीसिंहांचा शोध करूं लागले होते. अमेरिकेंतल्या त्यांच्या मित्रांनाहि त्यांचा पत्ता कसा लागेल याची फार काळजी लागून राहिलेली होती. अखेर एके दिवशीं सकाळीं कुणी तरी एका तरुण क्रान्तिकारकाची त्यांच्याशीं ओळख घालून दिली. एका दृष्टिक्षेपासरशीं पृथ्वीसिंहांना अशी खात्री पटली कीं हा तरुण विश्वास ठेवण्यास योग्य आहे. दोघांनीं एकमेकांसमोर आपलीं अंतःकरणें उघड करून दाखविलीं. तरुणाची सूचना अशी होती कीं "तुम्ही सोविएत रशियांत

जाऊन क्रान्तिकारक संस्थांबरोबर प्रत्यक्ष संबंध जोडावेत. " अंधार पडल्यावर आणखी एक तरुण आला; त्याच्या चेहऱ्यावरून, त्याच्या एकेका आविर्भावावरून त्याच्या अंगची वीरता व निर्भयता नुसती ओसंडत असलेली दिसत होती. हा तरुण होता चन्द्रशेखर आझाद. मागाहून अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्कमध्यें पोलिसांच्या गोळीबाराला गोळीबारानें जबाब देतां देतां याला मृत्यु आला.

आझाद हा क्रान्तीचा स्वतंत्र शूर शिपाई होता. पृथ्वीसिंहांशीं त्याची दोनदां मुलाखत झाली आणि तेवढ्यांत त्यानें त्यांच्यावर आपली कायमची छाप बसविली. भगतसिंह आणि त्यांचे दोस्त यांनीं दहशतवादाचा पुरता अनुभव घेऊन असा निष्कर्ष काढला कीं एकट्या दुकट्या सरकारी अधिकाऱ्याची हत्त्या केल्यानें आपली क्रांति यशस्वी होऊं शकत नाहीं. राहतां राहिला एकच मार्ग. तो म्हणजे पिळल्या जाणाऱ्या जनतेचें सहकार्य घेऊन, अर्थात् मार्क्सवादी विचारसरणीच्या आधारानें, पुढें जाणें हाच. फांशी जाण्यापूर्वी भगतसिंहानें आपल्या दोस्तांना हें समजावून सांगण्याचा भरपूर प्रयत्न केलेला होता. चन्द्रशेखर आझादहि आतां ही गोष्ट मान्य करीत होते. पृथ्वीसिंह व आझाद या दोघांचें या बाबतींत एकमत होतें. पृथ्वीसिंहांनीं परदेशांत जाऊन मार्क्सवादाचा चांगला अभ्यास करावा आणि क्रांतीचे डावपेंच शिकून स्वदेशीं परत आल्यावर क्रांतीसाठीं कार्य करावें म्हणून त्यांना आझादांनीं फार फार आग्रह केला.

आझाद हे कोणी विद्वान पंडित नव्हते. आणि त्यांना मार्क्सवादाचा अभ्यास करण्याची संधीहि नव्हती मिळालेली. पण त्यांच्या अनुभवानेंच त्यांना मार्क्सवादाच्या सत्यतेची चुणूक दाखवून दिलेली होती. आझादांच्या अंगीं पुढारीपणाचे उपजत गुण होते.

१९३० च्या ऑक्टोबरांत ज्या दिवशीं भगतसिंह, राजगुरु व सुखदेव यांना फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली, त्याच दिवशीं संयुक्त प्रांत, महाराष्ट्र, मुंबई व पंजाबच्या क्रान्तिकारकांनीं शिक्षेविरुद्ध निषेध प्रदर्शित करण्यासाठीं मुंबईंत लॅमिंग्टन रोडवर गोळीबार केला. पोलिसांनीं पुष्कळशा लोकांना पकडलें आणि त्यांना अटकेंत ठेवून ६०००० रु. खर्चून आठ महिने खटला चालविला. पुरावा कांहींच नव्हता. ज्यूरीनें आरोपींना निर्दोषी ठरवून सोडून देण्याची शिफारस केली आणि कोर्टानेंहि ती मान्य केली. पोलिसांनीं हाय कोर्टांत अपील करण्याचा विचार केला, पण सरकारी वकिलानें खटल्यांत कांहींच दम नाहीं असें पाहून अपील करूं नये असें मत दिलें. लॅमिंग्टन रोडवरील


नगर वाचनालय, 卐

गोळीबारांत पोलिसांनीं स्वामीरावांचेंहि नांव गोंवलें व त्यांना पकडून देणाऱ्यास १००० रु. इनाम जाहिर करून साऱ्या मुंबई प्रांतभर त्यांच्या फोटोसकट जाहिराती लावल्या.

पृथ्वीसिंह आगगाडींतून चालले होते. बलसाडला सी. आय. डी. वाल्यांना त्यांचा संशय आला. त्यांच्या कंपार्टमेंटमधील साऱ्या उतारूंना काढून लावण्यांत आलें, आणि पोलिसचे तीन लोक साध्या कपड्यांनिशीं आंत येऊन बसले. पुढच्या स्टेशनावर पुरेशा पोलिसांची मदत घेऊन त्यांना अटक करण्याचा त्यांचा बेत होता. हा धोका पृथ्वीसिंहांच्या पुरता लक्षांत आला. पुढच्या स्टेशनवर सिग्नल न पडल्यामुळें गाडी अलीकडेच उभी राहिली. पृथ्वीसिंहांनीं कोटाच्या खिशांत हात घालून आपलें पिस्तुल बाहेर काढलें आणि तिथून सरळ पोबारा केला. तिघे पोलिसवाले टकमकां बघतच राहिले. रात्रीच्या अंधारानें त्यांना मदत केली. ते नवसारी शहरांतून बाहेर पडून एका जंगलांत जाऊन झोंपले. शहरांतून त्यांनीं कपडे आणले होते. शेतकऱ्याप्रमाणें धोतर व कुडता असा वेष घेऊन बाकीच्या कपड्यांचें गांठोडें त्यांनीं बरोबर घेतलें. सकाळीं ते गुरुकुलांत गेले, तिथें त्यांनीं भोजनहि केलें, पण कुणाहि ओळखीच्या माणसानें त्यांना ओळखलें नाहीं. मग २० मैल पायीं चालून ते सुरतेला पोंचले. सुरतेहून रेल्वेनें ते बडोद्याला गेले. बडोद्यांत त्यांच्या एका मित्रानें सारा धोका माहीत असूनहि त्यांना आपल्याकडे ठेवून घेतलें व आणखी राहण्याचा आग्रह केला.

## कराची कॉंग्रेस (मार्च १९३१)

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

आतां आपल्याला स्वदेशांत राहून कांहींएक काम करता येणार नाहीं हें पृथ्वीसिंहांना स्पष्टपणें दिसूं लागलें. त्या वर्षी कॉंग्रेसचें अधिवेशन कराची शहरीं भरावयाचें होतें. तिथें आपल्या जुन्या दोस्तांपैकीं कुणी ना कुणी तरी भेटेलच असा विचार पृथ्वीसिंहांच्या मनांत आला. म्हणून त्यांनीं तिकडचीच वाट धरली. ते दुसऱ्यांदां भावनगरला पोंचले. तिथून कांहीं स्टेशनें गेल्यानंतर एका ठिकाणीं ते उतरले व डोक्याचें मुंडन करून घेऊन त्यांनीं भगवे कपडे धारण केले. नांव घेतलें स्वामी सदानंद. मग सदानंद गुरु-शिखराकडे निघाले. सूर्यास्ताच्या सुमारास तिथें पोंचले. साधू लोक जेवावयास चालले होते. भोजनानंतर लोक धुनीभोंवतीं बसले. ही जागा म्हणजे एक मोठी गुहा होती. तिला एकच दरवाजा होता. गांज्याची एक भली मोठी चिलिम भरण्यांत आली. चिलमीचा एकेक दम भरल्यानंतर मंडळींचा तिसरा डोळा उघडला आणि मग ब्रम्हज्ञानाच्या चर्चेला तोंड लागलें.

गुहेचा महन्त एक तरुण साधु होता. स्वामी सदानन्दांनीं या मंडळींपुढें गांजा सोडण्याबद्दल एक व्याख्यान झोडलें. पण महन्तानें त्यांच्याविषयीं जरा जास्त आदर दाखवूं लागण्यापलीकडे त्याचा कांहींएक परिणाम झाला नाहीं. त्यांनीं तिथेंच राहावें म्हणून महंतानें फार खटपट केली.

पण तीनच दिवसांनंतर सदानन्द तिथून निघाले आणि अम्बादेवीच्या क्षेत्रीं पोंचले. अम्बादेवीचें मंदिरहि फारच रमणीय स्थानीं आहे. तिथल्या महन्तानें स्वामी सदानन्दांच्या चालचलणुकीवरून त्यांना एक सुशिक्षित संन्यासी समजून मठाच्या वरच्या मजल्यावरील खोलींत त्यांना राहण्यासाठीं जागा दिली. रोज तो त्यांच्यासाठीं आपल्या हातचें चांगलें जेवण तयार करून आणी. स्वामींची निस्पृह वृत्ति व चांगली भाषणशैली पाहून महन्तानें त्यांचा खूप गौरव केला. एके दिवशीं एका गृहस्थानें महन्ताला सांगितलें कीं "आपल्या-सारख्या महापुरुषाला जेऊं घालून मी पुण्य मिळवूं इच्छितों." महन्तानें उत्तर दिलें—"तुम्हांला जर खरोखरीच कुणा महापुरुषाचा आशीर्वाद हवा असेल तर वर जा, तिथं एक महात्मा ध्यानस्थ बसलेला अ हे." त्याप्रमाणें तो गृहस्थ स्वामी सदानन्दांकडे गेला आणि त्यानें त्यांना जेवण्याचें आमंत्रण स्वीकारण्याची विनंति केली. ठरलेल्या वेळीं स्वामी सदानन्द त्या गृहस्थाच्या बिऱ्हाडीं दाखल झाले. तो आपल्या साऱ्या परिवारासह तीर्थयात्रेसाठीं आला होता. स्वामीजींचें खूप कौतुक झालें. स्वामीजींना विचारल्यावर त्या गृहस्थानें सांगितलें "मी सरकारी नोकर, पोलिस इन्स्पेक्टर आहें." आपल्या चेहऱ्यावरील भाव लपविण्यासाठीं सदानंद मोठ्या नें हंसले. त्या गृहस्थानें कारण विचारलें तेव्हां ते म्हणाले—"वा: ! तुम्ही तुमच्या पापाचं परिमार्जन करायला आलांत होय ? तुम्ही एका साध्या-सुध्या संन्याशाकडून आशीर्वाद घेऊन आपलं जुनं पाप धुवून टाकणार अन् पुन्हां त्या मार्गानं जाणार, असंच ना ?" हें बोलणें थट्टेचंच होतें आणि तें थट्टेवारीच नेण्यांत आलें. पण थट्टा करतांनासुद्धां स्वामी सदानन्द चांगल्या प्रकारें जाणून होते कीं "कुणी सांगावं ? या सब इन्स्पेक्टरच्या खिशांतहि मला पकडायचं वारंट कशावरुन नसेल ?"

भोजनानंतर स्वामींनीं इन्स्पेक्टरला आशीर्वाद दिला. त्यानें त्यांना १॥ रु. दक्षिणा देण्याची इच्छा दर्शविली, पण स्वामींनीं आपली निरिच्छता दाखवून ती घेण्याचें नाकारलें.

अम्बादेवीच्या यात्रेला गुजराती लोक फार येतात. तिथें आणखी राहणें धोक्याचें आहे असें सदानन्दांना वाटूं लागलें.

आतां त्यांना महाराणा प्रतापसिंहाचें कुरुक्षेत्र हळदीघाट पाहण्याची इच्छा झाली. ज्याला ज्याला त्यांनीं हळदीघाटाच्या बाबतींत विचारलें त्यानें त्यानें आपल्याला कांहीं माहिती नाहीं असें उत्तर दिलें. ज्या गांवीं त्यांनीं ही चौकशी केली तीं हळदीघाटापासून ५० मैलांच्या आंतच होतीं आणि तिथल्या गांवकऱ्यांच्या पूर्वजांनीं प्रतापसिंहासमवेत हळदीघाटाच्या लढाईंत नक्कीच भाग घेतला असला पाहिजे. या अनास्थेबद्दल स्वामीजी रजपुतांची सडकून कान-उघाडणी करीत होते. अशा वीरवृत्तीच्या संन्याशाचें आगतस्वागत करण्यासाठीं सर्व ठिकाणीं ठाकुर लोक हात बांधून उभे राहात असत. दरेक जागीं पुढच्या गांवीं जाण्यासाठीं वाटाड्या व कुणा तरी प्रमुख व्यक्तीला उद्देशून ओळख-पत्र मिळे.

स्वामी सदानंद केळव्याला पोंचले तेव्हां तिथल्या ठाकुरानें या सुशिक्षित संन्याशाचा पुष्कळच मानसन्मान केला. आणि त्याच्या आग्रहाखातर त्यांनीं २० दिवस तिथेंच मुक्काम केला. ठाकुरसाहेब एका सरोवराच्या कांठीं स्वामीजींसाठीं पर्णकुटी बांधून देण्याच्या विचारांत होते पण सदानंद तर तिथून निघाले सुद्धां! जाते वेळीं ठाकुरसाहेबांनीं त्यांना व्याघ्राजिन व २०० रुपये भेट म्हणून दिले पण संन्याशीबुवांनीं पैसे घेण्याचें नाकारलें. हा इसम कफनीच्या आंत २०० रु. च्या नोटा व भरलेलें पिस्तुल बरोबर बाळगून असतो हें बिचाऱ्या ठाकुरसाहेबाला कुठून माहित असणार? वाटेंत इतर स्थळें पाहात पाहात ते उदेपूरला पोंचले आणि तिथें हळूहळू संन्याशीबुवांच्या गुणांसंबंधांत लोक जास्त चौकशा करूं लागले तेव्हां त्यांनीं सांडणीस्वार होऊन हळदीघाटाचा रस्ता धरला.

एका खेड्यालगत कांहीं साधूंचा तळ पडलेला होता. संन्याशाला पाहून त्यांनीं बसावयास सांगितलें. स्वामी सदानन्दांच्या बगलेंत एक सुन्दर व्याघ्रांबर होतें. साधु मंडळींनीं तें पाहण्यासाठीं मागितलें. नवें सुंदर व्याघ्राजिन पाहून त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें. त्यांनीं तें आसन पसरून त्यावर आपल्या गुरुला बसावयास सांगितलें. थोडा वेळ धर्मचर्चा चालली. आतां व्याघ्राजिन परत मिळेल, मग मिळेल अशी वाट बघत स्वामी सदानन्द तसेच बसून राहिले होते. उशीर होतोसें पाहून त्यांनीं जाण्यासाठीं परवानगी मागितली तेव्हां साधू म्हणाले–'जाल हो! बसा कीं.' व्याघ्राजिन मिळेल म्हणून सदानन्द पांच मिनिटें खोळंबून राहिले, पण साधूंचा गुरुजी जाग्यावरून उठण्याचें नांव काढीना. वर आणखी साधू लोक सांगूं लागले– "आतां जा हं तुम्ही; नाहीं तर रात्र होईल." सदानन्दांनीं एक मिनिटाचाहि उशीर न लावतां सांगितलें — "कृपा करून माझं व्याघ्राजिन तेवढं द्या हं."

" कुठलं व्याघ्राजिन ?"

" हेंच. तुमचे गुरुजी याच्यावर बसले आहेत ना !"

" आमचे गुरुजी तुमच्या व्याघ्राजिनावर बसले आहेत? आमच्या गुरुजींचा अपमान करण्याइतकी मिजास चढली तुम्हांला!"

यावर स्वामीरावांनीं सांगितलें—" द्या मुकाट्यानं, नाहीं तर परिणाम फार वाईट होईल !"

स्वामीजींच्या हातांत एक चांगली मजबूत लाठी होती. साधूंची संख्या १५ अगर त्याहून अधिक होती खरी पण या माणसाच्या हातांतला दंडा म्हणजे यमराजाचाच दंडा ठरेल याची जाणीव साधूंना होती. त्यांत पुन्हां स्वामीजींनीं आणखी स्पष्ट शब्दांत सांगितलें—"ऐकून घ्या हं! मी आतां लाठी चालवणार आहें! हिचे दोन तुकडे व्हायच्या आंतच तुमच्या कपाळांचं व हाडांचं चूर्ण करीन मी !" दोन मिनिटांच्या आंतच गुरुजी उठून उभे राहिले. व्याघ्राजिन स्वामीजींना परत मिळालें.

स्वामी सदानन्दांनीं रात्रीं पुढच्या गांवीं मुक्काम करून दुसऱ्या दिवशीं ते हळदीघांटावर पोंचले.

एखाद्या भाविक यात्रेकरूप्रमाणें स्वामी सदानन्द हळदीघांटाचें दर्शन घेण्यास गेले होते. तिथले दगड, उंचसखल जागा, ओढे व खड्डे त्यांनीं अत्यंत भक्तिभावानं पाहून घेतले. तिथली पिंवळी भूमि रजपुतांच्या "मारूं किंवा लढत मरूं" या बाण्याची त्यांना आठवण करून देत होती. तिथं त्यांनीं राणा प्रतापसिंहाचा शूर घोडा चेतक याची समाधि पाहिली. या ऐतिहासिक स्थळाची ही उपेक्षा पाहून स्वामी सदानन्दांच्या हृदयांत फारच खळबळ माजली. प्रतापसिंहाचे वंशज आजहि उदेपूरचे राज्यकर्ते आहेत. उदेपूर शहरांत व्हाइसरॉयांचे व इतरांचे किती तरी पुतळे व स्मारकें लाखों रुपये खर्चून उभारण्यांत आलीं; पण हळदीघाटांत चेतक घोड्याच्या स्मारकाशिवाय त्याचें ऐतिहासिक महत्व दर्शविणारी कसलीहि खूण आढळत नाहीं. आणि चेतकाचें स्मारक देखील स्वतः राणा प्रतापसिंहानेंच बांधलें होतें.

स्वामी सदानन्द आतां पश्चिमेच्या रोंखानें निघाले. मारवाडाच्या वाळवंटांतून अगोदर पायीं, मग आगगाडीनें, असें करीत करीत एक दिवस ते कराची स्टेशनावर पोंचले. कॉंग्रेसचें अधिवेशन सुरु व्हावयास अजून कांहीं दिवसांचा अवधि होता. कॉंग्रेस नगराचें बांधकाम अजून चालूच होतें. त्यांना शहराच्या एका टोंका-

... वाचनालय, ...

कडून दुसऱ्या टोंकापर्यंत जावयाचें होतें. याच वेळीं एक टॅक्सीवाला पाठीमागून येऊन गाडी उभी करून म्हणाला—" आपल्याला कुठं जायचंय ? " स्वामीजींनीं कॉंग्रेस नगरालगतच्या एका मोठ्या मंदिराचें नांव सांगितलें. टॅक्सीवाल्यानें त्यांना बसावयास सांगितलें. यावर स्वामीजी म्हणाले—" माझ्याजवळ पैसे नाहींत. "

" आपला आशीर्वाद मला पुरेसा आहे. आपण बसा, मी आपल्याला आपल्या मुक्कामाच्या जागीं सोडून देईन. " टॅक्सीवाल्याला बहुधा स्वामीजींच्या निरोगी व सुन्दर गौर मुखावर ब्रम्हचर्याचें तेज झळकत असलेलें दिसलें असावें, म्हणूनच तो त्यांचा आशीर्वाद मिळविण्यासाठीं इतका उतावीळ झाला. थोड्याच मिनिटांच्या अवधींत स्वामी इष्ट स्थळीं दाखल झाले.

दोन तीन दिवस इकडे तिकडे तपास केल्यानंतर बाबा गुरुमुखसिंह, बाबा साहेबसिंह, इत्यादि गदर पार्टीच्या दोस्तांशीं त्यांची भेट झाली. त्यांच्याप्रमाणेंच बाबा गुरुमुखसिंहहि तुरुंगांतून फरारी झाले होते व नुसते कम्युनिस्ट होण्यावरच न थांबतां ते कम्युनिस्ट देशांत (सोविएत रशियांत) कित्येक वर्षें वास्तव्य करून परत आले होते. पृथ्वीसिंहांना आतांपर्यंत आपल्या जुन्या दोस्तांना भेटण्याची संधि मिळालेली नव्हती. आतांच त्यांना आपल्या दोस्तांशीं क्रांति व राजकारणाबाबत खुल्या दिलानें बोलणें करण्याची संधि मिळाली.

क्रांति करणें हें केवळ चार दोन शूर तरुणांच्या आवांक्यांतलें काम नव्हे ही गोष्ट या दोस्तांनीं त्यांना समजावून सांगितली. क्रान्तीच्या कार्यांत सारी जनता, कामगार, शेतकऱ्यांची मोठी ताकद सामील करून घ्यावी लागेल; आणि कामगार, शेतकरी आपल्यावरील दैनंदिन जुलमांच्या प्रतिकारासाठीं करीत असलेल्या लढ्यांची सांगड क्रान्तीच्या लढ्याशीं घालतां आल्यानंतरच त्यांना क्रान्तीचें महत्व समजेल व ते क्रान्तीच्या कार्यांत सामील होतील. दोन तीन दिवस बोलणीं केल्यानंतर पृथ्वीसिंहांना नवा मार्ग स्पष्ट दिसूं लागला. दोस्त मंडळींनीं असें ठरविलें कीं पृथ्वीसिंहांनीं स्वदेशांत राहून धोका पतकरण्याची जरूरी नाहीं; त्यांनीं अगोदर रशियाला जाऊन मार्क्सवादाचा व क्रान्तिकारक कार्यपद्धतीचा अभ्यास करून आलें पाहिजे.

★

## ( ११ )

# सोविएत रशियांत ( १९३१-३५ )

आतां पृथ्वीसिंहांना सोविएत रशियाला जाण्यासाठीं निघावयाचें होतें. त्यांना पठाणांच्या स्वतंत्र प्रदेशांतून अफगाणिस्तानच्या मार्गानें जावयाचें होतें. तिकडून त्यांना पठाण होऊनच जातां येत होतें. १५ दिवस हजामत न केल्यामुळें कराचींतच दाढीमिशा वाढलेल्या होत्या. तिथेंच त्यांनीं करीमखान हें नांव घेतलें व पठाणी पोशाख घालून ते खुदाई खिदमतगार बनले. कॉंग्रेसचें अधिवेशन आटोपल्यानंतर इतर खुदाई खिदमतगारांसमवेत तेहि पेशावरला रवाना झाले. लाहोरला एक सी. आय. डी. चा माणूस त्यांच्या डब्यांत आला, पण पठाणांनीं त्याची इतकी दर केली कीं त्याला पळून जावें लागलें. पेशावरहून ते टांग्यांतून उतमन्झाई येथें गेले. तिथें पुढची तजवीज करण्यासाठीं १०–१२ दिवस राहावें लागलें.

मोठमोठे पुढारी करीमखानांना मान देत होते आणि त्यांना मदत करण्यासाठीं तयार होते. त्यांच्या अंगांत गरीब पठाणाला शोभेसा एक मळकट फाटका कुडता व सलवार व डोक्यावर फाटका फेटा होता. कुणा पठाणाला डोक्यावर चपला ठेवून चालतांना त्यांनीं पाहिलें, तेव्हां त्याचीहि त्यांनीं नक्कल केली. एके दिवशीं वाटाड्याबरोबर त्यांना सरहद्दीकडे पाठविण्यांत आलें. जरा इकडे तिकडे चक्कर मारुन दुपारीं निघून संध्याकाळीं ७ वाजतां ते शबकदर नजीकच्या सरहद्दीवरील एका खेड्यांत जाऊन पोंचले त्यांना आत्मविश्वास पूर्ण वाटत होता आणि आपली भूमिका पूर्णपणें निभावून नेण्याची त्यांची तयारी होती. जेवणाच्या वेळीं एखादा दुसरा दिवस जरा काचकूच झाली, पण आतां अगदीं आरामांत एका थाळींत बसून त्यांना बिसमिल्ला करतां येऊं लागला आणि तऱ्हेतऱ्हेचे पठाणी पदार्थ जीभ मचक-मचक करीत खातां येऊं लागले. चेहऱ्याची ठेवण व पोशाकावरूनहि त्यांना कुणी ओळखूं शकत नव्हतें पण कुणी प्रश्न विचारूं लागला तर ? भाषा येत नाहीं या विचारानें करीमखानांचें काळीज कधीं कधीं धडधडूं लागे.

१९३१ च्या मे महिन्याची सुरवात होती. ते एका लहानशा खेड्यांत एका दोस्ताकडे राहात होते. खेड्यांत इंग्रज हेरांचा सुळसुळाट झालेला होता. रात्रीच्या निरभ्र आकाशांत ताऱ्यांची गर्दी झालेली होती. ते उघड्यावर पडल्या पडल्या विचार करीत होते —" उद्यां सूर्योदयाला मी स्वतंत्र भूमीवर असेन, नाहीं तर

माझ्या हातांपायांत बेड्या पडून मी तुरुंगांत असेन. " काळजीमुळें त्यांना सारी रात्र झोंप नाहीं आली. खेड्यांत पर ठिकाणचा एक काफिला उतरलेला होता; त्याच्याच बरोबर करीमखानांनाहि सकाळीं सरहद्द ओलांडावयाची होती. पहांटे ४ वाजतां सरहद्दीवरचा शिपाई काफिल्यांतील लोकांना पाहून गेला. त्यांत करीमखानांसारखे किती असतील कोण जाणे. एका चुटकीसरशीं १०० लोकांचा काफिला सरहद्द ओलांडून गेला देखील. पण ते बंदुकींच्या टप्प्याबाहेर गेले तेव्हां कुठें करीमखानांच्या जिवांत जीव आला. रात्रीच्या वेळीं त्या डोंगरांतून उंचसखल खडकाळ वाटेवरून चालत जाणें हें सोपें काम नव्हतें. मधून मधून पायतणेंहि घसरत. काफिला संध्याकाळपर्यंत चालत राहिला. मे महिन्याचा उकाडा. सगळ्यांत जास्त त्रास झाला पाण्याचा. आतां ते पठाणांच्या स्वतंत्र प्रदेशांतून चालले होते. दुसऱ्या दिवशीं दुपारीं मोहमंद जमातीच्या मुलुखांतील तुरंगझाई येथें ते पोंचले. करीमखानांजवळ मुल्ला तुरंगझाईचा मुलगा बादशाह गुल यांच्या नांवचें पत्र होतें; पण बादशाह गुल त्या वेळीं घरीं नव्हते. मुल्लानें स्वागत केलें. बादशाह गुलहि आले. ते एक सुशिक्षित समंजस व सुसंस्कृत गृहस्थ असल्याचें कळून आलें. करीमखानांना स्वतःची ओळख एक मोहाजिर (हिंदुस्थान सोडून निघालेला स्वातंत्र्यवादी मुसलमान) या नात्यानें करून द्यावी लागली. बादशाह गुल यांनीं जलालाबादच्या गव्हर्नरला उद्देशून पत्र लिहून दिलें आणि एक वाटाड्या दिला. त्या दिवशीं रात्रीं ते बादशाह गुल यांच्या दोस्ताच्या घरीं राहिले. जागा धोक्याची होती. प्रत्येक ठिकाणीं दरोडेखोरांचें भय होतें. पण वाटाड्या बरोबर होता म्हणून पुढें काय येणार हें अगोदर त्यांना कळत होतें. अफगाणिस्तानची सरहद्द ओलांडून ते डक्का येथें पोंचले. रात्रीं हॉटेलांत झोंपले. सकाळीं लॉरींत बसून जलालाबादला पोंचले. तिथें त्यांनीं गव्हर्नरला आपली व्यवस्था करण्यास सांगितलें. पण अधिकाऱ्यानें महमदअल्लींना (आतां हेंच पृथ्वीसिंहांचें नांव होतें) चौकीवर नेलें व तो त्यांचा जबाब मागूं लागला. महमदअल्ली म्हणाले —"मी हिन्दी मोहाजिर आहें. इंग्रजांच्या राज्याला रामराम ठोकून मी इस्लामच्या प्रदेशांत आलोंय." याहून जास्त कांहीं सांगण्याचें त्यांनीं साफ नाकारलें व आपल्याला गव्हर्नरकडे घेऊन जाण्यास सांगितलें. गव्हर्नरकडे गेल्यावर त्याला ते म्हणाले—"एक हिंदी मोहाजिर मुसलमान आहें मीं, इस्लामी देशावर जास्त भिस्त आहे माझी." गव्हर्नरनें पोलीस अधिकाऱ्याला हुकुम दिला कीं यांना ताबडतोब काबूलला पाठवून द्यावें. अधिकाऱ्यानें आतांहि विचारलें—"बंदोबस्तानं पाठवायचं ना?" गव्हर्नर म्हणाला—"छे छे! मामुली पद्धतीनंच जाऊं दे त्यांना."

पोलीस अधिकाऱ्यानें लॉरीवाल्यांना त्यांना घेऊन जाण्यास सांगितलें. लॉरीवाल्याला वाटलें कीं ही सरकारी बिगार असणार. तो गाडींत जागा नसल्याची सबब सांगूं लागला. महमदअल्लींनीं त्याच्या कानांत सांगितलें—" मी जास्त पैसे देईन. " तेव्हां त्यानें त्यांना चामड्यांच्या गठ्ठ्यांवर बसण्यास सांगितलें."

वाटेंत या हिंदु ड्रायव्हरबरोबर महमदअल्लींच्या गप्पागोष्टी झाल्या. तो कांग्याचा रजपूत होता. उतारूच्या तोंडून क्रांतीच्या व देशभक्तीच्या गोष्टी ऐकून त्याचा आदर वाढला. त्यानें त्यांना जेवण दिलें. काबुल शहरांत शिरतांना पोलिसानें पासपोर्ट मागितला पण ड्रायव्हरनें सांगून दिलें कीं "हे मोहाजिर आहेत." आणि अशाच चार गोष्टी सांगून तो त्यांना बिनधोक शहरांत घेऊन गेला.

महमदअल्लींना काबुल शहरांत दीड महिना राहावें लागलें. तिथें आणखी कितीतरी हिन्दी मोहाजिर होते, पण त्यांचें राजकीय ज्ञान फ़ारच कच्चें होतें. महमदअल्लींना तेथें एकेक दिवस काढण्याची मुष्किल होऊन बसली. त्यांच्या दोस्तांनीं त्यांना कुणा तरी चांगल्या विश्वासू वाटाड्याबरोबर पुढें पाठविण्याचा विचार केला होता. पण असा कुणी माणूस मिळेना. महमदअल्लींना तिथें छपूनच राहावें लागत होतें. त्यांचे दोस्त वाटाड्या शोधण्याच्या खटपटींत असतांना तेहि स्वस्थ नव्हते बसलेले. योगायोग असा कीं ते उतरले होते त्या घरच्या तरुण पठाणाशीं त्यांचा परिचय झाला. महिनाभर त्यांना त्याच्या घरीं राहावें लागलें, राजकीय व सामाजिक विषयांवर दोघांच्या गप्पागोष्टी चालत असत. हा तरुण एक देशभक्त अफगाण होता. महमदअल्लींच्या हृदयांत धगधगणारी स्वातंत्र्यप्रीति पाहून त्याचा त्यांच्याशीं स्नेह जमला. त्यांनीं त्याला आपला उद्देश सांगितला आणि तो स्वतःच त्यांचा चांगला वाटाड्या होण्यास तयार झाला. महमदअल्लींनीं आपल्या दोस्तांना वाटाड्या मिळाल्याची हकीकत सांगितली तेव्हां त्यांनीं हा वाटाड्या घेऊं नये म्हणून त्यांना परोपरीनें सांगितलें. पण ते फारच हट्ट धरून बसले तेव्हां दोस्तांनीं सांगितलें—"तुम्ही महामूर्ख आहांत. अशा रीतीनं जर तुम्ही गेलांत तर दहाच दिवसांच्या आंत बेड्या घालून घेऊन काबूलला परत याल." महमदअल्लींनींहि उत्तर दिलें—"तुम्ही नुसतेच कायमचे प्रवासी आहांत. तुम्हांला क्रांतिकारकांचा काय अनुभव आहे?" शेवटीं दोस्तांनीं त्यांना जाण्याची परवानगी दिली.

## हिरातच्या वाटेवर

महमदअल्लींचा पठाणी वेश होता आणि दाढी जरा आणखी वाढलेली

होती. त्यांनीं हिरातकडे जाणाऱ्या एका लॉरीशीं संधान बांधलें. दोघांच्या खिशांत अफगाणी रुपये व पुरेशा अमेरिकन नोटाहि होत्या. लॉरी चालली! चार तास चालल्यावर वाटेंत एक लष्करी चौकी लागली. शिपाई उतारूंची पहाणी करूं लागले. त्यांच्यापैकीं महमदअल्लींचा वाटाड्याच तेवढा त्यांना संशयास्पद वाटला. तरुण वाटाड्या सरळ अधिकाऱ्यांकडे गेला आणि त्यांच्याशीं बोलणें करुन परत मोटारींत येऊन बसला.

लॉरी गझनीला पोंचली. त्या वेळीं त्यांना पृथ्वीराज चव्हाणाच्या अटकेचा इतिहास आठवला आणि 'अब न चूक चौहान' हें गाणें आपल्या कानांत कुणी तरी गुणगुणत आहे असा त्यांना भास झाला. हिरे, मोतीं, सोनें, चांदी अशी लूट खेचरांवर लादून पठाणांनीं त्या वेळीं कशी नेली याची त्यांना आठवण झाली. गझनीहून लॉरीनें कन्दाहार गांठलें. हीच लॉरी पुढें हिरातला जाणार नाहीं असें इथें कळलें. दुसऱ्या लॉरीसाठीं पांच दिवस वाट बघत रखडावें लागलें. कन्दाहारचा स्वस्त मेवा व शहराबाहेरच्या सुन्दर बागा पाहण्यांत मन रमणें शक्य नव्हतें. कारण मनाची तंद्री एका निराळ्याच दिशेला लागलेली होती.

शेवटी कशीबशी एक लॉरी मिळाली आणि ते हिरातकडे रवाना झाले. कन्दाहारपासून कांहीं मैल अंतरावर एक नदी लागली. तिच्यावर पूल नव्हता. लॉरीचें इंजन नदी ओलांडतांना प्रवाहांतच बंद पडलें. उतारूंना आपापलें सामान डोक्यावर घेऊन पाण्यांतून पलीकडे जावें लागलें. आतां प्रश्न होता लॉरीला तिच्यांतल्या मालासकट खेंचून बाहेर काढण्याचा. महमदअल्ली सगळ्यांच्या अगोदर पुढें सरसावले. बाबापुता केल्यावर आणखी तीनचार लोक या कामासाठीं तयार झाले. महमदअल्लींनीं लॉरी बाहेर काढण्यासाठीं जी मेहनत केली तिच्यामुळें ड्रायव्हर व सारे उतारू त्यांच्याकडे विशेष आदराच्या दृष्टीनें पाहूं लागले. रात्रीं लोकांना उपाशी पोटीं तिथेंच राहावें लागलें. एक दिवस चालल्यावर लॉरी पुन्हां बंद पडली. तिथल्या त्या निर्जन वाळवंटांत कांहीं मदतहि मिळणें शक्य नव्हतें. ड्रायव्हर चार दिवस खटपटत राहिला. अखेर त्याला एकदाचें यश आलें. उतारूंनीं त्याला पुढें चलण्याचा आग्रह सुरु केला. तो रात्रींची गाडी चालविण्यास कबूल नव्हता. चार तास चालल्यावर बंदुकीचे बार ऐकूं आले. उतारूंना वाटलें दरोडेखोर आले. लॉरी थांबविण्यांत आली व लोक दरोडेखोरांची वाट बघत राहिले. उतारूंपैकीं चौघे श्रीमंत इसम होते आणि ते हाज ( मक्केची यात्रा ) करून परत घरीं चालले होते. त्यांनीं लॉरींतून उतरल्याबरोबर गुडघे टेंकून

" अल्लाच्या कृपेची " भीक मागण्यास सुरुवात केली. दोघां उतारूंजवळ बंदुका होत्या. पण त्यांच्या अंगांत हिंमत नव्हती. हाजी लोक प्रार्थना करूं लागलेले पाहून महमदअल्ली लघवीला जाण्याचा बहाणा करून जरा दूर गेले आणि तेथें खड्डा खणून त्यांत साऱ्या नोटा व पैसे ठेवून परत आले. त्यांनीं त्यांतल्या एका बंदुकवाल्याला विचारलें—"तुम्हांला चांगल्या तऱ्हेनं चालवायला येते का ? " त्याचें मन द्विधा झालेलें पाहून त्यांनीं त्याच्याकडून बंदूक मागून घेतली. ही शिकारीची जोडनळ्यांची बंदूक होती. महमदअल्लींनीं बंदूक भरली व लॉरीच्या पिछाडीला ते नेम घेण्याच्या पवित्र्यांत उभे राहिले. पांच मिनिटांनीं पुन्हां दुसऱ्यांदां गोळीबाराचा आवाज ऐकूं आला. या वेळीं सारेच गुडघे टेंकून प्रार्थना करूं लागले. महमदअल्लींनीं देखील गुडघे टेंकले होते, पण ते बंदुकीचा नेम धरण्यासाठीं. दोन तास पर्यंत ते तसेच तिष्ठत राहिले, मग आणखी एक बार ऐकूं आला. शेवटीं लोकांना कळलें कीं हे दरोडेखोर नव्हेत, जंगली जनावरांना शेतांतून पळवून लावण्यासाठी शेतकरी हे वायबार काढीत आहेत. लॉरी पुन्हां पुढें निघाली.

## हिरात शहरीं वास्तव्य

काबूलहून हिरातला चार दिवसांत पोंचतां येतें, पण महमदअल्लींना वीस दिवस लागले. लॉरी जेव्हां हिरातच्या वेशीजवळ आली तेव्हां एक पाहरेवाला काबूलहून येणाऱ्या उतारूंकडे फार बारकाईनें पाहात आहे असें त्यांना दिसलें. हिरातचा गव्हर्नर अमानुल्लाच्या वेळेपासूनच कायम होता. आतां राज्य होतें नादिरखानाचें. म्हणून काबूलहून हेर येतील अशी गव्हर्नरला नेहमीं धास्ती असे. महमदअल्लींनीं आपल्या अंगचें शौर्य दोनदां दाखविलेलें होतें. म्हणून साऱ्या उतारूंना त्यांच्याविषयीं कृतज्ञता वाटत होती. सारे जण असें समजत होते कीं हा हिंदी इसम असून कसल्यातरी रहस्यपूर्ण कामासाठीं हिरातला आलेला आहे. महमदल्लींची ही हकीकत माहीत असूनहि उतारूंनीं त्यांच्या बाबतींत पाहरे-वाल्याला कांहींएक सांगितलें नाहीं आणि ते कसलीहि अडचण न येतांच हिरात शहरांत पोंचले.

तरुण वाटाड्या सोविएत हद्दीपर्यंत जाण्याच्या बाबतींत कसलाच निश्चय करीना. सरहद्दीपलीकडे अटक झाल्यानंतर बोल्शेविक लोक फार छळ करतात अशा किती तरी हकीकती लोकांमध्यें प्रचलित होत्या. महमदअल्लींनीं या तरुणाला आणखी ७० मैल जाण्याचा आग्रह नाहीं केला. तरुणानें दुसरा कोणी तरी विश्वासू वाटाड्या

शोधून देण्यासाठीं खटपट सुरू केली. दोन दिवसांच्या कामासाठीं महमदअली १०० रु. देण्यास तयार होते. असे वीस दिवस गेले, तेवढ्यांत पोलिसांना बातमी लागली. दोघांना पोलिस ठाण्यावर बोलावण्यांत आलें आणि विचारण्यांत आलें—"गव्हर्नरच्या हुकुमाशिवाय तुम्ही शहरांत कां राहतां आहांत?" महमदअली दोन दिवसपर्यंत आपला जबाब तोंडी सांगत होते आणि पोलीस दुभाष्यांच्या मदतीनें ती खोटी हकीकत लिहून घेण्यांत दोन दिवस गुंतुन राहिले होते. तरुणाला खोटी कहाणी सांगण्याची जरूरच नव्हती. त्याच्या वडिलांचे कोणी जीवश्च कंठश्च मित्र हिरात शहरांतच राहात होते.

चौथ्या दिवशीं दोघांना गव्हर्नरसमोर हजर व्हावयाचें होतें. गव्हर्नर फार कडक माणूस आहे, तो स्वतः आपल्या हातांनीं मारहाण करतो अशा अनेक गोष्टी ज्याच्या त्याच्या तोंडीं होत्या. महमदअलींचा तरुण दोस्त घाबरला. त्यानें कारकुनाला विनवून सांगितलें—"आज आम्हांला नका हजर करूं." आणि त्या दिवशीं दोघेहि हजर केले गेले नाहींत. तेवढ्यांत तरुणाच्या वडिलांच्या स्थानिक मित्रांना बातमी लागली. त्यांनीं पोलिस अधिकाऱ्याला भेटून त्याला जामिनावर सोडण्याची विनंती केली. एक इसम सुटकेचा परवाना घेऊन पोलिस ठाण्यावर आला आणि म्हणाला—" हा घ्या, जामिनावर सोडायचा परवाना आला." शिपाई निरक्षर होता. त्यानें दोघांना सोडून दिलें. महमदअली तिथून बाहेर पडले खरे पण एक दोन तासांतच चूक उमगून येईल हें ते जाणून होते.

आतां एक मिनिट देखील गमावणें म्हणजे मोठाच मूर्खपणा ठरणार होता. त्यांनीं आपल्या तरुण वाटाड्याला १०० रु. देऊन त्याचा निरोप घेतला आणि पांचच मिनिटांत ते सोविएत रशियाच्या सरहद्दीकडे जाणाऱ्या रस्त्यानें चालूं लागले. पण हमरस्त्यानें जाणें धोक्याचें होतें, म्हणून शहराच्या बाहेर पडतांक्षणीं त्यांनीं शेतांतली वाट धरली. कोणत्या वेळीं पोलिसांचे स्वार येऊन थडकतील याचा नेम नव्हता म्हणून ते जीव घेऊन पळत सुटले होते. जून महिन्यांतला कडक उन्हाळा होता. तशांत ते चार तास पर्यंत पळत राहिले. एका डोंगरावर पोंचल्यानंतर त्यांनीं थोडा वेळ विश्रांति घेण्यासाठीं व विचार करण्यासाठीं बैठक मारली. अजून हमरस्त्यानें जाण्यांतला धोका संपलेला नव्हता. सरहद्द उत्तर दिशेला आहे हें त्यांना ठाऊक असलें तरी त्यांना नाकासमोर जाणें शक्य नव्हतें. म्हणून तारेच्या खांबांच्या खुणा धरून त्यांनीं चालत जाण्याचें ठरविलें.

सूर्यास्त होऊं लागलेला होता. दोन स्वार दौडत येत असलेले दिसले. महमदअल्लींच्या काळजाचा थरकांप झाला. लपण्यासाठीं ते डोंगराआड पळत गेले. कांहीं वेळ पर्यंत ते दरडीवर पडून राहिले. तहानेचा त्रास होतच होता आणि त्यांत पुन्हां स्वार येऊन पोंचतील ही धास्ती.

चांद वर आला. गार वाऱ्याच्या झुळुकांमुळें तहानेचा त्रास थोडा कमी झाला. जिथें हरघडीला दरोडेखोरांची धास्ती, तिथें रात्रीं प्रवास करण्याची हिंमत कुणाला होणार? पण महमदअल्ली तर तळहातावर शिर घेऊन चालले होते. ते रात्रभर चालत राहिले. सूर्योदयाच्या सुमारास एका खड्ड्यांत दडून त्यांनीं विश्रांति घेतली. थकवा भयंकर आलेला, भूक सपाटून लागलेली, अशा अवस्थेंत दिवस काढणें कसें शक्य होतें? त्यांच्याजवळ पैसे होते. पण सोनें-चांदी खातां येणार थोडीच? जरा दूर गेल्यावर कांहीं भिकारी येत असलेले त्यांना दिसले. अंगावरचे कपडे फाटलेले असल्यामुळें महमदअल्लीहि भिकाऱ्यासारखेच दिसत होते. त्यांनीं या भिकाऱ्यांजवळ कांहीं तरी खावयास मागितलें. भिकाऱ्यांनीं रोट्यांचे कांहीं वाळलेले तुकडे आपल्या लक्तरांतून काढून दिले. महमदअल्लींनीं ते खाऊन पाहण्याचा प्रयत्न केला पण ते दगडासारखे टणक झाले होते. पुढें एक डबके लागलें. त्यांत ते तुकडे त्यांनीं अगोदर भिजविले आणि मग खाण्यास सुरवात केली. या तुकड्यांची चव इतकी मधुर होती कीं अशी चव त्यांना कांहींहि खातांना पूर्वीं कधींहि वाटली नव्हती. बाकी भूकच तशी भयंकर लागलेली होती म्हणा! रात्रीं सडकेच्या कडेकडेनें ते खुशाल चालत असत पण दिवसा मात्र ते तारेच्या खांबांच्या खुणा धरूनच चालत. एका ठिकाणीं तारेचे खांब व रस्ता अगदी जवळ जवळ आले. महमदअल्लींनीं शेतांची वाट धरली. डोंगराच्या कडेला कांहीं खानाबदोश लोक राहुटी लावून राहिलेले होते. महमदअल्लींनीं त्यांच्या मुलांना थोडथोडे पैसे दिले. राहुटीवाल्यांनीं त्यांना लोणी, रोटी, व दूध दिलें. महमदअल्लींनीं त्यांच्या मुलांना पैसे दिले ते घेतलेल्या जिनसांचें मोल म्हणून नव्हे तर मुलांविषयीं प्रेम प्रदर्शित करण्यासाठीं दिले. पण राहुटीवाल्यांच्या मनांत त्यांच्याविषयीं मैत्री निर्माण करण्यास हे पैसे उपयोगी ठरले.

खानाबदोश मंडळींनीं त्यांना अशा प्रकारें डोंगरांत भटकण्याचें कारण विचारलें. महमदअल्लींनीं सांगितलें—"माझा लाडका भाऊ कुरक गांवीं एका दुकानदाराकडे नोकरीला आहे. तो आहे आजारी. अखेरच्या वेळीं भावाला एकदां

बघून घ्यावें म्हणतो. हिरातहून लॉरींतून बसून गेलों असतों पण माझ्याजवळ तितके पैसे नव्हते."

त्या साध्याभोळ्या लोकांना महमदअल्लींचें बोलणें खरें वाटलें. आणि भावावरील प्रेमामुळें वाटचाल करतांकरतां या माणसाच्या पायांना किती तरी फोड आलेले आहेत हें पाहून कांहींचे तर डोळे ओले झाले. एका माणसानें कुरकच्या जवळपासपर्यंत जाण्यासाठीं आपला घोडा देऊं केला, तेव्हां महमदअल्ली आपल्या मोडक्या तोडक्या फार्सी भाषेंत सांगूं लागले--"बिरादर! (बंधो!) मी हीं सारीं दुःखं स्वतः सोसावीं‍त असा अल्लाचा हुकुम आहे. मी हा हुकुम मोडूं इच्छीत नाहीं. अल्ला तुमचं भलं करो." घोडा घेण्यास महमदअल्लींनीं नकार दिल्यावर तर त्या मंडळींना त्यांच्याविषयीं वाटत असलेली करुणा आणखीच वाढली आणि त्यांच्यापैकीं एकानें पुढच्या रस्त्यासंबंधीं पूर्ण खुलासेवार माहिती दिली. सूर्यास्त होऊं लागला होता, तरीहि महमदअल्लींनीं खानाबदोश मंडळींची वस्ती सोडून पुढें कूच केलें. मैल दीड मैल गेल्यावर अंधार पडण्याची वाट पाहात ते एका ठिकाणीं पडून राहिले. रात्रीं जरी उजेड असला तरी त्या वेळेला रस्त्यानें चालण्याची हिंमत करणारे फारच क्वचित सांपडतील, हें महमदअल्लींना ठाऊक होतें. म्हणून आतां ते सडकेनें चालूं लागले. पुढचे २० मैल त्यांना रातोरात चालून जाणें भाग होतें, आणि तेंसुद्धां वाटेंतल्या तीन सरकारी चौक्या चुकवून! ते सपाट्यानें चालत होते. एका ठिकाणीं मेंढपाळांच्या कुत्र्यांनीं त्यांना घेरलें. त्यांच्यावर उगारण्यासाठीं महमदअल्लींच्या हातीं काठी देखील नव्हती. काठी असती तरी इतक्या कुत्र्यांना मार देऊन पळवून लावणें कसें शक्य होतें? त्याच वेळीं त्यांना रुमालांत बांधलेल्या रोटीची आठवण झाली. त्यांनीं एक तुकडा कुत्र्यांकडे दूरवर फेंकला. कुत्रे तिकडे धांवले आणि तेवढ्या अवधींत त्यांना जितकें पळतां आलें तितकें त्यांनीं पळून घेतलें. कुत्रे रोटीचा तुकडा संपवून पुन्हां त्यांचा पाठलाग करीत आणि पुन्हां ते एक तुकडा फेंकून देत. अशा प्रकारें कुत्र्यांच्या वस्तीपासून ते पुष्कळ दूर आले. आतां कुत्र्यांनीं त्यांचा पाठलाग करण्याचें सोडून दिलें खरें, पण थकव्यामुळें त्यांचें सर्व अंग ठणकूं लागलें. थोडा वेळपर्यंत ते पुन्हां जमिनीवर पडून राहिले, पण दिवस उगवावयाच्या आंत अफगाणिस्तानची हद्द ओलांडून न जाणें म्हणजे धोक्याची गोष्ट आहे हेंहि त्यांना चांगलें ठाऊक होतें. ते पुन्हां उठून चालूं लागले. कांहीं वेळानें मागच्या बाजूनें त्यांना घंटेचा 'टुन्-टुन्' असा आवाज ऐकूं आला.

पाहतात तों सामान लादलेला एक उंट बेफामपणें धांवत येत आहे आणि पाठोपाठ त्याचा मालक त्याला पकडण्याची खटपट करीत आहे. महमदअल्ली जरी माणसांना टाळून प्रवास करीत होते तरी या वेळीं मदत करणें आपल्याला हानिकारक होणार नाहीं अशी त्यांनीं आपली समजूत करून घेतली. उंट जवळ येतांक्षणीं त्यांनीं उडी मारून त्याचा लगाम पकडला आणि थोड्याशा त्रासानंतर उंटाला उभा करण्यांत त्यांना यश आलें. उंटवाला त्यांचे फार फार आभार मानूं लागला. त्यानें उंटाला बसविलें आणि आपल्याबरोबर उंटावर बसण्यास तो त्यांना सांगूं लागला. पण महमदअल्लींनीं त्याचे आभार मानून अत्यंत सौम्य शब्दांत नकार दिला. दोघे किती तरी दूरपर्यंत पायींच चालले. या वेळीं कुश्क व सोविएत सरहद्दीच्या बाबतींत त्यांना कळणें अवश्य असलेल्या कांहीं गोष्टी उंटवाल्यानें सांगितल्या. नदीच्या कांठाकांठानें जाऊं नका असें त्यानें त्यांना मुद्दाम बजावलें. नदी त्यांच्या उजव्या बाजूनें वाहात होती. ही नदी अफगाणिस्तान व सोविएत यांच्या सरहद्दीवर आहे आणि ती ओलांडण्याच्या खटपटींत गोळ्या खाण्याचा धोका असतो. पहांट होऊं लागलेली होती. महमदअल्लींनीं नमाज पढण्याच्या मिषानें हातपाय धुण्यासाठीं उंटवाल्याची रजा घेतली.

## सोविएत भूमींत

पूर्व दिशेला सूर्याची लाली फैलावूं लागली होती. महमदअल्ली झाडांमधून वाट काढीत नदीकांठीं पोंचले. नदींत पाणी जास्त खोल नव्हतें पण धार रुंद होती. ते शेवटची छलांग मारण्यापूर्वी जरा वेळ थांबून थोडासा विचार करूं लागले. त्यांनीं भरवेगांत धांवतच धार ओलांडण्याचा निश्चय केला. हेतु हा कीं सरहद्दीवर रखवाली करणाऱ्या शिपायांना नेम घेण्याची संधीच मिळूं नये. शेवटीं धोक्याचीं तीं चार दोन मिनिटेंहि टळलीं, आणि गोळ्यांचा वर्षाव तर झालाच नाहीं. अशा प्रकारें ता. २८ जुलै १९३१ रोजीं पृथ्वीसिंह समाजसत्तावादी सोविएत भूमींत दाखल झाले.

आदल्या दोन दिवसांतली धांवाधांव व उन्हाचा ताप यांच्या योगानें त्यांचा थकवा इतका वाढला कीं त्यांचें सारें शरीर आंखडून गेलें. ते किती तरी वेळपर्यंत एका जागीं पडून राहिले. कुणी तरी येऊन आपल्याला अटक करील व कुणा अधिकाऱ्याकडे घेऊन जाईल हाहि विचार त्यांच्या मनांत आला. कुणीच येत नाहींसें पाहुन ते स्वतःच तिथून उठले आणि एका कामगाराजवळ

जाऊन म्हणाले—"मला कुणा तरी जबाबदार माणसाकडे घेऊन चला." कामगार त्यांना एका अधिकाऱ्याकडे घेऊन गेले.

अधिकाऱ्यानें पहिला प्रश्न हा विचारला—"तुम्ही इथं कां आलांत?" पृथ्वीसिंहांनीं अत्यंत नम्रपणें फार्सी भाषेंत सांगितलें—"मी एक भारतीय क्रांतिकारक आहें. मला कुणा तरी जबाबदार अधिकाऱ्याकडे घेऊन चला, म्हणजे मी तिथं साऱ्या गोष्टी सांगेन." त्यांचें बोलणें कांहीं त्याला नीट समजूं शकलें नाहीं हें त्याच्या चेहऱ्यावरून दिसलें पण त्यानें त्यांच्या वृत्तींतलें गांभीर्य ओळखलें! तो पृथ्वीसिंहांना एका वरिष्ठ अधिकाऱ्याकडे घेऊन गेला. एक अनोळखी माणूस ऑफिसांत आलेला पाहून वरिष्ठ अधिकारी एकदोन मिनिटें कांहीं तरी विचार करीत राहिला, मग गालांतल्या गालांत हंसत रशियन भाषेंत कांहीं तरी बोलला. पृथ्वीसिंहांनीं इंग्रजींत बोलण्याची इच्छा दर्शविली. यावर हा अधिकारी म्हणाला—"इंग्लिश नेत्". त्याला इंग्रजी कळत नाहीं हें पृथ्वीसिंहांना समजलें. मग पृथ्वीसिंहांनीं फार्सींत बोलणें सुरू केलें. अधिकाऱ्यानें एक दुभाष्याला बोलावून घेतलें. पृथ्वीसिंह म्हणाले—"अगोदर एक बादलीभर गरम पाणी मागवून द्या." पाणी आलें. पृथ्वीसिंहांनीं बुटांसकटच दोन्ही पाय बादलींत ठेवले आणि मग अर्धा तासपर्यंत त्यांचें बोलणें चाललें. नंतर त्यांनीं संभाळून हलक्या हातांनीं बूट काढले. जागोजाग पायांचीं सालडीं निघालेलीं होतीं. मलम लावून पट्ट्या बांधण्यांत आल्या. थोडेंसें खाऊं घालण्यांत आलें. बाजूच्या खोलींत झोंपून राहण्याची मोकळीक मिळाली. दुपारनंतर त्यांना मोटारींतून दुसऱ्या एका शहरांत पोंचविण्यांत आलें. तिथें त्यांना किती तरी प्रश्न विचारण्यांत आले आणि एका आठवड्यापर्यंत त्यांना तिथेंच ठेवून घेण्यांत आलें.

मग खास चौकशीसाठीं त्यांची ताश्कंदला रवानगी झाली. दुभाष्यांच्या मदतीनें अधिकाऱ्यानें त्यांचा जबाब घेतला. त्याच्यासमोर कोणतीहि गोष्ट लपवून ठेवण्याचें पृथ्वीसिंहांना कांहींच कारण नव्हतें. त्यांनीं अमेरिकेला गेल्यापासून आजपर्यंतची सारी कहाणी सांगितली.

पण अशा कहाण्या नुसत्या ऐकून घेतल्याबरोबर सोविएत अधिकारी जर खऱ्या मानूं लागले असते तर सोविएत सरहद्दीचें रक्षण करण्याची जरूरच राहिली नसती. दुनियेंतलीं सारीं भांडवलदारी सरकारें या कामगार-शेतकरी-राज्याला घाबरलेलीं होतीं. खरबूज पाहिल्यावर खरबुजाचा रंग चढणार, आणि दुनियेची ९० टक्के जनता गरीब कामगार-शेतकरी जनताच असल्यामुळें

ती आतां अधिक दिवस आपल्यावरचा अंमल धनिकांच्या हातीं राहूं देऊन स्वतः नरकवासांत आयुष्य घालवायला कबूल होणार नाहीं याची भांडवलदारांना भयंकर धास्ती वाटत होती. ही जनता स्वतःच या जळवांना राज्यपदावरून ओढून काढून राज्यकारभाराचीं सूत्रें आपल्या हातीं घेईल, आणि हंगेरी, जर्मनी व युरोपांतील इतर देशांमध्यें जनतेनें असा प्रयत्न केलेला भांडवलदारांनीं पाहिला होता. म्हणूनच भांडवलदारी सरकारांनीं आपल्या गुप्त हेरांना कोणत्या ना कोणत्या तरी युक्त्याप्रयुक्त्या करून सोविएत युनियनमध्यें घुसविण्याची खटपट एकसारखी चालविलेली होती. येवढ्याचकरतां मॉस्कोमध्यें राहणाऱ्या गदर पार्टीच्या पुढाऱ्यांना विचारून त्यांच्याकडून पृथ्वीसिंहांच्या जबाबाची शहानिशा होईपर्यंत पृथ्वीसिंहांवर निर्बंध घालणें अधिकाऱ्याला आवश्यक वाटलें.

अशा प्रकारें त्यांना ताश्कंद शहरीं एक महिना काढावा लागला. ते या मुदतींत राजबंद्याचें आयुष्य घालवीत होते.

## मॉस्को शहरीं

एके दिवशीं सकाळीं पृथ्वीसिंहांचें वास्तव्य ताश्कंद शहरांतील सगळयांत चांगल्या हॉटेलांत झालें. अधिकाऱ्यांना पृथ्वीसिंहांच्या खरेपणाचा पडताळा मिळाला. आतां सगळे लोक त्यांच्याकडे स्नेहाच्या व आदराच्या दृष्टीनें पाहूं लागले. त्यांनीं ताश्कंद शहराचे किती तरी भाग फेरफटका करून पाहून घेतले. तिथले लोक एका निराळ्याच दुनियेंत वावरत आहेत, आपण आतांपर्यंत पाहिलेल्या दुनियेंत माणसांमाणसांतले जे भेदभाव पाहिले ते इथें आढळत नाहींत हेंहि त्यांना दिसलें. आतां त्यांना मॉस्कोला जावयाचें होतें, आणि तेंहि एकट्यानेंच. इतक्या दिवसांत त्यांनीं चाळीस पन्नास रशियन शब्द शिकून घेतले होते. गाडींत फार गर्दी होती, पण पृथ्वीसिंहांना चार दिवसांच्या प्रवासासाठीं एक आरामशीर जागा देण्यांत आलेली होती. दुनियेंतल्या पहिल्या कामगारराज्याच्या समाजसत्तावादी राजधानींत आपण जात आहोंत या विचारानें पृथ्वीसिंहांना खूप आनंद होत होता. साऱ्या दुनियेचा व्यवहार चालविणारी जनता ज्या शहराकडे मोठ्या आदरानें पाहते असें हें मॉस्को शहर, आणि त्याच मॉस्को शहरांत आपण क्रांतिकारक मार्क्सवादाचे धडे घेण्यासाठीं चाललों आहोंत! ज्याच्यासाठीं आपण इतके धोके पतकरले, इतके कष्ट काढले, त्या अखेरच्या मुक्कामाला आतां आपण पोंचत आहोंत! सप्टेंबर महिन्याची ती अखेर होती. पाऊस पडत होता. त्यांनीं गाडींत पाय ठेवला.

गाडींतले सारे उतारू पृथ्वीसिंहांना हर प्रकारें खूष ठेवण्याची खटपट करीत होते. भारतांत व भारताबाहेर त्यांचा गोऱ्या लोकांशीं संपर्क आला असला तरी त्यांच्या गर्विष्ठ व अपमानास्पद वर्तनामुळें पृथ्वीसिंहांच्या मनांत गोऱ्या रंगाविषयीं जबरदस्त तिरस्कार निर्माण झालेला होता. इथें गाडींत मॉस्कोला जाणाऱ्या या उतारूंमध्यें बहुसंख्य गोरे रशियनच होते. गोऱ्या रंगांत कांहीं दोष नसतो याचा इथें या चार दिवसाच्या प्रवासांत त्यांना प्रत्यय आला. दोष आहे तो श्रीमंत-गरीब या वर्गभेदांत आहे, धनिकांच्या राज्यसंस्थेंत आहे. महात्मे व राजे स्वतः जात-पात, रंग-रूप असल्या भेदांना उत्तेजन देऊन माणसांमाणसांत द्वेष निर्माण करतात. माणसामाणसाचें नातें वस्तुतः भावाभावाचेंच असतें हें इथें त्यांना कळून आलें. इथले लोक केवळ आपल्याशींच स्नेहानें वागतात इतकेंच नव्हे तर मध्य आशियांतील "काळ्या" लोकांशीं देखील गोरे रशियन सख्ख्या भावांसारखे वागत आहेत हें पृथ्वीसिंहांना दिसत होतें. ज्या गोष्टी ते प्रत्यक्ष पाहात होते आणि ज्यांच्यामुळें त्यांच्या साऱ्या जीवनांत जबरदस्त परिवर्तन होत होतें, त्या गोष्टी नुसत्या ऐकीव माहितीवरून त्यांना समजूं शकल्या नव्हत्या. पृथ्वीसिंहांचा स्वभाव जात्याच गोड असल्यामुळें लहान मुलांविषयीं त्यांना नेहमींच आकर्षण वाटत असतें. गाडींतून जाणारे बालगोपाल त्यांना एकसारखा गराडा देऊन राहिले आणि प्रत्येक जण त्यांना आपापली भाषा शिकविण्याची खटपट करीत होता. तरुण मंडळी त्यांच्याजवळ येऊन बसत असत आणि त्यांचे व्यायामानें पिळदार झालेले दंड व स्नायू दाबून त्यांच्या सामर्थ्याची प्रचीती घेत असत आणि मग आनंदित होऊन म्हणत-"खोची," "खोची" (कामगार). कामगार या शब्दाला दुनियेंतल्या इतर देशांमध्यें जो अर्थ आहे तोच अर्थ रशियांत नाहीं. जो अन्न-धन पैदा करतो तो कामगार; पण त्यालाच गांवढळ अडाणी असें म्हणून त्याचा अपमान केला जातो; कारण त्यानें सत्तेची लगाम दुसऱ्यांच्या हातीं देऊन ठेवलेली असते. पण रशियांत कामगार अन्न-धन पैदा करतो आणि त्याचबरोबर सत्तेची लगामहि त्याच्याच हातीं असते. म्हणून सगळ्यांत जास्त मानाला तो पात्र असतो आणि "कामगार" हा मोठा उच्च सन्माननीय शब्द ठरतो. पृथ्वीसिंहांचे मजबूत हात पाहून हा माणूस जळवांच्या वर्गांतला नाहीं, उलट आपल्या स्वतःच्याच वर्गांतला आहे हें तरुण मंडळींना समजून येतें. तरुण सुंदरी व वयस्क स्त्रिया त्यांच्या डोळ्यांकडे पाहून गालांतल्या गालांत

'सत सांगतात —" ओ, काक खरोशया चोरूनी ग्लाज" ( ओहो, किती सुंदर काळेभोर डोळे आहेत ! )

पृथ्वीसिंहांचे ते चार दिवस इतके लवकर गेले कीं त्यांना याचें फार वाईट वाटलें. पांचव्या दिवशीं ते मॉस्कोच्या रस्त्यांवरून चालूं लागले.

## मार्क्सवादाचे अभ्यासक (१९३१-३३)

स्टेशनपासून कॉमिन्टर्नपर्यंत पोंचण्यांत अडचण कांहींच नव्हती. त्यांच्या जवळ ओळखपत्र होतें तें त्यांनीं कॉमरेड मेयरला दाखविलें आणि त्याना त्याच दिवशीं पौर्वात्य विद्यापीठामध्यें पोंचते करण्यांत आलें. त्यांचे सगळेच प्रोफेसर रशियन होते. हिंदी विद्यार्थ्यांमध्यें कॉमरेड वासुदेवसिंहहि होते. हे वासुदेवसिंह आठ वर्षेपर्यंत पंजाबमधील निरनिराळ्या जेलांमध्यें राजबंदी होते. नुकती अलीकडेच त्यांची सुटका झाली आहे व ते पंजाबच्या शेतकऱ्यांमध्यें जागृति निर्माण करीत आहेत.

पृथ्वीसिंहांनीं अंबाला येथील शाळा सोडल्यानंतर पुन्हां कोणत्याहि शाळेचें अगर कॉलेजचें तोंडसुद्धां पाहिलेलें नव्हतें. पण त्यांची ज्ञानलालसा कधींच कमी झाली नाहीं. अंदमान व राजमहेन्द्री जेलमध्यें हिंदी उर्दूचीं जीं जीं पुस्तकें त्यांना मिळत तीं ते वाचल्याशिवाय राहात नसत. भावनगर शहरीं ते भरपूर वेळ पुस्तकें वाचण्यांत घालवीत. पौर्वात्य विद्यापीठामध्यें जो अभ्यासक्रम होता तो फार कमी असल्याचें त्यांना आढळून आलें. तो होता प्राथमिक श्रेणीच्या विद्यार्थ्यांसाठीं. आपल्या दोन वर्षांपैकीं एक दिवससुद्धां फुकट जाऊं नये अशी त्यांची इच्छा होती. त्यांनीं अभ्यास कमी आहे म्हणून तक्रार केली. याच्यापेक्षां वरच्या दर्जाचा अभ्यासक्रम लेनिन विद्यालयांत शिकवितात अशी त्यांना बातमी लागली. त्यांनीं त्यांत दाखल होण्याची उमेद धरली.

नोव्हेंबर महिना आला. ७ तारखेला महान् क्रांतीचा वाढदिवस समारंभ होता. शहराच्या प्रत्येक भागांतून लोक मिरवणुकी घे-घेऊन क्रेमलिनलगतच्या लाल चौकाकडे चालले होते. पृथ्वीसिंहहि आपल्या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या मिरवणुकींत सामील झालेले होते. सोविएत रशियाचे मोठमोठे पुढारी लेनिनच्या समाधीच्या गच्चीवर उभे होते आणि समोरून मोठमोठ्या मिरवणुकी जात होत्या. रणगाड्यांची रांग गडगडाट करीत पुढें चालली होती, मग लष्करी लॉऱ्यांमधून आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सज्ज अशी सेना चाललेली होती. मग हलक्या

... ग्रंथालय, ...

रणगाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. अधूनमधून तडफदार घोडेस्वार आपल्या मजबूत घोड्यांवर बसून चालले होते. आणि पाठीमागून पायदळांतले सैनिक येत होते. मग कामगारांची लष्करी गार्ड-दलें व शेवटीं कामगारांची प्रचंड मिरवणूक होती. बर्फ पडलेलें होतें, आणि बर्फावरून चालण्याची संवय नसल्यामुळें पृथ्वीसिंह एकदोन जागीं घसरून पडलेहि. लाल चौकाच्या लाल आकाशांत शेंकडों लढाऊ विमानें घरघरत होतीं. समाजसत्तावादी जनतेचा हा अपार उत्साह पाहून पृथ्वीसिंहांना आपल्या जन्माचें सार्थक झालें असें वाटलें. कॉमरेड स्तालिन, कालिनिन, वोरोशीलोव्ह इत्यादि पुढाऱ्यांच्या समोरून चाळीस पन्नास यार्ड अंतरावरूनच पृथ्वीसिंहांची मिरवणूक चालली होती. त्यांनीं पुढाऱ्यांच्या चेहऱ्यांकडे अत्यंत लक्षपूर्वक पाहिलें.

पृथ्वीसिंह लेनिन विद्यालयांत जाण्याच्या खटपटीला लागले. लेनिन विद्यालयांत फक्त कम्युनिस्ट पार्टीच्या सभासदांनाच घेण्यांत येत असे. पृथ्वीसिंह अजून पार्टीचे सभासद झालेले नव्हते. ही अडचण त्यांना पार्टींत दाखल करून घेऊन दूर करण्यांत आली.

लेनिन विद्यालयांत सुमारें ५०० विद्यार्थी होते. त्यांत १०० स्त्रिया होत्या. इंग्रज, फ्रेंच, जर्मन अमेरिकन यांच्याशिवाय चीन, जपान, मलाया, सुमात्रा इत्यादि आशियाटिक देशांतलेहि कम्युनिस्ट विद्यार्थी तेथें होते. पृथ्वीसिंह इंग्रजी माध्यम असलेल्या वर्गात दाखल झाले.

अभ्यासाचे विषय—कामगारवर्गाचा इतिहास, क्रान्त्यांचा इतिहास, अर्थशास्त्र, गत्यात्मक भौतिकवाद इत्यादि होते. पृथ्वीसिंह आतां आपल्या अभ्यासावर तुटून पडले आणि सहा महिने झाले नाहींत तोंच त्यांचे शिक्षक त्यांच्या अभ्यासाची तारीफ करूं लागले.

१९३२ च्या जानेवारींत अगर फेब्रुवारींत त्यांना ताप आला. पूर्ण बरे होण्यासाठीं त्यांना मॉस्कोनजीकच्याच एका आरोग्यभुवनांत पाठविण्यांत आलें. पण तिथें त्यांना दहाबारा दिवसांपेक्षां जास्त राहवलें नाहीं. वजन पूर्ववत होताक्षणीं त्यांना अभ्यासांत मागें राहण्याची धास्ती वाटूं लागली. या विद्यालयांत त्यांचें नांव होतें **पॉल रिचर्ड मार्को !** मेक्सिको देशांतले मार्को मॉस्कोला कम्युनिझम शिकण्यासाठीं आलेले आहेत !! लेनिन विद्यालयाच्या अभ्यासक्रमांत लष्करी शिक्षणाचाहि समावेश होता आणि आठवड्यांतून कांहीं दिवस कवाईत, रिव्हॉल्व्हर-रायफल-हँडग्रेनेड-मशीनगन चालविणें, रस्त्यांतून लढणें, इत्यादि विषयांचें शिक्षण त्यांना पहिल्याच वर्षी पूर्ण करावें लागलें.

राजमहेंद्री जेलमध्यें असतांना असहकारितेच्या काळांत पृथ्वीसिंहहि राजकीय प्रश्नांचा विचार विशेष लक्षपूर्वक करूं लागले होते आणि त्यांत त्यांनीं धर्म, राजकारण व रूढि यांची एक विलक्षण गल्लत करून ठेवलेली होती. त्यांची समजूत अशी होती— सत्ययुगांत ब्राह्मणांचें राज्य होतें, मग क्षत्रियांचें झालें आणि आतां वैश्यांचें आहे आणि पुढें पूर्ण पुरुषाचें राज्य होणार आहे. अंगमेहनत करणाऱ्यांसाठीं त्यांनीं हा नवा शब्द तयार केलेला होता. इथें त्यांना समाजाच्या विकासावर व्याख्यानें ऐकावीं लागलीं आणि मग त्यांना कळलें कीं आरंभीं मनुष्य प्राणी शिकारीवर व फळांवर उपजीविका करीत होता त्या वेळीं सारी संपत्ति समाइक होती. व्यक्तिगत मालमत्ता नव्हती. पण पुढें पशुपालनाची प्रथा सुरु झाल्यावर आणि त्याहून जास्त प्रमाणांत शेती व तांबें-लोखंड यांचा वापर सुरू झाल्याबरोबर श्रीमंत-गरीब हा भेदभाव उग्र स्वरूप धारण करूं लागला. ज्या मूठभर लोकांच्या ताब्यांत पशु अगर खाद्यपदार्थांच्या स्वरूपांत जास्त संपत्ति आली ते इतरांना मजुरीवर राबवून त्यांच्याकडून स्वतःसाठीं आणखी धन पैदा करवूं शकत होते; या संपत्तीकडे कुणाची नजर लागूं नये म्हणून ते लढवय्यांना भाड्यानें घेऊं शकत होते. पृथ्वीसिंह भावनगरांत होते त्या साऱ्या मुदतींत त्यांची समजूत अशी होती कीं "भारतीय तरुण" या शब्दांत मोठी जादू आहे, तरुणांना एकदां कसरत, शिस्त, संघटना व कष्ट सहन करण्याचें चांगलें शिक्षण दिलें कीं भागलें काम. दूध तेंच, पण तें सापाच्या पोटांत गेले कीं त्याचें विष बनतें ही म्हण त्या वेळीं त्यांच्या लक्षांत येत नव्हती. तरुण असले म्हणून काय झालें ? आपल्या वर्गाच्या आर्थिक स्वार्थांत गुरफटलेले तरुण लोक जातीचे सच्चे शिपाई कधींच होऊं शकणार नाहींत. मॉस्को शहरीं पृथ्वीसिंहांनीं वर्ग-भेद व वर्ग-लढा या विषयांचा अभ्यास केला तेव्हां त्यांना स्वतःलाच काठेवाडी तरुणांचें उदाहरण आठवलें आणि ही एक अगदीं नवीच गोष्ट त्यांना कळली.

विद्यालयांत त्यांना इतर कामांच्या जोडीला भारतांतील हिंदी-उर्दू वृत्तपत्रांतील मजकुराचें इंग्रजी भाषांतर करावें लागे. हे पहिल्या पंचवार्षिक योजनेचे कठीण दिवस होते. सोविएत राष्ट्रानें लवकरांत लवकर लष्करी व औद्योगिक साधनांच्या बाबतींत इतर देशांपासून स्वतंत्र होण्याचा पक्का निर्धार केलेला होता आणि याच योजनेला अनुसरून लांकूड, राकेल व रोट्या देखील निर्यात करून परदेशांहून यांत्रिक सामान मागविण्यांत येत होतें. अजूनपर्यंत भगवंताच्या भरंवशावरच शेती चाललेली होती. ट्रॅक्टर, कालवे व विजेवर चालणारे



नगर वाचनालय

पंप यांची मदत शेतीला मिळालेली नव्हती. म्हणून त्या वर्षीं खाद्यपदार्थांची कमतरता आली. साऱ्या खाद्यपदार्थांवर कंट्रोल अगर रेशनिंग होतें. तरी पण परदेशांतून आलेल्या तरुणांची बहुसंख्या असलेल्या लेनिन विद्यालयांतील विद्यार्थ्यांची खाण्यापिण्याची सोय सगळ्यांत चांगली होती.

१९३२ चा मे महिना आला. सात महिने कसून अभ्यास केल्यानंतर प्रकृति नीट करून मेंदूला तरतरी आणण्यासाठीं थोडी विश्रांति घेणें आवश्यक होतें. मार्कोंना कॉकेशसकडे पाठविण्यांत आलें. त्यांनीं मणिपूर व आसाम पाहिला होता, हिमालयहि दुरून पाहिला होता. हिमालयावरील देवदारांच्या जंगलांतून व बर्फानें आच्छादलेल्या दऱ्याखोऱ्यांतून भटकण्याची संधि जर त्यांना मिळाली असती तर कॉकेशस पर्वत हेंच जगांतील सर्वांत सुंदर दृश्य आहे असा एकतर्फी निकाल मार्कोंनीं दिला नसता. वस्तुतः हिमालय व कॉकेशस हे सख्खे भाऊच आहेत. असो. मार्कोंचा मुक्काम किस्लोवस्कच्या सुंदर खोऱ्यांत होता. किस्लोवस्क हें पाचक पाण्यासाठीं प्रसिद्ध आहे आणि त्याच्या जवळचें कॉकेशसचें शिखर सुंदर देखाव्यांसाठीं प्रसिद्ध आहे. या शिखरावर चढण्यासाठीं मार्कोंचें मन फारच आतुर होऊं लागलें. एके दिवशीं ते मोठ्या आनंदानें शिखरावर चढूं लागले होते. दिवेलागणीला ते शिखरावर पोंचले. चारी बाजूंचें दृश्य अद्भुत दिसत होतें. या सौन्दर्यपानाच्या कार्यक्रमांत ते क्षणभर स्वतःला विसरून गेले. पण एकाएकीं त्यांच्या काळजांतून जणूं कांहीं कळ आली. त्यांचें मन त्यांना सांगूं लागलें-- " अरे गुलाम मनुष्या ! या निसर्गसौन्दर्याचा उपभोग घेण्याचा तुला काय अधिकार आहे ? ज्यानें आपल्या सामर्थ्यानें स्वातंत्र्य संपादन केलें आहे त्याला अधिकार आहे हा. "

मार्को भराभर शिखरावरून खालीं उतरले. त्यांनीं शक्य तितक्या लवकर तयारी करून मातृभूमीला परत जाण्याचा निश्चय केला.

महिन्याभरानें ते मॉस्कोला परत आले. एक महिन्यानें वोल्गा नदींतील प्रवासाचा कार्यक्रम ठरला. पण हा नुसताच प्रवास नव्हता. विशालहृदयीं वोल्गा नदींतून जाणाऱ्या बोटींत ३०० विद्यार्थ्यांचें एक विद्यालय चालू होतें. मॉस्कोहून काझानपर्यंत रेल्वेनें गेल्यावर तिथून बोटीचा प्रवास सुरू झाला. बोट दिवस चाले व रात्रीं थांबून राही. पहिली पंचवार्षिक योजना मुदतीच्या अगोदरच पूर्ण झालेली होती. शहरांत व सामुदायिक शेतांवर सर्व ठिकाणीं लोकांमध्यें अपार उत्साह दिसत होता. लेनिन विद्यालयांतील विद्यार्थ्यांना कधीं कुठें कारखाना पाहण्यासाठीं जावें लागे, कधीं सामुदायिक शेती पाहण्यास जावें लागे.

सहा महिने झाले नाहींत तोंच मार्कोंना रशियन भाषा समजूं लागली होती. वोल्गा नदीची विशाल, शान्त, सखोल धार पाहून त्यांना त्यांच्या लाडक्या गंगेची व सिंधूची आठवण येई. त्यांच्या मनांत विचार असा येई— "हिंदुस्थानांतसुद्धां तरुणांचें असलें फिरतें विद्यालय आमच्या सुन्दर नद्यांमधून प्रवास करीत करीत ज्ञानसंवर्धनाबरोबरच निसर्गशोभेचा आनंद उपभोगत आहे असा दिवस उगवेल ना?" वोल्गा नदीचें पाणी कुठें फिकट निळें, तर किंचित हिरवें असें दिसे. कधीं तिच्या कांठावरचे उघडे बोडके खडक दूरवर नजर टाकण्याची मोकळीक देत होते; तर कधीं नजर अडवूनच धरत होते. वोल्गा नदींतील मासे खाण्याला फार चविष्ट लागतात. आणि कापरासारख्या चांदण्याचें प्रतिबिंब वोल्गाच्या धारेवर पडलें म्हणजे दूरवर दिसणारी वृक्षांची काळी रांग व जवळच्या इमारतींचे सौध हें दृश्य अद्भुत दिसूं लागतें. टरबुजांची व दुधाची या प्रवासांत खूप चंगळ होती. बोटीवर मार्कोंखेरीज दुसरा कुणीहि भारतीय नव्हता. त्यांना पोहणें, उड्या मारणें, वजन उचलणें, प्रथमोचार इत्यादि व्यायामप्रकारांचा अभ्यास करावा लागला.

अस्त्राखानला गेल्यानंतर बोट सोडून या मंडळींनीं रेल्वेनें प्रवास सुरु केला. रोस्तोव, खारकोव हीं शहरें पाहून एक महिन्यानें हे लोक मॉस्कोला परत आले.

मार्कों हे विद्यालयांतले अत्यंत मेहनती विद्यार्थी होते, आणि म्हणूनहि त्यांना जास्त मान मिळे. पुढच्या वर्षीं ७ नोव्हेंबरला क्रान्तीच्या वाढदिवस-महोत्सवादिवशीं ते मिरवणूक व लष्करी साधनांची परेड पाहण्यासाठीं लाल चौकांत गेले तेव्हां तिथें त्यांना आणखीहि नव-नवीं हत्यारें दिसलीं. ७०० लढाऊ विमानांनीं आकाश झांकाळून गेलें होतें. मागच्या खेपेला पुष्कळशा हत्यारांचीं नांवेंसुद्धां ठाऊक नव्हतीं, पण आतां त्यांचें यांविषयींचें ज्ञान पुष्कळच वाढलेलें होतें, म्हणून सोविएत सामर्थ्याच्या या जबरदस्त प्रदर्शनामुळें त्यांना खूपच संतोष व आनंद वाटत होता.

थंडीच्या दिवसांत आतां सारें लक्ष त्यांनीं अभ्यासावर एकवटलें होतें. हिंदी प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठीं त्यांना वारंवार पौर्वात्य विद्यापीठांत जावें लागे. ते हीं सगळीं कामें मन लावून पण भराभर करीत होते; कारण पुढच्या वर्षीं (१९३३ सालीं) वसंत ऋतूंत त्यांना हिंदुस्थानकडे परतावयाचें होतें.

## हिंदुस्थानकडे प्रस्थान (एप्रिल १९३३)

या सुमारास बाबा गुरुमुखसिंह मॉस्कोला येऊन पोंचले होते. हिंदुस्थानांत

जाऊन काय काय करायचें याविषयीं त्यांच्या वाटाघाटी होत असत. एप्रिल महिन्यांत बाबा गुरुमुखसिंहांसमवेत ते रेल्वेनें ताश्कंदवरून स्तालिनाबादला आले. आतां ते पामीर पठाराच्या प्रदेशांत होते. एकीकडून काश्मीर व दुसरीकडून अफगाणिस्तान अशा दोन्ही देशांच्या हद्दी पामीरच्या हद्दीला येऊन मिळालेल्या होत्या. प्रथम अफगाणिस्तान आणि नंतर स्वतंत्र जमातींचे प्रदेश ( दागिस्तान ) या मार्गानें त्यांना हिंदुस्थानमध्यें परत यावयाचें होतें.

रस्ता वेडावांकडा होता. अजून बर्फ पुरतें वितळलेलें नव्हतें. एका शीख वाटाड्यासह चार दिवस चालल्यानंतर ते अमूदर्या नदीच्या कांठीं आले. नदीचें पाणी फारच गार होतें, आणि धारेला ओढहि जबरदस्त होती. अफगाणिस्तानच्या सैनिकांची नजर चुकवून या पाण्यांतून एका ठिकाणीं पलीकडलें तीर गांठावयाचें होतें. पृथ्वीसिंह पखाल छातीशीं धरून हातानें नदीपार होऊं लागलें तेव्हां गारठ्यामुळें त्यांचें शरीर अगदीं बधिर झालें. गुरुमुखसिंह घोड्याचें शेंपूट धरून नदीपार होत होते. शेंपूट तुटलें आणि ते धारेंतून वाहात चालले. याच वेळीं वाटाड्या त्यांच्या मदतीला येऊन पोंचला नसता तर त्यांची शंभर वर्षें भरलींच असतीं.

नदी ओलांडल्यावर ते रातोरात पुढें चालूं लागले. केस आणि दाढी वेष लपविण्याच्या कामीं कितीदां तरी धोका देते; पण बाबा गुरुमुखसिंहांनीं आपल्या शीख सोबत्याला केस कापून टाकण्यास नाहीं सांगितलें. हे तिघे त्या डोंगराळ व जंगली प्रदेशांतून वीस मैल चालत गेले. त्याच वाटेनें एक पोलिस पार्टी चालली होती. त्यांना संशय आला आणि त्यांनीं या तिघांना अटक केली. चौकशीच्या वेळीं तिघांनीं सांगितलें--आम्ही हिंदी व्यापारी असून व्यापारासाठीं सोविएत प्रदेशांत गेलों होतों पण बोल्शेविक अधिकाऱ्यांनीं आम्हांला पकडलें. आम्ही मोठ्या मुष्किलीनें त्यांच्या तावडींतून सुटून इकडे पळून आलों आहोंत.'' अफगाण पोलिसांना त्यांचें हें सांगणें खरें वाटलें आणि एक माणूस बरोबर देऊन त्यांनीं त्यांना फैजाबादला पाठवून दिलें. फैजाबादेंत त्यांनीं १०-१५ दिवस मुक्काम केला. तिथें त्यांना सोविएत ताजिकिस्तानहून पळून आलेले कित्येक श्रीमंत शेतकरी भेटले. यांचीं घरेंदारें पिकें जाळून यांना पळवून लावण्यांत आलें होतें. हे सारे सोविएत-सत्तेचे कट्टे विरोधक होते; कारण आतां त्यांना गरिबांच्या रक्ताचें शोषण करतां येत नव्हतें. या सोविएत-विरोधकांमध्यें कित्येक रशियन व यहुदीहि होते. या लोकांनीं प्रथम आपले कपडे व इतर सामानसुमान विकून गुजराण केली आणि मग ते बाजारांतून भीक मागत हिंडूं लागले. या पळपुट्यांची संख्या थोडी होती तोंपर्यंत अफगाण पोलिस त्यांना भीक

मागायलाहि मोकळीक देत होते. पण आतां त्यांची संख्या वाढूं लागलेली पाहून त्यांनीं एक निराळीच युक्ति अंगिकारलेली होती. अफगाण शिपाई या पळपुट्यांना एकत्र करून त्यांना अफगाणिस्तान, काश्मीर व ताजिकिस्तान या तीन सरहद्दीं-लगतच्या कुणाच्याच ताब्यांत नसलेल्या पामीरच्या निर्जन भागांत नेऊन सोडून देत असत. तिथें त्यांच्यावर काय काय प्रसंग ओढवत असतील ते त्यांचे त्यांनाच ठाऊक. नारायणदासांना ( आतां पृथ्वीसिंहांनीं हें नांव घेतलेलें होतें. ) एके दिवशीं अफगाण शिपाई असाच पळपुट्यांचा जमाव पामीरकडे घेऊन जाण्याच्या तयारींत असलेले दिसले. यांत एक रशियन तरुणी होती व दोन चार तासांपूर्वींच ती बाळंतीण झालेली होती. आणि अशाच स्थितींत तिला ह्या जमावाबरोबर जाण्याचा हुकुम मिळालेला होता. तिथल्या घाणेरड्या सराईंतून आपलें तान्हें मूल पोटाशीं धरून ही तरुणी निघाली. तिच्या कपड्यांतून अजूनहि रक्तस्राव होत होता. हा प्रकार पाहून नारायणदासांना आश्चर्य व दुःख वाटलें. वैयक्तिक स्वार्थासाठीं माणूस किती पतित होऊं शकतो आणि किती हाल-अपेष्टा सहन करण्यास तयार होतो याचें हें एक चांगलें उदाहरण होतें. जरा उशीर लावल्याबरोबर अफगाण शिपाई या लोकांना फटके लगावीत होते.

फैजाबादहून नारायणदास, बाबा गुरुमुखसिंह व हुकुमसिंह यांना खाना-बादकडे पाठविण्यांत आलें. तिथें हुकुमसिंहाच्या एका ओळखीच्या इसमानें जामीन भरला व तिघांची सुटका झाली. वीस दिवसांच्या आंत तिघांनीं काबूल शहरीं गव्हर्नरसमोर हजर झालें पहिजे या अटीवर त्यांना पोलिसांनीं सोडून दिलें होतें. हुकुमसिंह ताजिकिस्तानचा रहिवासी होता म्हणून तो तिकडे परत गेला. बाकीचे दोघे एक घोडा व एक खेचर घेऊन काबूलकडे दौडत निघाले ! काबूल एक दिवसाच्या वाटेवर राहिल्यानंतर त्यांनीं घोडा व खेचर विकून टाकलें.

जुलै अगर ऑगस्ट महिना असेल तो. दोघे काबूलला पोंचले. २० दिवसांत हजर न झाल्यास पोलिस पुन्हां आपल्याला सतावतील, म्हणून त्यांनीं एक वाटाड्या बरोबर घेऊन अफगाणिस्तानची वाट धरली. दुसऱ्या दिवशीं ते एका डोंगराच्या कडेकडेनें नदीकांठावरून चालले असतां लष्करी चौकीवाल्यांना संशय आला आणि त्यांनीं त्यांना पकडलें. तिथूनहि त्यांनीं कशीबशी आपली सुटका करून घेतली. पण सरळ मार्गानें जाण्यांत धोका होता. वाटाड्याला त्यांनीं जास्त पैसे दिले व तो त्यांना डोंगर ओलांडून आडरानांतून घेऊन जाऊं लागला. पण तिथून पुढें जाण्यास कुठें रस्ताच सांपडेना. त्यांत पुन्हां उघड्या

बोडक्या तापलेल्या डोंगराचा उष्मा व तहानेचा त्रास त्यांना इतका झाला कीं त्यांना तिकडून परत फिरावें लागलें. रात्रीं ते जलालाबादच्या सडकेनें निघाले. एक चौकी ओलांडल्यावर त्यांनीं टांगा केला. पायींच चालले असते तर पोलिसांना संशय नसता आला. पोलिसांनीं त्यांना पकडून त्यांची कसून झडती घेतली. हजार रुपयांचें सोनें व जे कांहीं किरकोळ पैसे त्यांच्याजवळ मिळाले ते सारे पोलिसांनीं गडप केले आणि उडाणटप्पूच्या आरोपावरून त्यांना कच्च्या कैदेंत रवाना केलें.

★

(१२)

## काबूल जेलमधील नरकयातना

काबूल जेलचा सुपरिंटेंडंट व पोलिसांचा प्रमुख अधिकारी गुरुमुखसिंहांवर अगोदरपासूनच दांत धरून होता. आतां त्याला चांगला मोका मिळाला. पृथ्वीसिंहांना काय काय यातना सहन कराव्या लागल्या त्यांची हकीकत त्यांनीं 'बाँबे सेंटिनल' पत्राच्या ता. १४ व १५ जून १९३८ च्या अंकांत लिहिली आहे, ती त्यांच्याच शब्दांत पुढें देतों:

"धाडशी तरुणाला केवळ शौर्य व शाबासकीचा आनंद मिळविण्यासाठीं स्वतःला धोक्यांत घालून घेणें आवडतें. पण आम्ही दोघे [पृथ्वीसिंह व गुरुमुखसिंह] तरुणहि नव्हतों आणि तारुण्याची धुंदीहि आम्हांला आलेली नव्हती. आम्ही परिस्थितीपुढें हात टेंकून अफगाणिस्तानच्या पहाडी जंगलांत अडकून पडलों. १९२३ च्या जून महिन्याच्या कोणत्या तरी तारखेला जेव्हां आम्ही या धोकेबाज रस्त्यावर पाऊल टाकलें तेव्हां आमच्या मनाला एकच ध्यास लागून राहिलेला होता: हिंदुस्थानांत जावें, तिथल्या कामगार जनतेच्या स्वातंत्र्यासाठीं ज्यांनीं आपलें सर्वस्व पणाला लावलें आहे, त्यांच्यापुढें आपले अनुभव सादर करावेत व ते सांगतील तें काम पतकरावें'...हिंदुस्थानकडे येण्याचे सारे रस्ते आम्हांला वर्ज्य होते. म्हणूनच आम्हांला हिंदुकुश पर्वताच्या बर्फमय शिखरांना वळसा घालून हिंदुस्थानकडे जाण्याचा रस्ता शोधणें भाग पडलें.

"डक्का येथें चाळीस दिवस अटकेंत राहिल्यावर मुख्य प्रधानाच्या खास हुकुमानुसार आम्हांला १६ हत्यारबंद सैनिकांच्या पाहऱ्यांत मामांखेल (काबूल)

जेलमध्यें पाठविण्यांत आलें. आम्हां दोघांना ज्या लॉरींतून नेण्यांत येत होतें तींतच हे सोळा शिपाईहि होते. लॉरी काबूलच्या बाहेरच्या वेशीलगत वेळेच्या जरा अगोदरच पोंचली. म्हणून तिला पुढें जाण्याची परवानगी मिळाली नाहीं. सूर्यास्ताच्या सुमारास शिपयांना लॉरींतून खालीं उतरण्याचा हुकुम मिळाला आणि ते भरलेल्या बंदुका घेऊन आमच्यापासून पन्नास यार्डावर उभे राहून आपसांत वाटाघाटी करूं लागले. आम्हांला गोळ्या खाव्या लागतील अशी आशा वाटत होती पण आम्हांला निराश व्हावें लागलें. सहा शिपायांना लॉरींत चढण्याचा हुकुम मिळाला. ते रायफली खालीं ठेवून लॉरींत आडवे झाले. लॉरी निघाली आणि थोड्याच वेळांत आम्ही काबूल सेन्ट्रल जेलमध्यें दाखल झालों.

"तुरुंगांत शिरतांक्षणीं कॉमरेड गुरुमुखसिंह ओरडून म्हणाले—'जिन्दादा–गोर'.(आपण जिवंत गाडले गेलों). तुरुंगामध्यें आम्हांला सूडबुद्धीनें वागविण्यांत येऊं लागलें. त्यावरून आमची खात्री झाली कीं आम्ही इथून जिवंत बाहेर पडणें शक्य नाहीं. जेल सुपरिंटेंडंट हा शहराचा कोतवालहि होता. तो आमची वाटच पाहात होता. आम्ही येतांक्षणीं त्यानें तुरुंगांतल्या इतर अधिकाऱ्यांना व शिपायांना सांगितलें —'अफगाणिस्तानच्या या दुष्मनांजवळ इतर कुणी कैदी अगर शिपाई नुसता फिरकला तर त्याला बेदम फटके मिळतील. आणि हे जर कुणाजवळ गेलेले दिसले तर यांना खूप मार मिळेल.' आम्हांला आमच्या कोठडीमध्यें पोंचविण्यांत आलें. तिला एकच दार होतें, आणि तेंहि जेलरच्या ऑफिसांत जाण्यासाठीं होतें. जेलरचें ऑफिस हेंच त्याचें राहण्याचें घरहि होतें.

"आम्ही काबूलला येऊन चार दिवस झाले येवढ्यांत एका अफगाण तरुणानें काबूल शहरांतील ब्रिटिश वकिलाच्या कचेरीवर गोळी झाडली. कारस्थानी इंग्रजांनीं तडकाफडकीं या घटनेचा संबंध आमच्याशीं जोडून दिला आणि अफगाण सरकारवर दडपण आणलें. पण अफगाण सरकारनें आम्हांला इंग्रजांच्या स्वाधीन करण्याचें नाकारलें. मात्र इंग्रज सांगतील त्याप्रमाणें आम्हांला वागविण्यास अफगाण सरकार तयार होतें.

"अफगाण सरकारनें आपला शब्द पुरेपूर खरा करून दाखविला आणि असें सिद्ध करून दिलें कीं अफगाणिस्तानच्या सरकारकडून भारतीय क्रांतिकारकांनीं कोणत्याहि प्रकारच्या दयेची आशा करतां कामा नये. डॉक्टरची मदत आम्हांला मिळत नव्हती. अफगाणिस्तानांतल्या अगर हिंदुस्थानांतल्या आमच्या मित्रांना पत्रें लिहिण्याचाहि आम्हांला हक्क नव्हता. अफगाण बादशाह अगर मंत्री अगर जेल सुपरिंटेंडंटकडे कसलेंहि अपील आम्हांला करतां येत

नव्हतें......जेल सुपरिंटेंडंटनें आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना व इंग्रजांना अशी हमी दिली होती कीं 'जिथें या लोकांना डांबून ठेवलें आहे तिथें पाखराला देखील शिरकाव करून घेतां येणार नाहीं...'

"सरंजामशाहीच्या अमलाखालील देशांत क्षुल्लक चुकीबद्दलसुद्धां माणसाला अटक होते. प्रथम त्याला खूप मार मिळतो. आपला सारा पैसाअडका अगर आपल्याजवळ जी कांहीं मालमत्ता असेल तिच्यांतला बराच मोठा हिस्सा दिल्यावर मगच हा मार बंद होतो. कैद्याला आपली धनसंपत्ति अटक करणाऱ्याच्या नजरेआड लपवून ठेवतां येत नाहीं. तिचा पत्ता कसा लावावा हें या शांततेच्या व सुव्यवस्थेच्या ठेकेदारांना ठाऊक असतें. कैद्याला खाणें व कपडालत्ता कांहींएक मिळत नाहीं. त्यांत पुन्हां त्याचे आप्तेष्ट त्याच्या समाचारासाठीं जेलच्या दाराशीं आले म्हणजे त्यांच्या चेहरेपट्टीवरून, त्यांनीं आणलेल्या खाद्यपदार्थांच्या स्वरूपावरून, अंथरुण पांघरुणावरून, कैदी श्रीमंत आहे कीं नाहीं याचा ते अंदाज घेतात. आणि मग जेलच्या लोकांना जोंपर्यंत दक्षिणा मिळत राहील तोंपर्यंतच कैद्याला खाणें व कपडा-लत्ता देखील मिळत राहतो.

"अटक केल्यानंतर लगेच पांच सात शेर वजनाच्या बेड्या कैद्याच्या पायांत घालतात. खटला स्थानिक काजीसमोर जातो आणि निकाल तर कित्येक महिने अगर वर्षानुवर्षे लागत नाहीं. निकाल लवकर लागावयाचा का उशीरां, हें कैद्याच्या थैलीवर अवलंबून असतें.

"शिक्षा झाल्यावर कैद्याला एखाद्या लहान अगर मोठ्या तुरुंगांत पाठविण्यांत येतें. वाहनाची कांहींच सोय नसते, म्हणून कैद्याला बेड्यांसकट हा सारा प्रवास पायींच करावा लागतो. कैदी पैसेवाला असेल तर त्याला आपल्या बरोबर आलेल्या शिपायांनाहि खाऊं घालावें लागेल, नाहींतर स्वतः उपाशीं राहावें लागेल. कैद्याजवळ जर कांहींच नसेल तर दर मुक्कामाला त्याला रस्त्यावर भीक मागत हिंडावें लागेल. तुरुंग लहान असो अगर मोठा असो, तिथें पोंचल्यावर जेलर व शिपायांना कैद्यानें नियमितपणें दक्षिणा देत राहिलें पाहिजे, नाहीं तर तुरुंगांतून जिवंत बाहेर पडण्याची आशा सोडून द्यावी लागेल.

"पायांत बेड्या घालणें ही तिथें शिक्षा समजत नाहींत. सगळ्यांत क्रूर शिक्षा म्हणजे शारीरिक शिक्षा असते. चार तगडे इसम कैद्याचे हातपाय ताठ करून त्याला उचलून अधांतरीं ठेवतात. मग दोन तगडे लोक हातांत वेत व चाबूक घेऊन येतात. दुसरें कांहीं नच मिळालें तर पठाणांचे मोठे चप्पल घेऊन येतात. माराचा हिशोब कांहींच नसतो. कैद्याचा ओरडाआरडा बंद होईपर्यंत

अगर त्याची शुद्धि नाहींशी होईपर्यंत मार चालू राहतो. मग तशाच बेशुद्ध अवस्थेंत त्याला एक तर पाण्यांत टाकून देतात, अगर तिथेंच औषधपाणी वगैरे कांहीं एक न देतां त्याच्या नशिबावर हवाला ठेवून पडूं देतात.

"शारीरिक शिक्षेच्या बाबतींत लेखी हुकुम कसलाच नसतो. कोणत्या गुन्हेगाराला शारीरिक शिक्षा करावी, कोणाला करूं नये, या विषयीं नियम कसलेच केलेले नसतात. हें सारें तिथें हजर असलेल्या अधिकाऱ्याच्या मर्जीवर अवलंबून असतें. शिपाई कैद्याला फटके मारूं शकतो, हवालदार शिपायाला फटके मारूं शकतो. आणि कॅप्टनसारख्या अधिकाऱ्याला मेजरच्या हातचा छडीमार खातांना आम्ही आमच्या डोळ्यांनीं पाहिला आहे.

"...जर कुणा कैद्याला कुणी मदत करणार नसेल तर त्यानें आपली हकीकत लिहून अधिकाऱ्याकडे द्यावी लागते. अधिकारी दयाळू असेल तर तो कैद्याला एक अर्धवट भाजलेली पठाणी रोटी सकाळीं व संध्याकाळीं देईल. आमटी भाजीचा तर प्रश्नच नाहीं. रोटीचें वजन दाखवितात सहा छटाक, पण तें कधींच तितकें नसतें. ती भाजलेली असते नांवापुरतीच. कणकेचा गोळा जरा दाबून रोटाच्या स्वरूपांतहि कैद्याला दिला जातो. जर गरीब कैद्याला रोटी देण्याची कृपा जेलरनें केली नाहीं, तर श्रीमंत कैद्यांची सेवाचाकरी करून त्यांच्या उष्ट्या खरकट्यावर गुजराण करणें या एकाच मार्गानें त्याला खाण्याची तरतूद करतां येते.

"काबूल शहराच्या चारी अंगांना वाहणाऱ्या नाल्यांतूनच कैद्यांना पाणी मिळूं शकतें. या उघड्या घाणेरड्या नाल्यांमधून जें पाणी वाहतें तें अंघोळ, कपडे धुणें व पिण्यासाठीं वापरावें लागतें. जवळच्या एका खेड्याकडून आलेला असाच एक नाला जेलच्या आवाराजवळून जातो. नाला दोन फूट रुंद व दीड फूट खोल आहे. कुणी विशेष लक्षपूर्वक पाहिलें तरच त्यांतलें पाणी वाहात असलेलें कळतें. त्यांतून साऱ्या गांवची घाण आलेली असते. मग त्यांतच सुमारें हजार कैद्यांची आंघोळ व धुणीं होतात. त्यानंतर नाल्याचें पाणी माणसाला पिण्यायोग्य कसें राहणार ?...एक पेलाभर पाणी घेऊन पाहिलें तर त्यांत चार पांच उवा नक्कीच सांपडतील.

"कैद्यांकडून काम हिंदुस्थानांतील जेलांतल्याप्रमाणेंच करून घेण्यांत येतें. मात्र त्याला नियम कसलाच नसतो...

"कैद्याला तुरुंगांत आपले नेहमींचे कपडे वापरावे लागतात. अंगांत त्राण नाहीं, त्यांत हीं अशीं लक्तरें, ही कैद्यांची कंगाल अवस्था पाहून काळजाचें

पाणीपाणी होतें. थंडीच्या दिवसांत गरीब कैद्यांना कपड्यांची तरतूद करण्यासाठीं परेड होते.

"या परेडसाठीं फारच थोड्या लोकांची निवड होते. आणि त्यांतसुद्धां फक्त असेच लोक घेतात कीं ज्यांच्या बाबतींत नीट कपड्यालत्त्याची तरतूद न झाल्यास ते जास्त दिवस जिवंत राहणें शक्य नाहीं अशी खात्री झालेली असते. या अभागी लोकांपैकीं कुणी मेला कीं त्याचे कपडे न धुतांच इतर मर्जीतल्या कैद्यांना देण्यांत येतात.

"हेड क्लार्क, जेलर व असिस्टंट जेलरनें कपड्यांची जरूर असलेल्या कैद्यांच्या यादींत आम्हां दोघाचींहि नांवें लिहून दिलीं. केवळ दयाबुद्धीनें प्रेरित होऊन त्यांनीं हें काम केलें. पण सुपरिंटेंडंटनें आमचीं नांवें वाचतांच तो नांवें लिहणाऱ्यांना खूप शिव्या देऊं लागला. पंधरा दिवसांनीं दुसरी यादी तयार करण्यांत येत होती. हेड क्लार्कनें पुन्हां आमचीं नांवें लिहून दिलीं. या वेळीं बिचाऱ्याला खूप मार पडला.

"अत्यंत धोकेबाज राजकीय कैद्यांखेरीज बाकीच्या साऱ्या कैद्यांना एकाच बराकींत कोंबून भरण्यांत येतें. केवळ एका कोठडींत दहा कैदी कोंबलेले मी स्वतः पाहिले होते. त्यांचा अपराध येवढाच होता कीं ते सोविएत भूमीवरून अफगाणिस्तानांत पळून आले होते. ही कोठडी १० फूट रुंद, १२ फूट लांब व १४ फूट उंच होती. चोवीस तास त्यांना याच कोठडींत डांबून पडावें लागत होतें. कोठडीचा दरवाजा नेहमीं बंद असे व एक लहानशी खिडकी उघडी असे..................

"जो कोणी कसल्या ना कसल्या तरी प्रकारचें दडपण आणील त्याचीच वेळेवर सुटका होऊं शकते. नाहीं तर शिक्षेची मुदत पूर्ण झाल्यानंतर कित्येक महिनेपर्यंत कैद्याला सोडण्याचा विचारच केला जात नाहीं.

"आम्हां दोघांना जेलमध्यें फारच क्रूरपणें वागविण्यांत येत होतें. त्यामुळें आमच्या तब्येती ढांसळूं लागल्या. अफगाणिस्तानाबाहेरच्या राजकीय संस्थांशीं संबंध जुळेपर्यंत कसेंहि करून जिवंत राहावयाचें अशी आमची खटपट चाललेली होती. पण जेलच्या अधिकाऱ्यांचे अमानुष अत्याचार सहन करणें शक्य नाहीं हें पाहून आम्हांला अन्नत्याग करणें भाग पडलें.

"पण याचा जेलच्या अधिकाऱ्यांवर काडीइतकाहि परिणाम झाला नाहीं......कुणी डॉक्टरहि आला नाहीं, अगर कुणी सरकारी माणूसहि आमच्या कोठडींत आमची भेट घेण्यासाठीं आला नाहीं. पण बाबा गुरुमुखसिंहांचें म्हातारपण आणि आमचे असे हाल पाहून पाहरेवाल्या शिपायांचीं अंतःकरणें हळू हळूं विरघळूं लागलीं........

"एके दिवशीं तुरुंगाचे अधिकारी साऱ्या शिपायांना घेऊन कसल्या तरी कामांत अगदीं गढून गेलेले आम्हाला दिसले ......

"तीन सोट फाशीच्या चौकटीसारखे उभे करण्यांत आले. वरून एक दोर लटकत होता. साऱ्या कैद्यांना वाटलें कीं आतां या दोन हिंदूंचा निकाल लागणार ......पण ही तयारी आमच्यासाठीं नव्हती.

"जेलचें मोठें फाटक खुलें झालें. चांगला पोशाक असलेले पांच प्रतिष्ठित इसम आंत येत असलेले आम्हाला दिसले. त्यांच्या चेहऱ्यांवर स्वाभिमान व सरदारी रुबाब दिसत होता. आपल्याला कोठें घेऊन जात आहेत हें त्यांना ठाऊक नव्हतें. डावीकडे वळून पाहतांच त्यांना फांशीची चौकट दिसली......अत्यंत शांत व गंभीर वृत्तीनं त्यानीं पाणी मागितलें, मग हातपाय धुवून ते शेवटचा नमाज पढूं लागले.

"हे पांचहि इसम अमानुल्लाच्या पुरोगामी अमदानींत अफगाणिस्तानचे मोठमोठे मंत्री होते हें आम्हांला लवकरच कळलें. आपली शक्य तितक्या लवकर या यातनांतून सुटका व्हावी म्हणून या सर्वांनींच फांशीच्या चौकटीकडे जाण्याची घाई चालविलेली होती. पण त्यांना त्यांचें वय व दर्जाला अनुसरून फांशी जावें लागलें. ६० वर्षांपेक्षां अधिक वयाचा माजी मंत्री आझम याला प्रथम फांशी जावें लागलें. पहिल्या फेरींतील तिघांपैकीं एकाच्या मानेला फांस नीट बसला नाहीं. वीस मिनिटें तडफडल्यानंतर मग त्याचा प्राण गेला. हें हृदयद्रावक नाटक जिथें चालू होतें ती जागा आमच्या कोठडीपासून फार फार तर २५ यार्ड दूर असेल. म्हणून हें सारें दृश्य आमच्या स्मृतिपटावर चांगलें ठसून राहिलें...... आझमचें प्रेत सारा दिवस तसेंच लोंबकळत राहिलें. कारण त्याच्या मागें त्याची एक म्हातारी बायकोच तेवढी जिवंत राहिलेली होती; इतर सारे आप्तेष्ट एक तर फांशी गेले होते अगर कैदेंत होते.

"नादिरखानानें अशा प्रकारें आपल्या मार्गांतील सारे कांटे दूर केल्यानंतर त्याला असें वाटलें कीं आतां आपली गादी सुरक्षित राहील. पण आणखी कांहीं दिवस लोटले नाहींत तोंच एका गोळीनें त्याचाहि निकाल लागला. ज्या तरुणानें हें काम केलें त्याला सरंजामशाही अमदानींतल्या साऱ्या यातना भोगाव्या लागल्या आणि शेवटीं त्याला जाहीर रीतीनें फांशी देण्यांत आलें. ज्या जागीं या तरुणाची कत्तल झाली ती आम्हांला आमच्या खिडकींतून दिसत होती. डोकें मारण्यापूर्वीं या असहाय तरुणाशीं प्रमुख प्रधानांनीं अत्यंत क्रूर वर्तन केलें. चाकूनें त्याचें नाक व कान कापण्यांत आले.........!

" थंडीचे दिवस होते. उष्णतामान शून्याखालीं २०–२५ अंश गेलेलें होतें. खिडकी व दरवाजाच्या चौकटींच्या फटींतून गार वारा येऊन आमच्या अंगाला झोंबत होता. चिंध्या, दोऱ्या, लोकर व कापसानें आम्ही या फटी बंद करण्याचा प्रयत्न केला, पण तें कांहीं जमेना. शेवटीं आम्ही भुईवरची माती खरडून ती पाण्यांत कालवून तिनें या फटी बंद केल्या. अशा प्रकारें हाडापर्यंत झोंबणाऱ्या गार वाऱ्यापासून आम्ही आमचा बचाव करून घेतला.

" अफगाण सरकारनें आम्हांला फांसावर न चढवतांच जिवें मारण्याचा बेत केलेला होता. बाहेरच्या जगाशीं आमचा कसलाहि संबंध येऊं नये अशी पक्की तरतूद करण्यांत आली होती. एकीकडे सर्व साधनांनीं सज्ज असें संघटित सरकार व दुसरीकडे दोन असहाय्य, बेड्यांनीं जखडलेले, कडक पहाऱ्यांत बंदिस्त असलेले कैदी,— असा हा सामना होता. आम्ही अफगाण सरकारचें नाक खालीं करण्याचा निश्चय केला होता."

## नरकयातनांतून सुटका

पृथ्वीसिंह व गुरुमुखसिंहांच्या नरकयातना पाहून त्यांच्यावर पाहरा करणाऱ्या शिपायांचींहि अंतःकरणें विरघळूं लागलीं. त्यांच्या कोठडीचा दरवाजा जेलच्या ऑफिसला जोडलेला होता. जेलरचा एक तरुण आप्त पुष्कळदां तिथें येत असे. हा जेलरच्या बायकोचा प्रियकरहि होता. हळू हळू या तरुणावर या दोघां हिंदी कैद्यांचा प्रभाव पडूं लागला. त्याचीहि समजूत अशी झाली कीं या दोघां हिंदूंना मंत्रतंत्राचें ज्ञान पुष्कळच आहे. त्यानें आपली मनकामना पूर्ण होण्यासाठीं पृथ्वीसिंहांजवळ एक ताईत मागितला. पृथ्वीसिंहांनीं त्याला सोविएत राज्याचें लाल ताऱ्याचें चिन्ह कागदावर काढून दिलें. अशाच प्रकारें एक दोन दिवसांनीं या दोघांच्या दुःखाची करुण कहाणी सोविएत वकिलातींत पोंचली आणि मग कॉमिन्टर्नला ही हकीकत कळून साऱ्या दुनियेच्या कोनाकोपऱ्यांत तिचे पडसाद उमटले. साऱ्या जगभर जबरदस्त चळवळ होऊं लागली. अफगाण सरकारकडे तारांवर तारा येऊं लागल्या. अमेरिकेच्या एका बॅरिस्टरनें राजबंद्यांचा खटला चालविण्यासाठीं काबूलला येतों असें कळविलें.

अफगाण सरकारची सर्वत्र बदनामी होऊं लागली. जेल सुपरिंटेंडन्टनें हाताखालच्या अधिकाऱ्यांना व पहाऱ्यावरच्या शिपायांना विचारलें—"या हिंदी कैद्यांनीं लिहिलेलीं पत्रें हिंदुस्थानला व लंडनला कशीं पोंचलीं?" कांहीं अधिकारी उत्तरले—"साहेब! हे काफर मोठे जादुगार आहे."

४ जुलै १९३४ रोजीं भल्या पहांटेलाच तुरुंगाचा दरवाजा उघडला व या दोघांना झोंपेंतून जागें करण्यांत आलें. काबूलच्या विमान तळावर सोविएत विमान त्यांची वाट पाहात होतें. त्यांत बसून दोघेहि पुन्हां सोविएत भूमींत पोंचले. अफगाण सरकारचा पहिला बेत असा होता कीं त्यांना पामीरच्या पठारावर कुठें तरी निर्जन ठिकाणीं सोडून द्यावें म्हणजे परदेशांतले गुंड त्यांचा निकाल लावतील. इंग्रजांनींहि यांना आपल्या स्वाधीन करण्यांत यावें अशी जोराची मागणी चालविलेली होती. अमेरिकेच्या गदर पार्टीनें असा आग्रह धरला कीं ज्या अर्थीं हे दोघे कोणत्याच सरकारचे प्रजाजन नाहींत त्या अर्थीं सोविएत सरकारनेंच त्यांची जबाबदारी पतकरावी आणि सोविएत सरकारनेंच त्यांची जबाबदारी पतकरली.

★

# (१३)

## सोविएत भूमींतून परत हिंदुस्थानांत

सोविएत विमानानें त्यांना त्याच दिवशीं ताश्कंद शहरीं नेलें. तिथून दोन दिवसांनीं ते मॉस्कोकडे रवाना झाले. दोघेहि पुष्कळच अशक्त झालेले होते,— मृत्यूच्या दाढेंतून मरतां मरतां वांचले होते. त्यांना सायबेरियाच्या एका आरोग्य-भुवनांत १०-१२ दिवस ठेवण्यांत आलें. मग एक महिनाभर क्रायमियामधील आरोग्यसंवर्धक शहर याल्ता येथें त्यांना ठेवण्यांत आलें. त्यांनीं १९३४ सालचा नोव्हेंबर क्रांतीचा वाढदिवस महोत्सव पुन्हां मॉस्कोच्या लाल चौकांत पाहिला. या प्रसंगीं पृथ्वीसिंह एक सन्माननीय पाहुणे या नात्यानें बसून लाल सेनेचें प्रदर्शन पाहात होते. मागच्या तीन वर्षांत लाल फौजेनें कुठून कोठपर्यंत प्रगति केली हें त्यांना चांगल्या प्रकारें ठाऊक होतें.

### हिंदुस्थानकडे रवाना

आतां पृथ्वीसिंहांनीं हिंदुस्थानला जाण्याचा निश्चय केला. या प्रसंगीं प्रवास जास्तच कठीण होता. अफगाणिस्तानांत अटक होण्याच्या पूर्वी पृथ्वीसिंह कुठें आहेत हें इंग्रज सी. आय. डी. खात्याला ठाऊकच नव्हतें. काबूलच्या तुरुंगात इंग्रज सरकारच्या दडपणामुळें या दोघांचा फोटो घेण्यांत आला व अंगावरील साऱ्या खाणाखुणा टिपून घेण्यांत आल्या.

हिंदुस्थानांत दर ठिकाणीं त्यांच्या स्वागतासाठीं सी. आय. डी. वाले तयारच होते. तरीहि पृथ्वीसिंहांना हिंदुस्थानला जाणें आवश्यकच होतें. त्यांनीं एक पासपोर्ट तयार करविला. तो दिसावयाला अस्सल असला तरी होता नकलीच. त्यांत एक सगळयांत मोठी चूक अशी झाली कीं त्यांचें वय ४३ लावण्याऐवजीं २७ लावण्यांत आलें होतें. आणि त्यांतली उरलीसुरली कमतरता परदेशी बोटीवरच्या एका अधिकाऱ्यानें पूर्ण केली. त्यानें त्या पासपोर्टवर "रशियांतून ओदेसा बंदराहून पुढें रवाना" असा शेरा ठोकून दिला!

असा पासपोर्ट घेऊन पृथ्वीसिंहांना ब्रिटिश हिंदुस्थानांत कुठेंहि सुरक्षितपणें उतरतां आलें नसतें. पृथ्वीसिंह डिसेंबरात एका इटालियन बोटींतून मार्सेलिस (फ्रान्स) ला रवाना झाले. नेपल्स येथें फॅसिस्ट पोलिसांनीं त्यांना टोंगलें व सांगितलें-"हा कुणी कम्युनिस्ट दिसतोय." पण कॅप्टननें सांगितलें-"छे छे! कुणी सभ्य गृहस्थ आहे हा." आणि त्यानें त्यांची सुटका करविली. आतां बोटीनें पुढें जाणें त्यांना इष्ट वाटलें नाहीं. नेपल्सहून रोम व जीनीव्हावरून ते रेल्वेनें पॅरिस शहरीं पोंचले. ओदेसा हें नांव त्यांनीं पासपोर्टवरून खोडून टाकलें. पॅरिस शहर हा तर दुनियेंतल्या साऱ्या हेरांचा अड्डा. पृथ्वीसिंहांनीं फक्त रात्रींच भटक-भटक-भटकून फ्रान्सची ही राजधानी पाहून घेतली.

आतां त्यांना पॉंडिचरीला जाणें हा एकच सुरक्षित मार्ग दिसला. १९३५ च्या जानेवारींत एका फ्रेंच बोटींतून ते हिंदुस्थानकडे रवाना झाले. बोट कोलंबो व मद्रासलाहि लागली पण त्यांनीं किनाऱ्याकडे ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं. शेवटीं ता. २४ जानेवारी १९३५ रोजीं ते पॉंडिचरींत दाखल झाले.

## हिंदुस्थानांत

किनाऱ्यावर उतरतांक्षणीं फ्रेंच सी. आय. डी. नीं पाठलाग आरंभला. पृथ्वीसिंह हॉटेलांत शिरले. दोन सी. आय डी. पाळतीवर राहिले. पृथ्वीसिंहांजवळ हिंदी रुपये नव्हते. त्यांनीं सी. आय डी. वाल्यांना नाणीं बदलून मागितलीं. यावर त्यांच्यापैकीं एकानें सांगितलें कीं 'आम्ही चार वाजतां येऊन नाणीं बदलून देऊं.' त्याला वाटलें—" यांच्याजवळ पैसे तर नाहींत, मग जातील कुठें?" पृथ्वीसिंहांनीं किती तरी वेळ वाट पाहिली, मग बाजारांत नाणीं बदलून घेतलीं, धोतरजोडी खरेदी केली, आणि अंधार पडतांच शहराबाहेर मोर्चा हांकारला. शेतांत जाऊन झाडाखालीं थांबून त्यांनीं कपडे बदलून धोतर परिधान केलें.

कडालूरची हद्द ओलांडून ते पुढें जात होते येवढ्यांत साध्या कपड्यांतला एक माणूस त्यांना अडवूं लागला. त्यांनीं त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. पण तो माणूस त्यांना चौकीवर नेण्यासाठीं हट्टूनच बसला. सामदामाचे उपाय लागू पडेनात तेव्हां त्याच्या बाबतींत त्यांना निराळा मार्ग अवलंबणें भाग पडलें. पृथ्वीसिंहांनीं त्याला जरा आणखी जवळ येऊं दिलें आणि मग ते त्याच्यावर एकाएकीं तुटून पडले. त्याला त्यांनीं जमिनीवरून उचलून खूप जोरांत खालीं आदळलें. माणूस सशक्त व तरुण होता, तो उठून पळून जाऊं लागला. पण अशा प्रकारें त्याला सहजासहजीं जाऊं देणेंहि योग्य नव्हतें. त्यांनीं त्याचा पाठलाग करून त्याला पुन्हां पकडलें. या वेळीं त्याला मारहाण करण्याऐवजीं त्यांनीं त्याचें धोतर सोडून त्याला बांधून ठेवून त्याच्या तोंडांत बोळा कोंबण्याचा बेत केला. ते त्याच्या तोंडांत बोळा कोंबत होते येवढ्यांत तो त्यांचें बोट दांतांत धरून चावूं लागला. त्यांनीं त्याला दोन चार ठोसे लगावले, गुडघ्यांनीं ढोसलें. बोट तर तोंडांतून निघालें, पण बोटाचें चामडें सोलून निघालें व नसा तुटल्या. तितक्यांत तो माणूस धोतर टाकून नागवाच पळाला. पृथ्वीसिंहांनीं शेतांतली वाट धरली आणि धांवत धांवत दाट झाडी असलेल्या एका डोंगरांत दडी मारली. पण पोलिस आपल्या मागावर असणार हें माहित असल्यामुळें तिथें मुक्काम न करणें बरें असें त्यांनीं ठरविलें. ते सारी रात्र चालत राहिले. दिवसा कुठेंतरी झाडींत झोंप काढावी आणि रात्रीं चालावें असा त्यांनीं क्रम ठेवला. ते ब्रिटिश हिंदुस्थानांत होते. पण स्टेशनवर जाऊन तिकीट काढण्याची हिंम्मत त्यांना होत नव्हती.

पृथ्वीसिंहांच्या पायांत नवा बूट होता. तो त्यांनीं पॅरिस शहरीं खरीदलेला होता. १०० मैलांचा प्रवास शेतें, डोंगर, जंगलें तुडवीत त्यांना शक्य तितक्या लवकर संपवावयाचा होता. कित्येक वर्षांत अनवाणी चालण्याची संवय नसल्यामुळें बूट काढून चाललें कीं खडे बोंचत होते. म्हणून त्यांना बुटांसकटच धांवावें लागलें.

चालत चालत, धांवत धांवत त्यांनीं एकदांचें मद्रास शहर गांठलें. तिथें त्यांना एका ओळखीच्या गुजराती गृहस्थाचा पत्ता लागला. पण ओळख फक्त एकमेकांच्या नांवावरून होती. नोकरानें पृथ्वीसिंहांना मालकाकडे नेलें. दरिद्री दिसणारा माणूस समोर आलेला पाहून मालकाला आश्चर्य नक्कीच वाटलें असलें पाहिजे, पण त्यानें पृथ्वीसिंहांना 'बसा' म्हणून खुणेनें सांगितलें. पृथ्वीसिंह उभ्या उभ्याच म्हणाले—"मला एक ग्लासभर पाणी मागवून द्या." त्यांना तहानहि

खूपच लागलेली होती, पण त्याचबरोबर नोकरादेखत त्यांना बोलणें करावयाला नको होतें. नोकर पाणी आणावयास गेला. त्यानीं शांत स्वरांत सांगितलें—"मी स्वामीराव. येवढं तुम्हांला सांगितलं कीं पुरेसं आहे. मोठ्या मुष्कलीनं मी येथपर्यंत आलोंय. आतां पुढं जायला माझ्या अंगांत ताकद राहिलेली नाहीं. तुम्ही मला मदत करायला तयार असाल तर मीं बसतों, नाहीं तर मी दुसऱ्या कुणा तरी दोस्ताची मदत घेईन." थोडा वेळपर्यंत मालक गप्पच बसला. कसल्या तरी विचारांत तो गुंग झाला पण एक दोन मिनिटांतच त्याच्या ओठ वर स्मित झळकूं लागलें. त्यानें पृथ्वीसिंह ना खुर्चीवर बसण्यास सांगितलें.

नोकर पाणी घेऊन आला. मालकानें त्याला आपल्या प्रायव्हेट सेक्रेटरीला बोलावून आणण्यासाठीं बाहेर पाठवून दिलें. सेक्रेटरी आल्यावर मालकानें सांगितलें—" हे श्री. स्वामीराव. याचें म्हणणें ऐकून घ्या अन् हे जें सांगतील तें करा."

सेक्रेटरीला स्वामीराव नांवावरून ठाऊक होते. तो त्यांना स्वयंपाकघरांत घेऊन गेला. त्यांनीं पायांत बूट तसेच ठेवून जेवावयास बसण्याची परवानगी मागितली. एका हिंदूच्या घरांत बुटांसकट जेवावयास बसणें म्हणजे नवलाचीच गोष्ट होती. पण पृथ्वीसिंहांनीं पांच दिवसांत आपले कपडे बदललेले नव्हते. त्यांचा उजवा हात रक्तानें बरबटलेल्या चिंधीनें बांधलेला होता. नोकरांना व बायका मंडळींना असें वाटलें असणार कीं हा कुणी तरी वेडा भिकारी आहे जेवल्यानंतर त्यांना चालण्याचीहि ताकत राहिली नाहीं. इतरांच्या मदतीनें ते एका व्हिक्टोरियांत बसले. थोड्या अंतरावर गेल्यानंतर व्हिक्टोरिया सोडून देऊन त्यांनी टॅक्सी केली आणि मग ते आसऱ्याच्या स्थळीं पोंचले.

पृथ्वीसिंहांनीं आपल्या दोस्ताला सांगितलें—" अगोदर मला बदली करायला दुसरे कपडे द्या, मग माझी हजामत करवा, मग चाकू कात्री घेऊन या." सुजलेल्या पायांतून बूट काढतां येणें शक्यच नव्हतें. त्यांनीं बूट कापकापून काढले इतकेंच नव्हे तर बुटाच्या चामड्याबरोबर मांस व चामडेंहि त्यांना कापावें लागलें. अशा परिस्थितींत कुणा डॉक्टरची मदत घेणें ही त्यांना धोक्याची गोष्ट वाटत होती म्हणून त्यांनीं सारें कांहीं आपल्या हातांनींच केलें आणि मग औषध लावून पट्ट्या बांधल्या. वेदना तर फारच होत होत्या, पण कित्येक दिवसांपासून त्यांना थकवा आलेला होता, झोंपहि मिळालेली नव्हती, म्हणून अशा स्थितींतहि त्यांना झोंप लागली. पुरे सहा दिवस त्यांना जमिनीवर पाय ठेवता

आला नाहीं. सातव्या दिवशीं ते आपल्या पायांवर उभे राहिले. पृथ्वीसिंहांनीं इथें इतके दिवस राहणें म्हणजे त्यांच्या मित्राला धोक्याची गोष्ट होती. पण त्यानें धोक्याची पर्वा केली नाहीं. आतां त्या ठिकाणीं त्यांना अधिक मुक्काम करण्याची इच्छा नव्हती.

## कॉ. पी. सी. जोशी यांची मुलाखत

डॉक्टर सुब्रम्हण्यम् व श्री. सांबमूर्ति यांचा पृथ्वीसिंहांशीं राजमहेंद्री जेलमध्येंच परिचय झालेला होता. त्यांनीं या अवस्थेंत पृथ्वीसिंहांना मोठी मदत केली. चांगले बरे झाल्यानंतर १९३५ च्या मार्च महिन्यांत पृथ्वीसिंह मुंबईला आले. तिथें कॉ. मिरजकर, पाटकर, इकबाल इत्यादि कम्युनिस्ट दोस्तांची त्यांनीं भेट घेतली. पृथ्वीसिंह हिंदी कम्युनिस्ट पार्टीचे सेक्रेटरी कॉ. पूरणचंद्र जोशी यांना भेटून त्यांच्याशीं कांहीं बोलणें करूं इच्छीत होते. कॉमरेड्सनीं जागा आणि वेळ ठरवून असें सांगितलें-"तिथें एक जबाबदार माणूस येईल आणि तो तुम्हांला कॉ. जोशी यांजकडे घेऊन जाईल." कसल्या तरी कारणानें कॉ. जोशी स्वतःच तिथें हजर झाले. कॉ. जोशी यांच्याकडे घेऊन जाण्याची गोष्ट पृथ्वीसिंहांनीं काढतांच त्यांना उत्तर मिळालें, "मीच जोशी." तेव्हां पृथ्वीसिंहांना संशय आला. त्यांनीं साफ सांगितलें- "मला तुमच्याशीं बोलणं करतां येणार नाहीं याबद्दल मला फार खेद वाटतो." कॉ. जोशी यांनीं त्यांना परोपरीनें समजाविलें तरी पृथ्वीसिंह आपला हट्ट सोडीनात आणि "एक तास पुरा व्हायच्या अगोदर यांना घरांतून जाऊं देऊं. नका" असें घरवाल्यांना बजावून निघून गेले. कॉ. जोशी मोठ्याच पेचांत सांपडले; कारण त्यांच्यावरहि वारंट होतें आणि त्यांना पकडून देणाऱ्याला इनामहि जाहिर झालें होतें.

कॉमरेड्सनीं असा सल्ला दिला कीं पृथ्वीसिंहांनीं जास्त भटकतां कामा नये. सात-आठ महिनेपर्यंत ते असेच छपून राहिले आणि पार्टीचा पत्रव्यवहार सुरक्षित ठेवण्याच्या कामीं त्यांनीं मदत केली.

त्या वेळीं पृथ्वीसिंहांना त्यांचा एक मित्र दरमहा २५ रुपये मदत देत होता. आपल्या दोन क्रान्तिकारक कॉमरेड्ससमवेत मुंबईच्या एका गरीब मोहल्ल्यांत ते राहात होते. २५ रुपयांपैकीं ८ रुपये घरभाड्यांत खर्च करीत असत. २ रु. चीं वर्तमानपत्रें मागवीत असत. राहिलेल्या १५ रुपयांत तीन माणसांचें जेवण, कपडे धुणें आणि राकेलचा खर्च भागवावा लागे. अशा असह्य दारिद्र्यावस्थेंत त्यांनीं सहा महिने काढले. कम्युनिस्टांना तर मॉस्कोहून सोन्याच्या

लगडीच्या लगडी येतात असा बदनामीकारक प्रचार विरोधकांनीं ज्या वेळीं चालविलेला होता त्याच वेळीं पृथ्वीसिंह व त्यांचे कॉमरेड्स असे हालांत दिवस काढीत होते. आपल्याकडे आलेल्या कुणाहि क्रांतिकारकाला मॉस्को मनमोकळेपणानें मदत करूं शकतें; पण जनतेची क्रान्ति बाहेरून आलेल्या सोन्याच्या बळावर होऊं शकत नाहीं हें मॉस्को जाणून आहे. जनतेला क्रान्तीसाठीं शिकवून तयार केल्यानंतर जनता स्वतः आपणहूनच साऱ्या खर्चाचा बोजा आपल्या शिरांवर घेईल.

## चपराशी, दरवान व मॅनेजर

१९३५ च्या अखेरीस पृथ्वीसिंहांनीं बाहेर येण्याचें ठरविलें. कांहीं दिवस त्यांनीं एका वर्तमानपत्राच्या कचेरींत चपराशी व दरवान म्हणून नोकरी केली, मग त्यांनीं ॲल्युमिनियन वगैरे वस्तूंची एजन्सी घेतली. पार्टीची आर्थिक स्थिति तर अशी होती कीं पैसे मिळविण्याचा कांहीं मार्ग काढणेंहि तितकेंच आवश्यक होतें. पण इथें तर एका बेकायदेशीर पार्टीला स्वदेश-परदेशाशीं संबंध ठेवणेंहि आवश्यक होतें. पृथ्वीसिंहांनीं या कामांत अपार मदत केली. आतां त्यांना रात्रीऐवजीं भर दिवसा उजेडीं लोकांसमोर यावें लागत असे, पण त्यांना स्वतःच्या प्रसंगावधानाची पूर्ण खात्री होती. मुंबई शहराच्या सर्वांत मोठ्या उद्योगकेंद्रांत ते राहात होते. तिथून त्यांच्या परिचयाचे हजारों लोक जात येत असत. यांत जोखीम नक्कीच होती. पण पृथ्वीसिंहांना अशी खात्रीं होती कीं आपल्या परिचयांतले लोक वरिष्ठ व मध्यम वर्गांतलेच आहेत, आणि खालच्या वर्गाच्या लोकांमधून आपल्या ओळखीचा चेहरा त्यांना शोधून काढतां येणारच नाहीं. पण चेहरा पाहिल्याबरोबर कुणीहि जुन्या परिचयांतला माणूस त्यांना सहज ओळखूं शकला असता. मात्र मोठ्या लोकांना जिथें त्यांना सलाम देण्याइतकी सुद्धां फुरसत नव्हती, तिथें त्यांना ओळखण्याचा प्रश्नच कुठें होता?

## प्रवासी एजंट

पृथ्वीसिंहांना एका कारखान्यांत टाइमकीपरचें काम मिळालें. मॅनेजरनें त्यांचा चेहरा व बोलणें चालणें पाहिलें. हा माणूस चांगला ट्रॅव्हेलिंग ( प्रवासी ) एजंट होऊं शकेल असें त्याला वाटलें. पृथ्वीसिंहांनीं त्याचें म्हणणें मान्य केलें. आतां पृथ्वीसिंह निरनिराळ्या प्रकारच्या वस्तूंचे नमुने व ऑर्डरबुक घेऊन जागोजाग हिंडूं लागले. चाळीस दिवसांच्या पहिल्या दौऱ्यांत त्यांनीं कंपनीसाठीं

बऱ्याच ऑर्डरी आणण्यांत यश मिळविलें. मॅनेजर त्यांच्या या यशस्वी कामगिरीवर फारच खूष झाला.

एकदां ते बंगलोरमधील एका गुजराती हॉटेलांत जेवत होते. त्यांच्यासमोर दोन तरुण बसले होते. अर्धा तासपर्यंत ते टेबलाशीं बसून राहिले. एक तरुण पृथ्वीसिंहांकडे टक लावून पाहात होता. पृथ्वीसिंहांना संशय येऊं लागला, पण तरुणानें कांहींच विचारपूस केली नाहीं. यानंतर योगायोग असा आला कीं दोघेहि कित्येक दिवसपर्यंत एकाच दिशेला फिरावयास जात राहिले. तरुण इसम त्यांच्याविषयीं जास्त आपलेपणा दाखवूं लागला होता, पण तरीहि त्यानें आपल्या जुन्या परिचयाच्या बाबतींत एक अक्षरहि तोंडांतून काढलें नाहीं. पृथ्वीसिंहाचेंहि मन त्या तरुणाकडे जास्त प्रमाणांत आकर्षित झालें. कारण ते केवळ व्यापारी एजंट नव्हते. त्यांची आवड निराळ्या प्रकारची होती. सहा महिनेपर्यंत दोघांनीं एकमेकांसमोर आपलें अंतःकरण कधींच उघडें करून दाखविलें नाहीं. तरुण त्यांना आपला गुरु मानत होता आणि तो भावि काळांत चांगला क्रांतिकारक होईल अशी पृथ्वीसिंहांनीं उमेद धरली होती. एके दिवशीं योगायोगानें दुसऱ्या एका कॉमरेडची भेट झाली आणि मग कळलें कीं ज्या तरुणाला ते हळूहळू पार्टींत दाखल करून घेण्याच्या विचारांत होते तो अगोदरच पार्टींत आहे. पृथ्वीसिंह आतां दुसऱ्या एका व्यापारी केन्द्राच्या ठिकाणीं आपल्या कामासाठीं गेले होते. तिथें एका देखण्या तरुणानें मोठ्या श्रद्धेनें त्यांना प्रणाम केला. पृथ्वीसिंहांनीं तो प्रणाम त्या अर्थानें स्वीकारला नाहीं. तरुणाचें वय फार फार तर वीस वर्षे असावें. त्यांनीं काठेवाड सोडलें त्या वेळीं त्याचें वय १० वर्षांपेक्षां जास्त नसणार. प्रयत्न करूनहि त्यांना त्या तरुणाच्या बाबतींत ओळख पटविणारी अशी कसलीच गोष्ट आठवेना. भोजन झाल्यावर रात्रीं सारे एजंट पत्ते खेळूं लागले. पृथ्वीसिंहहि त्यांत सामील झाले. तो तरुण त्यांच्याविषयीं फारच आदर दर्शवीत होता. आणि जेव्हां तेव्हां त्यांना 'गुरुजी' म्हणून संबोधीत होता. यावर पृथ्वीसिंह म्हणाले–" भाई, हा तरुण फार सज्जन दिसतो. यानं मला गुरुचं पद दिलंय आणि बाकीच्या मंडळींना यानं आपले काका करून ठेवलंय. " तरुण जरा गालां-तल्या गालांत हंसला आणि मग तसाच पत्ते खेळण्यांत गुंग झाला. मध्यरात्रीनंतर खेळ संपल्यावर पृथ्वीसिंह त्या तरुणाजवळ गेले आणि त्यांनीं त्याला त्याच्या विचित्र वर्तनाचें कारण विचारलें. तरुण म्हणाला–" स्वामीजी! जे विद्यार्थी तुमच्या मांडीवर खेळले, त्यांना तुम्ही बनवूं शकणार नाहीं."

एके दिवशीं पृथ्वीसिंह आपल्या दोन नव्या दोस्तांबरोबर दुकानांत कापड खरेदी करण्यास गेले. त्यांनीं कापड विकणाऱ्या तरुणाला कापडाचे नमुने दाखविण्यास सांगितलें. तरुण त्यांच्या चेहऱ्याकडे पाहूं लागला. पृथ्वीसिंहांच्या पोटांत गोळा उठला. तरुण गालांतल्या गालांत हंसत म्हणाला—" आपण भावनगरचे स्वामीराव तर नाहीं ?" पृथ्वीसिंह खो खो हंसत आपल्या दोघां दोस्तांकडे तोंड वळवून म्हणाले—" आतां तुम्हीच सांगा कीं माझ्या चेहऱ्यांत असं काय खास वैशिष्ट्य आहे ? एक माणूस तर मला शान्तिभाई अशी हांक मारून माझ्या पाठोपाठ धांवतच सुटला. तें एक असो. त्याला मी वेडा म्हणून सोडून दिला. पण इथं बघा आतां. हे गृहस्थ मला स्वामीराव म्हणूं लागले आहेत !" तिघेहि हंसूं लागले. तरुण खजील होऊन नम्रपणें म्हणाला—" माफ करा हं मी चुकून आपणांला भावनगरचे स्वामीराव समजलों."

" कोण बुवा हा स्वामीराव ? अन् भावनगर कुठाय तें ?"

" भावनगर काठेवाडांत आहे. तिथें एक गृहस्थ होते. त्यांना आम्ही प्रेमानं स्वामी म्हणत असूं. त्यांचं नांव होतं स्वामीराव !"

*　　　*　　　*

एके दिवशीं पृथ्वीसिंह आपल्या दोस्ताबरोबर "तुकाराम" बोलपट पाहावयास गेले. ते रस्त्यांत आले तों समोर इराण्याच्या हॉटेलांत खातपीत असलेल्या एका तरुणाची नजर आपल्याकडे लागलेली त्यांना दिसली. तरुणानें पैसे व कप तिथेंच टाकला व तो छलांग मारून पृथ्वीसिंहांच्या समोर येऊन उभा राहिला. तो खूप धट्टाकट्टा मजबूत जवान होता आणि चांगल्यापैकीं कुस्ती खेळणारा होता. एक मिनिटापेक्षां जास्त वेळ तो तसाच गालांतल्या गालांत हंसत निश्चल नजरेनें पृथ्वीसिंहांच्या चेहऱ्याकडे पाहात राहिला. पृथ्वीसिंहांना तो कोण हें कांहीं आठवत नव्हतें; तरी पण त्यांच्या मनांत धास्ती कसलीच निर्माण झाली नाहीं; कारण तरुणाच्या डोळ्यांत स्नेह व आदराची भावना प्रतिबिंबित झालेली त्यांना दिसत होती. मग तरुण म्हणाला —" काय चमत्कार आहे ! किती लवकर आपण मला विसरलांत ! मी अमक्याचा धाकटा भाऊ !" पृथ्वीसिंहांना आतां सारें कांहीं आठवलें. त्यांनीहि त्याच्याविषयीं स्नेहभाव प्रदर्शित केला. तरुण त्यांना घरीं येण्याचा आग्रह करूं लागला. आपल्या इतर दोस्तांच्या देखत पृथ्वीसिंहांना कोणतीच गोष्ट उघड सांगतां येईना. त्यांनीं आपल्या पायांनीं तरुणाचा अंगठा दाबला. तरुणानें त्यांचा आशय ओळखला आणि पुन्हां आग्रह केला नाहीं.

त्या वेळीं पृथ्वीसिंह एका फार मोठ्या शहरीं कमिशन एजंटाचा बहाणा करून राहिलेले होते. त्यानीं अनेक प्रकारच्या वस्तूंचे नमुने अशा थाटांत मांडून ठेवलेले होते कीं खरोखरीच पुष्कळशा कंपन्यांची एजन्सी त्यांच्या हातीं आहे असें पाहणाराला वाटावें. एके दिवशीं संध्याकाळीं पांच वाजतां साध्या कपड्यांतल्या दोघां सी. आय. डीं. नीं त्यांचा पाठलाग सुरू केला. आपण एका मोठ्या क्रांतिकारकाचा पाठलाग करीत आहोंत हें त्यांना ठाऊकच नव्हतें. त्यांना वाटलें कीं हा बहुधा कोकेन, अफू, वगैरेचा चोरटा व्यापार करणारा कुणी तरी इसम असावा. पृथ्वीसिंहांनीं पाठलाग चुकविण्याची खूप खटपट केली पण कांहीं जमेना. अखेर ते एका हाडवैद्याच्या दुकानांत गेले. त्याला त्यांनीं सांगितलें—"अधून मधून माझे सांधे दुखत असतात." वैद्यानें एक तासभर खूप मालिश केलें. पृथ्वीसिंहांनीं दुखावा वाढत असल्यासारखा चेहरा करून एक टॅक्सी आणविण्यास सांगितलें. टॅक्सींतून बसून ते भर वेगांत निघून गेले आणि सी. आय. डी. वाले आ वासून बघत राहिले.

* * *

पृथ्वीसिंहांनीं आपल्या कंपनीचे फिरते एजंट या नात्यानें फारच चांगली कामगिरी बजाविली होती. मालकाचा त्यांच्यावर आतां पुष्कळच विश्वास बसला. मालक स्वतःच कंपनीचा मॅनेजर होता. कसल्या तरी कामासाठीं मालक २० दिवसांच्या रजेवर गेला. त्याच्या गैरहजेरींत पृथ्वीसिंहांना मॅनेजरचें काम देण्यांत आलें. त्यांना सगळ्या कामावर देखरेख करावी लागे व कागदांवर सह्याहि कराव्या लागत. कितीदां तरी त्यांना आपल्या सहीचे कागद पोलिसांकडेहि पाठवावे लागत. दोन वेळां तर एक इंग्रज सार्जंट त्यांच्या ऑफिसांत कांहीं तरी पूसतपास करण्यासाठीं आला. याच वेळीं एक पंजाबी इसम रजा घेऊन मुलुखाला चालला होता. तो दिसायला खूप मजबूत व हुशार दिसत होता. सी. आय. डीं. नीं त्यालाच क्रांतिकारक समजून अटक केली. पंजाबी तरुणानें आपला पत्ता व ठावठिकाणा दिला आणि सी. आय. डी. वाले त्याचीच पूसतपास करण्यासाठीं मॅनेजरकडे आले. पृथ्वीसिंहांनीं मॅनेजर या नात्यानें त्यांना समजावून सांगितलें—" हा पंजाबी तरुण सज्जन माणूस आहे, त्याला निष्कारण त्रास देऊं नका." त्यांनीं त्याच्यासाठीं रदबदली केली आणि त्याला लगच्या लगेच सोडून देण्यांत आलें.

* * *

त्या वेळीं मुंबईत ते ज्या मालकाकडे काम करीत होते त्यानें आपल्या कारखान्यांतील उत्तमोत्तम वस्तु प्रदर्शनांत दाखविण्यासाठीं व विक्रीसाठीं ठेवलेल्या

नगर वाचनालय, सातारा.

होत्या. मालकाला वाटलें की पृथ्वीसिंहांसारखा रुबाबदार व चांगला बोलका माणूस जर प्रदर्शनांत कामावर राहील तर आपल्याला चांगलें यश मिळेल. पण जिथें हजारों लोक प्रदर्शन पाहण्यासाठीं येणार, तिथें पृथ्वीसिंहांनीं उभें राहून कसें चालेल? तिथें त्यांना बोलावें लागणार, चर्चा करावी लागणार व हंसतमुख करून गिऱ्हाइकांचीं मनें खरेदीसाठीं वळवावीं लागणार. अशा परिस्थितींत, आणि विशेषतः प्रदर्शन एक महिना चालू राहणार असल्यामुळें, स्वतःचें खरें स्वरूप लपवून ठेवणें त्यांना फार मुष्किलीचें झालें असतें. पृथ्वीसिंहांनीं मालकाची परोपरीनें समजूत घालून पाहिलें पण तो त्यांना तें काम करण्याचा आग्रह करीतच राहिला. अखेरीस पृथ्वीसिंहांना नोकरीचा राजीनामा द्यावा लागला.

★

नगर वाचनालय सातारा.

## (१४)

## आत्म-समर्पण व तुरुंगवास

सन १९३७ सालीं हिंदुस्थानांत पुष्कळशा प्रांतांमध्यें कॉंग्रेस मंत्रिमंडळें राज्य-कारभार करूं लागलेलीं होतीं. मुंबईच्या कॉंग्रेस मंत्र्यांचे कित्येक दोस्त पृथ्वीसिंहाचेहि मित्र होते. त्या वेळीं केव्हां ना केव्हां तरी कुणा ना कुणाची तरी भेटहि होत असे. आतां त्यांच्यासमोर प्रश्न असा उभा राही. एक तर अशाच रीतीनें अज्ञातवासांत काळ कंठत राहावयाचें व जनतेशीं उघड संबंध प्रस्थापित करण्याचा नादच सोडून द्यावयाचा; नाहीं तर असा एखादा मार्ग काढावयाचा कीं ज्याच्या योगानें पुन्हां जनतेमध्यें उघडपणें काम करण्याची संधि मिळेल. त्यांनीं पार्टींतील कॉमरेड्सचा सल्ला घेतला. गांधीजी बंगालच्या क्रांतिकारकांना सोडविण्याची खटपट करीत होते. कॉमरेड्सनीं सांगितलें-- "महात्माजींना भेटा. त्यांनीं जर तुम्हांला सोडविण्याचें वचन दिलें तर आपण होऊन स्वाधीन होणें चांगलें. अशा रीतीनेंच कांहीं दिवसांनंतर तुम्हांला उघडपणें काम करतां येण्याचा संभव आहे."

### महात्माजींची मुलाखत

१९३८ सालचा मे महिना होता. महात्माजी कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीसाठीं मुंबईला आले होते आणि जुहूला बिर्ला हाऊसमध्यें उतरले होते. खुद्द महात्माजींना भावनगरचे स्वामीराव माहीत होते. डॉ. पट्टाभि सीतारामय्या व

स्वामीरावांच्या कित्येक गुजराती दोस्तांनीं त्यांच्या बाबतींत महात्माजींना अगोदरच सांगून ठेवलें होतें. आणि 'आतां त्यांना तुमच्याबरोबर काम करायची इच्छा आहे' असाहि खुलासा केला होता. महात्माजींना खूपच आनंद झाला आणि त्यांनीं पृथ्वीसिंहांना बोलावणें धाडलें. ठरलेल्या वेळीं पृथ्वीसिंह बिर्ला हाऊसवर गेले. महादेवभाई देसाईंनीं सांगितलें—"महात्माजींना थकवा आलाय, ते कुणालाच भेटूं शकत नाहींत."

पृथ्वीसिंह म्हणाले—"आपण जरा महात्माजींना इतकंच सांगा कीं ज्याला आपण या वेळेस भेटावयास बोलावलंय तो माणूस आलाय."

महात्माजींना बातमी कळतांच त्यांनीं पृथ्वीसिंहांना बोलावून घेतलें. पृथ्वीसिंहांचें महात्माजींबरोबर कितीतरी उशीरपर्यंत बोलणें झालें. त्यांनीं सांगितलें—"माझा आतां दहशतवादावर बिलकूल विश्वास नाहीं. माझा जनतेच्या सामर्थ्यावर विश्वास आहे आणि आपण जनशक्तीला जागृत करायच्या कामीं फार कार्य केलंय असं माझं मत आहे." पृथ्वीसिंहांनीं आपणहून पोलिसांच्या स्वाधीन होण्याचा प्रश्न निघाला तेव्हां महात्माजी म्हणाले—"ही मोठी धोक्याची गोष्ट आहे. कुणी सांगावं? सारा जन्मभर तुम्हांला तुरुंगांतच खितपत पडावं लागेल!"

"कांहीं पर्वा नाहीं. पण आपण जर माझी सुटका करवायची जबाबदारी घेत असाल तर माझ्या मित्रांना विचारून मी आपणहून पोलिसांच्या स्वाधीन व्हायला तयार आहे.

पृथ्वीसिंह वाटाघाट करून परत आले. त्या वेळीं कम्युनिस्ट पार्टी बेकायदेशीर होती आणि तिचे सारे प्रमुख कार्यकर्ते पोलिसांच्या तावडींतून वांचण्यासाठीं भूमिगत राहात असत. ज्या कॉमरेडकडून त्यांना शेवटची संमति घ्यावयाची होती तो कोणत्या तरी कारणामुळें भेटूं शकला नाहीं. ते तर महात्माजींना वचन देऊन आले आणि इकडे तर तो कॉमरेड नाहीं भेटला. एकट्यानें निर्णय करण्याच्या ते विरुद्ध होते पण आतां दुसरा कांहीं मार्गच नव्हता. गांधीजींनीं त्यांना स्वतःविषयीं थोडक्यांत माहिती लिहून देण्यास सांगितलें होतें. ते रात्रभर लिहीत राहिले.

## आत्म-समर्पण (२० मे १९३८)

ता. २० मे रोजीं सकाळीं १० वाजतां पृथ्वीसिंह गांधीजींकडे पोंचले आणि त्यांनीं आपलें लेखी म्हणणें त्यांना सादर केलें. त्यात असें विधान होतें—"राष्ट्राच्या प्रतिनिधीसमोर मी बिनशर्त आत्मसमर्पण करीत आहें."

प्रथम असें ठरलें होतें कीं पृथ्वीसिंहांना वर्ध्याला नेऊन सरकारच्या स्वाधीन करण्यांत यावें. पण त्याच दिवशीं त्यांच्या एका दोस्ताला पार्टीच्या कुणा कॉमरेडकडून या गोष्टीचा पत्ता लागला व त्यानें जुहूला जाऊन महादेवभाईंना सांगितलें—"मी सरदार पृथ्वीसिंहांना भेटायला आलोंय."

सारी बातमी गुप्त ठेवली असतांना अशा प्रकारें अचानक एक माणूस पृथ्वीसिंहांची चौकशी करीत आहे हें पाहून त्यांना हा नक्कीच पोलिसचा माणूस असला पाहिजे असा संशय आला. त्याच क्षणीं महात्माजींनीं महादेवभाईंच्या हातीं मुंबईच्या कलेक्टरला एक पत्र लिहवून दिलें आणि संध्याकाळच्या आंतच त्यांना ठाणा जेलमध्यें पोंचविण्यांत आलें.

## ठाणा जेल ( २० मे ते १० जुलै १९३८ )

सरदार पृथ्वीसिंहांना पावणेदोन महिने ठाणा जेलमध्यें राहावें लागलें. तिथें आणखी कुणीच राजबंदी नव्हता. आणि सामान्य कैद्यांना त्यांच्या जवळपास फिरकूं देत नसत. आतां त्यांचा वेळ केवळ वाचन-मननांत जाई.

साऱ्या हिंदुस्थानांतील वृत्तपत्रांमध्यें सरदार पृथ्वीसिंहांच्या आत्मसमर्पणाची बातमी मोठमोठ्या मथळ्यांनिशीं प्रसिद्ध झाली. त्यांच्या भावालाहि हें कळलें आणि तो त्यांची भेट घेण्यासाठीं मुंबईस आला. १९ जून रोजीं जेलच्या फाटकाशीं भावाला भेटण्यासाठीं त्यांना बोलावण्यांत आलें. एका युगानंतर दोघांची भेट झाली. त्यांना त्याच्याबरोबर आणखी दोन तरुण दिसले. हे कदाचित सी. आय. डी. चे लोक असतील असा त्यांना संशय आला. जेलरला विचारल्यावर तो म्हणाला—" हेहि आपलेच भाऊ आहेत." याच्या अगोदर ते असें समजत होते कीं दुनियेंत आपला सगासोयरा आतां कुणींच नाहीं राहिला ! पण आतां तर त्यांना डिप्टीसिंह, वर्मासिंह व रामसिंह हे तीन सख्खे भाऊ भेटले. पृथ्वीसिंहांनीं वडिलांची चौकशी केली तेव्हां तिघांहि भावांना आपले अश्रु आंवरेनात. दुसऱ्या दिवशीं पुन्हां त्यांचे भाऊ दोन तास भेटावयास आले. त्यांनीं निरोप देतांना भावांना सांगितलें—" ज्यानं आपल्या देशासाठीं आपलं आयुष्य समर्पण केलंय अशा भावाचा तुम्हांला अभिमान वाटला पाहिजे. भाऊ या नात्यानं माझ्याकडून इतर कोणत्याहि गोष्टीची आशा धरूं नका. मला माझ्या जीवनाचं ध्येय गांठायसाठीं मोकळा ठेवा."

ठाण्यांत असतांनाच सरदारांनीं आपल्या आरंभींच्या आयुष्यासंबंधीं कांहीं हकीकत संक्षेपतः लिहून काढली. अशा वीर पुरुषाचें चरित्र देशासाठीं

उपयोगी पडेल असें समजून महात्माजींनीं हें लिहून काढण्याचा त्यांना आग्रह केला होता.

## रावळपिंडी जेलमध्यें

ता. ९ जुलै १९३८ रोजीं सुपरिंटेंडंटनें सूचना दिली—'आपल्याला पंजाबमधील कोणत्या तरी तुरुंगांत जावं लागणार.' पृथ्वीसिंहांच्या ओळखीचे लोक जितके मुंबईंत व आसपास होते, तितके पंजाबांत नव्हते. पण सरकारी हुकुम तो हुकुम! पंजाबचें नांव ऐकतांच त्यांच्या हेंहि लक्षांत आलें कीं ज्या सरकारवर गांधीजींचा व लोकमताचा प्रभाव सगळयांत कमी पडूं शकतो व ज्याच्या आड राहून इंग्रज सरकार आपलें सगळें उट्टें फेडून घेऊं पाहील अशा सरकारच्या ताब्यांत आपण जात आहोंत. नाहीं तरी आपल्या जुन्या शिक्षा तर १९६६ पर्यंत भोगावयाच्या आहेतच!

पंजाब सरकारनें त्यांना घेऊन येण्यासाठीं एक सब इन्स्पेक्टर व दोन कॉन्स्टेबल धाडले. सुपरिंटेंडंट सब इन्स्पेक्टरच्या हातीं पृथ्वीसिंहांचा चार्ज देऊं लागला. तेव्हां सब इन्स्पेक्टर चार्ज घेईना. त्यानें सांगितलें—"असल्या धोकेबाज कैद्याला आम्ही तीन इसम नेऊं शकत नाहीं." अखेर मुंबई सरकारला आणखी पांच कॉन्स्टेबल व एक जमादार द्यावा लागला. कदाचित सब इन्स्पेक्टरला त्याच्या मालकांनीं तसा हुकुमच देऊन ठेवला असेल. एक क्रांतिकारक आपणहून इंग्रज सरकारच्या स्वाधीन झाला व त्याला कलेक्टरनें आपल्या खाजगी मोटारींतून एकहि शिपाई बरोबर न घेतां ठाणा जेलमध्यें आणून सोडलें, अशा स्थितींत त्याला एका तुरुंगांतून या दुसऱ्या तुरुंगांत नेण्यासाठीं इतक्या माणसांची जरूर काय! पण हें लक्षांत घेण्याची त्या सब इन्स्पेक्टरला जरूर वाटली नाहीं. स्वखुषीनें आत्मसमर्पण करणाऱ्या सरदार पृथ्वीसिंहांना आपल्या हातांतून निसटण्याची संधि मिळूं नये म्हणून पंजाब सरकारनें मुद्दाम एका धिप्पाड शीख सब इन्स्पेक्टरला धाडलें होतें. या सब इन्स्पेक्टरला व त्याच्या साथीदारांना त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं अनेक प्रकारच्या हकीकती सांगून 'तुम्ही एक जंगली पक्षी पकडायला जात आहांत' असें त्यांच्या मनांवर बिंबवण्याची खटपट केली होती. पण आपली गांठ कुणा हिंस्र पशूशीं पडलेली नसून एका सुशिक्षित सुसंस्कृत इसमाच्या सहवासांत प्रवास करण्याची संधि आपल्याला मिळाली आहे हें थोडा वेळ गप्पा गोष्टी होतांक्षणीं सब इन्स्पेक्टरला कळून चुकलें. पंजाब सरकारनें साऱ्या गोष्टींचा विचार करून पृथ्वीसिंहांसाठीं रावळपिंडी जेलची निवड केली होती. रावळपिंडी

जेल कां निवडण्यांत आला ? कारण तो जेल कडकपणाबद्दल प्रसिद्ध होता. तिथें एकहि राजबंदी नव्हता. तिथला डेप्युटी सुपरिंटेंडंट राजबंद्यांशीं कठोर वर्तन करण्याबद्दल प्रसिद्ध होता आणि म्हणून तो सरकारच्या विशेष मर्जींतला होता.

अंदमान बेटांतील पोर्ट ब्लेअर जेलमध्यें पूर्वीं सुपरिंटेंडंट असलेलाच इसम आतां पंजाबमधील जेलांचा इन्स्पेक्टर जनरल होता. पृथ्वीसिंहांना इतर राजबंद्यांची भेट घेतां येऊं नये अशी त्याची खटपट होती. जुनें रेकॉर्ड अभ्यासून वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं खूप कडक धोरण ठेवण्याचा हुकूम दिला होता. पण डेप्युटी सुपरिंटेंडंटनें सरदार पृथ्वीसिंहांना समक्ष पाहतांक्षणीं त्याला त्यांच्यावर विश्वास ठेवणेंच सयुक्तिक वाटलें.

जेलच्या कायद्याच्या कक्षेंत राहून जितकें शक्य होतें तितक्या प्रमाणांत जेलचे अधिकारी त्यांच्याशीं सहृदयतेनें वागत असत. जेल सुपरिंटेंडंट कॅप्टन हैदर हा फारच मोकळया मनाचा माणूस होता. कितीदां तरी त्याला वरून कडक वर्तन ठेवण्याचे हुकुम आले पण त्यानें त्यांची पर्वा न करतां आपलेंच धोरण चालू ठेवलें. मुंबई सरकारनें सरदार पृथ्वीसिंहांना 'अ' वर्गाचे कैदी म्हणून पाठविलें होतें, पण पंजाब सरकारला हें कसें आवडणार ? इन्स्पेक्टर जनरलनें 'अ' वर्ग काढून घेण्याचा हुकुम पाठविला. कॅप्टन हैदरनें दोन महिनेपर्यंत या बाबतींत पत्रव्यवहार केला आणि शेवटीं नाइलाजानें त्याला तो हुकुम अमलांत आणणें भाग पडलें. 'अ' वर्गाबरोबरच आपलीं पुस्तकेंहि काढून घेण्यांत आलीं नाहींत ही पृथ्वीसिंहांना सुदैवाचीच गोष्ट वाटली. मात्र सरकारनें त्यांच्याजवळ शाई व टांक नाहीं राहूं दिला. गांधीजींशीं त्यांचा पत्रव्यवहार नियमितपणें चालू राहिला. गांधीजींनीं आपल्या एका पत्रांतून त्यांना असा निरोप धाडला-- "आमचें तर त्यांना हेंच सांगणें आहे कीं त्यांनीं शांत राहावें, सुटण्याची आशा धरूं नये. सुटका झाली कीं त्यांच्यासाठीं काम तयारच आहे. पण जितका वेळ ते तुरुंगांत घालवितील तितकी त्यांची मनःशांतीहि वाढेल याबद्दल मला शंका वाटत नाहीं. मी खुशामत केली म्हणजे तेवढ्यावर त्यांची सुटका नाहीं होणार. अभिमानपूर्वक चळवळ केल्यानेंच सुटका होऊं शकेल."

पंजाब सरकारनें भेटी-मुलाखतींच्या बाबतींत पुष्कळशा अडचणी उभ्या करून ठेवलेल्या होत्या. महात्मा गांधीजींचे प्रायव्हेट सेक्रेटरी प्यारेलाल एके दिवशीं सकाळीं आपल्या वॉर्डांत आलेले पाहून सरदारांना आश्चर्य वाटलें. त्यांनीं प्यारेलालांना यापूर्वीं कधींच पाहिलेलें नव्हतें. आणि त्यांची किरकोळ

शरीरयष्टि पाहून ते पंजाबचे नसून दक्षिण हिंदुस्थानांतील कुठल्या तरी ठिकाणचे आहेत असें त्यांना वाटलें.

प्यारेलाल सरहद्द प्रांताहून परत चालले होते. गांधीजींनीं आपल्या जबाबदारीची आठवण ठेवलेली आहे हें सरदारांना सांगण्यासाठीं त्यांनीं त्यांना मुद्दाम सरदारांच्या भेटीला पाठविलें होतें. सरदारांनीं प्यारेलालजींमार्फत महात्माजींना निरोप पाठविला-- "मी तुरुंगांतून बाहेर येऊं इच्छितों तो वैयक्तिक स्वतंत्रतेसाठीं नव्हे."

प्यारेलालजी येऊन गेल्यानंतर कांहीं दिवसांनीं अंबाल्याचे लाला दुनीचंद त्यांना भेटावयास आले. १९१४ सालीं जेव्हां कोणीहि वकील कोणाहि क्रांतिकारकाचा खटला चालविण्यास तयार होत नसे, अशा वेळीं लाला दुनीचंदांनीं सरदार पृथ्वीसिंहांचा खटला चालविलेला होता. लाला दुनीचंदांनीं सरदारांच्या साहसी जीवनाबद्दल त्यांचें अनेकदां अभिनंदन केलें.

पंजाब, गुजरात व इतर प्रांतांतील अनेक मित्रांनीं व ऋणानुबंधी मंडळींनीं मुलाखतीसाठीं अर्ज केले होते, पण पंजाब सरकार येवढी मेहेरबानी करण्यास तयार नव्हतें. रावळपिंडीच्या १४ महिन्यांच्या तुरुंगवासांत फक्त ५ वेळां मुलाखती मिळाल्या.

प्यारेलालांच्या मुलाखतीनंतर पंजाबच्या सी. आय. डी. खात्यांत एक मोठेंच वादळ निर्माण झालें होतें. कुणा तरी वर्तमानपत्रकारानें लिहून टाकलें कीं महात्माजींनीं प्यारेलालांच्या मार्फत सरदार पृथ्वीसिंहांना एक संदेश पाठविला आहे. त्या वेळीं इप्पीचा फकीर व पठाण जमाती सरहद्द प्रांतांत गडबड माजवीत होत्या. म्हणून सी. आय. डी. खातें हा 'गुप्त संदेश' समजून घेण्यासाठीं फार उत्सुक झालें होतें. मग इंग्रज सुपरिंटेंडंटनें लिहून कळविलें कीं मुलाखत जेलरच्या समक्षच झाली होती व कोणताहि गुप्त संदेश देण्यांत आला नव्हता.

## इन्स्पेक्टर-जनरलशीं संभाषण

सरदार जेव्हां अंदमान जेलमध्यें होतें तेव्हां कर्नल बार्कर तिथला सुपरिंटेंडट होता. आतां तो पंजाबमधील जेलांच्या इन्स्पेक्टर-जनरल झाला होता. तो सरदारांना चांगल्या प्रकारें ओळखत होता. कारण तुरुंगांतील दु:सह यातनांच्या प्रतिकारासाठीं जेवढे लढे झाले त्या सर्वांमध्यें पृथ्वीसिंह सर्वांच्या पुढें असत. कर्नल बार्कर रावळपिंडी जेलची तपासणी करण्यासाठीं आला. तो सरदारांच्या

जवळूनहि गेला पण सरदारांना कांहींच सांगावयाचें नव्हतें. वॉर्डावरुन जातांना कर्नल बार्कर सरदारांच्या जवळ आला आणि म्हणाला—"तुम्हांला कांहीं सांगायच असलं तर सांगा." सरदार म्हणाले—"मला कांहीं सांगायचं, मागायचं अगर तक्रार करायची नाहीं. महात्माजींच्या मार्फत सरकारच्या स्वाधीन होतेवेळींच मी माझ्या साऱ्या इच्छा व गरजांवर पाणी सोडलं."

कर्नल बार्कर मोठ्या खुषींत होता. त्यानें जातांना आवारांत बॅडमिन्टन खेळण्याची सोय करण्यासाठीं जेलच्या अधिकाऱ्यांना हुकुम दिला. त्यानें लाहोरला जाऊन कांहीं व्यायामोपयोगी साहित्यहि पाठवून दिलें.

## राजकोटचा सत्याग्रह

ज्या अधिकाऱ्यांना सरदारांची सुटका हवी होती त्यांना महात्माजींनीं राजकोटला उपवास सुरू केल्याची बातमी ऐकून फार काळजी वाटूं लागली. कॅप्टन हैदर सरदारांच्या सुटकेसाठीं फारच उत्सुक झालेला होता. तो रोज उपवास व तडजोडीच्या वाटाघाटींची बातमी ऐकण्यासाठीं जात असे. उपवास सोडल्याची बातमी रेडियोवर आल्याबरोबर त्या क्षणीं ती आनंदाची बातमी सांगण्यासाठीं तो सरदारांकडे आला. ही अत्यंत आनंदाची बातमी होती यांत शंकाच नाहीं. पण सरदारांनीं राजकोटच्या साऱ्याच प्रकरणावर आपल्या दृष्टीनें विचार केला. आपलें विश्लेषण त्यांनीं गांधीजींना एका पत्रांतून कळविलें— "...दोन वेगवेगळया प्रकारच्या शक्ती विजय मिळविण्यासाठीं आखाड्यांत उतरलेल्या होत्या. संस्थानाचा मालक राज्याच्या साऱ्या सामर्थ्यावर पूर्ण भिस्त ठेवून आपल्या साऱ्या साधनांचा उपयोग पक्क्या डावपेचांनिशीं करूं इच्छीत होता. न्याय अन्यायाचा कांहींच विचार न करतां त्याला हवी ती शक्ति उपयोगांत आणतां येत होती. दुसरा पक्ष होता पिळल्या जाणाऱ्या, जुलमानें गांजलेल्या लोकांचा; आणि त्याचें पुढारीपण एक असा पुढारी करीत होता कीं जो जाणूनबुजून न्याय्य साधनांच्या द्वारांच न्याय मिळविण्याची खटपट करीत होता."

## मुलाखतींची माळका

सरदारांना मित्रांची व आप्तेष्टांची भेट घेण्याची परवानगी नव्हती. तरीहि त्यांच्या नांवाचें सर्वांनाच विशेष आकर्षण निर्माण झालें असल्याकारणानें सरकारी अधिकारी व इतरहि ज्यांना ज्यांना तुरुंगाच्या आवारांत जातां येत असे, ते

सरदारांना भेटण्याची खटपट करीत असत. भेटण्यासाठीं आलेल्या या साऱ्या इंग्रज व हिंदी लोकांनीं त्यांच्या बाबतींत अनेक प्रकारचे गुणानुवाद ऐकलेले व वाचलेले असत.

एकदां रावळपिंडीचा डेप्युटी कमिशनर तुरुंगात आला. त्यानं सरदारांकडे जाऊन विचारलें—" तुम्ही कशाला इथं तुरुंगांत अडकून पडले आहांत ?"

" कारण तुम्ही इथें होतां म्हणून."

डेप्युटी कमिशनरनें विचारलें—" तुमच्या म्हणण्याच्या आशय काय ? "

"माझा आशय काय हें कसं समजावून सांगूं तुम्हांला ? ठीक, ऐका तर. माझ्या दोस्तांच्या मदतीनं आम्ही बादशहाविरुद्ध युद्ध करायसाठीं कट केला अन् हिंदुस्थानांतून गोऱ्या लोकांना हांकलून द्यायसाठीं आपल्या देशबांधवांच्या फौजाची संघटना केली. तुमचं सुदैव म्हणा, आमचं दुर्दैव म्हणा, आम्हांला आमच्या प्रयत्नांत यश आलं नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं तुम्ही आजहि आमच्या डोक्यावर मिरे वांटून राज्य करीत आहांत अन् मी थडग्याकडे जायच्या वाटेवरची पावलं मोजतोंय."

एके दिवशीं कमिशनर तुरुंगांत झाला. त्यानें सरदारांना विचारलें—"तुम्ही केव्हां सुटणार ?"

" १९६६ सालीं."

" तुम्ही १९६६ पर्यंत जिवंत राहाल हें शक्य आहे ?"

"कदाचित जगेनहि मी. पण ब्रिटिश साम्राज्य १९६६ पर्यंत जिवंत राहूं शकणार नाहीं."

" असं म्हणायला तुमच्याजवळ काय पुरावा आहे ? "

" हिंदुस्थानांतील राष्ट्रीय भावनेची जी जागृति व आंतरराष्ट्रीय राजकारणांत साऱ्या शक्तींचा जो परस्परसंबंध दिसतोय त्याच्या आधारावर मी सांगतोंय हें."

"सरकारनं तुरुंगांत तुमचं जीवन सुखकर करायसाठीं इतकीं साधनं मिळवून दिलीं असतांना तुम्ही ब्रिटिश साम्राज्याच्या बाबतींत असं म्हणावं म्हणजे हा कृतघ्नपणा नव्हे का ? "

" मी हिंदुस्थानावरील इंग्रजी अमलाविरुद्ध जें बंड करतों तें मला व्यक्तिगत सुखसोई पाहिजेत म्हणून नव्हे. मला पाहिजे आहे माझ्या देशाचं स्वातंत्र्य. नागरिक या नात्यानं सुखी जीवन जगायचं स्वातंत्र्य. तुमच्या सरकारनं

मला १९६६ सालापर्यंत शिक्षा कां दिली आहे? केवळ येवढ्याचसाठीं कीं मी परदेशी जळवा तोडून फेंकून द्यायसाठीं एक योजना तयार केली होती म्हणून."

पंजाब सरकारचे गृहमंत्री लाला मनोहरलाल यांजकडे तुरुंग खात्याचा कारभार होता. पृथ्वीसिंहांच्या बाबतींत समक्ष कांहीं कळलें तर पाहावें म्हणून ते मुद्दाम रावळपिंडीला आले. राजकीय प्रश्नांबाबत दोघांनीं बरीच चर्चा केली. पृथ्वीसिंहांच्या सुटकेचा प्रश्न निघाला तेव्हां मनोहरलाल म्हणाले "आपल्याला सोडवण्यासाठीं आम्ही प्रयत्नाची शिकस्त करीत आहोंत पण सारं कांहीं हिंदुस्थान सरकारवर अवलंबून आहे"

इतर प्रांतांतल्याप्रमाणें पंजाबांतले शेतकरीहि करांच्या बोज्याखालीं चिरडले जात आहेत. त्या वेळच्या मंत्रिमंडळानें सत्तेचा लगाम हातीं घेतल्यापासून तर कर आणखीच वाढविण्यांत आले. हा बोजा कमी करून घेण्यासाठीं किसान सभेनें सरकारला खूप विनवण्या केल्या पण तिच्या मागण्या ठोकरून लावण्यांत आल्या. शेवटीं दुसरा कोणताच मार्ग राहिला नाहीं तेव्हां सत्याग्रह करावा लागला. हजारो शेतकऱ्यांनीं त्यांत भाग घेतला. पंजाबचे तुरुंग शेतकरी कैद्यांनीं भरून गेले. निरनिराळ्या जेलांतून २०० शेतकरी कैदी रावळपिंडी जेलमध्यें आणून ठेवण्यांत आले. सत्याग्रही कैद्यांमध्यें कित्येक जण सरदार पृथ्वीसिंहांचे जुने दोस्त होते.

तुरुंगामध्यें या कैद्यांना जी वागवणूक मिळे, तिच्यामुळें कितीदां तरी झगडे होत असत. पृथ्वीसिंहांना या कैद्यांची भेट घेण्याची इच्छा झाली. ते कैदीहि कित्येक वर्षांपासून दुरावलेल्या आपल्या या दोस्ताला भेटण्यासाठीं उत्सुक झालेले होते. पृथ्वीसिंहांच्या भेटीचा तरी शेतकरी-कैद्यांवर परिणाम झाला तर पाहूं या असा विचार जेलच्या अधिकाऱ्यांनीं केला. त्यांना भेटण्याची संधि मिळाली. अधिकाऱ्यांनीं पाट्या, वह्या, फळा इत्यादि लिहिण्या वाचण्याचे साहित्य दिलें. शेतकरी-कैद्यांपैकीं निम्मे निरक्षर होते. त्यांना साक्षर करावें असें ठरलें. शिकवितां शिकवितां पृथ्वीसिंह रोज दोन तास त्यांना वेगवेगळे प्रश्न समजावून सांगत असत. सकाळीं दोन तास ते त्यांच्याकडून व्यायाम, कवाइत, परेड करवून घेत असत. अशा प्रकारें तीन महिने फार चांगल्या रीतीनें गेले.

सरहद्द प्रांताहून परत येतांना गांधीजींचे सेक्रेटरी महादेवभाई देसाई जेलमध्यें सरदारांना भेटावयास आले. दोघांचा अगोदरपासूनच एकमेकांशीं परिचय होता. महादेवभाईंनीं आपल्याबरोबर गांधीजींचा संदेश आणलेला होता. तो पूर्वींच्या संदेशासारखाच होता. गांधीजी आपल्याला विसरले नाहींत हें समजल्यामुळें सरदारांना संतोष झाला.

# तुरुंगांतून सुटका

१९३९ च्या सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत जेल सुपरिंटेंडंट कॅप्टन हैदर यांनीं इतर अधिकाऱ्यांसमवेत येऊन मोठ्या आनंदानें सरदारांना ही बातमी सांगितली—" पंजाब सरकारनें कांहीं अटींवर आपणांला सोडून देण्याचा हुकुम दिला आहे. "

त्यांना ऑफिसमध्यें नेण्यांत आलें. तिथें सरकारी हुकुम सरदारांनीं वाचला. अट अशी होती कीं पंजाब सरकारच्या परवानगीशिवाय सरदारांना पंजाबांत प्रवेश करण्यास मनाई होती. या अटीला सरदारांची हरकत नव्हती. त्यांनीं कागदावर सही करून दिली.

जेलच्या अधिकाऱ्यांनीं असेंहि सांगितलें कीं " येवढ्यांतच आपण आपल्या सुटकेची बातमी कुणाला सांगूं नका. "

ता. २० सप्टेंबर १९३९ रोजीं सुपरिंटेंडंटनें सांगितलें कीं " पंजाब सरकारचा अखेरचा हुकुम आलेला आहे; आतां पोलिस आपल्याला वर्धा जेलमध्यें नेतील व तिथून आपली सुटका होईल. " सरदार आपल्या किसान दोस्तांना भेटले. सर्वांना अपार आनंद झाला. मात्र सरदार पृथ्वीसिंहांना स्वतःच्या जन्म-प्रांतांत येतां येणार नाहीं या गोष्टीचें शल्य नक्कीच बोंचत होतें.

ता. २१ सप्टेंबर रोजीं त्यांनीं रावळपिंडी जेल सोडला. आतां त्यांच्या बरोबर पोलिसांची मोठी पलटण नव्हती. एक सब इन्स्पेक्टर त्यांना टांग्यांतून स्टेशनवर घेऊन गेला. लाहोरला गेल्यानंतर चार पोलिसचे लोक त्यांच्या बरोबर निघाले. वर्धा स्टेशनवर त्यांना मध्यप्रांताचा सब इन्स्पेक्टर भेटला व त्यानेंच त्यांना वर्धा जेलमध्यें पोंचतें केलें. प्रथम जेलमध्यें येण्याबाबतचे कागदपत्र ठाकठीक करण्यांत आले. दोन तास जेलमध्यें राहिल्यानंतर ता. २३ सप्टेंबर रोजीं सरदार पृथ्वीसिंहांना जेलमधून सोडून देण्यांत आलें. सब इन्स्पेक्टर व जेलचे डॉक्टर सेवाग्रामपर्यंत त्यांच्या बरोबर गेले. महात्मा गांधी व आश्रमांतील इतर लोक त्यांची वाटच पाहात होते.

★

( १५ )

# गांधीजींच्या सहवासांत

पंचवीस वर्षांनंतर सरदार पृथ्वीसिंहांना भारताच्या स्वतंत्र वातावरणांत श्वास घेतां आला. त्यानंतर दोनच दिवसांनीं (ता.२५ सप्टेंबर रोजीं) गांधीजी व्हाइसरॉयला भेटण्यासाठीं दिल्लीला चालले होते. त्या दिवशींच्या प्रार्थनेच्या वेळीं गांधीजींनीं विनोदानें पृथ्वीसिंहांची ओळख करून देतांना आश्रमवासीयांना सांगितलें होतें– "सावध रहा; एक मोठा डाकू आश्रमांत आलेला आहे."

पृथ्वीसिंहांनीं आतांपर्यंत जो कांहीं अभ्यास, वाचन केलेलें होतें व जी कांहीं बौद्धिक प्रगती केलेली होती ती तर कायम होतीच. पण अजूनपर्यंत त्यांना गांधीजींचें तत्वज्ञान जवळून समजून घेण्याची संधि मिळालेली नव्हती. म्हणून तें अगदीं मनापासून समजून घेण्याची त्यांची इच्छा होती. सरदार मॉस्कोला राहून आलेले आहेत, ते कम्युनिझम मानतात, हें गांधीजींना ठाऊक होतें. त्याचबरोबर ते सत्य व अहिंसा समजून घेण्यासाठीं फारच उत्सुक झालेले आहेत हेंहि गांधीजींना माहित होतें. प्रार्थनेचा विषय निघाला असतां पृथ्वीसिंह म्हणाले— "प्रार्थनेवर माझी श्रद्धा नाहीं. पण आश्रमावासीयांचं ऐक्य राखण्यासाठीं मी तींत जरूर सामील होईन."

पृथ्वीसिंह आश्रमांत आले यासंबंधांत महादेवभाईनीं वृत्तपत्रांतून एक निवेदन प्रसिद्ध केलें होतें. 'आतां त्यांना आश्रमांतून जाता येणार नाहीं' असें या निवेदनांत सांगितलेलें होतें. सरदारांना ही गोष्ट जरा खटकली खरीच, पण त्यांनीं तिकडे जास्त लक्ष दिलें नाहीं. हिंदुस्थान व ब्रह्मदेशांतील साऱ्या वृत्तपत्रांमध्यें सुप्रसिद्ध क्रांतिकारक पृथ्वीसिंह तुरुंगांतून सुटल्याची बातमी छापून आली आणि आतां ते सेवाग्रामच्या संताचे शिष्य बनले अशीहि पुस्ती या बातमीला जोडण्यांत आली. त्यांना हजारों पत्रें येऊं लागलीं. कधीं कधीं तर त्यांची डांक गांधीजींच्या डांकेपेक्षाहि मोठी असे.

ब्रह्मदेशाहून भावांचीं पत्रांवर पत्रें येऊं लागलीं. त्यांना भेटण्यासाठीं ते ार उत्सुक झाले होते. पृथ्वीसिंहांना देखील आपल्या भावांचा परिवार पाहावासा टत होता. त्यांनीं महात्माजींजवळ कितीदां तरी ब्रह्मदेशाला जाण्याची परवानगी

मागितली. पण परवानगी मिळाली नाहीं. पृथ्वीसिंहांनीं कुठें जाण्यायेण्याची गोष्टच काढूं नये अशी महात्माजींची इच्छा असल्याचें सरदारांना इकडच्या तिकडच्या गोष्टी करतां करतां कळून आलें. त्यांनीं आश्रमांत राहून सत्य अहिंसेचें तत्व चांगल्या प्रकारें समजावून घ्यावें अशी महात्माजींची इच्छा दिसली. दोन अडीच महिने राहिल्यानंतर पृथ्वीसिंहांना आश्रमाचा व आश्रमवासीयांचा चांगलाच परिचय झालेला होता. आश्रमांतच राहिल्यानें सत्य-अहिंसा शिकतां येते असें त्यांना नव्हतें वाटत. परंतु गांधीजी व आणखी एकदोन व्यक्ति सोडून बाकीचे सारे लोक स्वतःची व दुसऱ्यांची फसवणूक करुन एकमेकांवर मात करीत आहेत हें तिथल्या वातावरणांत प्रत्यक्ष पाहिल्यानंतर पृथ्वीसिंहांचा कोंडमारा होऊं लागला. एके दिवशीं त्यांनीं मिराबेनला सांगितलें—

"महात्माजी जर मला एका तुरुंगांतून सुटल्यानंतर इथं दुसऱ्या तुरुंगांत अडकवून ठेवूं पाहात असतील तर हें मला मान्य नाहीं. मला या जेलऐवजीं त्या पूर्वीच्या जेलमध्यें जाणंच जास्त आवडेल."

## ब्रह्मदेशचा प्रवास

गांधीजींना ही गोष्ट कळली तेव्हां ते म्हणाले—"मला तुमच्या बाबतींत मोठी आशा होती. कांहीं हरकत नाहीं. मी तुम्हांला बांधून ठेवूं इच्छीत नाहीं. तुमच्या मर्जीला येईल तिकडे तुम्ही खुशाल जा."

१९३९ च्या डिसेंबरांत पृथ्वीसिंह भावांना भेटण्यासाठीं ब्रह्मदेशांत गेले. सात दिवस आपल्या परिवारांत राहिले आणि पंधरा दिवस निरनिराळ्या संस्थांमध्यें व्याख्यानें, भेटी, मुलाखती इत्यादि कार्यक्रम उरकून १९४० च्या जानेवारींत पुन्हां सेवाग्रामला परत आले.

सत्य-अहिंसेचें पालन लौकिक अर्थानेंच नव्हे तर आध्यात्मिक अर्थानेंहि करावें असें गांधीजी म्हणत असत. पृथ्वीसिंहांना हें समजणें जड जाई. सत्य-अहिंसेची सिद्धि प्राप्त करण्यासाठीं उपनिषद् काळांतील ऋषींप्रमाणें आध्यात्मिक साधनेची आवश्यकता आहे असें गांधीजींना वाटे; आणि येवढ्याचसाठीं आश्रमवास व अविचल श्रद्धेनें गुरूच्या आज्ञेचें पालन त्यांच्या मतें फार आवश्यक होतें. पण पृथ्वीसिंहांनीं आपलें जीवन सत्य-अहिंसेचा आध्यात्मिक अर्थ समजून घेण्याच्या कार्याला वाहिलेलें नव्हतें. त्यांनीं आपलें जीवन वाहिलेलें होतें देशाच्या स्वातंत्र्याला. जर सत्य-अहिंसा देशाच्या स्वातंत्र्याला

सहाय्यक होत असेल तर ती समजून घेण्याची व मान्य करण्याची त्यांची तयारी होती. सरदार पृथ्वीसिंहांनीं आपल्यावर खरी श्रद्धा ठेवली आहे याचा अर्थ महात्माजींनीं असा केला कीं त्यांनीं आत्मिक, शारीरिक व मानसिक बाबतींत पूर्णपणें आत्मसमर्पण केलें आहे. पण पृथ्वीसिंहांची स्वातंत्र्याची भावना आतां गांधीजींना दिसूं लागली. म्हणून त्यांनीं एकदां सरदारांना "तुमच्याजवळ आत्मविश्वास जास्त आहे" असें सांगितलें देखील. पण सरदारांना आत्मविश्वास हें दूषण वाटण्याऐवजीं भूषणच वाटत होतें. गांधीजींविषयींचा आदर त्यांच्या मनांतून कधींच कमी झाला नाहीं. कारण त्यांचा आदर अंधश्रद्धेच्या स्वरूपाचा नव्हता. पण गांधीजींच्या अर्थानें आपली कोणत्याहि प्रकारची आत्मिक उन्नति सेवाग्रामच्या मुक्कामांत होईल अशी आशा त्यांना वाटणें मात्र शक्यच नव्हतें.

## मानसिक संघर्ष

आपल्या शक्तीचा संपूर्ण उपयोग सेवाग्राममध्यें होऊं शकत नाहीं हें सरदारांनीं पाहिलें; म्हणून त्यांनीं बाहेर जाऊन काम करण्याचा निश्चय केला. नवजवानांच्या स्वभावाचा त्यांना फार चांगला परिचय होता. त्यांची शारीरिक व मानसिक मजबुती व संघटना करणें हेंच त्यांना आपलें ध्येय ठेवण्याची इच्छा होती. गांधीजींना विचारल्यावर त्यांनीं त्यांना संमति दिली.

काठेवाडांत समुद्रकांठीं घोघा हें एक सुंदर स्थान आहे. सरदारांनीं व्यायाम-कवाइतीबरोबरच बौद्धिक शिक्षणासाठीं तिथें एक वर्ग चालू केला. या वर्गांत गुजरातच्या भिन्न भिन्न भागांतून ४०० तरुण-तरुणी सामील झाल्या.

दहा वर्षांपूर्वीं असाच एक तरुणांचा कँप आपण चालवीत होतों आणि त्यांतूनच आपण सत्याग्रहांत सामील झालों व मग पोलिसांच्या हातांवर तुरी देऊन फरारी झालों, या गोष्टींची पृथ्वीसिंहांना या वेळीं आठवण झाली. दहा वर्षांनंतर आतां जे तरुण स्त्री-पुरुष समोर दिसले, त्यांना पाहून त्यांना या कामांत खूपच उमेद वाटली. सरदारांनीं या तरुणांना शिकविण्यासाठीं एक संपूर्ण अभ्यासक्रम तयार केला आणि गांधीजींनींहि तो पाहिल्यावर सांगितलें— "तुम्ही तुमच्या कामाला लागा. पैशाची पर्वा करूं नका. बार्डोली हें तुमच्या कार्याचें केन्द्र बनवा."

पुण्यांत काँग्रेस कमिटीची बैठक झाली. आणि तिथें जो ठराव पास झाला तो महात्माजींना आवडला नाहीं. या ठरावाच्या बाबतींत वल्लभभाईंचें मतहि महात्माजींच्या विरुद्ध होतें. इंग्रजांशीं समेट करण्यासाठीं हिंदुस्थानाला युद्धांत सामील करण्यास वल्लभभाई अनुकुल होते. महात्माजींना अशी शंका वाटूं लागली कीं

आपला अहिंसेचा मार्ग सोडून सारा देश हिंसेचा मार्ग पतकरूं इच्छीत आहे. आतां सरदार पृथ्वीसिंहांच्या व्यायाम योजनेकडेहि ते साशंक दृष्टीनें पाहूं लागले. त्यांनीं पृथ्वीसिंहांना सांगितलें—"तुम्ही व्यायामाच्या शिक्षणांत भाला, तलवार, सुरा इत्यादि हत्यारांचा समावेश केला आहे, तो ठीक नाहीं. या वस्तु हातीं घेतल्यानें मनांत हिंसेची भावना जागृत होते. म्हणून हीं हत्यारं अभ्यासक्रमांत ठेवूं नयेत." सरदार उत्तरले—"मी या हत्यारांचा वापर शिकलोंय, पण माझ्या मनांत हिंसेची भावना कधींच येत नाहीं. माणसाला मारायला हत्यारच काय, पण एक थप्पडसुद्धां पुरते. तसं म्हटलं तर मनगटांतला जोर देखील हिंसेची भावना जागृत करील. मग व्यायाम करणं ही सुद्धां हिंसाच म्हणायची, कारण व्यायामानं साऱ्या अवयवांमध्यें बळ येतं." गांधीजी म्हणाले—"बरोबर आहे. हेंहि होतां कामा नये."

हें ऐकून पृथ्वीसिंहांना फारच आश्चर्य वाटलें. आणि त्यांनीं तिथल्या तिथें सांगून टाकलें—"मला आपल्या असल्या योजनेंत सामील होतां येणार नाहीं."

१९४० साल संपत येईपर्यंत सरदारांना ही गोष्ट कळून चुकली कीं ज्याला दुनियेंत कुठंच थारा नाहीं अगर ज्याच्या मनांत महात्माजींविषयीं अंधश्रद्धा आहे अशाच माणसाला सेवाग्राममध्यें राहातां येईल. त्यांच्या सेवा-कार्यामुळें ते आश्रमांत सर्वांचे आवडते झाले होते, परंतु आपली शक्ति व्यर्थ जात असलेली पाहून त्यांचें मन फारच अस्वस्थ झालें. त्यांना असें वाटूं लागलें—"महात्माजींच्या इच्छेनुसार मला स्वतःचं व्यक्तित्व नष्ट करतां येत नाहीं. अन् स्वतःच्या इच्छेनुसार इथं कार्य करायला मला क्षेत्रहि मिळत नाहीं."

त्यांचें मन आतां तिथें बिलकुल लागत नाहीं ही गोष्ट इतरांनाहि कळून चुकली. वर्धा कॉलेजच्या प्रिन्सिपालनें अशी इच्छा प्रदर्शित केली कीं पृथ्वीसिंहांनीं वसतिगृहाची व्यवस्था आपल्या ताब्यांत घ्यावी. जमनालाल बजाज सगळी मदत द्यावयास तयार होते. व्यायामशिक्षणाचें केन्द्र तयार करण्यासाठीं एखादी जागा पसंत करा असें जमनालालजी त्यांना सांगत होते. तसें म्हटलें तर तुरुंगाबाहेर अज्ञातवासाच्या काळांत पृथ्वीसिंहांचें बहुतेक वास्तव्य गुजरातेंतील श्रीमंत व मध्यम वर्गांतच झालेलें होतें. त्यांच्या मित्रमंडळींत या वर्गांतल्या लोकांची संख्याच जास्त होती. तरीसुद्धां सेवाग्राममध्यें कुणी सामान्य माणूस आला कीं "महात्माजींना सवड नाहीं" असें सांगून त्याची बोळवण होई, आणि कुणी बिर्ला, बजाज, साराभाई आले कीं त्यांना सदैव मुक्तद्वार असे, हें पाहून पृथ्वीसिंहांना फार वाईट वाटे. यांत दोष महात्माजींचा नव्हता; दोष होता द्वारपालाचा. त्याच्या दृष्टीनें गरीब

लोक कःपदार्थ असत व श्रीमंत लोक भगवंताच्या कृपेला लायक असत–ही गोष्टहि पृथ्वीसिंहांना ठाऊक होती.

## महात्माजींना पत्र

पुष्कळ दिवसपर्यंत सरदारांनीं आपलें मन आंवरून धरलें. मनांतले विचार खुल्या दिलानें उघड करून सांगण्याचा त्यांना धीरच होत नव्हता. पण त्यांना आतां सेवाग्रामच्या भरंवशावर न राहतां स्वतःचा मार्ग स्वतः काढणें भाग होतें. म्हणून त्यांनीं ता. १८ जानेवारी १९४१ रोजीं गांधीजींपुढें आपलें अंतःकरण उघड करून दाखविण्यासाठीं पुढील पत्र लिहिलें—

सेवाग्राम

ता. १८--१--४१

"पूज्य बापूजी,

"आपल्या आदर्श जीवनानं माझ्या जीवनांत एक फार मोठी क्रान्ति निर्माण केली. त्याच हेतूसाठीं मी तुरुंगांत गेलों. कित्येक वर्षांपासूनच्या जिवाभावाच्या मित्रांचा त्याग केला. जे लोक माझी पूजा करीत होते त्यांच्या तोंडच्या शिव्या व निर्भर्त्सना सहन केल्या. आपण माझ्या मनांत आपल्याविषयीं एक जबरदस्त प्रेम निर्माण केलं म्हणून हें सारं परिवर्तन झालं... प्रेमानं मला आजपर्यंत आपल्याशीं निगडित करून ठेवलं... पण माझ्या हृदयांत देशासाठीं जें प्रेम आहे व देशासाठीं प्राण द्यायची जी ईर्ष्या माझ्या मनांत आहे तिची कुणालाहि कल्पना देखील करतां येणं कठीण आहे. आपलं प्रेम मला आपल्याकडे खेंचतंय, आणि देशाचं प्रेम त्याची स्थिति सुधारायसाठीं इच्छेनुसार कार्य करायला मला भाग पाडतंय. मी आपला भक्त राहूं इच्छितों—मन व प्राण सर्वस्वीं आपल्या भजनीं लावावेसे वाटतात. पण मी सच्चा देशप्रेमीहि आहें; देशाच्या स्वातंत्र्याच्या वेदीमध्यें आपल्या प्राणांची आहुति द्यायची ईर्ष्या धरणारा एक देशभक्त आहें मी. मी माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं कांहीं ना कांहीं तरी करूं इच्छितों...मी सेवाग्राममध्यें राहावयासाठीं मनाची खूपदां समजूत घातली पण मला तें जमलं नाहीं, अन् मला असं दिसतंय कीं मला सेवाग्रामीं अगर वर्ध्यात राहणं जमणारच नाहीं. आजपर्यंत मला कसल्याच प्रकारचा फायदा मिळाला नाहीं अन् पुढंहि तो व्हायची आशा नाहीं...भय ही गोष्टच मला ठाऊक नाहीं. आजपर्यंत

मला कोणत्याहि प्राण्याचं, माणसाचं, सत्ताधाऱ्याचं, हवापाण्याचं अगर आगीचं भय म्हणून वाटलेलं नाहीं. पण आपलं मात्र मला भय वाटतं. माझ्याकडून आपल्याला कसल्याहि प्रकारचं दुःख होईल असं कांहींहि करायची मला हिंमत होत नाहीं...आज माझं मन अत्यंत बेचैन झालेलं आहे. माझ्या अश्रूंनींच मी हें पत्र लिहीत आहे. माझ्या सहनशीलतेची आज अगदीं हद्द होणार. तुरुंगांतून सुटल्यानंतर एक वर्ष व चार महिने झाले अन् देशासाठीं कांहींच करायला मी लायक होऊं शकलों नाहीं. आज मी या दोन्ही गोष्टींचा खूप विचार केलाय. विचार करतां करतां माझं अंतःकरण दुभंग झालं. माझी अवस्था अशीच राहिली तर तिचा माझ्या मनावर व शरीरावर काय परिणाम होईल कोण जाणे. माझी ही अवस्था लक्षांत घेऊन आपण माझ्यावर दया करावी आणि मला देशांत इतरत्र जाऊन कांहीं तरी कार्य करायची...आज्ञा द्यावी......मला प्रत्येक कार्य यशस्वी रीतीनं करायला आपल्या मदतीची जरुर लागेल. कोणत्याहि खास कारणापायीं आपली मदत करायची इच्छाच नसेल तर गोष्टच वेगळी; पण मला आपलं प्रेम व आशीर्वाद मात्र अवश्य पाहिजे."

## महात्माजींचें उत्तर

गांधीजींनीं त्याच दिवशीं त्यांना पुढील उत्तर धाडलें—

"भाई पृथ्वीसिंह,

"तुमचं पत्र मी अत्यंत मननपूर्वक वाचलं. माझ्याशीं बोलायला भय कसलं ?

"मी तुम्हांला इथं मारुन मुटकून ठेवून घेऊं इच्छीत नाहीं. तुम्ही अगदीं शांतपणानं आणि मनापासून राहूं शकत असाल तर तुमच्या राहण्यानं मला आनंद होऊं शकेल. पण मला वाटतं तुम्हांला जोंपर्यंत आश्रमजीवनाशीं समरस होतां येत नाहीं तोंपर्यंत इथं राहणं निरर्थकच आहे. मला असंहि वाटतं कीं ज्यानं सारं भय सोडून दिलंय, त्याला आश्रमापासून काय मिळणार ? म्हणून तुम्हांला जिकडे जायचं असेल तिकडे जायचा, व जें करायचं असेल तें करायचा संपूर्ण हक्क आहे. तुम्हांला माझा आशीर्वाद तर आहेच आहे. तुम्ही जिथं जाल तिथं, व जें कांहीं कराल त्यांत, अहिंसा व सत्य असणारच हें मी जाणून आहें. मला तुम्ही पत्र लिहीत जा, पत्ता देऊन ठेवा, आणि काय काय करतां आहांत

तें, शक्य असेल तर, कळवीत जा. इकडे यायची जेव्हां मर्जी लागेल तेव्हां अवश्य या. या बाबतींत माझ्याशीं वाटाघाट करायची असेल तर अवश्य करा. बऱ्या बोलानं अलग होण्यांतहि दुःख कसचं ! धर्मपालनांत सुखच असतं. बापूचे आशीर्वाद. ”

## मालाड कँप

जानेवारींत सरदारांनीं वर्धा सोडलें. तसे ते अगोदरहि वर्ध्यांत सतत राहात नव्हतेच. ते सरळ मुंबईला आले. आपली व्यायामाची योजना त्यांनीं मित्रांसमोर ठेवली. त्यांना ती खूपच आवडली. व्यायाम शिकविण्यासाठीं एक चांगल्यापैकीं कँप सुरू करण्याचें ठरलें आणि मुंबईनजीक मालाड येथें कँप सुरू झाला. कँपमध्यें ६९६ विद्यार्थी होते, त्यांपैकीं १०३ विद्यार्थिनी होत्या. गडीमाणसें मिळून एकंदर १००० लोक होते. मालाड येथें एका विशाल आंबराईत या कँपसाठीं तट्ट्याच्या झोंपड्या बांधण्यांत आल्या. आणखी १००० तरुणांनीं प्रवेश अर्ज पाठविले, पण जागेच्या कमतरतेमुळें ते नामंजूर करणें भाग पडलें.

मुंबईच्या राष्ट्रीय वृत्तपत्रांनीं व्यायाम-शिबिराच्या प्रशंसापर पुष्कळ लेख लिहिले. दर रविवारीं हजारों लोक व्यायाम पाहण्यासाठीं मुंबईहून मालाडला जात असत; त्यांत ४००-५०० मोटारी असत. त्या वेळीं आंबराईंत खूप आंबे लागलेले होते. कांहीं लोक शंका प्रदर्शित करून म्हणाले—“या वानरसेनेच्या तावडींतून एकहि आंबा वांचायचा नाहीं.” सरदार म्हणाले—“ आपण जर मुलांच्यावर विश्वास ठेवला तर आंबे जिथल्या तिथं नक्कीच राहतील.” विद्यार्थ्यांमध्यें दहा दहा वर्षांचे लहान लहान मुलगेहि होते. पण आंबे कोणीहि तोडावयाचे नाहींत ही शिस्त सर्वांनीं आपणहून मानली. काम करण्याच्या बाबतींत तर मध्यम वर्गांतील हीं सुशिक्षित मुलें-मुली अगदीं घाणेरड्यांतलें घाणेरडें काम करावयास तयार असत. एका जागीं संडासाची घाण बरीच सांठलेली होती. सरदारांनीं १०० तरुण मागविले आणि एका मिनिटांत त्यांच्या मदतीनें सारी जागा साफ करून टाकली.

शिस्तीचा अंमल फार कडक होता. त्याची कडक परिक्षा घेण्यासाठीं त्यांनीं एका रात्रीं शिटी वाजविली. मुलें भाले घेऊन झोंपत असत. शिटी वाजतांक्षणीं गणवेश न घालतांच भाले घेऊन कांहीं सेकंदांच्या अवधींतच सारे एकत्र जमले.

सरदारांच्या या कार्यांत लोक मदत करायला किती मनापासून तयार असत याचें एकच प्रत्यंतर असें: त्यांनीं पैशासाठीं अपील केल्याबरोबर पैसे इतके जमले कीं कांहीं मिनिटांच्या आंतच त्यांना देणग्यांची यादी बंद करावी लागली.

मालाडचें शिबिर फारच यशस्वी झालें आणि वृत्तपत्रांतून त्याचा प्रचार तर आणखीच जोरांत झाला. या यशाची बातमी वर्ध्यालाहि पोंचली. महात्माजींनींहि याबद्दल आनंद प्रदर्शित केला आणि त्यांनीं पृथ्वीसिंहांच्या या कार्यात सहकार्य करण्यास कार्यकर्त्यांना सांगितलें.

पृथ्वीसिंहांनीं व्यायामसंघाची एक पंचवार्षिक योजना तयार केली. त्यांत दरसाल १०० तरुणांना घेण्याची तरतूद होती. एक वर्षपर्यंत त्यांना व्यायाम वगैरे शिक्षण देण्यांत यावें, मग दोन तीन महिने त्यांना महात्माजींच्या केन्द्रांमध्यें खादी व हरिजनोद्धाराचें शिक्षण मिळावें आणि मग देशभर वेगवेगळीं केन्द्रें उघडून तेथें त्यांना कामाला लावावें, अशी ही योजना होती. सारें काम राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखालीं व्हावयाचें होतें. पैशाच्या बाबतींत सांगावयाचा अवकाश कीं वर्षभराच्या खर्चासाठीं लागणारे ३०००० रु. कांहीं दिवसांच्या आंतच जमले. अशा देशसेवकांच्या अंगीं विशेष प्रकारची शारीरिक व मानसिक योग्यता असली पाहिजे. अशा तरुणांच्या शोधार्थ संयुक्त प्रांत, महाराष्ट्र, गुजरात, काठेवाड व बिहारमध्यें सरदार मुद्दाम हिंडून आले पण त्यांना जसे तरुण हवे होते तसे फार थोडे मिळाले. त्यांचा उत्साह जरा थंडावला तर खराच. पण कोणतेंहि कार्य करावयाचें असल्यास एक राजकीय आदर्श, एक सामाजिक ध्येय पुढें ठेवून केलें पाहिजे. नाहीं तर गंगा-जमनी तरुण एकत्र करावयाचे म्हणजे त्यांत काय अर्थ ? सरदारांना पस्तीस तरुण मिळाले. त्यांतलेहि पांच बाजूला काढावे लागले.

संघाचें नांवहि गांधीजींच्या सूचनेनुसार "अहिंसक व्यायाम संघ" ठेवलें होतें तरी एक दोन व्यक्तींखेरीज कुणाचीहि अहिंसेवर श्रद्धा नव्हती. हा कँपहि मालाड येथील रामबागेंत भरविण्यांत आला. तरुणांचें शिक्षण कसून झालें. त्यांची शिस्त पाहून जनता देखील फारच खूष झाली.

रात्रींच्या वेळीं एक इसम एका मुलीला मोटारींतून पळवून नेत होता. बागेजवळ मुलीनें मोटारींतून उडी मारून ओरडाआरडा केला. कँपमधील तरुणांनीं शिटी वाजविली. मोटार ड्रायव्हर ३०० वार पुढें गेला तोंच कपच्या फाटकाशीं तरुण स्वयंसेवकांचा त्याच्या भोंवतीं गराडा पडला. त्यांनीं मोटारवाल्याला पकडून पोलिसांच्या हवालीं केलें. हा प्रकार घडला त्या दिवशीं पृथ्वीसिंह कँपांत नव्हते.

## महात्माजींचा निरोप

जर्मनीनें सोविएत युनियनवर आक्रमण केलें तेव्हां सरदारांनीं गांधीजींना

लिहिलें—

"ही वेळ गप्प बसावयाची नव्हे. हा जनतेच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. आपण एकदां असं सांगितलं होतं कीं 'ज्या दिवशीं वेस्ट मिन्स्टर ॲबेवर बाँब पडेल त्या दिवशीं माझ्या डोळ्यांतून आंसवं येतील.' आज रशियाच्या कामगार-शेतकऱ्यांच्या घरांवर बाँब पडत आहेत. अशा स्थितींत आपण एक अक्षरसुद्धां कां नाहीं बोलत?"

महात्माजींनीं याचें उत्तर देतांना ता. २० सप्टेंबर १९४१ रोजीं लिहिलें—"आतां रशियाच्या संबंधांत आपल्याला कांहींच करतां येत नाहीं. मी तिघांमध्यें फारसा फरक मानत नाहीं. मात्र रशियांत लोकांच्यासाठीं पुष्कळ कार्य झालंय हें मी नाकबूल नाहीं करत." सरदारांनीं देवळी कॅंपमध्यें अन्नसत्याग्रह करून राहिलेल्या राजबंदींकडेहि महात्माजींचें लक्ष वेधलें आणि यांच्यासाठीं कांहीं तरी करण्याची विनंती केली. देवळी येथें जिवावर उदार होऊन झगडत असलेल्या कैद्यांपैकीं पुष्कळसे राजबंदी सरदारांचे गाढे स्नेही होते. आणि यांपैकीं बाबा सोहनसिंह, बाबा रूरसिंह यांच्यासारखे किती तरी राजबंदी तर फांशीच्या घांट्यावरून उतरलेले त्यांचे जुने सहकारीहि होते.

१९४२ चा मार्च महिना असावा बहुधा. मुंबईंत कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक होती. सरदारांनीं पंडित जवाहरलालजींना मालाडला बोलावलें. त्यांचें व्याख्यान ऐकण्यासाठीं १०००० लोक जमले होते. सरदारांच्या शिष्यांनीं सभेची व्यवस्था इतकी उत्तम ठेवली होती कीं ती पाहून एक सद्‌गृहस्थ म्हणाला—"जी सभेची व्यवस्था आमच्या कल्पनेंत देखील येऊं शकत नव्हती, ती आज आम्ही प्रत्यक्ष पाहिली."

सरदारांवर महात्माजींचा प्रभाव होता तेव्हां देखील राजकीय विषयांवर त्यांच्याशीं ते जास्त चर्चा करीत नसत. ते कधीं कधीं असे उद्गार मात्र काढत असत—"महात्माजी, ज्यांना आपलं म्हणणं कळतं, ते आपल्या मार्गानं जात नाहींत अन् ज्यांची आपल्यावर श्रद्धा आहे, त्यांना आपलं म्हणणं कळत नाहीं."

गांधीजींच्या तत्वज्ञानाचे पंडित श्री. किशोरीलाल मश्रूवाला यांनीं एकदां सरदारांना असें सांगितलें होतें—"मोठी पंचाईत आहे बुवा. तुम्हांला वाटतंय कीं आपण गांधीजींचे सहकारी आहोंत. अन् गांधीजींना वाटतंय कीं तुम्ही त्यांचे शिष्य आहांत."

१९४२ चा जानेवारी महिना होता. भावनगर शहरीं खेळ व व्यायामाच्या चढाओढींसाठीं एक मोठें वार्षिक संमेलन भरलेलें होतें. सरदारांनीं सांगितलें कीं

अशा संमेलनांमध्यें तरुण पुढाऱ्यांनाहि बोलावून त्यांचा आपण काँग्रेस पुढाऱ्यांप्रमाणें सन्मान केला पाहिजे, त्यांना हार घातले पाहिजेत, त्यांच्या मिरवणुकी काढल्या पाहिजेत. माजी काँग्रेस मंत्री श्री. मुरारजी देसाई यांना हें म्हणणें गैर वाटलें. त्यांनीं सांगितलें —" आम्ही जें कांहीं करतों तें काय हार मिळवायसाठीं करतों ?" सरदारांनीं असेंहि सांगितलें होतें —" काळ बदलत चालला आहे. पुढाऱ्यांनाहि बदलावं लागेल. जर बदलले नाहींत तर ते प्रतिगामी होऊन बसतील." जुन्या मताच्या साऱ्या पुढाऱ्यांना हें बोलणें गैर वाटलें. गांधीजींच्या आसपासच्या साऱ्या लोकांना हें मत पसंत पडणें शक्य नव्हतें. त्यांनीं महात्माजींजवळ तक्रार केली. पृथ्वीसिंहांनींहि महात्माजींना एक पत्र पाठवलें व महात्माजींनीं आपण त्यांच्या विचारांशीं सहमत असल्याचें मत प्रदर्शित केलें.

क्रिप्स मिशन आलें त्या वेळीं गांधीजी दिल्लीला गेले होते. एके दिवशीं मोटार सोडून देऊन ते सरदार पृथ्वीसिंहांसमवेत पायींच चालत निघाले. त्या वेळीं महात्माजींनीं पृथ्वीसिंहांना सांगितलें—" माझं मन तुमच्या विरुद्ध कलुषित व्हावं म्हणून कांहीं लोक तुमच्या बाबतींत तक्रारी घेऊन माझ्याकडे येतात हें मला ठाऊक आहे. पण मी त्यांच्या सांगण्याची पर्वा करीत नाहीं." सरदार त्या वेळीं म्हणाले— " मला कम्युनिस्ट पार्टीतर्फेंचा हेर म्हणून आपणांकडे पाठविण्यांत आलंय असं कित्येक पुढाऱ्यांना वाटतं ही दुर्दैवाची गोष्ट आहे. कम्युनिस्ट पार्टीचं नांव घेतलं म्हणजे इतरहि लोकांना माझ्याविरुद्ध सहज उठवितां येईल असा त्यांचा डाव आहे. पण माझे विचार कम्युनिझमला अनुकूल असले तरी मला कम्युनिस्ट पार्टीतर्फें पाठविण्यांत आलेलं नाहीं."

१९४२ च्या मे महिन्यांत महात्माजी अँड्र्यूज स्मारकाच्या कामासाठीं मुंबईला आले होते. त्यांचा मुक्काम बिर्ला हाऊसमध्यें होता. सरदार पृथ्वीसिंहहि त्यांना भेटावयास गेले. गांधीजी बोलतां बोलतां त्यांना म्हणाले—"मोठा कठीण काळ आला आहे, तुम्ही माझ्याच बरोबर असा. हे माझे अखेरचे दिवस आहेत, हें माझं शेवटचं युद्ध आहे."

महात्माजींनीं पृथ्वीसिंहांना अहिंसक व्यायाम संघ बंद करून आपल्याबरोबर येण्याचा आग्रह केला. संघ बंद करणें पृथ्वीसिंहांना पटलें नाहीं. पण संघच वर्ध्याला घेऊन जाण्याच्या बाबतींत त्यांनीं नाथजी व कुलकर्णी यांचा सल्ला घेतला. त्यांनींहि महात्माजींच्या बरोबर जाण्याचा सल्ला दिला. सरदार पुन्हां गांधीजींना भेटले व संघाचे तरुण सदस्य व त्यांचें शिक्षण इत्यादि माहिती त्यांनीं त्यांना दिली.



वाचनालय

गांधीजी आश्चर्यचकित होऊन म्हणाले— " मला तर हें ठाऊकच नाहीं." हें ऐकून सरदारांना अतिशय वाईट वाटलें. कारण दहाच दिवसांपूर्वी गांधीजींनीं बिर्लांना संघाच्या खर्चाचा भार सोसण्यास सांगितलें होतें ! बिर्लांना सांगितल्या-नंतर ती गोष्ट गांधीजींच्या स्मरणांतून अजिबात गेलीच असावी. पण सरदारांच्या मनाला ही गोष्ट फार लागून राहिली.

याच्या अगोदरच सरदार गांधीजींना संघाचा कँप पाहण्यासाठीं मालाडला येण्याचें आमंत्रण देऊन चुकले होते. आणि गांधीजींनींहि कांहीं लोकांचा बराचसा विरोध असतांना देखील हें आमंत्रण स्वीकारलें होतें. विरोधक महात्माजींना असें सांगत होते कीं या एका संस्थेचें जर आमंत्रण स्वीकारलें तर इतर संस्था-देखील आमंत्रणें देतील. यावर गांधीजी उत्तरले—" मी मालाडला तर जाणारच, पण इतर ठिकाणीं मात्र नाहीं जाणार. "

पण गांधीजींच्या वर सांगितलेल्या बोलण्याचें सरदारांना इतकें दुःख झालें होतें कीं पुन्हां त्यांनीं महात्माजींना तिकडे येण्याबद्दल आग्रहच केला नाहीं. ते एकटेच मालाडला परतले. त्यांनीं कार्यकर्त्यांना एकत्र बोलवलें आणि सांगितलें— " हा तुमचा अहिंसक व्यायाम; हे त्याचे विद्यार्थी; आणि हे संघाचे पैसे. तुम्ही हें सारं संभाळा. आतां माझा यांच्याशीं कांहीं एक संबंध नाहीं. "

कार्यकर्ते बुचकळयांत पडले. दुसऱ्याच दिवशीं महात्माजी तिथें येणार होते. रात्रींच संघाचे अध्यक्ष श्री. केदारनाथजी यांना टेलिफोन करून बोलावून घेण्यांत आलें. नाथजींनीं परोपरीनें समजावलें, पण सरदार म्हणाले—"माझा तर निश्चय होऊन चुकला आहे." नाथजींनीं गांधीजींना टेलिफोन करून विचारलें—" आपल्याला सकाळीं यायचंय ना ? " गांधीजींनीं होकार दिला.

दुसऱ्या दिवशीं गांधीजी मालाडला आले. त्यांच्या समवेत बिर्ला, वल्लभभाई व महादेवभाईहि होते. कँपची व्यवस्था व शिक्षण पाहून सर्वांनीं प्रसन्नता प्रदर्शित केली. मग नाथजींनीं महात्माजींना सरदारांचा निश्चय सांगितला. गांधीजींना फारच आश्चर्य वाटलें आणि त्यांनीं सरदारांना बोलावून आणण्यास सांगितलें. नाथजी सरदारांना गांधीजींची भेट घ्या म्हणून सांगूं लागले. तेव्हां सरदार म्हणाले—" या संबंधांत आतां माझ्या मनांत तो पूज्यभाव राहिलेला नाहीं, म्हणून येण्यांत कांहीं अर्थ नाहीं." तरीहि सरदार गांधीजींना भेटावयास गेलेच. गांधीजी हंसत हंसत म्हणाले—"काय झालं काय ?" सरदार किती तरी वेळ गांधीजींचें बोलणें ऐकतच राहिले आणि मग म्हणाले—" मी आपल्याला बार्डोलीच्या मुक्कामांतच सांगितलं होतं कीं मी हिंसा अहिंसा जाणत नाहीं.

जोंपर्यंत आपल्यावर माझा विश्वास राहील तोंपर्यंत मी आपल्या बरोबर राहीन, नाहीं तर अलग होईन. आपण माझ्या आयुष्याचा पूर्ण उपयोग करूं शकत नाहीं हें आपल्या बोलण्यावरून मी समजून चुकलों. आतां माझा विश्वास नाहीं राहिलेला.

"माझ्यावर नसला तरी अहिंसेवर तर तुम्हांला विश्वास ठेवतां येईल!"

"अहिंसा तर मला कधीं समजलीच नाहीं, मग मी तिच्यावर विश्वास कुठून ठेवणार? मी मार्क्सवादाच्या दृष्टीनें अहिंसा समजून घेऊं इच्छीत होतों. राज्यसंस्था ही लष्कर व पोलिस यांसारख्या 'अहिंसक' शक्तींवर अवलंबून असते. जेव्हां समाजांतील श्रीमंत-गरीब, पिळणारे-पिळले जाणारे हा भेद नष्ट होईल तेव्हां हें हिंसेवर आधारलेलं राज्ययंत्र नष्ट होईल. त्याच वेळीं समाजांत अहिंसा पूर्ण स्वरूपांत विराजमान होईल. त्याच अहिंसेच्या अनुरोधानं मी आपली विचारसरणी समजून घ्यायचा प्रयत्न करीत राहिलों."

महात्माजींनीं त्यांची समजूत घालण्याची खूप खटपट केली, पुन्हां वर्ध्याला येऊन वाटाघाट करण्यास सांगितलें, पण सरदारच कबूल झाले नाहींत.

किशोरीलाल मश्रूवाला व इतर मित्रांनींहि त्यांना वर्ध्याला येण्याबद्दल कित्येक पत्रें धाडलीं पण सरदारांचें मन पुन्हां तिकडे जाण्यासाठीं राजीच होईना.

★

वाचनालय, सातारा.

## (१६)

## पार्टीचें कार्य व तुरुंगवास

रशियन राज्यक्रांतीचा प्रभाव सरदार पृथ्वीसिंहांच्या मनावर अगोदरच फार मोठ्या प्रमाणांत पडलेला होता. कराची कॉंग्रेसचे वेळीं आपल्या जुन्या सहकाऱ्यांना भेटल्यावर सोविएत युनियन व कम्युनिझमविषयीं त्यांच्या मनाला अधिकच आकर्षण वाटूं लागलें. सोविएत युनियनमध्यें प्रत्यक्ष राहून अभ्यास केल्यानंतर तर त्यांची पक्की खात्रीच झाली कीं हिंदुस्थानांत क्रांति करण्याचा हाच एक मार्ग आहे. क्रांतीच्या ध्येयासाठीं सर्वस्वाचा त्याग करण्याची जशी त्यांच्या मनाची तयारी होती तशाच उत्साहानें त्यांची बुद्धीहि या कार्यांत साथ देऊं लागली. कम्युनिझमच्या प्रत्यक्ष प्रयोगाशीं व कर्त्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांशीं त्यांची जानपछान

झालेली होती व मनानें आणि बुद्धीनें ते पक्के कम्युनिस्ट झालेले होते. आपणहून पोलिसांच्या स्वाधीन होईपर्यंत ते हिंदुस्थानांत एक कम्युनिस्ट या नात्यानेंच कार्य करीत होते. नंतरच्या चार वर्षांत त्यांच्या विचारांवरील कम्युनिझमचा प्रभाव नाहींसा नव्हता झालेला; तरी पण त्यांनीं गांधीजी व त्यांची विचारसरणी मनापासून समजून घेण्याची खटपट केली. तरुणांचें शरीर व बुद्धि मजबूत करणें हें गांधीवादाला जितकें आवश्यक आहे तितकेंच साम्यवादालाहि आवश्यक आहे असा त्यांचा समज होता.

हिंदुस्थानांतून गुलामगिरी व गरीबी या दोहोंचेंहि उच्चाटन झालें पाहिजे असें त्यांना वाटत होतें. ते गांधीजींनाहि हें समजून सांगण्याचा प्रयत्न करीत होते, कारण गांधीजी देखील देशाची गरीबी नष्ट करूं इच्छितात हें त्यांना ठाऊक होतें. पण आश्रमाचें वातावरण त्यांना अनुकूल वाटेना. त्याचीं कारणें अगोदर दिलेलींच आहेत. त्यांनी आश्रमाला रामराम ठोकला.

पार्टी अजूनहि बेकायदेशीरच होती. डॉक्टर अधिकारी त्या वेळीं मुंबईंतच भूमिगत राहून कार्य करीत होते. सरदारांनीं त्याच दिवशीं त्यांना निरोप पाठविला व दुसऱ्या दिवशीं काम मागण्यासाठीं ते पार्टीकडे आले. भांडवलदारांच्या हस्तकांनीं वृत्तपत्रांतून हर प्रकारच्या अफवा फैलावल्या. गांधीजींनींच नापसंती दर्शवून मालाडचा आश्रम बंद करविला अशी बातमी या लोकांनीं पसरविली. सरदारांनीं गांधीजींना या बाबतींत एक पत्रक काढण्याविषयीं लिहिलें. गांधीजींनीं आपलें पत्रक काढलें व सरदारांनींहि आपलें वेगळें पत्रक काढलें. हीं दोन्ही पत्रकें जून १९४२ च्या 'हरिजन' मध्यें पहिल्या पानावर प्रसिद्ध झालीं.

जर्मनीनें सोविएत युनियनवर आक्रमण करतांक्षणीं हिंदुस्थानच्या कामगार-किसानांचें भवितव्य सोविएत रशियांतील व साऱ्या दुनियेंतील फॅसिझमविरोधी जनतेच्या भवितव्याशीं निगडित झालें ही गोष्ट सरदार पृथ्वीसिंहांनीं लक्षांत घेतली. म्हणून ते सांगूं लागले कीं "दुनियेंतील पिळल्या जाणाऱ्या जनतेचें भवितव्य फॅसिस्टांच्या पराभवावरच अवलंबून आहे; म्हणूनच जर्मन-जपानी फॅसिस्टांचा नाश करण्यांत ज्या कोणत्या शक्ति गुंतलेल्या आहेत, त्यांच्या कामांत व्यत्यय आणणें गैर आहे." क्रिप्स मिशन परत गेल्यानंतर जेव्हां लढ्याची व चळवळीची भाषा सुरू झाली, तेव्हां राष्ट्रीय चळवळीचा व स्वातंत्र्याचा मार्ग हा नव्हे असें सरदार स्पष्टपणें बजावूं लागले. आपण राष्ट्रीय ऐक्य करून राष्ट्ररक्षणाची जबाबदारी आपल्या हातीं घेतली पाहिजे.

आपल्या स्वातंत्र्याचा हाच मार्ग आहे. १९४२ सालीं त्यांनीं सुरत, बडोदें, नडियाद, अहमदाबाद, भावनगर, राजकोट इत्यादि गुजरात-काठेवाडांतील कित्येक शहरांना भेटी देऊन तेथील सुशिक्षित जनतेला हें धोरण समजावून सांगितलें.

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकीचे वेळीं त्यांचा मुंबईला येण्याचा बेत होता. पण वाटेंत पावसामुळें रेल्वे लाइन वाहून गेल्यामुळें त्यांना अहमदाबादेंतच अडकून पडावें लागलें.

९ ऑगस्ट रोजीं ते मुंबईला आले तों गांधीजींना अगोदरच अटक झालेली होती.

ता १४ ऑगस्ट रोजीं सुप्रसिद्ध कम्युनिस्ट व काँग्रेस पुढारी डॉक्टर अश्रफ यांच्या समवेत सरदारहि इन्दूर येथील फॅसिस्ट-विरोधी परिषदेला हजर राहिले.

त्यानंतर गनिमी सैनिकांचें एक शिक्षण-शिबिर चालविण्यासाठीं सरदार भावनगरला गेले. त्यांचे मित्र व सहकारी त्यांना या कामांत पुष्कळच उत्तेजन देत होते. परंतु तरुण लोक संतापानें बेभान झालेले होते. सरदारांनीं त्यांची समजूत घालण्याची खूप खटपट केली, पण तरुणांनीं याला उत्तर म्हणून एक पत्रक काढलें. "हृदयांतील मूर्तीचें खंडन" असा या पत्रकावर मथळा होता.

सरदार भावनगरला पोंचल्यानंतर तीनचार दिवसांनींच तेथील राष्ट्रीय पुढारी पकडले गेले. विद्यार्थ्यांनीं निदर्शन केलें. पोलिसांनीं लाठी चालविली आणि सुमारें ३०० लोकांना अटक केली. हा सारा प्रकार भावनगरांत आपल्या डोळ्यांदेखत घडत असतां सरदारांना गप्प बसवणें शक्यच नव्हतें. पोलिस सुपरिंटेंडंटला भेटून त्यांनीं सांगितलें कीं "धरपकड व लाठीमारामुळें लोक अधिक चिडतील. तुम्ही तरुणांना सोडून द्या, त्यांची जबाबदारी मी घेतों." तरुणांवर सरदारांचें किती वजन आहे हें पोलिस सुपरिंटेंडंटला चांगलेंच ठाऊक होतें. त्यानें तरुणांना सोडून दिलें. सरदारांनीं दुसऱ्या दिवशीं नागरिकांची सभा भरविली व पुढाऱ्यांनाहि समजावलें.

त्यांनीं नागरिकांना सांगितलें—"तुम्ही पुढाऱ्यांच्या सुटकेसाठीं सरकारवर दडपण आणा, म्हणजे त्याच्या योगानं इथं शांतता राहील. मी तुरुंगांतल्या पुढाऱ्यांची समजूत घालतों अन् तुम्ही दिवाणाची समजूत घाला." सभेंत असें ठरलें कीं सरदारांनींहि नागरिकांसमवेत दिवाणाकडे जावें व जेलमधील पुढाऱ्यांना समजावण्यासाठीं त्याची परवानगी घ्यावी. लोक दिवाणाला

भेटले. दिवाण म्हणाला--" तुम्हांला जातां येईल. पण मी स्वामीरावांना परवानगी देणार नाहीं." नागरिक म्हणाले--" स्वामीराव आमच्या बरोबर येत नसतील तर आमचं जाणं व्यर्थ आहे." तेव्हां दिवाणाला झक मारत सरदारांनाहि परवानगी देणें भाग पडलें. ते पुढाऱ्यांना भेटले आणि सारी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थिती समजावून सांगितल्यानंतर म्हणाले--" तुम्ही मंडळी महात्माजींचा मार्ग सोडून देत आहांत." पण दुर्दैवानें पुढाऱ्यांनीं त्यांचें म्हणणें ऐकलें नाहीं व सरकारशीं सलोखा होऊं शकला नाहीं.नगर वाचनालय सातारा संगणकीकृत

## अटक आणि स्थानबद्धता

सरदार भावनगरांत एक मोठी व्यायामशाळा स्थापन करायच्या योजनेंत गुंतलेले होते. पण ता. १० ऑक्टोबर रोजीं रात्रीं २ वाजतां ब्रिटिश एजन्सीचे व संस्थानचे मिळून १०० पोलीस व पांच इन्स्पेक्टरांनीं त्यांच्या घराला गराडा दिला व भारतसंरक्षण कायद्यान्वयें त्यांना अटक करून एका मोटारींत घालून नेलें. एक मोटार पुढें व एक मागें असा त्यांच्या मोटारीवर पाहरा होता. सरदारांना एजन्सीचें ठाणें सोनागड येथें नेण्यांत आलें. तिथून त्यांची रवानगी राजकोट जेलमध्यें झाली. कॉंग्रेस पुढाऱ्यांशीं त्यांची गांठभेट होऊं नये म्हणून पुढाऱ्यांना तुरुंगांतून काढून बाहेरच्या एका बंगल्यांत ठेवण्यांत आलें व सरदारांना जेलमध्यें डांबून ठेवण्यांत आलें.

ता. १ जानेवारी १९४३ रोजीं सरदारांना संस्थानी तुरुंगांतून येरवडा जेलमध्यें पाठविण्यांत आलें. कॉमरेड डांगेहि या वेळीं तिथेंच स्थानबद्ध कैदी म्हणून होते, म्हणून २०-२५ दिवस दोघे एकत्र राहिले. सरदारांना पकडण्यांत आल्याची बातमी ऐकून सर्वांना आश्चर्य वाटलें. पण हें सरकार निरंकुश आहे इतकेंच नव्हे तर त्याच्यावर कोणत्याहि टीकेचा परिणामच होत नाहीं; आणि या सरकारच्या राज्यांत अंधेर नगरीच्या नाटकाचे प्रयोग केव्हांहि होऊं शकतात.

आतां सरदारांची पुन्हां तुरुंगांतील दिनचर्या सुरू झाली. सकाळीं सात वाजतां उठल्यावर स्नान आणि व्यायाम. न्याहारीनंतर वाचन. साडेबारा वाजतां भोजन व थोडीशी विश्रांति. मग वाचन अगर एखादा खेळ. संध्याकाळीं साडेसहा वाजतां भोजन आणि रात्रीं आठ वाजतां कुलुप-बंदी.

★

( १७ )

# विवाह आणि मुक्तता

सरदारांचे तिघे भाऊ ब्रह्मदेशांत राहात होते हें मागें सांगितलेंच आहे. जपान्यांनीं ब्रह्मदेशावर हल्ला केला व मौन्यिवावर बॉंबफेंक केली तेव्हां तिथले लोक जीव घेऊन पळत सुटले. सरदारांचे बंधु वर्मासिंह आपल्या पत्नीला बरोबर घेऊन मौन्यिवाहून पळत निघाले. वाटेंत जपानी सैनिकांनीं त्यांना लुटलें. त्यांतच त्यांना मलेरिया लागला. अनेक अडचणींना तोंड देत देत पायींच कसेंबसें अर्धमेल्या अवस्थेंत त्यांनीं मणिपूर गांठलें. तिथून ते पाटण्याला आले आणि तेथें आजारी पडले. सरदारांना कळल्याबरोबर त्यांनीं त्यांना भावनगरला बोलावून घेतलें. अजूनहि त्यांची प्रकृति नीट झाली नव्हती तोंच सरदारांची तुरुंगांत रवानगी झाली. सप्टेंबरांत वर्मासिंहांचें दुखणें विकोपाला गेलें. चहूंकडून सरकारवर दडपण आलें. म्हणून ता. २७ ऑक्टोबर १९४३ रोजीं सरदार एक महिन्याच्या पॅरोलवर सुटले. इस्पितळांतील डॉक्टरांनीं खूप मेहनत केली व वर्मासिंह वांचले.

## विवाह

सरदार पृथ्वीसिंह अत्यंत आरोग्यसंपन्न, देखणे व तरुण जवान होते. परदेशांत स्वतंत्र वृत्तीच्या ब्रम्ही तरुणींनीं त्यांना आपल्या प्रेमपाशांत बांधण्याचा प्रयत्न केला पण त्या वेळीं आपल्या रजपूत कुळाच्या अभिमानामुळें ते या मोहांतून बचावले. त्यानंतर देशभक्तीच्या भावनेनें ते भारले गेले. मग विवाह करायची फुरसत कुठून असणार? विवाहाच्या बाबतींत त्यांच्यावर जें दडपण आलें होतें, त्यांच्यापुढें जीं प्रलोभनें व आकर्षणें ठेवण्यांत आलीं होतीं, त्या सर्वांची हकीकत लिहिली तर वाचकांचें चांगलेंच मनोरंजन होईल आणि त्याचबरोबर सरदारांच्या दृढ मनोबलाचीहि त्यावरून चांगली कल्पना येईल. पण त्या घटनांची हकीकत देऊन आम्ही या पुस्तकाचा विस्तार वाढवूं इच्छीत नाहीं. मात्र सरदारांच्या समोर कशा प्रकारचीं प्रलोभनें व आकर्षणें आलीं व तीं त्यांनीं कशीं टाळलीं याची कल्पना देणारी एक प्राचीन कथा आम्ही सांगतों.

* * *

प्राचीन काळीं एक राजा होता. त्याचें आपल्या प्रजेवर फार प्रेम होतें आणि प्रजेचेंहि त्याच्यावर प्रेम होतें ! या प्रजावत्सल राजावर दुसऱ्या एका जुलमी राजानें आक्रमण केलें. राजा मारला गेला, राणी सती गेली. जुलमी राजा प्रजेच्या छातीवर कोरडे ओढूं लागला. प्रजा कातावून गेली. प्रजावत्सल राजाचा एक लहानगा मुलगा होता. नोकरांनीं त्याचे प्राण वांचविण्यासाठीं त्याला दूर देशीं पाठवून दिलें होतें. कुमार हळूहळू लहानाचा मोठा होऊन शाहणा झाला. त्याला आपल्या पित्याला मारण्यांत आल्याची हकीकत कळली. त्या देशांतहि त्याचें तारुण्य व सौन्दर्य पाहून किती तरी सुन्दरी त्याच्यावर मुग्ध झालेल्या होत्या. पण कुमारानें अशी प्रतिज्ञा केली होती कीं मला माझ्या जन्मभूमीला मुक्त करावयाचें आहे व जें प्रेमबंधन माझ्या कार्यांत बाधक होऊं शकेल तें मला पतकरतां येत नाहीं.

जन्मभूमीला सोडविण्यासाठीं तो जागोजाग भटकत राहिला आणि याच खटपटींत असतांना एके दिवशीं वेश पालटून तो आपल्या देशांत दाखल झाला. तिथें जंगलांत च्यवन ऋषीचा आश्रम होता. वृद्ध ऋषि म्हणजे दयेची व करुणेची मूर्तीच होती. कुणालाहि दुःखी स्थितींत पाहून त्यांचें अंतःकरण द्रवत असे. ते अजातशत्रु होते. त्यांच्याशीं कोणीहि वैर करीत नव्हतें. जुलमी राजाच्या दुष्ट कारभारामुळें प्रजा त्रस्त झाली आहे हें पाहून च्यवन ऋषींना फारच दुःख होत होतें. कुमार त्यांच्या आश्रमांत वेश पालटून राहिलेला होता. परंतु ऋषीला खरा प्रकार कळला. ऋषींचा शस्त्रास्त्रांवर विश्वास नव्हता. तरी पण कुमार आपल्या देशाचा उद्धार करूं इच्छीत आहे म्हणून ते कुमाराकडे स्नेहाच्या दृष्टीनें बघत होते. च्यवन ऋषीच्या आश्रमांत आत्मिक शांतीच्या शोधार्थ दूरदूरचे लोक येत असत. हिरण्यकश्यपूच्या वंशांत देखील प्रल्हाद नाहीं का निर्माण होत? तशाच प्रकारें जुलमी राजाच्या वंशांत एक कन्या जन्माला आली. तिचा स्वभाव पित्याच्या अगदीं उलट होता. मानव प्राण्यालाच काय, पशुपक्ष्यांना देखील दुःख झालेलें तिला बघवत नसे. उपाशीं मुलें, नंगे भिकारी, उजाड गांवें पाहून तिचें हृदय विव्हल होत असे. या साऱ्याला कारण आपला पिता आहे हें कळल्यावर तर कुमारीचें चित्त आणखीच उद्विग्न झालें. क्रूर असला तरी पिता आपल्या एकुलत्या एक कन्येवर फार प्रेम करीत होता. कुमारीनें पित्याला समजावण्याचा खूप प्रयत्न केला पण त्याचा कांहींच परिणाम झालाच नाहीं. ती एकसारखी उदास राहूं लागली. एके दिवशीं च्यवन ऋषींची ख्याति अन्तःपुरापर्यंत पोंचली. कुमारीचें रूप व गुण पाहून किती तरी राजकुमार तिला आपली पट्टराणी करूं

इच्छीत होते. पण कुमारीला या अन्यायी दुनियेचा वीट आलेला होता आणि तिनें आजन्म कुमारी राहण्याची प्रतिज्ञा केलेली होती. च्यवन ऋषीची हकीकत कळल्यावर ती एके दिवशीं राजमहाल सोडून आश्रमांत चालती झाली. इथें तिला आत्मिक शांति मिळाली. मात्र जेव्हां तेव्हां लोकांचे कष्ट ऐकून तिचें चित्त विव्हल होऊन राही.

सांजवातीची वेळ होती. गाई जंगलांतून गांवांत परत येत होत्या. त्या दिवशीं योगायोगानें कुमारीबरोबर कुमारहि फिरावयास गेला होता. कुमारी पुढें चालली होती व कुमार पाठोपाठ चालला होता. एक मोठ्या शिंगांचा बैल समोरुन दौडत येत होता. कुमाराला चिंता पडली आणि त्याच्या स्वाभाविक दाक्षिण्यानें उसळी मारली. डोळ्याचें पातें लवतें न लवतें येवढ्यांतच कुमारीला मागें ओढून घेऊन तो स्वतः पुढें झाला आणि बलाचीं शिंगे धरुन त्यानें त्याला बाजूला ढकलून दिलें. कुमारी थोडा वेळपर्यंत गंभीर चिंतेंत मग्न झाली. मग ती म्हणाली "कुमार, स्त्री असूनहि मी आजपर्यंत कधीं कुणा पुरुषाच्या मदतीनं माझं रक्षण व्हावं अशी इच्छा नव्हती केली. अन् पुरुषानीं मला अबला समजावं आणि मला मदत करण्यासाठीं आपले बाहू पसरावेत हें मला मुळींच पसंत नव्हतं. आज तुम्ही काय केलंत हें ?" आपल्या स्त्री-दाक्षिण्यानें आपल्याला हें अविचारी कृत्य करावयास भाग पाडलें हें कुमार कसें सांगणार ? त्या दिवसापासून कुमारीचें कुमारावरील प्रेम फारच वाढत गेलें, पण हें प्रेम होतें भावा बहिणीचें. ती त्याला "माझा लाडका कुमार" म्हणे आणि कुमारहि तिला "माझी लाडकी ताई" म्हणे. कुमारीला सतत च्यवन ऋषीच्या आश्रमांत राहावें लागे. पण कुमारानें तर जन्मभूमीला मुक्त करण्याचें कंकण बांधलें होतें. कुमारी त्याला नियमितपणें पत्रें पाठवीत असे, त्यांत कधीं ती "तुमची" व कधीं "तुमची लाडकी" असें लिहीत असे. कुमारहि तशाच प्रकारें आपलें भावाचें प्रेम व्यक्त करीत असे. कुमारीचें हें साधेंसुधें प्रेम हळूहळू अशा प्रकारच्या स्वरूपांत परिणत झालें कीं तें तिला कळलेंहि नाहीं. तिला वाटे कुमाराला आपल्या अगदीं अगदीं जवळ ठेवून घ्यावा. आणि या प्रयत्नांत तिनें कुठच्या कुठें मजल गांठली. कुमारापासून दूर राहिल्यामुळें कुमारी कशी अधीर होऊन जात असे, त्याच्या पत्राकडे ती कशी डोळे लावून बसत असे, हें जर आधुनिक प्रेमपत्रांच्या स्वरूपांत लिहून काढलें तर तीं पत्रें साधारणपणें पुढील प्रकारचीं झालीं असतीं.

" माझ्या लाडक्या दादा,

" आठवडा पुरा झाला अन् तूं यायच्या ऐवजीं नुसतं एक पत्रच आलं...फार उशीरपर्यंत बाहेरगांवीं राहूं नये यापेक्षां जास्त मी कांहीं सांगूं इच्छीत नाहीं...माझी झोंपडी अर्ध्याहून अधिक बांधून तयार झाली...मी तुझ्यासाठीं एक कोंपरा राखून ठेवलेला असेल. तुम्हांला शांतता हवी असेल तेव्हां तींत कुणीहि व्यत्यय आणणार नाहीं याची जबाबदारी माझ्याकडे लागली..."

* * *

" मत्प्रिय दादा,

" तुम्ही महर्षींच्या पायांशीं ठाण मांडायचा निश्चय केलेला तुमच्या पत्रावरून कळला. मला अतिशय आनंद झाला. या कार्यात भगवान आपल्याला नक्कीच शुभाशीर्वाद देतील. अन् एका बहिणीच्या प्रार्थनेचा जर उपयोग होण्यासारखा असेल तर तीहि हजर आहे..."

आतां कुमारीच्या स्नेहानें नवें रूप धारण केलं. तेव्हां तिच्या पत्रांचें स्वरूप असें होऊं लागलें:

" प्रियतम कुमार,

"...परमेश्वरानं इतक्या वर्षांच्या अस्पष्ट व्यथेची परिणति जळत्या ज्वालेंत करून ठेवली. पण सगळ्यांत मोठा फरक हा झाला कीं ही व्यथा कां व तिची ज्वाला कां झाली हें मला कळतंय.

" अखेर तुम्ही मला सांपडलांत. या जाणिवेच्या जोरावर मला आतां कंबर कसून उभी राहतां येतंय अन् अंतःकरण एकवटून मला कार्यमग्न होतां येतंय. याच्याच जोरावर मला ध्येय गांठायला व ध्येयवाद्याच्या सहवासाला अधिक लायक होतां येतंय.

"माझ्या मनाची दुर्बलता व मनांत येणाऱ्या कुविचारांबद्दल तुम्ही मला उदार हृदयानं क्षमा करावी. ते मागं सारायसाठीं मी प्रयत्नांची पराकाष्ठा करीन. देव करो अन् माझ्यामुळं तुमच्या कार्यात कधीं व्यत्यय न येवो अन् तुमच्या ध्येयाची सेवा माझ्या हातून कशा रीतीनं होऊं शकेल हें मला कळो येवढीच माझी प्रार्थना आहे. परमेश्वर तुमचं प्रसन्न मन ठेवो. आतां अन् सदैव अन् जन्मोजन्मीं तुमचीच......"

* * *

" प्रियतम कुमार,

"...परमेश्वर मला शक्ति देऊं लागलाय, माझी समजूत पटूं लागलीय, अन् माझ्या व्यथेची परिणति आनन्दांत—गंभीर आनन्दांत—होऊं लागलीय......

"...म्हणजे आपण इथवर आलों तर! या बोज्यामुळं घाबरूं नका! मला आपल्या ध्येयप्राप्तीच्या साधनांपैकीं एक समजा.

"...माझ्या कार्यक्षमतेचा जितका उपयोग व्हायला पाहिजे होता तितका पुरतेपणीं कधींच करून घेतला गेलेला नाहीं कारण तुम्ही येऊन तिला जाग आणीपर्यंत ती मूर्च्छित अवस्थेंत असल्यासारखी होती.

"सदैव तुमचीच..."

* * *

"मत्प्रिय कुमार, अत्यंत प्रिय दादा,

"तुमचं अमोल पत्र आलं. येतांक्षणीं मी तडक सरळ महर्षींच्या चरणांपाशीं गेल्यें. ते एकटेच होते. मी तें त्यांना दिलं. त्यांनीं तें सारं वाचलं. मग माझ्याकडे बघत ते म्हणाले—'हें फारच चांगलं पत्र आहे.'

"तुम्ही मला उत्तर धाडाल अशी आशा करायचंहि धाडस मला करवत नाहीं—किंबहुना मी तुम्हांला नाखूष केलं असावं अशी धास्ती बसलीय मला...आजच सकाळीं मी एकटीच टेंकडीवर फिरत होत्यें, त्या वेळीं माझ्या हृदयव्यथेमुळं माझे डोळे आंसवांनीं भरून आले. पण आतां तुमचं पत्र माझ्या हातीं आहे अन् माझ्या दादाला माझ्याजवळून कुणी हिरावून नेणार नाहीं, तो सदैव माझ्या कुशींतच राहील अशी आतां माझी समजूत झालीय...

" महर्षींना सारं कांहीं ठाऊक आहे, अन् ते आपल्याला मार्ग दाखवतील. काल मी एकटीच त्यांच्याबरोबर फिरायला गेल्यें होत्यें अन् तुमच्या बाबतींत त्यांच्याशीं माझं बोलणं झालं. महर्षींच्या आशीर्वादानं दिवसेंदिवस खरा मार्ग आपल्यापुढं खुला होत राहील......"

* * *

" अत्यन्त प्रिय दादा,

" तुम्ही लवकर इकडे येणार हें कळल्यामुळं मला अत्यंत आनंद झालाय......

" आतां मी माझ्या झोंपडींत राहिल्यें आहे. थोड्या दिवसांसाठींच हं. मी महर्षींना सांगितलंय कीं ही झोपडी माझ्या दादांची आहे, अन् मी कामासाठीं बाहेर गेल्यें कीं ते या झोंपडींत राहायला येतील......

" सदैव तुमची लाडकी बहीण......"

*　　　*　　　*

" अत्यंत प्रिय दादा,

" ......हा भूभाग मला जास्त कां आवडत होता? मी तुमच्या ठायीं माझं जीवन अर्पण केलं तेव्हां कळलं मला याचं कारण.

" ...सप्रेम सदैव तुमचीच......"

*　　　*　　　*

" मत्प्रिय कुमार दादा,

" ......मी तुमच्यावर अन्याय केला असं नका हं म्हणूं. माझ्यावर अन्याय व्हायचा कांहीं प्रश्नच नाहीं, पण तुम्ही आपल्यावर अन्याय करूं घेतां कामा नये हं; तशानं मला फार क्लेश होतील. परमेश्वरानं तुम्हांला अत्यंत शुद्ध सोन्याच्या मुशींतून ढाळलंय, अन् कोणत्याहि गोष्टीमुळं हें शुद्ध रूप मलिन झालं तर मला तें सहन नाहीं होणार. तुम्ही स्वतःशीं प्रामाणिक राहा अन् मला तुमच्याच जीवनाचा एक अंश समजून माझ्यावर विश्वास ठेवा. तुम्ही आपल्या आत्म्याला दुःख देऊं इच्छितां हें ऐकणंसुद्धां मला कधीं सहन होणार नाहीं ... तुम्हांला या साऱ्या कठोर वासनांचा अजिबात परिचय नव्हता हें मला ठाऊक आहे. तुम्ही सारं कांहीं चांगलंच आहे असं समजत होतां— अन् मीहि तसंच समजत होत्यें— पण कशाच्यामुळं तरी साऱ्या गोष्टी उलट्या पालट्या झाल्या. अन् माझ्या हृदयावरचे हे आघात मी रक्ताचं अर्घ्य देऊन पुरतेपणीं सहन केले..."

*　　　*　　　*

" प्रियतम दोस्त,

" ... तुम्ही मागच्या महिन्यांत इथून गेलांत त्यानंतर कांहीं दिवसपर्यंत मी विचार करीत राहिल्यें. मग मला माझा मार्ग स्पष्ट दिसूं लागला— मी आतां तपस्येचीं सारीं बाह्य चिन्हं सोडून दिलीं पाहिजेत व आपली सगळी शक्ति जनसेवेच्या कारणीं लावली पाहिजे पण यांत जर मला यशस्वी व्हायला हवं असेल तर मी माझ्या स्वभावाला साजेसं काम करायला स्वतंत्र झालं पाहिजे. कित्येक वर्षांपूर्वीं मी महर्षींच्या पायांशीं आल्यें तेव्हां स्वतःला त्यांच्या हातीं सोंपवून दिलं अन् त्यांनीं आपल्या संपूर्ण वात्सल्याची पांखर मजवर घालून मला पुरतेपणीं आपल्या ताब्यांत घेतली. केवळ माझ्या कार्यावरच नव्हे तर माझ्या विचारांवर व मनावरहि त्यांनीं आपला पगडा बसविला. अशी कडक शिस्त व शिक्षण मला भरपूर मिळालं, पण याच्या योगानं माझा आत्मविश्वास व माझं स्वत्व नष्टच झालं. कोणतंहि काम स्वतंत्रपणानं व कायमचं पतकरायची लायकी माझ्या अंगीं राहिली नाहीं. महर्षींच्या सहवासांत राहायच्या अगोदर माझ्या अंगीं आत्मविश्वास होता, उद्योगशीलता होती, अन् स्वतंत्र शक्ति होती. मी हें सारं घालवून बसल्यें. तुम्ही माझ्या जीवनांत प्रवेश केलांत तेव्हां मात्र माझ्या नैसर्गिक शक्तीला जाग आली....

" ... एकाच प्रकारच्या प्रेरणेनं आपणां दोघांना घरांतून बाहेर काढून अज्ञात दिशेला भिरकावून दिलंय—जन्मभूमीचं स्वातंत्र्य हें एकच ध्येय आज आपल्या हृदयांत भरून राहिलंय. आपल्या विचारांत फक्त येवढी एक तफावत आहे—आपण दोघं एक होण्यानंच आपल्याला आपल्या शक्तींचा पुरतेपणीं उपयोग करतां येईल अशीच माझं अंतःकरण व माझा आत्मा मला शंभर टक्के ग्वाही देतो; अन् तुम्ही या बाबतींत निराळं मत देतां. जोंपर्यंत तुमची अशी समजूत आहे, तोंपर्यंत मी वाद न घालतां तुमच्या इच्छेला मान देईन.

" सदैव तुमचीच ..."

* * *

ज्या जुलुमी राजाच्या तावडींतून जनतेला मुक्त करण्याचा आपण विडा उचलला आहे त्याचीच ही मुलगी आहे हें कुमाराला ठाऊक झालेलें होतें.

कुमारी ही सामान्य स्त्री नव्हे, तिचें हृदय अत्यंत शुद्ध आहे, हें तो जाणून होता. आपल्या कामांत मनापासून मदत करण्याची तिची इच्छा आहे याचीहि त्याला जाणीव होती. पण जें कार्य आपण अंगिकारलेलें आहे त्याची पूर्ति च्यवन आश्रमामुळें होऊं शकणार नाहीं, आणि कुमारीची मात्र सारी भिस्त च्यवन आश्रमावरच आहे, याबद्दल त्याची पूर्ण खात्री होती.

कुमारी जितकी जास्त आशा धरून कुमाराजवळ येत होती तितका तो तिच्यापासून जास्त दूर जात असलेला दिसत होता. तिचे इष्टमित्र तिची समजूत घालूं लागले म्हणजे ती त्यांना म्हणे— "मी जन्मजन्मांतरीं कुमारांचीच झाल्यें आहे. या वेळीं भेट तर झाली, माझ्या हृदयानं आपल्या प्रियकराची ओळख करून घेतली, पण प्रियकराला माझा विसर पडलाय. हें माझ्या एखाद्या जुन्या पापाचं फळ असावं; किंवा मला हा कुणाचा तरी शाप असावा. म्हणून मला प्रायश्चित्त घ्यावं लागेल."

एकदां कुमारीनें प्राण देण्याचा निर्धार केला. ऋषि व आश्रमवासी, साऱ्यांनाच चिन्ता पडली. कुमाराला बोलावणें गेलें—कुमारीचे प्राण वांचविण्या-साठीं कुमारावर दडपण आणणें हें ऋषीला आपलें कर्तव्य वाटलें. कुमार आला, पण त्याचें एकच उत्तर होतें— "मी केवळ बहीण या नात्यानंच तिचा स्वीकार करूं शकतों." आत्महत्येनें आपल्या प्रियतमाला दुःख होईल अशा विचारानें कुमारीनें प्राण देण्याचा बेत सोडून दिला. पण प्रियतमाची गेलेली आठवण जागृत करण्यासाठीं ती आपल्या साधनेला लागली.

कुमाराला कुणी तरी सांगितलें कीं त्याच्या वियोगामुळें कुमारी झुरणीला लागून फारच अशक्त झाली आहे. हें ऐकून कुमाराला फार वाईट वाटलें. च्यवन ऋषीनें कुमाराला समजावून सांगितलें-- "कुमारीच्या बाबतींत वाईट वाटून घ्यायची आवश्यकता नाहीं. तिची तर अशीच समजूत आहे कीं पूर्वजन्मीं तुमच्याशीं तिचा संबंध होता व भविष्यकाळींहि तो तसाच राहील. या जन्मीं तुम्हांला या संबंधाचा विसर पडलाय, याचं तिला दुःख वाटतंय, अन् एका अर्थानं सुखहि वाटतंय. या गोष्टीलाहि कुमारीनं आध्यात्मिक स्वरूप देऊन ठेवलंय अन् ती तपश्चर्या करीत आहे, पुराणाचं वाचन करीत आहे......" कुमारानें एकदां कुमारीची समजूत घालण्याचा प्रयत्न करण्याच्या निमित्तानें तिला लिहिलें—

" मतिप्रिय ताई,

"या खळबळीच्या दिवसांत जन्मभूमीवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक माणसाचं हें कर्तव्य आहे कीं सगळीकडलं लक्ष काढून घेऊन केवळ

देशाच्या स्वातंत्र्यासाठींच तेवढं काम करावं. ज्या साऱ्या जीवनाच्या ध्येयासाठीं मी जगलों अन् भयंकर कष्ट सहन करीत राहिलों तें ध्येय साध्य करण्याशिवाय दुसरा कोणताहि विचार मी माझ्या मनांत येऊं देऊं इच्छीत नाहीं. देशाची नाजुक अवस्था तुला दिसत नाहीं का? आपल्या जनतेच्या सेवेखेरीज दुसरा कोणताहि विचार तुझ्या मनांत आला तरी कसा? अन् त्या विचारानं तुला वेड लावलं अं? ...... कुमारी, परमेश्वरानं तुला पुष्कळसे गुण दिले आहेत. तूं स्वार्थी होऊं नकोस."

दोघांचेंहि या जन्मांत मीलन होऊं शकलें नाहीं.

या प्राचीन कथेंतल्यासारखी प्रलोभनें सरदारांच्या जीवनांतहि आलीं होतीं.

सरदार पॅरोलच्या दिवसांत येरवड्याहून थेट भावनगरला गेले. इथें ते किती तरी दिवसांपासून विचार करीत राहिलेले होते—"आमच्या कामांत विवाह बाधक होण्याऐवजीं साधक होण्याची वेळ आतां आलेली आहे." त्यांना असें वाटत होतें कीं आतां आपण ज्या राजकारणांत उजळ माथ्यानें उडी घेतलेली आहे त्यांत आपले वर्गशत्रू आपल्या विरुद्ध कोणतेंहि हत्यार उपयोगांत आणण्याचें शिल्लक ठेवणार नाहींत. तुरुंगांत जाण्यापूर्वी ते जेव्हां भावनगरला गेले होते, तेव्हां त्यांच्या एका मित्राच्या परिवारांतली तरुणी कुमारी प्रभावती दवे आपण देशसेवेप्रीत्यर्थ काय काम करावें म्हणून त्यांचा सल्ला विचारण्यास आली होती. सरदारांचा आवडता विषय होता व्यायाम. त्यांनीं सांगितलें—"तुम्ही स्त्रियांमध्यें व्यायामाचा प्रचार केला पाहिजे." पण प्रभावतीला आतांपर्यंत साहित्याची आवड जास्त होती. दोन तास वाटाघाट केल्यानंतर तिला व्यायामाची उपयुक्तता समजली. ती कर्वे विद्यापीठाची पी. ए. ( प्रदेयागमा ) होती. भावनगर सरकारनें अशा लायक तरुणीला शिष्यवृत्ति मंजूर केली व ती मुंबईनजीक कांदिवलीच्या सरकारी शारीरिक शिक्षण विद्यालयांत . दाखल झाली. सरदार तुरुंगांत असतांनाहि प्रभावतीचीं पत्रें त्यांना येत असत. त्यांतून प्रेम ओसंडत असे. सरदारांनींहि एकमेकांचा समानधर्मेपणा लक्षांत घेतलेला होता. पॅरोलवर जातांना ते कांदिवलीवरूनच भावनगरला गेले होते आणि त्याच वेळीं विद्यार्थ्यामार्फत निरोप पाठविण्यांत आला होता. भावनगरला येण्याबद्दल प्रभावतीनें पत्र पाठविलें. सरदारांनीं तार केली. प्रभावती आली. सरदारांना मामुली पद्धतीनें लग्न करण्याची इच्छा नव्हती. आणि प्रेमाची लांबलचक कहाणी ऐकवण्याची त्यांना आवश्यकता वाटत नव्हती. त्यांनीं तिला सरळ प्रश्न विचारला—"तुझ्या पत्रांतून प्रेमाचा वास येत होता. खरं आहे हें?" "वास वाचणाऱ्याला आला

असेल," येवढेंच उत्तर देऊन प्रभावती गप्प राहिली. सरदारांनीं सांगितलें कीं "लग्न करायचं मी ठरवलंय, पण माझ्या कॉमरेड्‌सनीं परवानगी दिल्यावर मगच लग्न करणार आहें मीं. तूंहि आपल्या आतांना विचारून ठेव."

दुबे ब्राह्मण असल्या विवाहाला कसची मान्यता देतात म्हणा! सरदार मुंबईला आले. कॉ. पी. सी. जोशी यांनीं लग्नाला परवानगी दिली. ता. २७ नोव्हेंबर १९४३ रोजीं तुरुंगांत परत जाण्याची तारीख होती. त्याच दिवशीं लग्न रजिस्टर करण्याचा दिवस मुकर करण्यांत आला व त्याचबरोबर पॅरोलची मुदत वाढविण्या-विषयीं सरकारला लिहिण्यांत आलें. पॅरोलची मुदत आणखी एक महिन्यानें वाढली. पंजाब सरकारनेंहि जन्मभूमीचें दर्शन घेण्यासाठीं पंधरा दिवसांची परवानगी दिली. आणि एका युगाच्या कालावधीनंतर आपल्या पत्नीसमवेत ते लालडूला गेले. सरकारनें पुन्हां दोन महिने पॅरोल वाढविला आणि शेवटीं फेब्रुवारी १९४४ मध्यें त्यांना सोडून दिलें.

आज सरदार पृथ्वीसिंह पुन्हां पूर्वींइतक्याच तत्परतेनें देशासाठीं कार्य करीत आहेत. ज्या व्यक्तीच्या बाबतींत आन्ध्र देशांत शेंकडों कथा महशूर आहेत त्या या मूर्तीला कधीं आन्ध्र किसान समक्ष पाहतात आणि त्यांचे भाषण ऐकतात. कधीं ते गुजरातमधील आपल्या जुन्या दोस्तांकडे जातात आणि बंगालच्या मदतीसाठीं त्यांना सढळ हातानें पैसे देण्यास सांगतात. आजहि त्यांचा देह तितकाच बलिष्ठ व आरोग्यसंपन्न आहे. आजहि त्यांची हिंमत तितकीच मजबूत आहे. आणि आज त्यांचे बरेचसे दोस्त व मित्र जे १९४२ च्या काळांत त्यांचा शब्दहि ऐकावयास तयार नव्हते त्यांना त्यांच्या बोलण्यांत तथ्य आहे असें वाटूं लागलें आहे.

सरदार पृथ्वीसिंग / अनु. मोडक स. ह.

★

नगर वाचनालय सातारा
५९९५
दा. नं. १३६८
चं. ३१५
भवानी पेठ